# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ६२

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०८.२०१६ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगस्ट-२०१६ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.०८.२०१६ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.पात्रे राम संभाजी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.खाडे तानाजी विठ्ठल

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.जावेद रमजान शेख

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४०. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४१. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४२. मा.अपर्णा निलेश डोके

४३. मा.अनंत सुभाष को-हाळे

४४. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४५. मा.जयश्री वसंत गावडे

४६. मा.पवार मनीषा काळूराम

४७. मा.प्रसाद शेट्टी

४८. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५३. मा.वाबळे संजय मल्हारराव

५४. मा.मडिगेरी वर्षा विलास

५५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५६. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५७. मा.सुपे आशा रविंद्र

५८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५९. मा.मोहिनीताई विलास लांडे

६०. मा.अजित दामोदर गव्हाणे

६१. मा.गोफणे अनुराधा देविदास

६२. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६४. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६५. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६६. मा.लोंढे शुभांगी संतोष

६७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६९. मा.सावळे सिमा रविंद्र

७०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७२. मा.पालांडे सुजाता सुनिल

७३. मा.बहल योगेश मंगलसेन

७४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७५. मा.कदम सदगुरु महादेव

७६. मा.गिता सुशील मंचरकर

७७. मा.कैलास महादेव कदम

७८. मा.छाया जगन्नाथ साबळे

७९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

८०. मा.टाक अरुण मदन

८१. मा.आसवाणी सविता धनराज

८२. मा.वाघेरे सुनिता राजेश

८३. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८५. मा.काळे विमल रमेश

८६. मा.पाडाळे निता विलास

८७. मा.विनोद जयवंत नढे

८८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९०. मा.विमलताई सुरेश जगताप

९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९२. मा.बारणे निलेश हिरामण

९३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९४. मा.बारणे माया संतोष

९५. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९८. मा.कलाटे स्वाती मयुर

९९. मा.नांदगुडे विलास एकनाथ

१००. मा.चौंधे आरती सुरेश

१०१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२. मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०४. मा.जवळकर वैशाली राहुल

१०५. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०७. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

११०. मा.जम सोनाली पोपट

१११. मा.प्रशांत शितोळे

११२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

११३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११४. मा.गायकवाड संध्या सुरदास

११५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११६. मा.शेंडगे आशा सुखदेव

११७. मा.मोटे किरण बाळासाहेब

११८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११९. मा.संजय केशवराव काटे

१२०. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२१. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप - नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त,मा.पाटील,मा.तुपे,मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे,मा.माने,मा.खोसे,मा.दंडवते,मा.कडूसकर,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.आष्टीकर,मा.लोणकर -सहा.आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.कांबळे-शिक्षणाधिकारी(माध्यमिक),मा.पाटील-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.पिरजादे,मा.बरशेट्टी,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार,मा.शेख,मा.पुजारी, मा.गायकवाड-कार्यकारी अभियंता, मा.बोदडे-प्रशासन अधिकारी, मा.मोरे-सह.व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल,मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) मा.महापालिका सभा क्रमांक- ५९ दि.२०/५/२०१६ (दु.२.०० व २.२०) व दि.२०/६/२०१६ (दु.१.००) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

ब) मा.महापालिका सभा क्रमांक-६० दि.२०/६/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

<u>**प्रश्नोत्तरे**</u>

**मा.नगरसचिव**– मा.सिमा सावळे व मा.आशा शेंडगे यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.सिमाताई सावळे यांना एक विनंती आहे की, उशीर खूप झाला आहे. पुढील सभेमध्ये प्राधान्याने विषय घेतला तर बरे होईल.

**मा.सिमा सावळे** – मी आत्ताच मा.महापौर साहेबांना पण विचारले होते. मा.नगरसचिव यांचे म्हणणे आहे की, पुढील वेळी वगळण्यात येतील. मा.महापौर यांनी परवानगी दिली की पुढील वेळी प्रश्नोत्तरे घेण्यात येतील तर वगळण्याचा प्रश्नच आला नाही पाहिजे. तो मा.महापौर यांचा अधिकार आहे.

**मा.नगरसचिव**–आदरणीय महापौर मॅडम, सन्मा.सभागृह, नियम क्रमांक ९९ प्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित असतील आणि प्रश्न विचारला नाही तर ती प्रश्नोत्तरे वगळण्यात येतील. अशी तरतूद आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, सन्मा.सदस्य सभागृहात नसतील तर प्रश्नोत्तरे वगळण्यात येतील.

**मा.योगेश बहल-**आपण मा.महापौर साहेबांना विनंती केली आहे की, पुढील अजेंडावर मा.सिमा सावळे यांचे विषय प्राधान्याने घ्यावेत.

**मा.महापौर-**सन्मा.सदस्या मा.सिमा सावळे यांची प्रश्नोत्तरे पुढील सभेमध्ये प्राधान्याने घेण्यात येतील.

------

**मा.सुजाता पालांडे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक-१

दिनांक-२०.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/६/कावि/२७५/२०१६ दि.९/८/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२४ दि.९/८/२०१६

पी.एम.पी.एम.एल. अध्यक्षीय तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडील दिनांक १५/०७/२०१६ च्या पत्रानुसार पी.एम.पी.एम.एल. संचालकांचा ठराव क्र.१८ दि.२/०७/२०१६ अन्वये पी.एम.पी.एम.एल. साठी एकुण १५५० बसेसे तीन पद्धतीने खालीलप्रमाणे उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन या तिन्ही प्रकारच्या धोरणांस प्राप्त होणा-या बसेससाठी आवश्यक डेपो व अनुषंगीक सुविधा यासाठी लागणारा निधी व पी.एम.पी.एम.एल. संचयनातील अतिरिक्त येणा-या तुटीचे आर्थिक दायित्व व वित्तीय संस्थांच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करण्यासाठी म.न.पा.ने महामंडळाच्या वित्तीय संस्थांसाठी हमी देण्याबाबत मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे प्रस्ताव सादर करुन होणारा निर्णय पी.एम.पी.एम.एल.कडे कळविणेस विनंती केलेली आहे.

१) दोन्ही म.न.पा.च्या दायीत्वानुसार ५०० बसेसची खरेदी करणे.

२) पी.एम.पी.एम.एल. च्या माध्यमातून फायनान्स मेकॅनिझम पद्धतीने ५०० बसेसची खरेदी करणे.

३) ए.एस.आर.टी.यु. माध्यमातून भाडे तत्वावर वातानुकूलीत ५५० बसेसची खरेदी करणे.
वरील पत्राच्या अनुषंगाने पुणे म.न.पा.ने त्यांच्या मा.स्थायी समितीमध्ये खालीलप्रमाणे मान्यता देऊन पुणे म.न.पा. मा.मुख्य सभेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

१) पी.एम.पी.एम.एल. साठी ७०० बसेस ह्या बाजारातून अर्थसहाय्य उभे करुन घेण्यात याव्यात.

२) १०० बसेस स्वतःच्या/म.न.पा.च्या निधीतून घ्याव्यात.

३) ७५० बसेस भाडे तत्वावर घेणेत याव्यात.

४) वरीलसाठी आवश्यक असलेली रक्कम बस खरेदीची विविध टप्पे पार पाडल्यानंतर पी.एम.पी.एम.एल. ला वेळोवेळी उपलब्ध करुन देण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस मान्यता देण्यात यावी.

५) मार्केट फायनान्स प्रमाणे करावयाची प्रक्रिया पी.एम.पी.एम.एल. मार्फत राबविण्यास व याप्रमाणे वित्तीय संस्थांना येणा-या वर्षामध्ये कर्जफेड परत करण्यास लागणारी वित्तीय हमी देण्यास व त्या वित्तीय सहाय्यातून पी.एम.पी.एम.एल. ने ESCROW अकांऊट उघडून त्यामार्फत पेमेंट अदा करणे.

६) वरीलप्रमाणे बसेस उपलब्ध झाल्यानंतर आवश्यक लागणारी संचलन तुटीची रक्कम/नविन बस डेपो उभारणे, नविन टर्मिनल बांधणे, जुने टर्मिनल व डेपो नुतनीकरण करणे या अनुषंगीक सुविधा उपलब्ध करुन पी.एम.पी.एम.एल. मार्फत सादर होणा-या प्रस्तावाच्या आर्थिक दायीत्व स्विकारण्यास मान्यता देणे तसेच या तिनही प्रकारच्या बसेस उपलब्ध करुन देणेसाठी महामंडळाच्या ठरावाप्रमाणे गठीत चार सदस्य समिती बस स्पेसिफिकेशन, परतफेड अदा करावयाचे नियम व त्याप्रमाणे वेळापत्रक, बेस्ट मार्केट फायनान्स प्रपोजल, सर्व्हिस लेव्हल अग्रीमेंट इ. ठरविण्याचे सर्व अधिकार चार सदस्य समितीस देण्यास मान्यता देणे.

पी.एम.पी.एम.एल. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचेकडील पत्र तसेच गठीत चार सदस्य समितीची दिनांक ६/०८/२०१६ ची मा.आयुक्त, पुणे म.न.पा. यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील सुचनांचे अवलोकन करुन पी.एम.पी.एम.एल. साठी १५५० बसेस उपलब्ध करुन देणेकामी खालीलप्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेच्या मान्यतेकामी सादर करण्यात आलेला आहे.

१) पी.एम.पी.एम.एल.साठी ७०० बसेसकामी बाजारातून वित्तिय संस्थांकडून अर्थसहाय्य उपलब्ध करुन खरेदी करणे व ही सर्व प्रक्रिया पी.एम.पी.एम.एल. मार्फत राबविणे.

२) १०० बसेस खरेदीकामी महापालिकेच्या दायीत्वानुसार सन २०१६-१७ साठीच्या अंदाजपत्रकीय तरतुदींतून पी.एम.पी.एम.एल. साठी निधी या लेखाशिर्षातून निधी उपलब्ध करुन देण्यास,

३) ७५० बसेस भाडे तत्वावर घेण्यास,

४) वित्तिय संस्थांकडून अर्थसहाय्य उभे करुन वित्तिय संस्थांस पी.एम.पी.एम.एल. कडून येणा-या वर्षामध्ये कर्ज परतफेड करण्यास लागणारी वित्तीय हमी देण्यास व त्या वित्तीय सहाय्यातून पी.एम.पी.एम.एल. ने आवश्यक ESCROW अकांऊट उघडून त्यामार्फत पेमेंट अदा करणे.

५) वरीलप्रमाणे बसेस उपलब्ध झाल्यावर पी.एम.पी.एम.एल.ला आवश्यक संचलन तुटीची रक्कम/आवश्यकता असलेल्या ठिकाणी नविन बस डेपो उभारणे, नविन टर्मिनल बांधणे, जुने डेपो/टर्मिनल नुतनीकरण करणे व अन्य अनुषंगिक सुविधा पी.एम.पी.एम.एल. त्यांच्या प्रस्तावातून उपलब्ध करुन देण्याचे आर्थिक दायीत्व स्विकारणे.

६) उपरोक्त तीनही प्रकारे बसेस उपलब्ध करुन देणेकामी पी.एम.पी.एम.एल. कडील चार सदस्य समितीस बस स्पेसिफिकेशन, परतफेड अदा करावयाचे नियम, त्याचे वेळापत्रक, बेस्ट मार्केट फायनान्स प्रपोजल, सर्व्हिस लेव्हल अग्रीमेंट ठरविण्याचे अधिकार देण्यास

७) उपरोक्त प्रमाणे बसेस उपलब्ध करुन देण्यासाठी खरेदीच्या विविध टप्प्यांवर पी.एम.पी.एम.एल. ला आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त, पिं.चिं. यांना देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.महापौर** – या विषयाची माहिती द्यावी.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल)**– सन्मा.महापौर महोदया, सर्व सन्मा.सभागृह, परिवहन महामंडळाच्या मालकीच्या १४०२ बसेस आहेत. त्यात २०० बसेस पीपीपी तत्वावर चालविल्या जातात. ६५३ बसेस भाड्याने घेतलेल्या बसेस आहेत. एकूण २०५५ बसेसचा ताफा आपल्या ताब्यात आहे. यात वर्षभरात सर्वसाधारणपणे ३२४ बसेस स्क्रॅप कराव्या लागणार आहेत. म्हणजे त्यांचे आयुर्मान एकतर १२ वर्षे झालेलं असेल. किंवा १,४०,००० कि.मी. चालवल्या असतील अशा बसेस स्कॅप करायची आपली पॉलिसी आहे. त्यानुसार या १२ महिन्यांत ३२४ बसेस स्क्रॅप होणार आहेत. ही वजाबाकी केलीतर आपल्याकडे १७३१ बसेस राहतात. आयटीडीपी नावाची संस्था आहे. त्यांच्या नॉर्मस् नुसार एक लाख लोकसंख्येला ५१ बसेस पाहिजेत. पीएमसी व पीसीएमसीचा एरिया व आजूबाजूचा परिसर आहे, त्यासाठी एकूण ६५ लाख लोकसंख्या जर धरलीतर आपल्याकडे ३३१५ बसेस असल्या पाहिजेत. ३३१५ मधून हा १७३१ आकडा काढलातर आपल्याकडे साधारणपणे १५८४ बसेस पाहिजेत. ही बाब विचारात घेऊन पीएमपीएलच्या सन्माननीय बोर्डाने बीओडीने दि.२ जुलै २०१६ ला ठराव केला होता. या १५५० बसेस तीन प्रकारे घेता येतील किंवा घ्याव्यात. त्यांनी पहिला मार्ग दिला आहे. ५०० बसेस मालकी तत्वावर घ्याव्यात. ३०० बसेस पीएमसी फायनान्स करेल. २०० बसेस पीसीएमसी फायनान्स करेल. पहिल्या ५५० बसेस एसआरटू कडून भाड्याने घ्याव्यात. आणि दुस-या ५०० बसेस मार्केटमधून लोन घेऊन घ्याव्यात. अशाप्रकारे ५५० बसेस घेण्याबाबतचा हा ठराव मा.बोर्डाने केल्यानंतर आपल्याकडे विनंती करण्यात आली. पीएमसी व पीसीएमसी दोन्हीकडील आयुक्तांना विनंती करण्यात आली. आजची जी पोझिशन आहे. पुणे महापालिकेत परवा १० तारखेला जो विषय मंजूर झाला होता, त्यानुसार तो पीएमसीचा निर्णय होता. आपल्या माहितीसाठी सांगतो की, ५०० ऐवजी सुरुवातीला १०० बसेस खरेदी कराव्यात. त्यातील ६० बसेस पीएमसी करेल व ४० बसेस पीसीएमसी खरेदी करेल. या ५५० एसीबसेस एसआरटी म्हणजे असोसिएशन ऑफ रोड

ट्रान्सपोर्ट यांच्याकडून भाड्याने घ्याव्यात. ही केंद्रशासन अंगीकृत संस्था आहे. आपण त्यांना सांगणार आणि ते आपल्यावतीने टेंडर करुन ही एजन्सी आपल्याला देणार. आपण त्यांना प्रति किलोमीटरप्रमाणे पैसे देणार आहोत. ५५० बसेस भाड्याने घ्यायच्या व ९०० बसेस याकरिता बँकैकडून लोन घेऊन खरेदी कराव्यात. बँक असेल,फायनान्शियल इन्स्टिट्युट असेल त्यांच्याकडून ९०० बसेस घ्याव्यात. सन्मा.पुणे महानगरपालिकेने ठराव पारित केला आहे. हा सन्मा.सभागृहाचा अधिकार आहे. माहितीसाठी हे सांगितले आहे. सन्मा.सभागृहाने निर्णय घ्यावा.

**मा.दत्ता साने**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आज खरेतर उशीर झाला आहे. या विषयावर सगळ्यांना खूप काही बोलायचे आहे. पीएमपीएल आपल्याला सवतीची वागणूक देते आहे. त्यावरून बराच वेळ जाणार आहे. म्हणून आपल्याला विनंती आहे की, हा विषय तहकूब करा व पुढील सभेला हा विषय घ्यावा.

सन्मा.महापौर, सन्मा.आयुक्त व सन्मा.सभागृह, पीएमपीएमएलच्या माध्यमातून अनेक वेळा ज्या-ज्या वेळी त्यांनी मागणी केली आहे, त्या-त्या वेळी अनेक वेळा विषय मंजूर केला आहे. मोरे साहेब, आपण पहिल्यांदाच सभागृहात आला आहात. याआधीही दोन दोन/तीन तीन तास पीएमपीएमएलच्या विषयावर चर्चा झाली आहे. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला विनंती करतो की, मा.महापौर साहेब व स्थायी समिती सभापती हे दोनच आमचे मेंबर पीएमपीएमएलच्या कमिटीवर आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची जी पूर्वीची पीसीएमटी होती, ते व पीएमटीतले हे कामगार एकत्र आले. त्यांची कर्मकहाणी खूप विचित्र आहे. पीएमपीएमएल आमच्या कामगारांना सवतीची वागणूक देते आहे. ज्या-ज्या वेळी आपल्या महापालिकेने किंवा आपल्या कामगारांनी ड्युटी चेंज करुन द्या म्हणून मागणी केली. तुमच्या लाडक्या कामगारांनी ड्युटी चेंज करुन द्या म्हणून मागणी केलीतर त्यांना ड्युटी चेंज करुन दिली जाते. आमच्या कामगारांना ड्युटी चेंज करुन दिली जात नाही. इथपर्यंत अधिकारी त्यांना हॅरॅसमेंट करत आहेत. त्यांना रजा कधी मंजूर होत नाहीत. त्यांना रुट कधी त्यांच्या मनाप्रमाणे दिले जात नाहीत. महापालिकेच्या कामगारांप्रमाणे त्यांना कधीही वागणूक दिली जात नाही. एवढे सगळे असताना आपण त्यांना प्रत्येक वेळी, अनेक वेळा त्यांनी पैसे मागितले त्याप्रमाणे त्यांना पैसे देत राहिलो आहोत. त्यांनी परत नवीन बस खरेदीचा प्रस्ताव मांडला आहे. मी जाहिरपणे सांगतो की, तिथेपण सवतीची वागणूक का दिली जाते. आजही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत नवीन किती बस आहेत आणि जुन्या बसेस किती आहेत, याचा पूर्वी सर्वे केला आहे. जवळपास ७० टक्के बसेस रुटवर बंद पडलेल्या आहेत. ७० टक्के बसेस जुन्या दिलेल्या आहेत. हे सगळे असताना परत त्यांना पैसे द्या. परत त्यांचे दुकान थाटा. यासाठी हा विषय. ज्या-ज्या कामगारांचे हाल होत आहेत. नगरसेवकांनी अनेक वेळा त्यांच्या व्यथा

मांडायचा प्रयत्न केला आहे. मग कोणी त्यांच्या वॉर्डातला असेल, कोणी त्यांच्याशी संबंधित असेल. पूर्वी अधिकारी अष्टिकर साहेब होते, गवळी साहेब होते. या लोकांना सुद्धा अनेक वेळा त्यांच्याकडे सुद्धा पाठवले आहे. अनेक वेळा सांगितले आहे, त्याचा घरगुती प्रॉब्लेम आहे, त्याला कुठलातरी एखादा घराजवळचा रुट द्या. त्यांच्या रूटच्या वेळादेखील अशा आहेत की, त्याला निगडीला जॉईन व्हायचे असलेतरी त्याने पहिले पुण्याच्या ऑफिसला यायचे. त्याने जर निगडी इथूनच कामाला सुरुवात केलीतर तुम्हाला काय अडचण आहे. भोसरी इथून कामाला सुरुवात केलीतर तुम्हाला काय अडचण आहे. नियम/अटी इतक्या अवघड केल्या आहेत की, काही लोक घरी थांबले आहेत. त्यांची कामावर जायची पण मनःस्थिती नाही. पीएमपीएमएलचे वरिष्ठ अधिकारी आमच्या पूर्व पीसीएमटीच्या कामगारांची पिळवणूक करायचा प्रयत्न करत आहेत. हा माझा शंभर टक्के पुराव्यासहित आरोप आहे. यापूर्वी ४/५ जणांची बदली केली. भोसरी डेपोवरुन शिफ्टींग करायला ते निगडी डेपोला येतात. त्यांचा घरगुती प्रॉब्लेम होता. त्याला जॉईन करा म्हणून सांगितले होते. तो कंडक्टर आहे. त्याला केले नाही. आमचे लोक कुठेतरी हडपसरला पहाटे साडेतीन/चारला जातात. जर आमच्या लोकांना हा नियम लावत असालतर पुण्यातल्या कामगारांना आमच्याकडे ड्युटी द्या. पुण्यात राहणारे किती कामगार इथे काम करतात त्याची यादी द्यावी. आमचे किती लोक काम करतात त्याची तुम्ही यादी द्यावी. का सवतीची वागणूक देताय. नियमाप्रमाणे जे-जे ठरले आहे. आम्ही आजपर्यंत का दिले आहे कारण आमचे कामगार आहेत म्हणून दिले आहे. आख्या सभागृहाने विरोध केला आहे. की आम्ही तुम्हाला द्यायची काही गरज नव्हती. माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे. पिंपरी चिंचवडचे किती कामगार आहेत, आमच्या रुटवर किती बसेस आहेत. खरेदी केलेल्या बसेसपैकी किती बसेस आमच्या रुटवर चालू आहेत. किती जुन्या बसेस चालू आहेत. चिखली-थरमॅक्स चौक हा सगळ्यात जास्त पैसे मिळवून देणारा रुट आहे. तुमच्या रेकॉर्डवर आहे. चिखली चौकात अनेक वेळा जुन्या बसेस बंद पडतात. हे अनेक वेळा सांगितले आहे. अनेकवेळा मागणी केली आहे. तिथे कोणत्याही नगरसेवकाचे ऐकत नाहीत ना चेअरमन यांचे ऐकतात. ना मा.महापौर यांचे ऐकत नाहीत. तिथे मनमानी कारभार करायचा असेलतर आम्ही तुम्हाला पैसे का द्यायचे. आम्हाला सेपरेट करुन द्या म्हणून आम्ही मागणी केली होती. आमची जुनी पीसीएमटी होती ती आम्हाला आमची द्या. आमच्या वाट्यापेक्षा जास्त पैसे द्यायचे काम आम्ही करतोय. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, माझे दोन प्रश्न आहेत. पिंपरी चिंचवडमधील किती कामगार पुण्यातील रुटवर आहेत व पिंपरी चिंचवडमधील रुटवर पुण्यातले किती कामगार आहेत. ज्या बसेस आमच्या भागात येतात, त्यात जुन्या बसेस किती आहेत. आमची पूर्वी ॲग्रीमेंट काय होती. पीसीएमटी व पीएमटी याची खरेतर आकडेवारी द्यावी.

**मा.सुरेश म्हेत्रे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पीएमपीएमएलचे एकूण उत्पन्न किती आहे,त्याचे आकडे सांगा. पिंपरी चिंचवडची संख्या किती आहे.

**मा.आष्टिकर (सहा.आयुक्त)-**एकूण संचालक दहा आहेत. त्यापैकी मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब व मा.स्थायी समिती अध्यक्ष आहेत.

**मा.सुरेश म्हेत्रे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आपण ४० टक्के वाटा देतोय. अजून एक सदस्य घेतला पाहिजे. मग तो उपमहापौर असेल किंवा अन्य कोणी सदस्य असेल. पिंपरी चिंचवडला न्याय मिळत नाही. पगाराला पण ४० टक्के वाटा देतोय. आमचे पूर्व पीसीएमटीतील किती कर्मचारी पीएमपीएमएलमध्ये आहेत. ४० टक्के वाट्याप्रमाणे तेवढ्या प्रमाणात कर्मचारी आहेत का.

**मा.संजय काटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ता मा.सुरेश म्हेत्रे साहेबांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्याला माझे अनुमोदन देतो. आपण त्याची दक्षता घ्याल अशी अपेक्षा बाळगतो. आपल्याकडे २०५५ गाड्या आहेत. त्यांची विभागणी कशी केली आहे. पुण्याला किती आणि पिंपरी चिंचवडला किती केली. आत्ता आपण नॉर्मस् सांगितले की, १ लाख लोकसंख्येला ५१ गाड्या. त्याप्रमाणे पिंपरी चिंचवडचा विचार केलातर २०५५ गाड्यांची विभागणी करुन ७०० गाड्या पीसीएमसी हद्दीत चालल्या पाहिजेत आणि पुणे शहराच्या हद्दीतून १४०० गाड्या चालल्या पाहिजेत. दोन्हीकडील लोकसंख्येचा विचार केलातर ३३१५ गाड्या पाहीजेत असे तुम्ही म्हणताय. २०५५ ही बसगाड्यांची संख्या अपूरीच आहे. २०५५ पैकी ७०० गाड्या तुम्ही आम्हाला दिल्या आहेत. पण या ७०० गाड्या आमच्याकडे चालतात का. याची आधी माहिती हवी आहे. पुण्याकडे १४०० व आमच्याकडे ७०० हे प्रमाण असेलतर त्याप्रमाणे आमच्याकडे ७०० गाड्या चालत नसतील तर का चालत नाहीत, काय अडचण आहे याची सुद्धा आम्हाला माहिती द्यावी.

**मा.कैलासभाऊ थोपटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज इथे पीएमपीएमएलचा विषय आला होता. मी पीएमपीएमएलला अनेकवेळा पत्र दिले आहे. काही गाड्या काळेवाडी,रहाटणी भागातून जात असताना त्या गाड्या खूप फिरून जातात. निगडीतून निघालेली गाडी रहाटणी चौकातून पुढे साई चौकात, साई चौकातून पुढे औंध गावातून जायला पाहिजे. ती तशी न जाता पिंपळे सौदागर मार्गे पिंपळे गुरव, सांगवीतून फिरून औंधमध्ये जाते. पिंपळे गुरव मधून पुणे स्टेशनला गाडी जाणार असेलतर एवढी फिरून का जाते. त्यामुळे अनेक विद्यार्थी, कामगारांचा अर्धा तास वेळ वाया जातो आहे. मारे साहेब, यात लक्ष द्यावे. काळेवाडीवरुन पुणे स्टेशनला जाणा-या गाड्या आहेत. निगडीवरुन पुणे स्टेशनला जाणा-या गाड्या आहेत. या गाड्या रहाटणी चौकातून जाऊन साई चौकातूनच औंधला गेल्या पाहिजेत.

अनेक वेळा पत्र देऊनसुद्धा अधिकारी दूर्लक्ष करीत आहेत. बीआरटी बसस्टॉपला नावे दिली आहेत. काही नावे चुकीची दिली आहेत. आपल्याला सहा महिन्यांपूर्वी पत्र दिले होते. या विषयावर अनेक वेळा चर्चा होते. परंतू त्यावर निर्णय होत नाही. आज शिवार हॉटेल, साई चौकात जो बसस्टॉप आहे, तो बसस्टॉप रहाटणी गावाच्या हद्दीत आहे. तिथे साई चौक, पिंपळे सौदागर असे नाव दिले आहे. हा बसस्टॉप पिंपळे सौदागरमध्ये नसून रहाटणी गावात आहे. त्याच्यावर काहीही निर्णय झालेला नाही. त्या बसस्टॉपचे साई चौक, रहाटणी असे नाव द्यावे अशी मी सभागृहाला, मोरे साहेबांना विनंती करतो. धन्यवाद.

**मा.शारदा बाबर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज पीएमपीएमएलचा विषय विषयपत्रिकेवर आला आहे. त्यांना कितीवेळा विचारले. पत्र पाठवले आहे. स्पेशल बस देत नाहीत. पण निगडी रोडवरुन बस येऊ द्या. किंवा शाहूनगरवरुन असू द्यात. आमच्या वॉर्डात बस जाऊ द्या. मी त्यांना प्रत्येक वेळी पत्र देते आहे. ते प्रत्येक वेळी रिस्पॉन्स नाही म्हणून पत्राचे उत्तर देत आहेत. त्यांनी रिस्पॉन्स कधी पाहिला, ४/५ वर्षांपूर्वी. आजची लोकसंख्या, त्यावेळची लोकसंख्या याचा विचार करा. माझा वॉर्ड झोपडपट्टीचा वॉर्ड आहे. आपण सेवा कुणासाठी करतो. श्रीमंत सगळे गाड्यांमधून फिरतात. आपण वारंवार मागणी करुन सुद्धा ते सांगतात की तिथे बसला रिस्पॉन्स नाही म्हणून. तरीसुद्धा मी तिथे आधीच बसस्टॉप बसवून घेतला आहे म्हणजे तिथे कधीतरी बस येईल. सगळ्या बसस्टॉपवर नगरसेवकांचे फोटो आहेत. आम्ही फोटो लावलेले नाहीत. पण बस चालू झाली नाहीतर त्या बसस्टॉपवर मी मा.महापौर मॅडम व आयुक्त साहेबांचा फोटो लावेल. बीनाबसचा बसथांबा. माझ्या वॉर्डमध्ये यशवंतराव चव्हाण रुग्णालयात जाणारे नागरीक भरपूर आहेत. तरी मी मनापासून सांगतेय की, पीएमपीएमएल पिंपरी चिंचवडला विश्वासात घेतेय का. पैसे घ्यायला इकडे येतात. काम करताना मात्र विचारत नाहीत. कोणत्याही रुटने न्या. पण आमच्याकडे बस चालू झाली पाहिजे. विद्यानगर,रामनगर भागातून बस गेल्या पाहिजेत.

**मा.सुनिता वाघेरे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी गेले तीन वर्षांपूर्वी पिंपरी वाघेरे ते डेक्कन ही बस चालू करावी असे पत्र वारंवरा दिले आहे. मी गेल्या महिन्यात स्वतः ५० महिलांना घेऊन पीएमपीएमएलच्या कार्यालयात घेऊन गेले होते. त्या मुली कॉलेजला जातात. मी मुलींचे आयडेंटीटी कार्ड घेऊन श्री.वाघमारे यांना भेटले होते. त्यांनी उत्तर दिले, ताई,आम्हाला खूप काम आहे. पुण्याचे आयुक्त आम्हाला खूप काम सांगतात. वेळ नाही. नंतर कधीतरी बघू. पुण्याचे चेअरमन घोडके तिथे होते, त्यांनी सुद्धा त्यांना सांगितले, त्या ताई खूप लांबून आल्या आहेत. तुम्ही त्यांची दखल घ्या. आम्हाला हौस आहे म्हणून आम्ही तिथे जात नाही. जर एवढ्या महिला रोज अपडाऊन करत असतील तर तुम्ही त्यांच्यासाठी एक बस का चालू करत नाहीत. ते सरळ उत्तर देतात की, भरणा नाही आहे. तुम्ही बस चालू करत

नसालतर भरणा कसा होईल. पुणे-मुंबई रोडवर येण्यासाठी रिक्शावाले साठ रुपये घेतात. हे साठ रुपये कोण देणार आहे, पीएमपीएमएल देणार आहे का. मा.महापौर, तुम्ही आमच्या वतीने पीएमपीएमएलच्या मिटींगला नेहमी जाता, तेव्हा आमचे हे प्रश्न तिथे मांडा. मी चेअरमन मा.डब्बू आसवानी यांच्या सुद्धा कानावर ही गोष्ट घेतली आहे. तरी तुम्ही पिंपरी वाघेरे ते डेक्कन अशी बस चालू करावी, एवढीच माझी विनंती आहे.

**मा.माया बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, याअगोदर पीएमपी-एमएलचे अनेक विषय या सभागृहात आले. त्यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक वेळा टिकाही केली, त्यातल्या त्रुटी दाखवून दिल्या. काही वेळा सूचनाही केल्या. त्यात प्राधान्याने पीएमपीएमएलमधील कर्मचारी असतील, त्यांच्या पदोन्नतीचा विषय असेल, नवीन बसखरेदीचा विषय असेल, नवीन बसरुटचा विषय असेल. पूर्वी या सभागृहात या विषयांवर अनेक वेळा चर्चा झाली आहे. मी त्याचा ऊहापोह पुन्हा करणार नाही. मला सभागृहाचा वेळ वाया घालवायचा नाही. पीएमपीएमएलचे जे अधिकारी इथे आले आहेत. मला त्यांच्याकडून काही प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. त्याचा खुलासा संबंधित अधिका-यांनी इथे करावा. अधिका-यांनी आपल्याला आत्ताच सांगितले आहे की, पीएमपीएमएलमध्ये किती बसेस आहेत. यातील किती बसेस नादुरुस्त आहेत, रुटवर किती आहेत. भाडेतत्वावर बसेस घेताना त्या निविदा काढून घेतो का थेट पद्धतीने घेतो. भाडेतत्वावर घेतलेल्या बसचा मार्ग कोणकोणता आहे. पीएमपीएमएलला यातून दरमहा मासिक उत्पन्न किती मिळते. तसेच भाडेतत्वावर ज्या बसेस घेतल्या आहेत, त्यांना किती किलोमीटर दराने पीएमपीएमएल पैसे अदा करते. भाडेतत्वावर घेतलेल्या बसेस कोणत्या एजन्सीमार्फत घेतल्या, त्यांची नावे आणि त्यांना आत्तापर्यंत किती रक्कम अदा केली आहे त्याचा खुलासा हवा आहे. नवीन बस खरेदी करणार अशी मागणी पिंपरी चिंचवडमधील नागरीकांनी केली का पुणे महापालिकेतील नागरीकांनी केली आहे. ज्या नवीन बसेस खरेदी केल्या आहेत त्या कोणासाठी केल्या आहेत. नवीन बसेस चालू करा. पुण्यातल्या हद्दीतील मार्ग व पिंपरी चिंचवड हद्दीतील मार्ग इथे क्लिअर करुन द्यायचे आहेत. तुम्ही बाजारातून ७०० बसेस घेणार आहात, ते अर्थसहाय्य उभे करुन घेणार आहात. हे अर्थसहाय्य आपण कोणाकडून घेणार आहात. निविदा काढून घेणार का आपण थेट पद्धतीने घेणार आहात. महामंडळाच्या ठरावानुसार समितीवर एकूण १० सदस्य आहेत. त्यातील तीन सदस्य पिंपरी चिंचवड महापालिकेतील आहेत. मग उर्वरीत ६ सदस्य कोण आहेत. माझ्या माहितीनुसार, पीएमपीएमएलमधील काही सन्माननीय सदस्य सुद्धा त्यात आहेत याचाही खुलासा करावा. पीएमपीएमएलचे अंतर्गत लेखापरिक्षण होते का. कारण अंतर्गत लेखापरिक्षणाचा विषय दरवर्षी सभागृहात होतो. परंतू त्याचा खुलासा दिला जात नाही. होत असेलतर सदस्यांना का दाखवला जात नाही. मा.महापौर साहेब, माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत. धन्यवाद.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पीएमपीएमएलचा विषय निघाला की सगळे नगरसेवक पोटतिडकीने विषय मांडत असतात. मी एका वेगळ्या विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छिते. मा.महापौर साहेब, आपली पीसीएमटी १९७४ साली स्थापन झाली होती त्यावेळी आपले तीन डेपो होते. शंभर बसेससाठी एक डेपो असावा असे सीआरटीचे नॉर्मस् आहेत आज लोकसंख्या एवढी वाढली आहे तरीसुद्धा आमच्याकडे निगडी, भोसरी व संत तुकारामनगर हे तीनच डेपो आहेत. जेव्हा जेएनएनयूआरएममधून नवीन बस घेतल्या होत्या, तेव्हा आम्ही २५ टक्के रक्कम दिली होती. पण दूर्दैवाने साहेब,सगळ्या जुन्या बसेस पिंपरी चिंचवडकडे पाठवल्या गेल्या आहेत. पुणेकर खूप हुशार आहेत. आम्ही सारखे म्हणतो, आम्हाला दुय्यम वागणूक मिळते, सवतीच्या मुलाची वागणूक दिली जाते असे सारखे का बोलले जाते आहे. कारण तुम्ही सांगायचे आणि आम्ही पैसे द्यायचे असेच आजवर केले आहे. तुटलेल्या, मुटलेल्या, रस्त्यात बंद पडलेल्या बसेस आम्हाला दिल्या जातात. म्हणून मा.मोरे साहेब, तुम्ही आम्हाला तातडीने अजून २ डेपोंची परवानगी दिली पाहिजे. एलबीटी चालू झाल्यामुळे फुगेवाडीचा जुना जकात नाका आत्तापण बंद अवस्थेत आहे. तिथे ५० बससाठी डेपो तयार करायचे म्हटलेतरी शून्य पैसे खर्च करुन तिथे डेपो सुरु करता येईल. डेपो चालू करण्यामागे दोन कारणे आहेत. एक म्हणजे आपल्या कर्मचा-यांना डेपो मॅनेजर असेल किंवा अन्य काही असेल, प्रमोशन मिळू शकेल. आमचा त्यात दुहेरी स्वार्थ आहे की, जर डेपोंची संख्या वाढलीतर ज्या शंभर बसेस नवीन खरेदी करतोय,त्या शंभरच्या शंभर बसेस पुण्याला न जाता आमच्याच डेपोत थांबतील. कारण आमच्या स्थायी समितीतून विषय मंजूर होतो. आमच्या स्वतःच्या पैशांनी आम्ही तुम्हाला १०० बसेस देतोय. या शंभरही बसेस पिंपरी चिंचवड एरियातच फिरतील. पुण्याला जातील पण रात्री मुक्कामाला आमच्या डेपोत येतील. सकाळी पुण्यात जातील. तुम्ही तपासणी करा. काय हरकत आहे. डेपोसाठी शहरात किती आरक्षणे आहेत, याची माहिती नगररचना विभागाकडून घ्या. आपल्याला कमीतकमी अजून दोन डेपोंची आवश्यकता आहे. आज चारशे, पाऊण चारशे बसेस आपल्या शहरात आहेत. ७०० अजिबात नाहीत. आमच्याकडे बसेसचा पुरवठा कमी आहे. नवीन बसेस इथेच राहिल्या पाहिजेत. आमचे कर्मचारी इथेच नोकरीला असतील. ते पंचींग करायला साडेतीन चारला पुण्यात जाणार नाहीत. आमच्या अधिका-यांना तुम्ही प्रमोशन्स दिली पाहिजेत. दोन डेपो करण्यासाठी तुमच्या काय अडचणी आहेत किंवा फुगेवाडीचा स्पॉट तुम्हाला माहिती आहे. तिथे ५० बसचा इमर्जन्सी डेपो, तो विषय झाल्याशिवाय तुम्ही १०० बस खरेदीची मागणी करु नका. याच्यामुळे दुहेरी फायदा होणार आहे. कर्मचा-यांचे प्रमोशन होणार आहे. आमच्या नागरीकांना नवीन व चांगल्या बसेस मिळतील. अडीचशे अनस्कील्ड् एम्प्लॉई भरले होते, ते तसेच्या तसे महापालिकेकडे हॅण्डओव्हर केले होते. त्यांच्या पगारापोटी महापालिका पीएमपीएमएलला पन्नास लाख वेगळे देते आहे. म्हणजे आमचे हे अडीचशे कर्मचारी आमच्या पगारावर तुम्ही वापरताय. मग तो कोणत्याही

विभागासाठी असो, पाण्यासाठी, लाईटसाठी असो, कुठेही असो. आम्ही हे पैसे तुम्हाला देतोय. म्हणजे तुम्हाला आमच्याकडून एक्सट्रा सुविधा मिळते आहे. पण आम्हाला तुमच्याकडून एक्स्ट्रा तर सोडाच पण आवश्यक ती सुविधा सुद्धा मिळत नाही.

अजून एक सूचना आहे, पुण्यामध्ये पुणे दर्शन अशी बस सुरु केली आहे. तशीच आपल्याकडेही पूर्ण पारदर्शक ग्लास असलेली अशी पिंपरी चिंचवड दर्शन अशी बस सुरु करा. या शंभर बसमधूनच तशाप्रकारच्या बसेस केल्या पाहीजेत. विमानाने येणा-या जाणा-यांची संख्या वाढली आहे. म्हणून लोहगावपासून आय.डी पार्क हिंजवडीपर्यंत बससेवा सुरु केली आहे. ते डायरेक्ट तिथून येतात, विमानाने जातात. तिथे टॅक्सीची अव्हेलेबिलिटी नसते किंवा जास्त भाडे द्यावे लागते. पिंपरी चिंचवड दर्शनमध्ये दूर्गा टेकडी आहे, मोरया गोसावी मंदीर आहे, केजूदेवी बंधारा उद्यान आहे. तशा तीन/चार बसेस या खरेदीमधून केल्या, जसे शहराचे भूषण म्हणून करता आलेतर ते आपल्यासाठी चांगलेच आहे. पुण्याने करायचे आणि नंतर आपण ते फॉलो करायचे. यापेक्षा आपण शहरासाठी वैशिष्ट्यपूर्ण असे काही का करायचे नाही जे त्यांनी फॉलो केले पाहिजे. मा.महापौर साहेब, मा.मोरे साहेबांनी हे स्पष्ट करावे की, आणखी दोन डेपो चालू करण्यासाठी काय अडचणी आहेत का. जकात नाक्याच्या जागा आमच्या आहेत. आमच्या शंभर बस तिथेच थांबतील, तिकडे जाणार नाहीत, इथेच थांबणार. अशाप्रकारची सूचना देते. सभागृहातील कोणाचा त्याला विरोध असणार नाही. या बस नागरीकांना वापरायला मिळतील, धन्यवाद.

**मा.राजेंद्र जगताप**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मला एवढेच सांगायचे आहे की, मागील महिन्यात एमएसईबी व विद्युत विभागाची मिटींग तुपे साहेबांनी लावली होती. त्या मिटींगला उपस्थित ४० नगरसेवक, नगरसेविकांनी आपल्या समस्या मांडल्या होत्या. या महिन्यात सर्व सदस्य व पीएमपीएमएलचे अधिकारी यांच्याबरोबर मिटींग ठेवावी. समस्या मांडण्यासाठी अशी मिटींग घ्यायची आवश्यकता आहे. पीसीएमटीच्या भरपूर समस्या आहेत. बस चालत नाहीत. बरेचसे रुट बंद पडलेले आहेत. ऑटोक्लस्टर असेल किंवा महापालिकेत असेल एकदा अशी मिटींग घ्यायची गरज आहे अशी सूचना देतोय.

**मा.राजेंद्र काटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, ख-या अर्थाने कर्मचा-यांच्या अडचणी असतील, बसविषयक अडचणी असतील, या बेसिक अडचणी वाढल्या आहेत. मोरे साहेब, अष्टेकर साहेब, तुम्हाला निश्चितपणे आठवत असेल श्रीकर परदेशी साहेब असताना त्यांच्या कार्यकाळात त्यांनी भाडेतत्वावरील बस कमी केल्या होत्या. आणि आपल्या बसेस जास्तीत जास्त चालवून त्यांनी पीएमपीएमएल नफ्यात आणली होती. पीएमपीएमएल फायद्यात कशी येईल याकडे त्यांनी लक्ष दिले होते. तुमच्याकडे व्यवस्थापन होते, त्यात त्यांनी बदल घडवून आणला. त्यांनी ख-या अर्थाने चांगल्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या

होत्या. परंतू ते गेल्यानंतर पूर्वकाळच पुन्हा आलेला जाणवतो. सर्वात महत्वाचे म्हणजे पिकअप अवर्समध्ये तुमच्या बस कधी पोहोचत नाहीत. इथे सांगावेसे वाटते की, मा.महापौरांच्या वॉर्डमधून, पिंपळे गुरवमधून ज्या बस येतात, त्यांची संख्या तुटपूंजी आहे. तुमचे काय लक्ष असेल हे एक विशेष आहे. मा.महापौर साहेब, ख-या अर्थाने मा.आयुक्त साहेब व मा.स्थायी समिती सभापती मी पहिल्यांदा तुमची माफी मागतो व विचारतो, तुम्ही तिथे कमिटीवर आहात. खरोखरच तिथे तुम्हाला कुठला अधिकार आहे का नाही. मा.मोरे साहेब आमच्या सदस्याला तिथे खरेच अधिकार आहे का नाही. इथे दरवेळी पीएमपीएमएलचा विषय निघाल्यानंतर प्रत्येक नगरसेवकाच्या एवढ्या तक्रारी असतात. आमचे महापौर साहेब, आयुक्त साहेब आज इतके वेळा दर महिन्याच्या मिटींगला तिथे येतात. पण दर महिन्याच्या जीबीत ते तिथल्या एकाही अधिका-यांना आणू शकत नाही. तुम्हाला कंपल्सरी केले पाहिजे. तुम्ही प्रत्येक सभेला हजर रहायला पाहिजे. आपण तिथे जाऊन आपली हेटाळणी करुन घ्यायची. काय कारण आहे. मा.आयुक्त साहेब, तुम्हाला विनंती करतो की, आपण दरवेळी पीएमपीएमएलला ४० टक्के वाटा देतोय, त्याचा तुम्ही थोडा फार उपयोग करुन घेऊ शकत नाही का. तुमचे अधिकार दाखवायची क्षमता तुमच्यात नाही का. प्रत्येक वेळी नगरसेवक तिथे कम्पलेण्ट घेऊन जातात. बसेसची कमतरता, सगळ्या गोष्टींची कमतरता तिथे सांगतात. आष्टीकर साहेबांकडे किती वेळा कम्पलेण्ट केली. त्यांनी किती तक्रारींची आत्तापर्यंत पूर्तता केली आहे. प्रत्येक मिटींगला, प्रत्येक जनरल बॉडी मिटींगला तुमचा एक अधिकारी इथे असायलाच हवा आहे अशी मागणी करतो. आणि पुढील काळात सुधारणा होईल अशा आशा बाळगतो. मा.सुरेश म्हेत्रे साहेबांनी इथे सांगितले होते. आम्ही ४० टक्के वाटा देतो तर आमचे चार सदस्य कमिटीत ऍड करा. त्यामुळे फरक पडेल, त्याचा उपयोग तरी होईल. त्यामुळे निश्चितपणे भविष्यकाळात याचा विचार करावा. आपल्या बसेसची संख्या निश्चित नाही. उदाहरण म्हणून सांगतो, पिंपळेगुरव रोडला विद्यार्थी संख्या एवढ्या मोठ्या प्रमाणावर असते. एकही विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचू शकत नाही. एकदा तुमचा अधिकारी तिथे येऊ द्या. त्याला येऊन बघू द्या. नुसते चेकर पाठवण्यापेक्षा तुमचा प्रॉपर अधिकारी तिथे पाठवा. सर्वेक्षण करा. चांगल्या सुविधा करा. आणि निश्चितपणे याचा उपयोग दुस-या ठिकाणी करा.

**मा.शमिम पठाण**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, पीएमपीएमएल व आपले नाते कसे आहे काही कळतच नाही. सवतीच्याही पलिकडचे वाईट नाते आहे. काहीही कारण असो, आम्हाला ते पैसे मंजूर करावे लागतात. शहरातून एवढा पैसा जातो. त्याप्रमाणात आपल्या पिंपरी चिंचवड शहरवासियांच्या अडचणी सुटतात का, अजिबात नाही. शून्य अडचणी सुटतात. जेव्हा अष्टीकर साहेब पीएमपीएमएलला होते. ते एकदा/दोनदा आले होते. आणि सर्व सदस्यांचा रुद्रावतार बघून मला वाटते, ते परत आलेच नाहीत. डायरेक्ट सहा.आयुक्त म्हणूनच आले. पीसीएमटीने त्यांना इथे पाठवले का कसे आले ते कळत नाही. पण ते आले. जर पिंपरी

चिंचवडच्या गरजा आपण त्यांच्या कानावर घातल्या. आपण दोघे त्याठिकाणी सदस्य म्हणून जाता, त्यावेळी सदस्यांच्या म्हणजे प्रत्येकाच्या प्रभागात पीएमपीएमएलच्या ज्या अडचणी आहेत. बससंदर्भात ज्या अडचणी आहेत, त्या तुम्ही सोडवून घ्यायला पाहिजेत. मा.महापौर, दुसरा पर्याय नाही. मा.महापौर साहेब, तुम्ही त्याबाबतीत सर्वांचे नेतृत्व करताय. आम्ही अर्ज दिला. तुम्ही आमच्या अडचणी सोडवायला आलात, तसे अधिकारी सांगतात. जरी महापौर किंवा आमचे आयुक्त तिथे काही कारणास्तव बोलले नाहीत. पुणेकरांसमोर आमची बोलायची काय टाप आहे, काय बिशाद आहे. एखाद्याने अर्ज केला, आम्ही बरेच अर्ज केले. पण उत्तर काय, येथे नवीन रुट देणे शक्य नाही. जे रुट चालू आहेत, आमच्याकडून एखादी बस वाढवा, शक्य नाही आणि मग नवीन रुट देत नाहीत. निगडी-औंध मार्गे, पुण्याला जाणा-या बस यांच्या रुटवर माझा प्रभाग आहे. म्हणून नवीन बसच नाहीत. निगडीवरुन कोथरूड-कात्रज औंध मार्गे बस केल्यातर आम्हाला सोयीचे होईल. निगडीवरुन आकुर्डीला जाणा-या बसेस चिंचवड गावातून गेल्यातर आमची सोय होईल. आहे त्या बस रुटवरुन थोड्याशा वळवून नेल्यातर आमचाही फायदा होणार आहे. आता शहरातील रस्ते पूर्वीसारखे दहा/बारा फूटांचे राहिलेले नाहीत. शहरातील बरेचसे अंतर्गत रस्ते हे रुंद झाले आहेत. सर्व सन्माननीय नगरसेवकांनी चांगल्या प्रकारचे रस्ते केले आहेत. आपण त्यांची पाहणी केली पाहिजे. तुम्हीला फक्त जुना मुंबई-पुणे रस्ता व औंध रोड तेवढाच दिसतो. त्याच रोडवर आपल्या बस धावतात. अंतर्गत रस्ते आहेत. तुम्ही आमच्याकडून ४० टक्के वाटा घेता मग निदान ४० टक्के बसेस पिंपरी चिंचवडमध्ये चालल्याच पाहिजेत. मा.आयुक्त साहेब, आपण बसस्टॉपवर कधी उभे राहिलात तर लक्षात येईल की, नवीन बस पुणेकरांसाठी आणि डब्बा गाड्या नक्कीच पिंपरी चिंचवडकरांसाठी. तुम्ही कधीतरी बस रुटवरुन जा. हा रोड सोडून द्या. तुम्ही भोसरीकडे उभे राहीलात, औंध रोडकडे गेलात, दापोडीकडे उभे राहीलात तर तुम्हाला कळेल बसेसची परिस्थिती कशी आहे. जशी बाहेर आहे, तशीच आतमध्ये असते. त्यादृष्टीने आत्ता बसेस घेणार आहोत. त्यातल्या ४० टक्के बसेस या आमच्या शहरासाठी नवीन बसेस आल्या पाहिजेत. त्या अंतर्गत रस्त्यावर धावल्या पाहीजेत. पिंपळे सौदागर बघा, पिंपळे निलख बघा, वाकड बघा, आमचा भाग बघा या सर्व बसेस अंतर्गत रस्त्यावर धावल्या पाहीजेत हे अत्यंत महत्वाचे आहे. पिंपरी चिंचवड व पुणे परिसर असलेली टेल्को कंपनीचे उत्पन्न खूप मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. आपण या नवीन बसेस टेल्को कंपनीकडून घ्याव्यात. याबाबतीत आम्ही आमच्या नेत्यांशी बोलू. दुसरे म्हणजे आमचे इथले जे कामगार आहेत, ते फर्स्ट शिफ्टसाठी तिथे पहाटे जाण्याऐवजी दुसरा मार्ग नसतो म्हणून तिथेच डेपोत झोपतात. फर्स्ट शिफ्ट असेलतर त्यांना लगेच दुसरी शिफ्ट देत नाहीत. त्यांना परत माघारी यावे लागते. त्यांना एकतर रुट देत नाहीत. त्यांची रजा लावतात. हे लोक गेले आठ/दहा वर्षांपासून तिथे रोजंदारीवर काम करत आहेत. तुम्ही दोन/चार महिन्याभरापूर्वी २०० लोक रेग्युलर केलेले आहेत. आणि नंतरचे लोक ज्यांचे आठ

दिवस कमी आहेत, पंधरा दिवस कमी आहेत. त्यांचे तेवढे दिवस भरल्यानंतर त्यांना पुढील महिन्यांत नियमित करतो असे तिथले अधिकारी म्हणाले होते. परंतू त्यांना अजूनही नियमित केलेले नाही. मा.अष्टीकर साहेब, तुमच्या विभागाने अशी खोटी उत्तरे दिलेली आहेत. मा.मोरे साहेब, तुम्ही याची नोंद करुन घ्या. कर्मचा-याला रेग्युलर करण्यासाठी त्याचे दिवस पूर्ण झाले असतीलतर त्यांना ताबडतोब रेग्युलराईज करुन घ्या. असे याठिकाणी सांगितले होते. आणि दुसरे म्हणजे, तिकीट आणि स्टॉप. ५०० मीटर लांब असलेल्या स्टॉपचे तिकीट अलिकडेच घेतले जाते. त्याबाबतीतसुद्धा तुम्ही काळजी घ्यायची आहे. अशाप्रकारे बसच्या कामात सुधारणा करणार असालतर लोकांना चांगली सेवा द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करते.

**मा.अनंत को-हाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मी २०१२ मध्ये निवडणूक जिंकलो आणि या सभागृहात आलो, तेव्हापासून प्रत्येक वर्षी पीएमपीएमएलला जेव्हा-जेव्हा पैशांची गरज लागते, तेव्हा-तेव्हा हा विषय येतो आहे. मला चांगले आठवतेय, मा.पठाणताई,मा.दत्ताकाका साने तीन वर्षांपूर्वी हेच बोलले होते, तेच तेच परत परत इथे होणार असेल, परत परत ठेचकाळणार असाल, त्यापासून धडा घेऊन सुधारणा होणार नसेलतर माझी मा.स्थायी समिती सभापती, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब यांना विनंती आहे की, आपण राजीनामा द्यावा. आपण पीसीएमटी पुन्हा चालू करण्यासंदर्भात विचार करावा. आपण ज्यांच्या पैशांच्या जीवावर बस खरेदी करणार आहोत, त्या नागरीकांना सुविधा मिळणार नसतील, त्यांना सेवा मिळणार नाहीत, तर मा.महापौर साहेब,तुम्ही नागरीकांच्या हितासाठी विचार करा. हे पीएमपीएमएल बास झाले आता. आपण पीसीएमटी चालू करु शकतो ना. नागरीकांसाठी पीएमपीएमएलच्या बस झाल्यातरी आपल्याला आपला कुठलाही रोड ठरवता येत नाही. रोड छोटा आहे तर छोट्या बस देता येतील. नागरीकांना सुविधा द्यायच्या असतीलतर सगळ्या दृष्टीने विचार करता येईल. आमची मागणी लक्षात घ्या. मग मिटींग घेण्यात काय मजा आहे का. हे लोक येणार, आपण तेच बडबड करणार. पुन्हा पुढच्या वर्षी तेच, असे किती वेळा करायचे. माझी विनंती आहे की, तुम्ही याचा ठोस निर्णय घ्या. प्रवाशांना, लोकांना कुठेतरी चांगल्या पद्धतीने सवलती देता येतील. कर्मचा-यांच्या किती समस्या आहेत. भरपूर कर्मचारी येतात, विचारतात. आमचे प्रमोशन होत नाही. आम्हाला बदली करुन मिळत नाही. त्यांना सुद्धा न्याय मिळत नाही. अशा ब-याच अडचणी आहेत. आपल्या कामगारांना न्याय मिळत नसेल, आपण त्यांना मदत करु शकत नसालतर याचा अर्थ काय होतो. आपली स्वतंत्र पीसीएमटी जशी होती तशी चालू करा. तुम्ही राजीनामा देऊन टाका. अशी माझी तुमच्याकडे मागणी आहे. माझे म्हणणे लक्षात घ्या.

**मा.महापौर** – राजीनामा द्यायचा का नाही ते आम्ही बघू. तुम्ही बोला.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब,तुम्ही सभागृहातील कोरम बघा. अजेंडावर महत्वाचे विषय आहेत. आम्हाला काही काम नाही म्हणून आम्ही सभागृहात बसलोय का. सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. मा.नगरसचिव तुम्ही कोरम आहे का ते बघा. कोरम कसा असतो ते सांगा. तुम्ही बेकायदेशीर सभा चालवू नका. कोरम तपासा.

**मा.महापौर** – तुम्ही पहिले खाली बसा. कोरम आहे का नाही ते बघू.

(सभागृहात गोंधळ)

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,सर्वच सदस्यांना पीएमपीएमएलच्या विषयावर पोटतिडकीने बोलायचे आहे.

**मा.महापौर** - पीएमपीएमएलच्या विषयासाठी नवीन सभा घेऊ यात. आजची सभा घेऊ यात.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, हा विषय मंजूर करणार का.

**मा.महापौर** – सन्मा.सदस्यांना बोलवून घ्या. हा विषय मंजूर करायचा आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, तुम्ही आत्ता कोरम बघा. तुम्हाला सभा चालवायची आहे. मग तुमचे सदस्य सभागृहात का नाहीत?

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आम्हाला सुद्धा बेकायदेशीर सभा चालवायची नाही. तुम्ही म्हणताय त्या पद्धतीने आम्हाला काहीच हरकत नाही. ज्या लोकांनी पीएमपीएमएलचे प्रश्न आत्ता मांडलेले आहेत. आज पीएमपीएमएलचे लोक कुणी आलेले आहेत. त्यांना आपले प्रश्न कळू देत. ते पुढील वेळी त्यांची उत्तरे देतील. विषयपत्रिकेवर एक विषय आहे, त्यात असे लिहिलेले आहे, पीएमपीएमएलचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडील पत्र. मा.सुलभाताई, मी त्यांना पीएमपीएमएलचे प्रश्न सांगते. ते पुढील वेळी आपल्याला त्याची उत्तरे सांगतील. तसेच चार सदस्यीय समिती दि.६/८/२०१६ चे मा.आयुक्त,पुणे महापालिका यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील सूचनांचे अवलोकन करुन पीएमपीएमएलसाठी १५०० बसेस उपलब्ध करुन देण्याकामी खालील प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत मा.आयुक्तांच्या मान्यतेकामी सादर करण्यात आलेला आहे. इथे पुणे मनपा व पुणे आयुक्त असा विषय दिला आहे. आमचे महापौर, आमचे आयुक्त त्या सभेला होते का. किंवा ही जी कमिटी केली आहे, या चार सदस्यांतील आमचे दोन सदस्य या कमिटीत आहेत का. आपल्याला हा विषय महत्वाचा आहे. मा.महापौर साहेब, जर स्थायी समिती सभापती, मा.आयुक्त साहेब व मा.महापौर त्या कमिटीवर आहेत. त्यांची मिटींग झाली आहे. त्यांनी चार सदस्यीय समिती स्थापन केली आहे. पुणे महापालिकेचे आयुक्त व यांच्यात ही मिटींग झाली होती. मग त्या मिटींगला पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त का नाहीत. आमच्या महापौर

त्यात का नाहीत. या चार सदस्यीय समितीत पिंपरी चिंचवड महापालिकेचे किती. याचा पहिला महत्वाचा खुलासा त्यात केला गेला पाहिजे. बाकीचे आमचे रोजचेच आहे. आम्हाला बसेस मिळत नाहीत, बसेस घाणेरड्या आहेत, बसेस बंद आहेत, तुम्ही बसेसचे काय करणार आहात. आम्हाला रुट देत नाहीत. पुण्यातल्या लोकांना सोयीस्कर रुट दिले जातात. पिंपरी चिंचवडच्या लोकांना पुण्यात ड्युटी दिल्या जातात. हे सगळे आहेच. अक्षरशः सगळे त्रासदायक आहे. परंतू शेवटी ट्रान्सपोर्टेशन हा शहराचा कणा आहे. म्हणून आम्ही दरवेळी तुम्हाला सहकार्य करतो. आम्हाला हे उत्तर पाहिजे आहे की, त्यात आमचे लोक आहेत का. याचा पहिला खुलासा करावा.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**सन्मा.महापौर महोदया,सर्व सन्मा. सभागृह, दि.२ जुलै २०१६चा मा.बीओटीचा जो ठराव झाला होता, त्यात जी बस कंपोनंट कमिटी आहे. त्या कमिटीत मा.अध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक म्हणजे आमचे सीएमडी पीएमपीएमएल, मा.आयुक्त पुणे महानगरपालिका, मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि सीआयआरटीचे डायरेक्टर मा.सतेज पाटील साहेब आहेत. या चार लोकांची ही समिती आहे. त्या समितीच्या वेळोवेळी बैठका झाल्या आहेत. जे बसचे स्पेसिफीकेशन आहे, सीआयआरटीने कोणत्या बसेस घ्याव्यात याविषयीचे स्पेसिफीकेशन सीआयआरटीने या समितीला सादर केले आहे. या समितीच्या वेळोवेळी बैठका झाल्या आहेत. या बैठकीला आपण नव्हतो, याची मा.आयुक्त साहेबांना कल्पना आहे. डॉकेटचे जे वर्डींग आहे त्याविषयी मा.आष्टिकर साहेब खुलासा करतील.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,डॉकेटचा खुलासा मा.आष्टिकर साहेब करतील. मी आयुक्त साहेबांना विनंती करेन की, आमचे सदस्य पोटतिडकीने बोलणार आहेत. त्यांच्या पीएमपीएमएलबाबत अनेक तक्रारी आहेत. कारण आमच्या पिंपरी चिंचवडच्या नागरीकांना चांगले ट्रान्सपोर्टेशन मिळाले पाहिजे. म्हणून सदस्य बोलत आहेत. तुम्ही आष्टिकर साहेबांना अजून एक पीएमपीएमएलचा चार्ज द्या. त्यांना कितपत गोष्टी माहित आहेत याच्यावर आम्हाला अजून यायचे आहे. त्यांना पीएमपीएमएलसाठी आणि नगरसेवकांसाठी कोऑर्डिनेट करा.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, आत्ता नगरसेवक कमी आहेत. आत्ता हा विषय घेऊ नका. त्यांना पण बोलायचे असेल. सभा नंतर घ्या.

**मा.योगेश बहल-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पीएमपीएमएलबाबत अनेक सदस्यांनी प्रश्न विचारले आहेत. पीएमपीएमएलच्या अधिका-यांनी त्या सर्व प्रश्नांची उत्तरे घेऊन यावीत. तोपर्यंत मंगळवार दि.२३/८/२०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत ही सभा तहकूब करण्यात यावी.

**मा.सविता साळुंके**– मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर-**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे ही सभा मंगळवार दि.२३/८/२०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ६२

## सभावृत्तांत

## (दिनांक २०.०८,२०१६ ची तहकूब सभा)

दिनांक – २३.०८.२०१६ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगस्ट-२०१६ ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.२३.०८.२०१६ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर

२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर

३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू

५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ

६. मा.भालेकर अरुणा दिलीप

७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने

८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)

९. मा.जाधव साधना रामदास

१०. मा.जाधव राहुल गुलाब

११. मा.आल्हाट मंदा उत्तम

१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर

१३. मा.काळजे नितीन प्रताप

१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर

१५. मा.पात्रे राम संभाजी

१६. मा.बाबर शारदा प्रकाश

१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१९. मा.उल्हास शेट्टी

२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.लोंढे गणेश नारायण

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६. मा.प्रसाद शेट्टी

४७. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४८. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४९. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५०. मा.शेख अस्लम शैकत

५१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५३. मा.वाबळे संजय मल्हारराव

५४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५५. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५६. मा.सुपे आशा रविंद्र

५७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५८. मा.मोहिनीताई विलास लांडे

५९. मा.अजित दामोदर गव्हाणे

६०. मा.गोफणे अनुराधा देविदास

६१. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६२. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६३. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६४. मा.लोंढे शुभांगी संतोष

६५. मा.सावळे सिमा रविंद्र

६६. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६७. मा.पालांडे सुजाता सुनिल

६८. मा.बहल योगेश मंगलसेन

६९. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७०. मा.कदम सदगुरु महादेव

७१. मा.गिता सुशील मंचरकर

७२. मा.कैलास महादेव कदम

७३. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७४. मा.टाक अरुण मदन

७५. मा.वाघेरे सुनिता राजेश

७६. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७९. मा.काळे विमल रमेश

८०. मा.पाडाळे निता विलास

८१. मा.विनोद जयवंत नढे

८२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८४. मा.विमलताई सुरेश जगताप

८५. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८६. मा.बारणे निलेश हिरामण

८७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८९. मा.बारणे माया संतोष

९०. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९१. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९२. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९३. मा.चौंधे आरती सुरेश

९४. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९५. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९६. मा.जवळकर वैशाली राहुल

९७. मा.जगताप राजेंद्र गणपत

९८. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१००. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०१. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०३. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०४. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०५. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०६. मा.संजय केशवराव काटे

१०७. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०८. मा.पाटील सुजित वसंत

१०९. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर,मा.माछरे,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.आष्टीकर,मा.लोणकर-सहा.आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.सवणे, मा.इंगळे,मा.पिरजादे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.कांबळे,मा.शेख,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.मोरे-कार्यकारी अभियंता,मा.बोदडे-प्र.अधिकारी,मा.मोरे-सह.व्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे-**मा.महापौर साहेब, जम्मू काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले जवान तसेच बी.आर.खेडकर-ख्यातनाम शिल्पकार,स्वामी महाराज-गुजरातमधील अक्षरधाम मंदिराचे निर्माते व प्रमुख,अशोक श्रीधर देवचक्के-माजी नगरसेवक,पुष्पलता बंड-माजी विभागीय आयुक्त दिलिप बंड यांच्या मातोश्री,श्रीमती ताराबाई नामदेव साने,कै.माऊली तुकाराम म्हेत्रे,अरविंद चिंचवडे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून दहा मिनिटांसाठी सभा तहकूब करणेत यावी.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.महापौर**- श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.महापौर**-सर्वांच्या संमतीप्रमाणे मंगळवार दिनांक २३/८/२०१६ रोजी दुपारी २.२० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ६२</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दिनांक २०.०८,२०१६, २३.०८.२०१६ (दु.२.०० वा.) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – २३.०८.२०१६</u> <u>वेळ – दुपारी २.२० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे ऑगस्ट-२०१६) दि.२३.८.२०१६ ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.२३.८.२०१६ रोजी दुपारी २.२० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१५. मा.पात्रे राम संभाजी

१६. मा.बाबर शारदा प्रकाश

१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१९. मा.उल्हास शेट्टी

२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.खाडे तानाजी विठ्ठल

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.लोंढे गणेश नारायण

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६. मा.प्रसाद शेट्टी

४७. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४८. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४९. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५०. मा.शेख अस्लम शैकत

५१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५३. मा.वाबळे संजय मल्हारराव

५४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५५. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५६. मा.सुपे आशा रविंद्र

५७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५८. मा.मोहिनीताई विलास लांडे

५९. मा.अजित दामोदर गव्हाणे

६०. मा.गोफणे अनुराधा देविदास

६१. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६२. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६३. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६४. मा.लोंढे शुभांगी संतोष

६५. मा.सावळे सिमा रविंद्र

६६. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६७. मा.पालांडे सुजाता सुनिल

६८. मा.बहल योगेश मंगलसेन

६९. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७०. मा.कदम सदगुरु महादेव

७१. मा.गिता सुशील मंचरकर

७२. मा.कैलास महादेव कदम

७३. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७४. मा.टाक अरुण मदन

७५. मा.वाघेरे सुनिता राजेश

७६. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७९. मा.काळे विमल रमेश

८०. मा.पाडाळे निता विलास

८१. मा.विनोद जयवंत नढे

८२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८४. मा.विमलताई सुरेश जगताप

८५. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

८६. मा.बारणे निलेश हिरामण

८७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८८. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे

८९. मा.बारणे माया संतोष

९०. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९१. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९२. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९३. मा.चौंधे आरती सुरेश

९४. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९५. मा.बोकड रामदास गेणभाऊ

९६. मा.जवळकर वैशाली राहुल

९७. मा.जगताप राजेंद्र गणपत

९८. मा.शितोळे शैलजा बाबुराव

९९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१००. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०१. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

१०२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

१०३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

१०४. मा.शेंडगे आशा सुखदेव

१०५. मा.मोटे किरण बाळासाहेब

१०६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

१०७. मा.संजय केशवराव काटे

१०८. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

१०९. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.दुधेकर,मा.पठाण-सहशहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर,मा.माछरे,मा.दुरगुडे,मा.इंदलकर,मा.आष्टीकर,मा.लोणकर-सहा.आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.सवणे, मा.इंगळे,मा.पिरजादे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.कांबळे,मा.शेख,मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.मोरे-कार्यकारी अभियंता,मा.बोदडे-प्र.अधिकारी,मा.मोरे-सह.व्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, त्यादिवशी आपण मोरे साहेबांना कल्पना दिली होती. ज्या-ज्या सदस्यांनी प्रश्न विचारले होते, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दोन दिवसांत आणावीत अशी अपेक्षा होती. त्यांनी खुलासा सादर करावा म्हणजे बाकी सदस्यांना बोलता येईल.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**सन्मा.महापौर महोदया,सर्व सन्मा. सभागृह, परवाच्या बैठकीत सदस्यांनी जे प्रश्न विचारले होते, त्यास अनुसरुन मा.दत्ता साने यांनी प्रश्न विचारला होता की, पिंपरी चिंचवडला सापत्न वागणूक दिली जाते. पिंपरी चिंचवड हद्दीतून जुन्या बसेस चालविल्या जातात असा प्रश्न होता. ख-या अर्थाने पीसीएमटी व पीएमटी यांचे विलीनीकरण होऊन पीएमपीएमएलची स्थापना झालेली आहे. त्यानंतर एक वाहतूक कंपनी अस्तित्वात आल्यानंतर पूर्व पीसीएमटी व पूर्व पीएमटी यांच्यासाठी वेगवेगळे नियम असे काही नाही. सगळ्यांसाठी सारखेच नियम आहेत. दुजाभाव केला जातो, असे सन्मा.सदस्यांचे म्हणणे आहे हे तेवढे संयुक्तिक नाही असे माझे मत आहे. परंतू तसे घडत असेलतर हे प्रशासनाचे निश्चितच काम राहील की, जर असे घडत असेलतर त्याठिकाणी हस्तक्षेप करुन न्याय मिळवून देणे हे निश्चितच आमचे काम राहील. कोणालाही अन्यायाची वागणूक दिली जात असेलतर आम्ही यासाठी निश्चितच प्रयत्न करु. यानंतर जुन्या बसेसबाबतीत जो प्रश्न केला आहे. पिंपरी चिंचवड हद्दीत तीन डेपो आहेत. त्यात ३७० शेड्यूल आहेत. ३७० शेड्यूलची पूर्तता करणेकामी ४७१ बसेसचे संचलन केले जाते. यात ९१ बसेस या १० वर्षे आयुर्मानापुढील आहेत. बाकी सर्व बसेस ५ वर्षांच्या आतील आयुर्मानाच्या आहेत. म्हणजे ४७१ बसेसपैकी ९१ बसेस या जुन्या आहेत. आणि ३८० बसेस आहेत या ५ वर्षांच्या आतील आयुर्मानाच्या आहेत. त्यानंतर सन्मा.सदस्य मा.सुरेश म्हेत्रे यांनी प्रश्न विचारला होता की,पीसीएमसीचा ४० टक्के वाटा असल्यामुळे दहा सदस्यांपैकी पीसीएमसीचा एक सदस्य वाढवला पाहिजे. ज्यावेळी शासनाने दि.१९ एप्रिल २००७ रोजी पीएमपीएमएलची स्थापना केली. त्या शासन आदेशाअन्वये हे दहा सदस्य कोणकोण असावेतत हे निर्देशित केलेले आहे. हा प्रश्न पॉलिसी मॅटरचा आहे. आणि तो राज्यस्तरावरचा विषय आहे. त्यामुळे मला यावर भाष्य करणे योग्य होणार नाही. त्यानंतर ४० टक्के कर्मचारी हे पिंपरी चिंचवडमधील असले पाहीजेत असे त्यांचे म्हणणे होते. आत्ता जी सद्यस्थिती आहे,त्यात एकूण ७७७७ कर्मचा-यांपैकी १२४८ कर्मचारी पूर्व पीसीएमटीचे आहेत. ६५२९ कर्मचारी पीएमटीचे आहेत. आणि दोघांचे विलीनीकरण झाल्यानंतर १९२९ कर्मचारी नव्याने डीडब्ल्यूडीमध्ये कार्यरत आहेत. त्यानंतर सन्मा.सदस्य मा.राजेंद्र काटे यांनी प्रश्न विचारला होता की, पिंपरी चिंचवड हद्दीत ७०० बसेस चालविल्या जातात का. पिंपरी चिंचवड महापालिकेत ३७० शेड्यूल बसेस आहेत. त्यांची पूर्तता करणेकामी ४७१ बसेस अलॉट केल्या आहेत. पिंपरी चिंचवड डेपोतील बसेस पुणे हद्दीत येतात.

आणि पुण्यातले जे बाकी डेपो आहेत, त्यांतून सुद्धा पिंपरी चिंचवडला या शेड्यूल बसेस सोडल्या जातात. तसा विचार केलातर पुण्याच्या या डेपोमधून ३५० ते ३७५ बसेस पिंपरी चिंचवडमध्ये येतात. म्हणजे एकंदरीत ८०० पेक्षा जास्त बसेसचे संचलन पीसीएमसी एरियात करण्यात येते. मा.कैलासभाऊ थोपटे यांनी प्रश्न केला होता की, बस काळेवाडी रहाटणी मार्गे गेली पाहिजे. ती पिंपळे गुरव मार्गाने दुरुन जाते. निगडी-पुणे स्टेशन बस फिरुन जाते. त्यामुळे प्रवाशांना विलंब होतो. याबाबतीत एक आठवड्यात सर्वेक्षण करुन याबाबत निश्चित आणि पॉझिटीव्ह भूमिका घेऊन योग्य ती कारवाई करु. कारण मार्ग निश्चिती ही सर्वेक्षण आणि प्रवाशांच्या मागणीवरुन करण्यात आलेली आहे. तरी यात नेमका निर्णय सर्वेक्षणाअंती घेण्यात येईल. रहाटणी चौकातील बसस्टॉपविषयी देखील दोन दिवसांत सर्वेक्षण करुन निर्णय घेऊ. यानंतर सन्मा.सदस्या मा.शारदा बाबर ताई यांनी निगडी-शाहूनगर मार्गे बस ही चालू झाली पाहिजे, अशी मागणी केलेली आहे. ज्या नवीन प्रस्तावित बस आहेत. त्यात पीएमपीएमएलच्या शेड्यूलमध्ये एकूण ३७१ शेड्यूल बस आहेत. त्यात नवीन १०० मार्ग पुन्हा नियोजित करण्यात आले आहेत. जेव्हा हे नवीन १०० मार्ग सुरु होतील, त्यावेळी या मागणीचा निश्चित प्राधान्याने विचार केला जाईल. मा.सुनिता वाघेरे ताईंनी डेक्कन-पिंपरी वाघेरे बस सुरु झाली पाहिजे अशी मागणी केली आहे. नवीन नियोजित मार्गामध्ये या मार्गाचा निश्चितपणे समावेश करण्यात येईल. त्यानंतर सन्मा. सदस्या माया बारणे ताईंनी पदोन्नतीबाबतीत प्रश्न केला होता. पदोन्नतीबाबत विभागीय आयुक्त कार्यालयाकडून जो मागासवर्गीय सेल आहे. त्या कक्षाकडून आम्ही ड्रायव्हर, कंडक्टर यांची जी बिंदूनामावली (रोस्टर) आहे, ती तपासून घेतली आहे. आणि वाहतूक विभागाचा उर्वरित रोस्टर आहे म्हणजे स्टँड ड्युटी कंडक्टर असतील, स्टार्टर असतील, यांचा रोस्टर आजच सबमिट केलेला आहे. याची कार्यवाही येत्या एक महिन्यांत पूर्ण होईल असा अंदाज आहे. त्यानुसार ही पदोन्नती प्रक्रिया पूर्ण केली जाईल. त्यानंतर ताईंनी दूसरा प्रश्न विचारला होता, मार्गावरील बसेस व नादुरुस्त बसेस याची आम्हाला माहिती द्या. तर परिवहन मंडळाच्या ताफ्यात १४०२ बसेस आहेत. यापैकी १२०२ बसेस आपल्या पूर्ण मालकीच्या आहेत. ज्या १४०२ बसेस पीपीपीवर चालतात. या पीपीपीवरील एकूण बसेसपैकी ८५ टक्के बसेस मार्गावर असतात म्हणजे १७० बसेस मार्गावर असतात. ७० टक्के बसेस म्हणजे ८४० बसेस. भाड्याच्या ज्या ७५३ बसेस आहेत. त्यापैकी ८५ टक्के बसेस म्हणजे ५७० बसेस या मार्गावर असतात. म्हणजे जवळजवळ १५५० बसेस मार्गावर असतात. आणि पन्नास/साठ/सत्तर बसेस स्पेअर असतात. कुठे ब्रेक डाऊन घडलातर लगेच रिप्लेसमेंट देता आली पाहिजे म्हणून या बसेस स्पेअरवर ठेवल्या जातात. दररोज बस बंद रहायचे प्रमाण आहे ते आपल्या बाकी ज्या ३५० बसेस आहेत, त्या रोजच्या ब्रेकडाऊनसाठी असतात. यात

बसेस या मेजर ब्रेकडाऊनच्या असतात. व डिलक्स बसेस या मायनर ब्रेकडाऊनच्या असतात. त्यानंतर भाड्याने ज्या बसेस आहेत, त्या ठेकेदारांची नावांची मागणी ताईंनी केली

होती. महालक्ष्मी ट्रान्सपोर्ट यांच्या १४३ बसेस आहेत. महालक्ष्मी ऑटोमोटीव्हज् यांच्या १४३ बसेस आहेत. अँथोनी गॅरेज यांच्या १०३ बसेस आहेत. बीव्हीजी इंडीया यांच्या ११० बसेस आहेत. ट्रॅव्हल टाईम यांच्या १५४ बसेस आहेत. या एकूण ६५३ बसेस आहेत. मेन करारनाम्यानुसार एक महिन्याकाठी ६००० कि.मी. इतके रनींग या बसेसनी द्यावे लागते. तेवढे रनींग दिले नाहीतर त्याचे पेमेण्ट पीएमपीएमएल यांना द्यावे लागेल असा करारनामा आहे. मा.सुलभाताई ऊबाळे यांचे प्रश्न होते. त्यात त्यांनी म्हटले आहे की, शंभर बसेससाठी एक डेपो आवश्यक आहे. नवीन येणा-या बसेससाठी पिंपरी चिंचवडच्या हद्दीत दोन डेपो झाले पाहिजेत. ताईंचे म्हणणे एकदम बरोबर आहे. नवीन डेपो बालेवाडी, भेकराई आणि शेवाळेवाडी इथे चालू केला आहे. तसेच पिंपरी चिंचवड हद्दीत नवीन दोन डेपो निश्चितच चालू करता येतील. त्यासाठी आपल्याला मुख्य समस्या जागेची आहे. मोशी ईपी क्रमांक २, ९२ आहे. आम्ही ३ जागा घेतल्या आहेत. जकात नाक्याच्या जागेची मागणी मागे केली होती. परंतू तो विषय दप्तरी दाखल झाला. या निमित्ताने माझी विनंती आहे की, जकात नाक्याच्या ज्या जागा आहेत, त्या आम्हाला दिल्या पाहिजेत. निगडी-च-होली आणि डुडूळगाव हा विषय सन्मा.बोर्डाच्या पटलावर आला होता. आणि तो दिला पाहिजे. दापोडी गाव इथे सर्वे नं. १ ते ४ ही साडेसात एकर जागा आहे. च-होली सर्वे क्र.१२९,१३० इथे साडेतीन एकर जागा आहे. या जागेबाबतीत किंवा सन्मा. बोर्ड निर्णय घेईल त्याप्रमाणे अशा जागा असतील तर त्या उपलब्ध करुन दिल्यातर निश्चितच पीएमपीएमएल यांना हे दोन डेपो करता येतील. या दोन डेपोंसाठी जो स्टाफ असेल तो अर्थात स्थानिक असेल. तो स्टाफ तिथे वापरात येईल. त्या स्टाफचीही जाण्यायेण्याची सोय होईल. जागा मिळाली तर आपल्याला या गोष्टी करता येतील. त्यानंतर ताईंचा दुसरा प्रश्न होती की, २५० कर्मचा-यांचा पगार पिंपरी चिंचवड महानगरपालिका करते. हा प्रश्न मला नीटसा समजला नाही. परंतू मी जी माहिती काढली. ती अशी आहे की, २००१ सालापासून विलीनीकरण झालेले नव्हते. तेव्हापासूनच आजच्या रेकॉर्डवर असे १८१ कर्मचारी आहेत. ते पिंपरी चिंचवडमध्येच काम करतात. त्यांचा पगार पीएमपीएमएलमध्ये जमा होतो आणि पीएमपीएमएल त्यांना तो पगार देते. परंतू ते आपल्या महापालिकेत काम करतात. त्यानंतर पुढचा प्रश्न होता की, पिंपरी चिंचवडमध्ये पिंपरीचिंचवड दर्शन बस सुरु झाली पाहिजे. हा सन्माननीय सभागृहाचा निर्णय आहे. परंतू पुणे दर्शन सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी ज्याप्रमाणे पुणे महापालिकेने बस खरेदी करुन दिल्या आहेत. त्या धर्तीवर किमान दोन बस दिल्यातरी ही सेवा निश्चितच सुरु करता येईल. शहरातील ऐतिहासिक स्थळे, प्रेक्षणीय स्थळांची यादी देऊन सन्मा.सभागृहाने निर्णय दिलातर निश्चितच ही सेवा सुरु करायला आमची हरकत राहणार नाही.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आमच्याकडे नवीन १०० बसेस द्याव्यात असे आमचे म्हणणे आहे. आमचे नवीन रुट दिले पाहिजेत. आम्ही नवीन १०० बस खरेदी करणार आहोत तर त्या पुण्याला न्यायच्या नाहीत.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**सन्मा.सदस्या, याविषयी वाहतूक विभागाचे नियोजन करावे लागणार आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आमच्या नागरीकांसाठी आम्ही या बसेस खरेदी करतो. मग आमची इच्छा आहे की, या बसेस आमच्या शहरात वापरल्या गेल्या पाहिजेत.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**सन्मा.सदस्या, जर आपल्या पैशांतून या बस घेतल्या आहेत तर त्याची सेवा आपल्या शहराला मिळाली पाहिजे. हा आपला मुद्दा बरोबर आहे. परंतू हे सन्माननीय बोर्डाच्या निदर्शनास आणून द्यावे लागेल. आपल्या मा.महापौर महोदया व आयुक्त साहेब त्या बोर्डात आहेत. मला इथे जास्त बोलणे योग्य होणार नाही. मा.शारदा बाबरताईंचा एक प्रश्न होता की, निगडी-शाहूनगर मार्गावर बस सुरु झाली पाहिजे. या नियोजनात या मार्गाचा समावेश करता येईल. त्यानंतर मा.राजेंद्र जगताप यांचा प्रश्न होता. भाड्याने घेतलेल्या बसचे उत्पन्न व खर्च याची माहिती आहे. भाड्याने घेतलेल्या बसचे उत्पन्न रु.२७२.७४ कोटी व खर्च रु.२३९.९६ कोटी. पण यात बस कंडक्टर याच्या खर्चाचा समावेश नाही. बसखरेदीचे सदस्य कोण आहेत असा त्यांचा प्रश्न होता. यात मा.अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल, मा.आयुक्त पुणे मनपा, मा.आयुक्त पिं.चिं.मनपा, मा.संचालक सीआयआरटी हे बीपीसी कमिटीचे सदस्य आहेत. पुढील प्रश्न होता इंटरनल ऑडीट होते का. शासनाच्या इंटरनल ऑडीटची स्वतंत्र पोस्ट आस्थापनेवर आहे. प्रत्येक महत्वाची फाईल इंटरनल ऑडीट होऊनच बाहेर येत असते. त्यानंतर मा.राजेंद्र जगताप साहेबांचा प्रश्न होता. समन्वयाच्या दृष्टिकोणातून पीएमपीएमएल व पीसीएमसी यांच्यात मासिक बैठक झाली पाहिजे. अशी मासिक बैठक निश्चितच झाली पाहिजे. आणि त्या बैठकीला आवश्यक ते एचओडी हजर राहतील. जास्तीत जास्त बसेस या पीएमपीएमएलच्या चालल्या पाहिजेत. त्याऐवजी भाड्याच्या बसेसला जास्त प्राधान्य दिले जाते. पीएमपीएमएल आणि दोन्हीमध्ये सुसूत्रता आणावी लागते, बॅलन्स साधावा लागतो. या भाड्याच्या बसेस आहेत त्यांना दर महिन्याला ६,००० कि.मी. द्यावेच लागणार आहेत. अन्यथा त्याचा खर्च आपल्याला द्यावा लागणार असल्यामुळे दोन्हीत बॅलन्स करुन आपल्यासुद्धा मालकीच्या बसेस चालू राहिल्या पाहिजेत. अशा रितीने नियोजन करण्यात येते. त्यानंतर मा.शमिम पठाण यांचे म्हणणे होते

की, मा.स्थायी समिती व मुख्य सभेच्या बैठकीला पीएमपीएमएलचे अधिकारी येत नाहीत. परंतू त्यासाठी सीएमडी यांची ऑर्डर काढली आहे. वाहतूक विभाग वाहतूक व्यवस्थापनाचे सी.ई. यांची याठिकाणी स्टँडींग कमिटी व मा.मुख्य सभा बैठकीसाठी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जर त्यांना शक्य नसेलतर अपवादात्मक प्रसंगी झोनल मॅनेजर यांना हे सांगितले जाते. यानंतर नवीन मार्ग चालू झाले पाहिजेत. निगडी,औंध,कोथरुड मार्गे मार्ग चालू झाले पाहिजेत. याबाबतीत निश्चित एक आठवड्यात सर्वेक्षण करुन हे चालू करायला वाव आहे का नाही याबाबतीत निश्चित या आठवड्यात निर्णय घेऊ. बदली सेवकांना न्याय मिळणेबाबतचा प्रश्न होता. ज्या कर्मचा-यांना बीडब्ल्यूडीमध्ये बदली नेमणूक करुन दोन वर्षे झाली असतील. आणि त्यांच्या हातून कोणतीही चूक घडलेली नाही. त्यांची सरासरी २०.५ मासिक हजेरी झाली असेलतर त्यांना कायम केले जाते. सद्यस्थितीत वाहक १५६, चालक ८५, क्लिनर ०२ यांना दोन वर्षे झाली आहेत. त्यांचे रेकॉर्ड मागवले आहे. २०.५ हजेरी ओ.के. असेल, डिफॉल्ट रेकॉर्ड ओ.के. असेलतर त्यांना कायम करायचे नियोजन आहे. मा.बो-हाडे साहेबांचे म्हणणे होते, हेच हेच प्रश्न विचारले जातात. काम काही होत नाही. पूर्वीप्रमाणे पीसीएमटी चालू करावी. परंतू हा शासन स्तरावरील प्रश्न आहे. यावर मला भाष्य करता येणार नाही.

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब,मोरे साहेबांनी इतके खंबीरपणाने सांगितले की, आमच्या दर फाईलचे ऑडीट होते. मोरे साहेब तुम्ही जबाबदारीने उत्तर दिले आहे ना. मी उद्या सकाळी पीएमपीएमएल डेपोला येऊन बसणार आहे. पीएमपीएमएलची स्थापना झाल्यापासूनचे ऑडीट नको. मागील तीन वर्षांचेच ऑडीट द्या. आम्ही मागील मिटींगमध्ये ऑडीटचा मुद्दा काढला होता. त्यांनी स्पष्ट सांगितले होते, पीएमपीएमएलचे ऑडीट झालेले नाही. तुम्हाला प्रत्येक फाईलचे विचारलेले नाही. तुमचे वार्षिक ऑडीट झाले का हे मी तुम्हाला विचारले आहे. सहीशिक्यानिशी काय, कमिशनर आपली ही जबाबदारी आहे. यांनी इथे जबाबदारीने उत्तर दिले आहे. अजून एक प्रश्न विचारायचा होता की, तुमचे पेन्शनचे चालू आहे. कोर्टाने २५ ही अंतिम तारीख दिली आहे. म्हणजे पुणे व पिंपरी चिंचवडकडील दोन्ही कर्मचा-यांना ती मिळणार आहे.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-** पेन्शनविषयीचे मॅटर सबज्युडीशियल मॅटर आहे. हायकोर्टात त्याची २५ तारीख आहे.

**मा.मंगलाताई कदम-**मा.मोरे साहेब, तुम्ही नाही म्हणालात तरी निकाल हा कर्मचा-यांच्याच बाजूने लागणार आहे. हे तुमच्या माहितीसाठी सांगते. तुमची जोडतोड करायची तयारी आहे का. तशी तयारी सुद्धा दाखवली पाहिजे. प्रलंबित कर्मचा-यांसाठी संबंधित विषय आहेत. १२४८ कर्मचारी आहेत. त्यामध्ये आमच्या लोकांना इथे कोणत्याही पद्धतीने फॅसिलिटीज मिळत

नाहीत. कर्मचा-यांना जेवढे हॉस्पिटलस् दिले आहेत, ते सगळे पुण्यातले हॉस्पिटल्स आहेत. पिंपरी चिंचवडच्या माणसाला पुण्यात घेऊन जायचे का. इथल्या कर्मचा-यांना इथले हॉस्पिटल्स द्यावेत. आमच्या कर्मचा-यांना वेगळी वागणूक दिली जाते. म्हणून असे म्हणतात. फरकाची रक्कम-वेतन सुधारणा फरकाचा तिसरा हप्ता देणार आहेत. पुण्यातल्यांना सांगतात, पुण्यातून मिळणार आहे. आम्हाला ऐनवेळी सांगणार आहात का. त्यांनी सुद्धा शून्य दरात सगळे केले होते. अनेक वेळा विषय आला की कर्मचा-यांना वाटते, आमचे नगरसेवक काय करतात, आमचे सभागृह काय करते. यांना तिसरा हप्ता द्यायची तुम्ही मागणी केली होती का.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-** यात इन्क्लूड नाही. तिस-या हप्त्याची मागणी केली होती. आयुक्त साहेबांच्या नावाने पत्र दिले होते. इंटर्नल ऑडीट सोबत आणले आहे. किती रक्कम होते ते सांगतो.

**मा.मंगलाताई कदम-**मा.आयुक्त साहेब,मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आमची तीन मंडळी दरवेळी सभेला जातात. खरेतर या सगळ्या गोष्टी तपासून बघितल्या पाहिजेत. उद्या मॅडम यांना पाठवा. त्यांनी फाईली मागवून घ्या. आपण एवढी रक्कम देतो. साहेब, हे लोक ऑडीट करतात का. ही परिस्थिती अशीच आहे. मिटींगला जाणार, तिथून काय विषय होतात तिथे होणार. परत जे आहे ते पुढचे. कागदोपत्री होणार आहे का हे बघणार आहेत का. आमच्या लोकांकडून काही बघितले जात नाही. कारण एवढा वेळसुद्धा नाही. महापौरांना महापौरांचे कार्यक्रम आहेत. आज निवडणूका डोळ्यासमोर आहेत. यांच्या सगळ्या गोष्टी बघण्यासाठी आपल्याकडे सुद्धा एक अधिकारी असला पाहिजे. तुम्ही त्यादिवशीसुद्धा म्हटले होते. मा.अष्टेकर साहेबांकडे ऍडीशनल चार्ज द्या. त्यांच्याकडे पुण्यात पीएमपीएमएलचा चार्ज होता. आणि आपल्याला जर या किचकट जबाबदारीतून सुटायचे असेलतर यांना जबाबदारीने चार्ज द्या की, यांचे सगळे कामकाज बघायचे. आपण काय करणार, आपण सभेत एकदा आलो, बसलो की, सभेत एकदाच विचारणा होते. लोकांना सगळ्यांना वाटते. कुठली तक्रार घेऊन कोणाकडे जाणार. त्यांच्याकडे सध्या केबीन आहे. पुण्यात पीएमपीएमएलमध्ये त्यांनी काम केले आहे. त्यांना तिथल्या बारीकसारीक गोष्टी कळणार आहेत. या सगळ्या गोष्टी असतील, ऑडीट असेल. आष्टिकर साहेब त्या गोष्टीला जबाबदार राहतील. जर स्वारगेटला जायचे असेलतर निगडीचा माणूस पहाटे ३.३० वाजताच घरातून बाहेर पडतो. या सगळ्या किरकोळ गोष्टी आहेत. उदाहरणार्थ, माझ्याकडे कात्रज बस सुरु केली. एकदा बस सुरु केल्यानंतर सांगताना तीन बस चालू करणार असे सांगितले होते. पण एकच बस चालू केली. त्यानंतर सगळ्या जुन्या बस येत आहेत. म्हणजे पहिल्यांदा दाखवताना नवीन बस पाठवतो असे दाखवतात. नंतर सगळ्या जुन्या बसेस देतात. प्रत्येक वेळी नगरसेवकांनी पुण्यात येऊन सांगायचे का. गोल फिरून-फिरुन यांची उत्तरे ऐकायची का.

शेवटी आपणसुद्धा म्हणत असतो, आमचे ट्रान्सपोर्टेशन चांगले झाले पाहिजे. हे ट्रान्सपोर्टेशन होताना शेवटी आमचेही कर्मचारी आहेत. आम्ही कोणत्याही गोष्टीला नाही म्हणत नाही. परंतू त्या दृष्टिकोणातून सगळ्या फॅसिलिटीज दिल्या पाहीजेत. एक कर्मचारी रिटायरमेंटला आला आहे. त्याचे एकच वर्ष राहीले आहे. पण त्याला मात्र म्हणणार तू पुण्यामध्ये कात्रजच्या बसने जा. आज त्याचे वय सत्तावन्न/छप्पन्न आहे. तो माणूस इथून पहाटे पुण्याला जाणार. त्याला सांगवीत द्या म्हटलेतर तेवढ्या पुरते हो म्हणतात. चारचार वेळा, आठआठ वेळा फोन करावा लागतो. आमच्या साहेबांना अजून एक चार्ज द्या. आज जेवढ्या नगरसेवकांनी तक्रारी केल्या आहेत की, कुठल्या डेपोला कुठे जागा ॲडजस्ट करायची. आपल्या कुठलाय बसेस आल्या आहेत, त्या खरोखर इतक्या बसेस आल्या आहेत का. इथे आत्ता महालक्ष्मी ट्रान्सपोर्ट, बीव्हीजी इ. पाच ठेकेदारांची नावे मोरे साहेबांनी सांगितली. एवढ्या बस कॉन्ट्रॅक्टवर असताना आपण नवीन बसेस घेणार आहोत. काम द्यायचे आहे. आजचा प्रस्ताव आहे. या बसेस लागणार आहेत का. हा पण प्रश्न आहे. एवढ्या बस खरेदी करायच्या आहेत. कॉन्ट्रॅक्ट बेसने पहिल्यांदा काम द्यायचे. मात्र पर्मनन्ट कर्मचा-यांना काम देऊ शकत नाहीत. कितीतरी ड्रायव्हर, कंडक्टर तसेच बसून राहतात, हि परिस्थिती बरोबर आहे का नाही. मग आपल्याला एवढ्या बस लागत नसतीलतर अशी परिस्थिती का आहे. आख्या पिंपरी चिंचवड, पुण्यात नुसत्या बसेसच बसेस दिसत होत्या. आता तुम्हाला पीएमपीएमएल डे करता येत नाही का. का कोणत्यातरी संस्थेने, पत्रकारांनी पुढाकार घ्यायला पाहिजे. मग नटबोल्ट नाही, टायर नाही, त्याचं अमकच खराब झालेल आहे. किरकोळ किरकोळ कारणावरुन तुमच्या कितीतरी बस रिकाम्या असतात. तुम्हाला एवढे ट्रान्सपोर्टवाले कशाला लागतात. हे विचारण्यासाठी आपल्यातला एक अधिकारी पीएमपीएमएलमध्ये असला पाहिजे. माझे सहकारी माझ्या मताशी सहमत आहेत की, पीएमपीएमएलमध्ये आमचे लोक असले पाहिजेत. काही शंका-कुशंका असतील तर त्यांना माहिती विचारली गेली पाहिजे. पण इथे कुणाच्या शंका-कुशंकांचे निरसन होत नाही. ज्या दिवशी विषय येतो, त्यादिवशी मग आमच्या सगळ्यांचे साठलेले असते ते बाहेर निघते. सदस्य पीएमपीएमएलवर बोलतात. मग आमच्या कर्मचा-यांना वाटते, एवढा हत्ती घालवतात आणि शेपटासाठी विचार करतात. रोज याचा खुलासा झाला पाहिजे. अष्टेकर साहेबांवर जबाबदारी द्या. अन्यथा तुम्ही तीन सदस्य यास जबाबदारी राहतील. आज सभेमध्ये मोरे साहेबांनी कबूल केले आहे की, पीएमपीएमएलचे ऑडीट आहे. आज ते प्रोसिडींगमध्ये आले आहे. मोरे साहेब, मी आख्खे तर मागणारच नाही. मला फक्त तीन वर्षांचा ऑडीट रिपोर्ट द्या. मी आमच्या लोकांकडून चेक करुन घेणार आहे. दर वर्षी ऑडीट होते का. अजिबात होत नाही. मी आत्ता फोन करुन विचारले आहे. ऑडीट झालेलेच नाही. अजिबात ऑडीट होत नाही. पेन्शनचा प्रश्न देखील तसाच आहे. मला सगळे माहित आहे. यांच्या तिकीटात घोटाळा आहे. जाहीरातीत घोटाळा आहे. पंचिंगमध्ये सुद्धा घोटाळा आहे. ही प्रत्येक गोष्ट बोलावी लागत असेल, सगळ्या गोष्टी नीट

करायच्या असतील तर एकच दिवस बस डे साजरा करुन चालणार नाही. राखीपौर्णिमा साजरी करुन चालणार नाही. आज पीएमटी व पीसीएमटी एकत्र करुन किती वर्षे झाली. पीएमपीएमएलच्या भरण्यात लाखो रुपये वाढत आहेत. संध्याकाळी मोशी चौकात जाऊन बघा. आयुक्त साहेब, तुम्ही साध्यासुध्या गाडीत जाऊन बघा. कमिश्नरच्या गाडीत जाऊ नका. रॉक्सी चौकात बस निघून जाते. आणि सगळ्या रिक्शा भरुन जातात. बसस्टॉपला बस का थांबत नाही. याला कोण जबाबदार आहे. असे का होते. आमच्या बसेस आल्यानंतर आम्ही त्या तुम्हाला देणार नाही,असे प्रत्येकाला वाटते. तुम्ही काय म्हणणार, बस पुण्यातून जाऊन येणार. पिंपरी-चिंचवडमधून जाऊन येणार. त्यांचं तसं म्हणण नाही. आमच्या बस पुण्यात जाऊन येऊ देत. पण आमच्या बस परत आमच्या दारात येऊ द्यात. वस्तूचा मालक काय म्हणतो, माझी वस्तू माझ्या दारात असली पाहिजे. या दृष्टीकोणातून त्यांचा म्हणण्याचा हा मुद्दा आहे. आमचा मोठा बसडेपो कुठेतरी तयार करुन ठेवा. आमच्या बस सुटणार आहेत. तिथून तुम्ही द्या. निगडीच्या बस निगडीतून पाठवतो. भोसरीच्या बस भोसरीतून पाठवतो. आपले बसडेपो आहेत त्याप्रमाणे पाठवतो. परंतू सत्य परिस्थिती कशी आहे, पहाटे साडेतीन वाजता आमचा ड्रायव्हर गेला. आणि तुम्हाला कॉन्ट्रॅक्टरची बस सोडायची असेलतर तुम्ही आमच्या ड्रायव्हरला बसवून ठेवता आणि कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर असलेल्या ड्रायव्हरला बस देता. तुम्हाला लागणार नाहीतर तुम्ही एवढ्या कॉन्ट्रॅक्टरच्या बस कशासाठी घेता. तुम्ही घेऊ नका. तुम्ही आत्तासुद्धा दुरुस्ती करुन घेऊ शकता. त्यात दुरुस्ती करा. किरकोळ कारणावरुन तुमच्या किती बसेस बंद आहेत त्यासुद्धा तुम्ही बघा. ८५ टक्के बस चालू ठेवतात, हा तुमचा आकडा खोटा आहे. अजिबात ८५ टक्के बसेस चालवत नाहीत. पावसाळा संपून गेला तरी बसला कपडा मारला गेलेला नाही. तुमच्याकडे बस धुवायला यंत्रणा नाही. बस रोजच्या रोज स्वच्छ होतात का. मग नागरीकांनी पैसे कसे द्यायचे. नागरीकांना फॅसिलिटीज द्यायला नकोत का. नागरीक बसमध्ये का बसत नाहीत. नागरीकांनी चांगले कपडे घातले की चोरुन तुमच्या बसमध्ये घुसायला लागते. कोणीतरी कुठेतरी थुंकले असेल ते अंगाला लागू नये म्हणून दहा वेळा वरुन बघायचे. बसायला मिळालेतरी आपण उठल्यानंतर काय परिस्थितीत उठणार आहोत. मग ही जबाबदारी कोणाची आहे. ही जबाबदारीसुद्धा बघितली पाहिजे. आपण नुसतेच म्हणतो, पुणे दर्शन बसप्रमाणे आमच्याकडे पिंपरी चिंचवड दर्शन बस चालू करा. पण तुम्हाला कधी वाटले नाही का की, पिंपरी चिंचवडमध्येसुद्धा पुण्याप्रमाणे दर्शन बस चालू करा. पुण्यापेक्षा नक्कीच चांगली स्थळे इथे आहेत. पुणे शहराला ऐतिहासिक वारसा असलातरी पिंपरी चिंचवडला पुण्यापेक्षा जास्त ऐतिहासिक वारसा आहे. पहिल्यांदा आमच्याकडे सुरुवात करायला पाहिजे होती. तुम्ही इतके दिवस बस सुरु का केली नाहीत. याचे उत्तर तुमच्याकडे आहे का. तुमच्याकडे काही उत्तरे नाहीत. म्हणून साहेब, आपल्याकडे नेहमीचा एक माणूस असला पाहिजे. त्यांना आणखी एक चार्ज देऊन बघा. त्याने रोजचं अपडेटींग घ्यायचं. त्याने रोज काय चालले आहे ते पण

बघायचं. ते बघायला माने साहेब म्हणून एक माणूस होता. त्या माणसासोबत ही जी पुण्यातली मंडळी आहेत, त्यांनी यांना परत निगडीला पाठवलं. तेव्हा यांचा आत्मा गार झाला आहे. त्यांची काहीही चूक नसताना त्यांच्यावर इतके ॲलिगेशन्स केले. शेवटी ते स्वतःच म्हणाले की, मी निगडीतच बरा आहे. मला पुण्यात अजिबात नको आहे.

मी सभागृहाचे लक्ष अजून एका गोष्टीकडे वेधू इच्छिते की, त्यांनी आपल्या लोकांना ६०:४० प्रमाणे प्रमोशन दिले आहेत का. आपले लोक मिटींगला जातात. त्यांनी हे तपासून बघितले पाहिजे. जर ६०:४० प्रमाणे प्रमोशन दिले आहेत तर आमचा एकच क्लास वन अधिकारी कसा होऊ शकतो. आमच्याकडून चिंचूके जात नाहीत. आमच्याकडून रोखठोक पैसे घेतात. आमच्या ४० टक्के माणसांना प्रमोशन का नाही. आमची १२०० पैकी ६०० माणसे प्रमोशनला बसतील. ज्यावेळी तुमच्याकडे मा.गवळी साहेब होते,त्यावेळी गवळी साहेबांनी ज्यांचे क्वालिफीकेशन नाही, ती चेकर मंडळी आहेत. मा.आयुक्त साहेब, तुम्ही त्यांचा डाटा घ्या. मा.अष्टेकर साहेबांना सगळे माहित आहे. आपल्यातल्या कोणाला अशी प्रमोशन दिलीत का, का दिली नाहीत, असे यांची किती लोक आहेत. ६५२९ लोक पुण्यातले आहेत. आमच्याकडील १२४८ लोक आहेत. आमच्यातल्या कोणालाही प्रमोशन दिलेले नाही. मा.मोरे साहेब, आज जे पदावर आहेत, त्यांचे क्वालिफीकेशनसकट प्रत्येकाचे तुम्ही द्यायचे आहे. गवळी साहेबांच्या आधीपासूनचा चार्ज. ज्या-ज्या वेळी प्रमोशन्स दिली आहेत, ते तुम्ही दाखवायचं आहे. आमचे लोक त्यावेळी होते. मग आमच्या लोकांना तुम्ही प्रमोशन का दिले नाही. तुम्ही तुमची प्रमोशन्स आधीच करुन घेतलीत. मी जे बोलले ते अष्टेकर साहेबांनी ऐकले असेल असे मी अपेक्षित धरते. मा.आयुक्त साहेब, मी सभागृहाच्या वतीने मागणी करतेय की, अष्टेकर साहेबांनी हे सगळे आम्हाला आणून दाखवले पाहिजे. पूर्वीच्या तिथल्या किती लोकांना प्रमोशन दिली आहेत आणि आम्हाला किती प्रमोशन दिली आहेत. इतकं परेशान करतात की, विचारायची सोय नाही. यांना एक माणूस सहन झाला नाही. त्या माणसावर ॲलिगेशन्स काढून या लोकांनी त्याला परत निगडी डेपोला पाठवून दिले. तुम्ही आमच्याकडे या. आम्ही तुमच्या लोकांना पण तसंच करणार, काही सोडणार नाही. मनात तळतळ येते. वाईट वाटते. आमची ही वृत्ती नाहीए. परंतू आमच्या अधिका-याला अशी वाईट वागणूक देणार असालतर, आम्हाला ६०-४० प्रमाणे प्रमोशन्स मिळतात का हे विचारणे ही सभागृहाची जबाबदारी आहे. आमच्या लोकांना ४० टक्केच्या रेशियोप्रमाणे प्रमोशन्स मिळाली पाहीजेत. तुम्ही प्रस्ताव आणायचा आणि आम्ही विषयाला मंजूरी द्यायची. पिंपरी-चिंचवडमधील एखाद्या पीएमपीएमएलच्या कर्मचा-याला काही झालेतर त्याला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होता येत नाही. बिर्ला हॉस्पीटल असेल, चैतन्य हॉस्पीटल असेल, स्टर्लींग असेल, रुबी हेल्थ केअर असेल, मोरया हॉस्पिटल असेल या रुग्णालयांची सुविधा पिंपरी चिंचवडमधील पीएमपीएमएलच्या कर्मचा-यांना द्यावी अशी मी मा.आयुक्त साहेबांना विनंती करते, मा.महापौर साहेबांना विनंती करते. या सुविधा आमच्या

लोकांना दिल्या गेल्या पाहीजेत. मी जे जे बोलले आहे. अजून कोणाला बोलायचे असेलतर त्यांनी बोलावे. आम्ही उपसूचना सुद्धा देणार आहोत. त्याप्रमाणे आम्ही सगळे देणार. परंतू मी पुण्यात येऊन अष्टेकर साहेबांना घेऊन येणार हे सांगते. त्याप्रमाणे मागील ३ वर्षांचा ऑडीट रिपोर्ट मला दाखवायचा आहे. जर ऑडीट रिपोर्ट निघाला नाहीतर आम्ही तुमच्यावर कारवाई करणार आहोत, हे लक्षात ठेवा.

**मा.आर.एस.कुमार**-मा.आयुक्त साहेब,मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह, या ठरावात पहिलेच म्हटले आहे की, १) दोन्ही महापालिकांच्या दायित्वानुसार ५०० बसेसची खरेदी करणे. पीएमपीएमएल करताना असे दायित्व ठरवून दिले होते का की, आम्ही तुम्हाला आयुष्यभर सपोर्ट करायचा. हे दायित्व म्हणजे काय याचा अर्थ तरी आम्हाला सांगा. २) उपरोक्त प्रमाणे बसेस उपलब्ध करुन देण्यासाठी खरेदीच्या विविध टप्प्यांवर पीएमपीएमएलला आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त, पिं.चिं. यांना देण्यास मान्यता देणे. - असा ठराव सभागृहात होतो का ते मला सांगा. किती कोटींसाठी आम्ही मान्यता देतोय. असा ठराव आमच्यासमोर येतो आहे. तो ब्लाईंड आहे. ठराव येताना आमच्या समोर यायला पाहिजे की,२५ कोटी,५० कोटी,१० कोटी,२० कोटी. आम्हाला अशी मान्यता देणे चुकीचे आहे. कितीही पैसे द्या. आमचा आयुक्तांवर विश्वास नाही असे नाही. आम्हाला आयुक्तांवर विश्वास आहे. पण ठराव करताना कोणत्याही संस्थेमध्ये ठराविक रक्कम टाकायला पाहिजे. ते होत नाही. ही दुरुस्ती व्हायला पाहिजे. मोरे साहेब तुम्ही कितीही सांगा. पिंपरी चिंचवडला सावत्र आईची ट्रिटमेंट मिळते. कर्मचारी असो,प्रमोशन असो. अगदी नवीन भरतीतून १० टक्के सुद्धा लोक पिंपरी चिंचवडमधून घेतलेले नाहीत. पुण्यातले आणि बाहेरगावचे किती कर्मचारी आहेत ते बघा. पैसे आम्ही देणार आणि तुम्ही आम्हाला अकाऊंट रिपोर्ट देत नाहीत. आत्ताच मा.मंगलाताई कदम यांनी सांगितले की, ऑडीट करत नाहीत. कंपनीचे दहा रुपयाचे शेअर्स घेतलेतरी त्या कंपनीचे एवढे मोठे पुस्तक येते. प्रत्येक वेळी महापालिका सभेअगोदर कळवतात. कंपनीचे एवढे मोठे पुस्तक येते. आम्ही बॅलन्सशीट द्या म्हणतो तर देत नाहीत. प्रॉफीट ऍण्ड लॉस अकाऊंटचे पुस्तक मार्च संपल्यानंतर यायला पाहिजे. ऑडीटर बॅलन्सशीट फायनान्शियल इयर संपल्यानंतर तीन महिन्यांत आमच्याकडे यायला पाहिजे. एखाद्या मुलाने बिझनेस करायला सुरुवात केल्यानंतर त्याचे वडील त्याला किती वर्षे भांडवल देतात. तीन/चार वर्षे झाली, कंपनी बरोबर चालत नसेलतर त्याचे वडील म्हणतात, कंपनी बंद करुन टाक. आम्ही गेले १० वर्षांपासून निधी पाठवतोय. तुम्ही स्वतःच्या पायावर कधी उभे राहणार आहात. मा.महापौर साहेब, माझी जनरल बॉडीला विनंती आहे की, पैसे बिल्कूल देऊ नका. ज्यांना पैसे पाहिजे आहेत, त्यांनी बँकेतून लोन काढा. आम्ही गॅरेंटर राहू. किती वर्षे पैसे द्यायचे. वॉर्डातले कुठले काम सांगितले तर म्हणतात, पैसे नाहीत. एवढे पैसे कुठून द्यायचे. बजेटमध्ये ५/१०

कोटी तरतूद ठेवली आहे. पीएमपीएमएलचे पैसे द्यायची प्रोव्हिजन केली आहे का तुम्ही. तुम्ही ५०० बसेसची प्रोव्हिजन केली आहे का. आम्हाला आमच्या वॉर्डात काम करायला फंडस् नाहीत आणि आम्ही दुस-या संस्थेला देतो. पीएमपीएमएलबद्दल कितीही बोला ते कमीच पडणार आहे. कारण यांच्या वर्कींग स्लीममध्ये काय चालते. आम्ही तुम्हाला फायनान्ससाठी मान्यता द्यायची आणि आम्हाला माहितसुद्धा पडत नाही. दुसरी गोष्ट अशी आहे की, पीएमपीएमएल बरखास्त करा. व पूर्वीसारखीच पीएमटी व पीसीएमटी करा. आमच्या हातात नाही. ठराव करुन महाराष्ट्र शासनाकडे पाठवून द्या. नाहीतर हे सुधारणार नाहीत. कितीही वर्षे झाली तरी यांना पन्नास कोटी/शंभर कोटी हे द्यावेच लागणार आहेत. जकात बंद झाली. एलबीटीत लिमिट आली. सरकार किती वर्षे पैसे देणार. पूर्वी ६५ कोटी देत होते. आत्ता महिन्याला ४८ कोटी देत आहेत. परत जीएसटी आल्यानंतर ही रक्कम कमी होऊ शकते. आपण पर्मनन्टली पैसे देऊ शकत नाहीत. आणि विषय करायचाच असेलतर माझी सभागृहाला विनंती आहे की, कितीही पैसे द्यायचे असलेतरी आयुक्तांना ब्लॅकचेक पॉवर देऊ नका. काहीतरी रक्कम टाका आणि परमिशन द्या.

**मा.महापौर-**त्यादिवशी बरेच जण बोलले होते. मी सगळ्यांना बोलायला देते. पण प्रत्येकाने दोन मिनिटांत त्यांचे भाषण संपवावे.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मा.आर.एस. कुमार साहेबांनी जी सूचना मांडली आहे. पूर्वी जशी पीसीएमटी होती तशीच वेगळी करुन पहिली पीसीएमटी सुरु करा. मी या विषयाला खरेतर अनुमोदन देते. मा.महापौर साहेब, आपण असे काही करु शकतो का, असा प्रस्ताव आपण पाठवू शकतो का, कायदा विभागाला विचारा. कारण त्यावेळी तशी परिस्थिती नव्हती, किंवा त्यावेळी भाड्याने बस घ्यायची तशी संधी नव्हती. आत्ता या कंपनीला ही संधी प्राप्त झाली आहे. एसपीव्ही स्थापन झाल्यानंतर२००७नंतर यांनी डायरेक्टर भरलेलेलच नाहीत. कंपनी फॉर्मेशनची कुठलीही नियमावली बनवलेली नाही. कंपनी अशीच चालली आहे. ही कंपनीच मुळात अधिकृत नाही. आपल्याकडे परत पीसीएमटी घेतलीतर आपले जे कर्मचारी आहेत. त्यांची तात्पुरती पदोन्नती सुद्धा होते. ते तसेच रिटायर्ड होतात. त्यांना पेंशनमध्ये फायदा होत नाही. आपल्या कर्मचा-यांच्या अनुकंपा तत्वावर नेमणूका होत नाहीत. नागरीकांच्या समस्या मांडतो तशा कर्मचा-यांच्या सुद्धा समस्या मांडतो. पीएमपीएमएलचा विषय यातच जातो. पैसे देणे आणि कामगारांना सवतीची वागणूक, सावत्र मुलाची वागणूक आपण काय काय उपमा वापरून आपला वेळ,शक्ती सगळे वाया घालवतो. नागरीकांच्या समस्या मांडू शकत नाही. नगरसेवकांना साडे चार वर्षे झाली आहेत. पण ते त्यांच्या वॉर्डमध्ये एकही बस चालू करु शकले नाहीत. जर ही परिस्थिती असेलतर कोट्यावधी

रुपयांवर पाणी आहे. असे करता येत असेलतर विचार करा. आपल्या घेतलेल्या बसवर स्मार्ट सिटी म्हणून पुण्यात मिरवणार असतील तर आपण आज आत्मपरिक्षण करायची वेळ आहे. तुम्ही सगळ्यांशी बसून बोलून विचार करा. काय फरक पडतोय. त्या-त्या पद्धतीने विषय व्हावा अशी विनंती करते.

**मा.दत्ता साने**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, सगळ्यांना यासाठी बोलायची इच्छा आहे की, पीएमपीएमएलची सर्व नागरीकांना जाण आहे. ही पीएमपीएमएल कशी चालली, काय चालली हे आपल्याला माहित आहे. वाईट याचेच वाटते की, प्रत्येक नगरसेवकाच्या वॉर्डात पीएमपीएमएलचे कामगार रहायला आहेत. ते त्यांचे दु:ख प्रत्येक वेळी सांगतात. हे दु:खच सभागृहात मांडायचा प्रयत्न केला आहे. मी मोरे साहेबांना विनंती करतो की, त्यांना आम्ही प्रश्न विचारला होता. ते म्हणाले सगळे चुकीचे आहे. जर असे असेल, तुम्ही असे म्हणू शकता. मी आरोप केला होता की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून जे आमचे कामगार आहेत, त्यांना तुम्ही सवतीची वागणूक देता. नाही असे उत्तर मी ऐकले होते. आत्ता पक्षनेत्यांनी सांगितले, मा.सुलभाताई ऊबाळे यांनी सांगितले, मा.आर.एस.कुमार यांनी सुद्धा सांगीतले. आज आमच्या कामगारांचे हालत सगळ्यात दयनीय अवस्था आहे. त्यांना पंचिग करायला सुद्धा पुण्यात जावे लागते. आमच्या भागात पिंपरी चिंचवडमध्ये आजपर्यंत ७० ते ८० टक्के जुन्या बसेस दिल्या आहेत. आणि नवीन बसेस सगळ्या पुण्यात वापरल्या आहेत. तुम्ही म्हणताय तसे नाही. तुम्हाला ऑन रेकॉर्ड दाखवू का. आमच्या पिंपरी चिंचवडमध्ये किती आहेत आणि पुणे महापालिकेत किती आहेत. तुम्हाला फोटो काढून दाखवतो. आमचेही हाल होतात. तुम्ही सांगाल नाही. आमच्या कामगारांची अवस्था हिच आहे. यापूर्वी अष्टेकर साहेबांकडे मी एक विषय बोललो होतो. रिटायर्ड झालेला कर्मचारी मेला तरीसुद्धा त्याला अजून पेन्शन मिळालेली नाही. याच्यापेक्षा वाईट अवस्था आमची काय असणार आहे. यापूर्वी सुद्धा हा विषय मांडला होता. त्याला ग्रच्युइटी फंडाचे पैसे दिलेले नाहीत. शंभर टक्के पिंपरी चिंचवडला सवतीची वागणूक दिली जाते. आमच्या कामगारांची पिळवणूक केली जाते. कामगारांना पंचिंग करायला पुण्यात जावे लागते. यापूर्वी सुद्धा आम्ही मागणी केली होती की, पिंपरी चिंचवड शहरातून आमच्या कामगारांना जाऊ द्यात. तुमचे लोक आमच्याकडे पंचिंग करायला येतात का. आमचे लोक तुमच्याकडे पंचिंग करायला जातात तर मग तुमच्या लोकांनाही आमच्याकडे पंचिंग करायला येऊ द्यात. त्यांना इथे पंचिंग करायला लावा. बघु तुमच्यात हिंमत आहे का. आम्ही ४० टक्के वाटा देतो. त्याबदल्यात तुम्ही आम्हाला काय दिले आहे. हा विषय तुम्ही मंजूर करणार का नाही हे मला माहित नाही. परंतू यानंतर त्या शंभर बसेस खरेदीसाठी परत हा विषय सभागृहापुढे येणार नाही. तुम्ही वाढीव ७०० बसेस घेणार. पाच ठेकेदार नेमले आहेत. हे पैसे कसे देणार आहोत हे सभागृहाला सांगितले नाही. पुणे व पिंपरी चिंचवडला एवढ्या

बसेस देऊ असे या विषयात काही आणलेले नाही. कॉन्ट्रॅक्टने घेतलेल्या बसेस ठराविक कि.मी.पर्यंत चालवाव्या लागतात. त्या चालल्या नाहीत तर त्या ठेकेदाराला पैसे द्यावे लागतात. म्हणजे ठेकेदाराने १०/५० गाड्या लावल्या असतील, त्याला रुट मिळाला नाही, काम मिळाले नाहीतर त्याच्या गाड्यांना बसून जागेवर पगार द्यावा लागणार आहे. असे सुद्धा तुम्ही सांगीतले होते. आपण या १०० बसेस विकत घेणार आहात. ७०० बसेस भाड्याने घेणार आहात. मग आमच्या कामगारांना तिथे काम मिळणार आहे का. मग शंभर बसेस घ्यायची घाई का. आम्हाला याचे उत्तर मिळालेले नाही. या ७५० बसेस, या ५०० बसेस त्याप्रमाणे तुम्ही या नवीन बसेस त्याठिकाणी घेणार आहात. त्याप्रमाणे तुम्ही आमच्या कामगारांना काम देणार आहात का. म्हणजे तुम्ही त्या ठेकेदाराला पोसण्यासाठी बस घेणार आहात का. हा माझा पहिला प्रश्न आहे. म्हणून माझी विनंती आहे की, तुम्ही तुमच्या उत्तरात जे सांगितले. मी तुमच्यावर सरळ आरोप करुन सांगतो की, पीएमपीएलचा कामगार व आमच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कामगारांमध्ये आजही आमच्या कामगाराला सवतीची वागणूक आहे, हे मी शंभर टक्के सांगतो.

**मा.माया बारणे**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह, अजेंडावर पीएमपीएमएलचा विषय आहे. त्यात पहिली चूक त्यांनी अशी केली आहे की, अमाऊंटच टाकलेली नाही. महापालिकेकडे किती रक्कम पाहिजे त्याची मागणी केलेली नाही. त्यानंतर माझी सन्मा.सभागृहाला विनंती राहील की, मा.मंगलाताई कदम म्हणाल्याप्रमाणे याआधी तीन वर्षांचे ऑडीट सादर करावे. जोपर्यंत त्या ऑडीटची छाननी होत नाही, सभागृहाला पूर्वकल्पना दिली जात नाही, तोपर्यंत हा विषय मान्य करु नये. आपण दरवेळी त्याच-त्याच चुका करतो. आणि नंतर त्यांच्या नावाने ओरडतो. आपल्याला संधी आली आहे. आपण यापूर्वी ज्या रकमा घेतल्या आहेत, त्याचा संपूर्ण लेखाजोखा सभागृहाला सादर करावा. त्यानंतर त्यांच्या प्रस्तावाचा विचार करावा. सन्मा. सभागृहाने या गोष्टीचा गांभिर्याने विचार करावा. रक्कम दिल्यानंतर खरेतर याचे दायित्व कोण घेणार आहेत. जेव्हा नागरीक याचा प्रश्न विचारतील त्यावेळी याला हे सभागृह जबाबदार राहणार आहे का. म्हणून सभागृहाने याचा गांभिर्याने विचार करावा.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खरेतर महापौर मॅडमनी दोनच मिनिटे बोलयला सांगितले आहे. माझ्या सहकारी बंधूभगिनींनी सगळेच विषय मांडले आहेत. पीएमपीएमएलवाल्यांना ज्या-ज्या वेळी गरज लागते, ते त्या-त्या वेळी आमच्याकडे कटोरा घेऊन उभे असतात. आपण सगळे सदस्य अगदी पहिल्या खुर्चीपासून शेवटच्या खुर्चीपर्यंत आपापली मतं मांडतात. आपण फक्त बडबड करतो. तुम्ही आमच्या सगळ्या सूचना ऐकायचं नाटक करायच. पुन्हा आमच्या सगळ्या सूचना, विचार, जाहिर चर्चा व्यवस्थितपणे कच-याच्या टोपलीत टाकल्या जातात. पुन्हा जेव्हा आर्थिक गरज लागेल तेव्हा

पुन्हा एकदा महापालिकेच्या पाय-या चढतात किंवा उंबरा झिजवतात असे याठिकाणी मला हे खेदाने सांगावे लागते. मा.मंगलाताई कदम यांनी विषय मांडला. जेव्हा निधी पाठवला, तेव्हा त्यांनी श्वास सोडला, अशी अवस्था पीएमपीएमवाल्यांची आहे. आमचा कासारवाडी वॉर्ड दोन भागांत विभागला आहे. तिथे बस रुट करावा. खालच्या भागातील परिसरातून हाय-वेला जाण्यासाठी कमीतकमी एक ते दीड कि.मी. चालावे लागते. सिक्स सिटरमध्ये बसायचे, जीव धोक्यात टाकायचा. काही सोर्स असलातर त्याने जायचे. नाहीतर पिंपळे गुरव इथे जायचे. ते सुद्धा एक/दीड कि.मी. अंतर आहे. तरच आम्हाला बसची व्यवस्था आहे. यांच्या मोरे, वाघमारे सगळ्यांना बोलून झाले की, तुमची जी भोसरीवरुन बस निघते ती, जेआरडी टाटा ब्रीजवरुन जाते. ती कासारवाडीतून जाऊ द्यात. जेणेकरुन नागरीकांना बसने जाता येईल. त्यांचा बस स्टॉप सुद्धा चुकणार नाही. पिंपळे गुरव बसस्टॉपपर्यंत त्यांना सहज जाता येईल. नागरीकांचा मोठा प्रश्न सुटणार आहे. नागरीकांची दीड ते एक कि.मी. ची पायपीट वाचणार आहे. मी अनेक वेळा यासंदर्भात पत्रव्यवहार केला आहे. पण नगरसदस्यांच्या पत्राला साधं एका ओळीचे किंवा एका शब्दाचे उत्तर देण्याची मानसिकता पीएमपीएमपीएमएलवाल्यांकडे नाही. मा.महापौर साहेब, कोणत्याही मंत्र्यांना पत्र दिल्यानंतर, पत्र मिळाले, त्यावर विचार करायची प्रक्रिया चालू आहे, एवढे दोन ओळींचे पत्र तरी दिले जाते. या सभागृहातील कोणत्याही सदस्याने सांगावे की, आजपर्यंत पीएमपीएमएल यांना पत्र दिले आणि त्यांनी एका शब्दांत उत्तर दिले आहे का. नाहीतर आम्ही त्यांना एखादा कम्प्यूटर प्रिंटर गिफ्ट करु. म्हणजे जेणेकरुन पत्राचे उत्तर देण्याची कृपा ते करतील. आपल्या लोकांना फायदा होणार असेल तरच विषय करावा. नाहीतर नेहमीप्रमाणे आपल्या शहराच्या हिताचे काहीतरी होईल, या अपेक्षेने आपण त्यांना मदत करतो. सदस्यांनी अनेक मुद्दे सांगितले. त्यावर त्यांनी निर्णय द्यावा. तरच आपण त्यांना सहकार्य करावे अशी विनंती करतो. मा.अष्टेकर साहेबांकडे याची जबाबदारी द्यायची आहे. ते तिथे होते त्यावेळी सुद्धा त्यांनी काय दिवे लावले हे सगळ्यांना माहिती आहे. त्यामुळे पुन्हा त्यांच्याकडे ही जबाबदारी देऊन ते काय दिवे लावणार आहेत, याचा देखील विचार करायला हरकत नाही. एखादा चांगला अधिकारी द्यावा अशी अपेक्षा करते आणि थांबते.

**मा.सुरेश म्हेत्रे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,विषय असा आहे की, मोरे साहेबांनी जी कर्मचारी संख्या सांगितली ७७७७. त्यातील १२४८ फक्त या भागातील आहेत. १६ टक्के आमचे व ८४ टक्के पीएमटीचे कर्मचारी इथे सुद्धा सवतीची वागणूक दिलेली दिसते आहे. या भागातल्या नागरीकांना प्राधान्य द्या. ४० टक्के नाही प्लस मायनस ५ टक्के. आणि तोच नियम प्रमोशनसाठी पण द्या. प्रमोशनबाबतीत तोच विषय झाला पाहिजे. बसेस घेताना बसेसचा वाटा आम्ही देतोय. दुसरा महत्वाचा विषय. जो विषय आला आहे. चार सदस्य समितीने विषय दिला आहे. स्टँडींग कमिटीने तो विषय पारित केला आहे. वित्त अर्थसहाय्य घेऊन ७००

बसेस बाजारातून घ्यायच्या. हे कोणाच्या माथी मारणार आहात. तुम्ही आमच्याकडून पैसे घेणार असे दिसतेय. त्यानंतर १०० बसेस खरेदीकामी दायित्व म्हणजे त्याचा ४० टक्के वाटा आत्ताच घेणार. त्यानंतर वित्तीय संस्थेकडून अर्थसहाय्य उभे करुन वित्तीय संस्थांस पीएमपीएमएलकडून येणा-या वर्षामध्ये कर्ज परतफेड करण्यास लागणारी वित्तीय हमी देण्यास व त्या वित्तीय सहाय्यातून पीएमपीएमएलने आवश्यक ESCROW अकाऊंट उघडून त्यामार्फत पेमेंट अदा करणे. म्हणजे त्यावेळी पण पैसे मागणार. आज फक्त १०० बस खरेदीसाठी ४० टक्के द्यायचे नाहीततर पुढे सुद्धा देत रहायचे. बसेस उपलब्ध झाल्यानंतर पीएमपीएमएलला आवश्यक संचलन तुटीची रक्कम/आवश्यकता असलेल्या ठिकाणी नविन बस डेपो उभारणे, नविन टर्मिनल बांधणे, जुने डेपो/टर्मिनल नुतनीकरण करणे व अन्य अनुषंगिक सुविधा पी.एम.पी.एम.एल. याच्या प्रस्तावातून उपलब्ध करुन देण्याचे आर्थिक दायीत्व स्विकारणे, याचा अर्थ तिथेसुद्धा पैसे लागणार आहेत. जीएसटी आल्यानंतर महापालिकेचे निश्चित उत्पन्न काय राहील याची हमी देता येत नाही. नवीन ७०० बसेस आणि त्यात अजून १०० बसेस म्हणजे ८०० बसेसची वाढ होते आहे. मागील वर्षातली जी आकडेवारी दिली आहे, त्यानुसार पीएमपीएमएलच्या १४०० बसेस कार्यान्वित आहेत. ३२४ बसेस स्क्रॅप होणार आहेत. २०० बसेस ब्रेकडाऊन असतात. ६५३ बसेस भाडेतत्वावर आहेत. नवीन ५० बसेस, वित्तीय सहाय्यातून ५५० बसेस व ५०० भाड्याने घेणार आहोत. एवढ्या बसेसची आवश्यकता आहे का. याचे तुम्ही कसे केले आहे. मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,स्थायी समितीच्या बैठकीत काय निर्णय झाला याची माहिती दिली आहे का. यानंतर स्थायी समितीने या ठरावात बायफर्केशन करुन हा निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त, पिं.चिं. यांना देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणे. आज जेवढ्या जेवढ्या मुद्यांची चर्चा झाली तरी ठराव झाला, आयुक्तांना अधिकार दिली की हा विषय संपतोय. या विषयावर परत एकदा नीट विचार होणे गरजेचे आहे.

**मा.तानाजी खाडे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ताच आमच्या पक्षनेत्यांनी याठिकाणी सविस्तर मार्गदर्शन केले आहे. आमचे ज्येष्ठ सदस्य माजी महापौर आर.एस.कुमार यांनी देखील काही सूचना केल्या आहेत. आज जो विषय आहे हा ब्लँक आहे. म्हणजे या विषयात सविस्तर काही समजत नाहीए. ८०० बस घ्यायच्या का १०० घ्यायच्या. एकूण किती बस घेणार आहात याचे बजेट. हे सगळे पैसे घेऊन देखील आपण काही टक्के रक्कम देऊनसुद्धा उद्या बसपासचा १०,००० लावलेला रेट आहे, त्या पद्धतीने उद्या पैसे द्यावे लागतील. उद्या दिवाळी बोनस आला तेव्हा पैसे द्यावे लागतील. जेव्हा जेव्हा मागीतले तेव्हा पैसे देत आलो आहोत. हा विषय संशयास्पद आहे. माझा वैयक्तिक या विषयाला विरोध राहणार

आहे. पीएमपीएमएल वेगळी केलेली सगळ्यात चांगले राहील. एवढे पैसे देतोय, पीएमपीएमएलची सावत्र आईची भूमिका त्या पद्धतीने चालली आहे. याला माझा विरोध आहे.

**मा.नितीन काळजे-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पीएमपीएमएलचा विषय प्रत्येक वेळी येतो. पैसे द्यायचे नाही म्हणून विरोध होतो, सगळे होते. मा.महापौर साहेब, माझे मत आहे. मी सभागृहाला विनंती करतो की, यांना भेटून सुद्धा काहीच होत नाही. हा विषय मंजूर करु नका. ते जोपर्यंत मागण्या पूर्ण करत नाहीत, तोपर्यंत पैसे देऊ नका. दरवेळी चर्चा होते व विषय मंजूर होतो. एकदा काय व्हायचे ते होऊ द्या. आपण प्रत्येकवेळी यांच्या हातापाया का पडायच्या. हे काही ऐकत नाही. हे सगळ्यांना त्रास देतात. बससेवा चालू करा म्हटलेतर ते अजिबात चालू करत नाहीत. यांना अजिबात मदत करु नका. मी तर म्हणतो, पूर्ण विरोध केल्याशिवाय ते काही करणार नाहीत. प्रत्येक वेळी भांडलो तरी पैसे देतो. पैसे मिळाले की ते पळतात. कारण यांना आपली काही गरज नाही. मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती आहे की, जोपर्यंत आमची मागणी पूर्ण करत नाहीत, तोपर्यंत यांना पैसे देऊ नका.

**मा.अनिता तापकीर-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आज पीएमपीएमएलचा विषय अजेंड्यावर आहे. रहाटणी, काळेवाडीत बस व्यवस्थित वेळेवर नसतात. चिंचवडवरून हिंजवडीपर्यंत बस मार्ग व्हायला पाहिजे. त्या कुठून जातात. मधल्या रस्त्याने घ्या. रहाटणी-काळेवाडीत पीएमपीएमएलच्या किती बस चालू आहेत ते माहित नाही. आत्ता सुद्धा एक बस बंद पडली आहे. बस बसस्टॉपला उभ्या नसतात. मध्येच उभ्या राहतात. लोक पळत असतात. बसस्टॉप जिथे आहे, तिथे बसने व्यवस्थित उभे राहून नागरीकांना व्यवस्थित घेतल्या पाहीजे. बसचे रुटीन पाहिजे. बस काळेवाडीवरुन आळंदीला जायला वेळेवर नसते. वायसीएमला जायला वेळेवर नसते. बसच्या वेळा नागरीकांना माहित नाहीत. काळेवाडीत नव्या बस दिल्या नाहीत. जुन्याच बसेस आहेत. चांगल्या दर्जाच्या बस द्याव्यात. नागरीकांचे हाल होऊ नयेत. काळेवाडीत मारुती मंदीरासमोर एक बसस्टॉप केला आहे तिथे बसस्टॉप सोडून बस पुढे जाऊन थांबते. नागरीक पळत असतात. नागरीकांना व्यवस्थित सेवा द्यावी. बसस्टॉपपाशी बस थांबवावी. पिंपरी ते काळेवाडी रस्त्याला एक पण बस थांबत नाही. पिंपरी चौकात पाहिलेतर लोक रिक्शाने प्रवास करत असतात. चांगली सेवा द्यावी अशी सभागृहाला विनंती करते आणि थांबते.

**मा.आरती चौंधे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पहिल्या निगडीकडे जाणा-या बसेस साई चौक रहाटणी मार्गे जात होत्या. आता बीआरटी मार्ग झाल्यामुळे कोकणे चौक, पिंपळे गुरव अशा बस वळवल्या आहेत. निगडीला शाळा, कॉलेजला आमचे जे विद्यार्थी जातात, त्यांना खूप अडचण होते आहे. त्यांना कोकणे चौकात बसायला जावे लागते. पूर्वी ज्या

रुटने बस जात होत्या, त्या तशाच सुरु कराव्यात. दुसरी एक पिंपळे निलख-आळंदी बस आहे ती रक्षक सोसायटी रहाटणी मार्गे जाते. मी अनेक वेळा सांगितले की, ही बस डीपी रोड पिंपळे निलख वाकड विशालनगर मार्गे जावी. मला असे सांगण्यात आले की, त्या मार्गे बस जाऊ शकत नाही. हडपसर-पुणे बस त्या मार्गाने जाते तर पिंपळे निलख वरून आळंदीला जाणारी बस त्या मार्गाने का जाऊ शकत नाही. ही बस विशालनगर मार्गे जाऊ द्या,एवढेच बोलून थांबते.

**मा.राजेंद्र काटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,तुमचे पिंपळे गुरव,दापोडी असेल,सांगवी असेल या परिसरात अनेक कार्यकर्ते असतील, पीएमपीएमएलचे वर्कर, कामगार आपल्या भागात राहतात. त्यांच्याकडून घेतलेल्या माहितीवरुन मी तुम्हाला सांगू इच्छितो, ते अक्षरशः पहाटे तीन साडेतीनला उठतात. धावत पळत सुटतात. माझा स्पष्ट आरोप आहे, तुमच्याकडे पूर्ण सेटींग असते. कुणाला ड्युटी देतात, कुणाला देत नाहीत. सकाळी ४.०० वा. जरी माणूस गेलातरी गाडी नाही म्हणून त्याला परत घरी पाठवायचे. तुम्ही स्वतःहून त्याला घरी पाठवत असालतर त्याला त्या दिवसाचा पगार द्या. तुम्ही त्याला त्या दिवसाचा पगार देत नाहीत. हा अन्याय नाहीतर काय आहे. का म्हणून एवढं फुकट पळत जायचं आणि तुम्ही परत पाठवायचं, काय कारण आहे. दुसरी गोष्ट, तुमच्याकडे ऑफीसला आलोतर तिथे पाहिलेतर तुमच्याकडे किती फिटर ऑफीसमध्ये काम करतात. फिटर ऑफीसला पाहिजेत का वर्कशॉपला पाहिजेत. तुमच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही सगळे अधिकार वापरता. कुणी तुमच्या पुढे पुढे केले की त्याला पाहिजे ती ड्युटी दिली जाते. मग तो चेकर असेल, फिटर असेल, त्याला ऑफीसला ऑफीस बॉय म्हणून घेतले जाते. तुमच्या म्हणण्याप्रमाणे सगळ्या सुविधा. मघाशी मा.मंगलाताई कदम म्हणाल्या, आमच्याकडे खूप चांगले आहे. मला विचारायचे आहे की, तुम्ही दुजाभाव करत नसालतर तुम्हाला निर्णय घेताना कळाले नाही. फक्त पुण्यातच दर्शन बस चालू करता आल्या. तुम्ही पीएमपीएमएल ही संस्था एकच मानता मग तुम्हाला सांगायला का लागते. पिंपरी चिंचवड आपल्या हद्दीत येते तर तिथेपण पर्यटन बस चालू करावी हे तुम्हाला स्वतःहून कळत नाही. हे सांगायची वेळ आमच्यावर का येते. तुम्हाला आमच्याकडून बस पाहीजेत, आमच्याकडून पैसे पाहिजेत, डेपो पाहिजेत. फायद्याच्या तेवढ्या गोष्टी पाहीजेत. मग आमच्या नागरीकांना सुविधा द्यायला का कमी पडता. तुमच्याकडे ऑफीसमध्ये जे काम करतात मग ते फिटर असतील. त्यांच्या नावासकट मी देऊ शकतो. इतका स्पष्ट माझा आरोप आहे. तुमचा कारभार पहिला सुधारा. चांगल्या प्रकारे करा. भाडेतत्वावर ज्या बस घेताय, ज्या कंपन्या असतील त्यांना कोणीतरी बांधील आहे. निश्चितपणे देण्याघेण्याचा व्यवहार होत असेल म्हणून आपण यांना पोसतोय का. असे होत असेलतर अतिशय चुकीची गोष्ट आहे. मा.श्रीकर परदेशी साहेबांनी त्यांच्या काळात या बंद असलेल्या बस चालू केल्या होत्या. पीएमपीएमएल

फायद्यात आणली होती. आपण त्यांच्याप्रमाणे स्वच्छ कारभार करावा. साहेब, पुढील वेळी येताना तुमच्या स्टाफचे वर्गीकरण एकदा आम्हाला द्या. त्यानुसार त्यांचे ड्रायव्हर किती, कंडक्टर किती, फिटर किती, आमचे ड्रायव्हर किती, कंडक्टर किती हे सुद्धा आम्हाला कळू द्या. हे समांतर पातळीवर द्यायचे असतीलतर याचा पुन्हा एकदा विचार केला पाहिजे. साहेब, एक महत्वाची गोष्ट म्हणजे, तुम्हाला आत्ता बराच वर्षांचा अनुभव आलेला दिसतोय की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सभेत एकदा विषय आला की त्यावर सभेमध्ये भरपूर चर्चा होते. भरपूर आरोप होतात. म्हणून तुम्ही यावेळी स्पेशल काळजी घेतलेली दिसतेय. ही स्पेशल काळजी म्हणजे, ७ नंबरचा विषय आहे, त्यात म्हटल आहे की, बसेस उपलब्ध करुन देण्यासाठी खरेदीच्या विविध टप्प्यांवर पी.एम.पी.एम.एल. ला आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त, पिं.चिं.यांना द्यावा. म्हणजे परत इथे यायलाच नको. सभागृहाला परत तोंड दाखवायलाच नको. एवढी काळजी आपण पुरेपूर घेतली आहे. काय गरज आहे. लोकांना कळू दे की, तुम्ही काय करता. स्वच्छ कारभार करा. सभागृहासमोर येऊ दे. साहेब, तुम्ही कामगारांचा नक्की विचार करा. आमचे कर्मचारी सकाळी ४ वा. तुमच्या वेळेत येतात, तुम्ही त्यांना परत पाठवता. याचा मी निषेध करतो.

**मा.झामाबाई बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पीएमपीएमएलच्या हा विषय बराच वेळ चालला आहे. ज्येष्ठ पदाधिका-यांनी, पक्षनेत्यांनी, माजी महापौरांनी चर्चा केली आहे. त्याचप्रमाणे मी सुद्धा सांगू शकते. यात उल्लेख आहे. पाचशे का शंभर अंदाजे किती गाड्या घेणार. आणि त्याची किती रक्कम देणार आहोत. सगळ्यांनीच उल्लेख केला आहे की, पैसे द्यायचे नाहीत. परंतू असे म्हटले तरी असे होणार नाही हे सगळ्यांना माहित आहे. पैसे द्यावे लागणार आहेत. या विषयावर चर्चा करत असताना आमच्या सभागृहनेत्या/पक्षनेत्यांनी उल्लेख केला की, खरेतर याची माहिती मिळाली पाहिजे. सदस्यांनी जे काही तळमळीने सांगितले आहे. अधिका-यांनी पण ऑडीटबद्दल स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, हे असं असं झालं आहे. आपण डोळे झाकून त्यांच्यावर विश्वास ठेवतो. म्हणजे आंधळं दळतयं आणि कुत्रं पीठ खातयं असा प्रकार आहे. असे न करता सभागृहातील सर्व सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, आपण त्याचा विचार करुन काटकसरीने व कशा पद्धतीने महापालिकेकडून किती रक्कम द्यायला पाहिजे हे ठरवले पाहिजे. आपण पाचशे बसेस घ्यायच्यात का शंभर बसेस घ्यायच्यात याचा उल्लेख केलेला नाही. या विषयात किती रक्कम द्यायची आहे याचा उल्लेख केलेला नाही. किती बसेस घ्यायच्या याचा उल्लेख दिसलेला नाही. आमच्या कर्मचा-यांना पीएमपीएमएलमध्ये व्यवस्थित वागणूक मिळत नाही. असे झाले नाही पाहिजे. मी मागील वेळी सुद्धा महापौर साहेबांना विनंती केली होती की, वॉर्डमधील जे अंतर्गत रस्ते आहेत. २४ मी.चे रस्ते आहेत, ४० मी.चे मोठे रस्ते आहेत. या रस्त्यांमधून बसगाड्या जाव्यात अशी मागणी केली होती. डांगे

चौकातून थेरगाव गावठाण, मोरया मंगल कार्यालयापासून अशोका सोसायटी काळेवाडी फाट्यावर या गाड्या निघाल्या पाहीजेत. कारण ज्येष्ठ नागरीक व लहान मुले, अपंग विद्यार्थी यांना लांब जायचे असेलतर त्यांचे हाल होतात. त्यांना एक कि.मी. पर्यंत चालत जावे लागते. ज्येष्ठ नागरीक व अपंग विद्यार्थ्यांकरिता अंतर्गत रुट घेतले पाहिजेत. मी अनेक वेळा मागणी केली आहे. एवढेच सांगू इच्छिते व थांबते.

**मा.शारदाताई बाबर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मी फक्त एकच मिनीट बोलणार आहे. पीएमपीएमएलच्या कामकाजाबद्दल सर्व पक्षीय नगरसेवक ओरडत आहेत. पक्षनेत्यांनी तर कळवळून सांगितले आहे. पक्षनेते म्हणाल्या की, दोन दिवसांत काय असेल तर सांगा. दोन दिवसांपूर्वी नगरसेवकांनी कम्पलेण्ट केली होती. गेले साडेचार वर्षांपासून मी कम्पलेण्ट करतेय. त्यात आता ५/६ महिने राहिले आहेत. आपण त्यांना शंभर बस देणार, त्यानंतर ते आपल्याला एक बस देणार. म्हणजे हे कधी देणार, तुम्ही आम्हाला शंभर बस द्या, नंतर आम्ही तुम्हाला एक देऊ. यात आमचे पाच/सहा महिने जाणार, म्हणजे आमची पाच वर्षे पूर्ण झाली. तुमची बस ज्या रुटने जाते आहे, ती फक्त आमच्याकडे वळवा. नक्की काय प्रॉब्लेम आहे. पीएमपीएमएल विभक्तच करा. कशाला एकत्र करताय. असे म्हटलेतर यांची प्रतिक्रिया काहीच नाही. माझ्या भागात बसस्टॉप लावला आहे पण बसच नाही. बस कधी येईल ते सांगा. मला जास्त बोलायला आवडत नाही. बोलून उपयोग होत नाही त्यासाठी चिड आली आहे. मला या शंभरातली नाही पण ज्या जुन्या गाड्या आहेत, त्यातली दिली तरी चालेल. माझ्या वॉर्डमधून वायसीएमला जाणारे नागरीकांची संख्या जास्त आहे. आत्ता मा.आर.एस.कुमार यांनी तसेच मा.सुलभाताई ऊबाळे यांनी पण विषय मांडला होता की, पीएमपीएमएल खरेच विभक्त करा. आपण पैसे देऊन त्यांचे ऐकून घ्या. प्रत्येकवेळी जी.बी.त उठून बोला. कशाला कंपनी पाहिजे. एवढेच सांगते. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.शांताराम भालेकर** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आज याठिकाणी ज्येष्ठ नगरसेविका मा.झामाबाई बारणे बोलल्या त्याप्रमाणे आंधळं दळतयं आणि कुत्रं पीठ खातयं ही खरी परिस्थिती आहे. सभागृहाने खरोखर डोळे उघडायची गरज आहे. मा.महापौर साहेब, तुम्ही थोडा सुद्धा राग येऊ देऊ नका. आपला पीएमपीएमएलमधील हिस्सा आहे १६ टक्के, त्यांचा हिस्सा आहे ८४ टक्के. पैसे देताना मात्र ४० टक्के प्रमाणे आपण पैसे द्यायचे. आणि आपल्याला वागणूक जी मिळते, एक टक्का सुद्धा आपल्याला किंमत नाही. आपल्याला तिथे कवडीची पण किंमत नसताना आपण खरेतर आंधळे आहोत. आपण हे का करतोय हेच कळत नाहीय. प्रत्येक वेळी विषय येतो, सगळे बोलतात, सगळे विरोध करतात आणि विषय मंजूर केला जातो असे का होते. म्हणजे आपण ख-या अर्थाने आंधळे आहोत. आपण डोळस व्हायची, डोळे उघडायची गरज आहे. ४० टक्के रक्कमेचा हिस्सा देऊन सुद्धा ही परिस्थिती.

मा.महापौर साहेब, आपण आपली पीसीएमटी चालवली असती, ४० टक्के रक्कम जी देतो ती इथे लावली असतीतर आपली पीसीएमटी आज एक नंबर झाली असती. जगात कुठेही बघा वाहतूक व्यवस्था म्हटली की ती नेहमी तोट्यातच असते. पण आपली परिस्थिती निश्चितपणे सुधारली असती. आत्ता सांगितल्याप्रमाणे आपण डोळसपणे डोळे उघडून काम करायची गरज आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, हा विषय मंजूर करु नका. सन्मा.सभागृहाने निर्णय घ्यावा. पीएमपीएमएलला पैसे द्यायचे काम करु नका. एवढेच याठिकाणी बोलतो.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर परवा या विषयावर चर्चा सुरु असताना मिटींग तहकूब झाली होती. कारण पीएमपीएमएलच्या कारभाराविषयी सन्मा.सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र स्वरुपाच्या आहेत. म्हणून कोणाला विषय मंजूर करावासा वाटला नाही. परवा आम्हालाही तसेच वाटले. असा गलथान कारभार. या विषयाला संमती देण्यापेक्षा सभागृहातून बाहेर निघून गेलेले बरे. म्हणून मुद्दाम कोरम कमी केला व मिटींग तहकूब झाली. मंगलाताईंनी पण भाषण केले. मला ताईंचं भाषण फार आवडलं. कारण त्यांनी त्यांच्या भाषणात भ्रष्टाचाराचे मुद्दे उपस्थित केले. अगदी तिकीट छापण्यापासून ते पंचिंग पर्यंत सगळे भ्रष्टाचाराचे आरोप त्यांनी केले. आज सत्ताधारी असताना एवढे मोठ्ठे धाडसं, निर्भीडपणे त्यांनी केले. त्यामुळे मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. पण दुसरी बाजू पाहिलीतर कुठेतरी हा विषय पास करायची मानसिकता त्यांच्यात आहे. जर हे सगळं डोळ्यांनी दिसतय. सदस्य म्हणतात की आम्हाला हे कळत नाही, आम्हाला हे नाही ते नाही. मुळात आपण सगळे अधिकारी त्यांना स्वाधिन केले आहेत. एक साधा हिशोब आहे. पीएमपीएमएल पूर्वीची पीसीएमटी, पीएमटी १९७४ पासून २००६ पर्यंत ३३ वर्षांचा हिशोब आहे. या ३३ वर्षांमध्ये भांडवली खर्च व महसूली खर्च यावर रु.११९ कोटी इतका खर्च इथे झाला आहे. पीएमपीएमएल यांचा फक्त ९ वर्षांचा संसार अजूनही अधिकृत नाही. पीसीएमटीचे पीएमपीएमएलमध्ये विलीनीकरण झाल्यानंतर ॲग्रीमेंट नाही, नियमावली नाही म्हणून हा अनधिकृत संसार असे मी म्हणतोय. यावर आजपर्यंत ५६३ कोटी रुपये खर्च झाला आहे. इथे मोठा भ्रष्टाचार आहे. आपल्या तीन सदस्यांना समितीवर घेतले आहे. परंतू सगळा अंकुश पुणे महापालिका व विशिष्ट लोकांकडे आहे. आपल्याला काहीच मनासारखे करता येत नाही. जर पीसीएमटी स्वतंत्र संस्था असतीतर आज महापालिकेला चांगले दिवस आले असते. चांगल्या पद्धतीने आधुनिकीकरण आणून एक चांगल्या पद्धतीची दळणवळण व्यवस्था यात आपण करु शकलो असतो. अजूनही वेळ गेलेली नाही. आपण अजूनही ठराव करुन शासनाला कळवू शकतो की, आम्हाला पीएमपीएमएलमधून विभक्त करा. आज एवढा मोठा खर्च करायचा विषय इथे पाठवला आहे. मी पीएमपीएमएलच्या अधिका-यांचे कौतुक करतो की, किती तोलून मोलून, कुठल्याही प्रकारची भाषा त्यातून विषय समजून येणार नाही असा छुपा विषय इथे आणला

आहे. ते तीन पद्धतींनी बस खरेदी करणार आहेत. दोन्ही संस्थांच्या दायित्वानुसार याठिकाणी ५०० बस खरेदी करणार आहेत. आत्ताच एका सदस्यांनी सांगितले आहे की, आपण त्यांना आंधळेपणाने परमिशन देतोय. कुठलीच आकडेवारी दिलेली नाही. जर ही आर्थिक संस्था आहे तरी या विषयात फक्त बस या वस्तूचा उल्लेख केला आहे. परंतू ज्या बस घेणार आहोत, त्याचे बजेट किती आहे. अशी कोणत्याही प्रकारची परमिशन इथे घेत नाहीत. ५०० बस कशा घेणार आहोत. कारण प्रत्येक बसची खरेदी वेगळ्या पद्धतीने आहे. पुन्हा एकदा खाली १०० बसेस खरेदीचा उल्लेख आहे. त्यांच्या मिटींगमध्ये जे निर्णय झाले आहेत, ते सगळे निर्णय पुन्हा इथे अवलोकनासाठी आले आहेत. एकाच विषयात किती सावळा गोंधळ आहे. एका विषयात किती विषय लपवलेले आहेत. इथे आलेले सन्मा.अधिकारी त्यांच्या खात्याच्या माध्यमातून सभागृहाची दिशाभूल करत आहेत. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे पाहिलीतर सन्मा.सदस्यांनी त्यांना जे प्रश्न विचारले होते, त्यांनी त्यातल्या एकाही प्रश्नाचे सकारात्मक उत्तर दिलेले नाही. हे होणार नाही. हे शक्य नाही. हा शासन निर्णय आहे. मग मला सांगा. सभासद इथे बोलतात. आमचे त्यांच्यावर कोणतेही निर्बंध राहिलेले नाहीत. आम्हाला मनासारखे काही करता येणार नाही. म्हणून माझे मत आहे की, आपण एकतर या बसेस स्वतः महापालिकेच्या माध्यमातून विकत घेऊन देऊ. आणि सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे त्यात पारदर्शकता निर्माण होईल. ही महापालिका चालविण्यात व विकासात टाटा प्रकल्पाचे फार मोठे योगदान आहे. पूर्वीसुद्धा सन्मा.सदस्यांनी पठाणताईंनी देखील सांगितले होते की, टेल्को कंपनीच्या बस खरेदी करा. ते जर या शहरासाठी एवढे करत असतीलतर आपण टाटा मोटर्सच्या बस खरेदी केल्या पाहिजेत. हे सगळे आपल्याला करता येईल परंतू त्यासाठी धाडसाने निर्णय घेण्याची गरज आहे. आजची पिंपरी चिंचवड महापालिकेची व्यथा काय आहे हे त्यांना समजून सांगता येईल. आज शहरात चांगले बसस्टॉप नाहीत, चांगल्या बसेस नाहीत. आपल्याला हा जाहीर निर्णय घेता येईल. आजही पीएमपीएमएलचं कुठल्याही प्रकारचं ॲग्रीमेंट नाही, कुठल्याही प्रकारची नियमावली नाही. म्हणजे लग्न झालं आहे पण सगळं रजिस्टर्ड नाही. फक्त मनाने एकत्र आहेत. अशा प्रकारे अनधिकृतपणे हा सगळा कारभार सुरु झाला आहे. ऑडीट नाही. आजपर्यंत दिलेल्या पैशांचे ऑडीट झालेले नाही. आत्ताच ताईंनी सांगितले. सगळं डोळ्यांना दिसतय म्हणून सदस्य विरोध करतात. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, एकतर हा विषय नामंजूर करावा. बिल्कूल मंजूरी देऊ नये. सन्मा.आयुक्तांकडून नव्याने एक विषय आणून स्वतंत्रपणे परिवहन संस्था स्थापन करावी. अशाप्रकारे याठिकाणी होत असलेला भ्रष्टाचार व होत असलेल्या सगळ्या गोष्टींतून आपल्याला बाहेर पडायचे आहे. यांच्या पापात आपण सहभागी होऊ नका. यात फार मोठा भ्रष्टाचार आहे एवढेच इथे दिसतेय.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आत्ता खरेतर या विषयावर ब-याच सदस्यांनी आपले मत व्यक्त केले आहे. पण मी दोन/तीन मुद्यांवर जास्त बोलणार आहे. याठिकाणी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या, पीएमपीएमएलच्या माध्यमातून पीसीएमटीच्या विषयावर बोलणे हे ख-या अर्थाने सभागृहाचे, या शहराचे दूर्दैव आहे की, पीएमपीएमएलच्या माध्यमातून पीसीएमटीचा विषय सभागृहात चर्चेला येतो. सभा तहकूब होते. या विषयावर सभागृहात चार/चार तास चर्चा चालते. ख-या अर्थाने आमचे दूर्दैव आहे जेव्हापासून ही पीसीएमटी पीएमपीएमएलमध्ये विलीन झाली, तेव्हापासून पुणे महापालिकेच्या वतीने, पीएमपीएमएलच्या असलेल्या मनमानी कारभारामुळे या शहरातील चाकरमान्यांचा व कामगारांचा अपमान झाला आहे. याठिकाणी चाकरमान्यांना कोणताही न्याय मिळालेला नाही. मी हा निश्चित इथे सभागृहाच्या माध्यमातून आरोप करतोय. कामगारांनी आमच्यासारख्या सदस्यांना निवेदन दिल्यानंतर एक/एक वर्षभर पीएमपीएमएल यांना जाग येत नसेल, आज कामगारांची काय अवस्था आहे. म्हाळूंगे एमआयडीसी, चाकण एमआयडीसीत सकाळी आमच्या शहरातला कामगार जातो. त्याचा सकाळचा दोन तास लेट लागतो. त्याच्या कुटूंबाला पगार कमी मिळतो. याला जबाबदार कोण असेलतर पीएमपीएमएल आहे. आमचा कामगार सकाळी पाचला घर सोडतो, त्याला आठला बस मिळते. त्याचे पंचिंग ७ वा. असते. त्या कामगाराने काय करायचे. मग या महानगरपालिकेचे नाव जगात असेल आणि पीएमपीएमएलमुळे जर या महानगरपालिकेचे नाव खराब होत असेलतर तातडीचा निर्णय घ्या. या शहराचे नाव खराब होऊ देऊ नका. पीएमपीएमएल मधून पीसीएमटी वेगळी करा, असाच सर्वांचा सूर आहे. यावर खरोखर निर्णय घ्या. पीएमपीएमएलमध्ये आमच्या सदस्यांना काहीही किंमत नाही. एक वर्षापूर्वी निवेदन दिले होते. पण यावर कोणताही विचार झाला नाही. माझ्या पत्राला साधे उत्तर दिले नाही हे दूर्दैव आहे. आत्ता महापौरांनी सांगितले. आम्हाला येथे बोलण्यासारखे भरपूर आहे. पण मी जास्त बोलत नाही. पण निश्चित सभागृहाच्या वतीने पीएमपीएमएलचा निषेध करतो. पिंपरी चिंचवड महापालिकेला पीएमपीएमएलच्या वतीने जी वागणूक दिली जाते याचा सभागृहात जाहिर निषेध करतो. नुसत पैशांचं गठ्ठुडं घ्यायचं आणि सेवा द्यायची नाही, हे या मनपाचे, शहराचे काम नाही. यातून शहराची होणार बदनामी. आयुक्त साहेबांनी, महापौर मॅडम यांनी याकडे लक्ष द्यावे. पीएमपीएमएलचा जो कारभार चालला आहे तो थांबवावा. अन्यथा सर्व सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे माझेही मत आहे की, पीसीएमटी पीएमपीएमएलपासून वेगळी करा. सर्वसामान्य नागरीकांना, कामगारांना, चाकरमान्यांना न्याय मिळेल. श्रीमंतांना सुद्धा न्याय मिळेल. ते सुद्धा पीसीएमटीने खेड, राजगुरुनगर, चाकण, तळेगाव, लोणावळ्यापर्यंत आरामात जातील याबद्दल दुमत नाही. मी माझे दोन मुद्दे बोलून माझे वक्तव्य संपवतो. जयहिंद.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मोरे साहेबांनी जे उत्तर दिले. किंवा गेले दोन तांस आपण या विषयावर चर्चा करतोय. परंतू मला वाटतेय की, सर्व सन्मा.सदस्यांच्या पीएमपीएमएलबद्दल भावना तीव्र आहेत. असे असताना मात्र सभागृहाने किंवा आपण हे विसरता कामा नये की, पूर्वी पीसीएमसी व पीएमसी दोन्ही सभागृहांनी एकत्रित मान्यता दिल्यानंतर ही कंपनी फॉर्म झाली. कंपनी फॉर्म झाल्यानंतर पीएमपीएमएलचा कारभार चालू झाला आहे. त्यांच्या कारभारात ज्या दुरुस्त्या अपेक्षित आहेत. त्यावर बोलणे जास्त योग्य राहील असे मला वाटतेय. आम्हाला आमची पीसीएमटी परत करा असे म्हटले तरी हा निर्णय आता आपल्या हातात राहिलेला नाही. मागे पुणे महापालिकेने सुद्धा असा ठराव केला होता. परंतू शासनाने त्यावर काही निर्णय घेतलेला नाही. असा निर्णय घ्यायचा झालातरी पुन्हा शासन दरबारी निवेदन सादर करावे लागले. मघाशी अनेक सदस्यांनी भाषण करत असताना काही चांगले मुद्दे मांडले आहेत. परंतू मला मोरेसाहेबांकडून एका गोष्टीचा खुलासा हवा आहे. कारण मा.मंगलाताई कदम यांनी त्यांच्या भाषणात, अनेकांनी त्यांच्या भाषणात ६०-४० हिश्यावर भर दिला आहे. ६०-४० हा हिस्सा फंडींगसाठी आहे असे माझे मत आहे. परंतू प्रमोशनसाठी ४० टक्के लागू होऊ शकत नाही. आणि कसे करणार ते कळालेले नाही. तिथे महापौर असतात, आयुक्त साहेब असतात, चेअरमन डब्बु आसवानी असतात. मग आपण एकदा दोन्ही कंपन्या एकत्र केल्या म्हणजे मर्ज केल्या. मग सगळ्यांची सिनिऍरीटी ही सिनिऍरीटीच राहणार आहे. त्यात बदल कसा होईल. टक्केवारीत बदल कसा होईल. प्रमोशन देताना सहा तिकडचे व चार इकडचे असे शक्य नाही असे माझे प्रामाणिक मत आहे. कारण मर्जिंग झालेले आहे. म्हणून कदाचित आमच्या कर्मचा-यांना न्याय मिळत नाहीए का. कदाचित हे आमचे अज्ञान आहे का. कदाचित आम्ही चुकीचे बोलतोय का. मा.महापौर साहेब, खरेतर याचा खुलासा आयुक्त साहेबांनी किंवा मोरे साहेबांनी करावा. कारण आमची धारणा अशी आहे की, एकदा मर्जिंग झाल्यानंतर त्यात सिनिऍरीटी वेगळी कशी करणार. असे करता येईल का. दुसरी गोष्ट म्हणजे इथे ज्या भावना मांडल्या गेल्या आहेत. मा.महापौर, मा.आयुक्त व मा.स्थायी समिती अध्यक्ष ही तीन मंडळी आमची आहेत. यांच्या कामाची व्याप्ती मा.मंगलाताईंनी त्यांच्या भाषणातून सांगितली आहे. परंतू मोरे साहेब, तुम्हाला या सर्व गोष्टींवर ख-या अर्थाने नियंत्रण आणायचे असेल, तुमचं आमचं माझं तुमचं हे करण्यापेक्षा दोन्ही महापालिकांनी मिळून ही आपली कंपनी आहे. खरेतर पीएमसीने पीएमसी म्हटले नाही पाहिजे आणि पीसीएमसीने पीसीएमसी म्हटले नाही पाहिजे. त्याला पीएमपीएमएलच म्हटले पाहिजे. आणि यात सुसूत्रता आणायची म्हणून आपण आरडाओरडा करतो, बोलतो, घसा कोरडा करतो. पण यातून निष्पन्न काही होत नाही. मा.आयुक्त साहेब, मला असे वाटते की, त्यांचे जबाबदार अधिकारी आहेत. त्यांना पिंपरी चिंचवड शहरात स्वतंत्र इमारत द्यायला पाहिजे. कारण आमचा ४० टक्के हिस्सा असलातरी ४० प्रमाणे खूप मोठी रक्कम दर वर्षी या महापालिकेला देऊ लागतो. मग इथल्या

कर्मचा-यांच्या काही अडचणी असतील, नागरीकांच्या काही अडचणी असतील, बसच्या अडचणी असतील याबद्दलचे त्यांचे म्हणणे ऐकून घ्यायला हे जरुरी नाही की आमच्या माणसाला तिथे स्वारगेटलाच जायला लागले पाहिजे. त्यासाठी इथे एक स्वतंत्र इमारत उपलब्ध करुन द्यावी. इथे एक जबाबदार अधिकारी बसवा म्हणजे महापालिका सभेत इतका आरडाओरडा होणार नाही. ज्या काही समस्या आहेत, अडचणी असतील. सभेत अनेकांनी रुटबद्दल, डेपोबद्दल सांगितले. मग यात सुसूत्रता आणायची असेलतर महापौरांनी आदेश द्यावेत. आणि असा प्रयत्न करावा की, या शहर मध्यवर्ती ठिकाणी पीएमपीएमएलचे एक चांगले ऑफिस असले पाहिजे. तिथे जबाबदार अधिकारी बसले पाहिजेत. जेणेकरुन आपल्यासारख्या नगरसेवकांना तिथे जाऊन त्यांच्या व्यथा मांडता येतील, नागरीकांना जाता येईल. तशा प्रकारची योजना चांगल्या पद्धतीने केली पाहिजे. मागे अष्टेकर साहेब हे काम बघत होते. नंतर त्यांची बदली इथे झाली. परंतू त्यांना अतिरिक्त पदभार देऊन यात कोऑर्डिनेशन करता येते का हे सुद्धा आपण पहावे. मला वाटते, मोरे साहेब, मी जे प्रश्न केले आहेत, मला त्यांचे उत्तर मिळाले की, पीसीएमसी व पीएमसी एकत्र होऊन पीएमपीएमएल ही कॉमन कंपनी झाली आहे. त्यामुळे सिनिएॅरीटी किंवा प्रमोशन चॅनल दोन्हीचे वेगळे आहे असे मला वाटत नाही. मा.महापौर साहेब, आपण खुलासा करायचा आदेश द्यावा. मा.आयुक्त साहेबांना विनंती आहे की, त्यांना खुलासा करु द्यावा.

**मा.भाऊसाहेब भोईर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पूर्वी एक परंपरा होती की, भाषण करायला शिकायचे असेलतर पीसीएमटीचा विषय आला की त्यावर बोलायचे. प्रत्येकाला बोलायचा आनंद घेता येतो आणि आपल्या व्यथा देखील मांडता येतात. परंतू त्याच परंपरेतील मी देखील कार्यकर्ता असल्यामुळे मी देखील थोडाफार बोलण्याचा आनंद घेतो. माझी नम्र विनंती आहे, एक नम्र सूचना आहे. पूर्वी महिना दीड महिन्यातून एकदा विषय यायचा. त्यामुळे मनापासून आनंद व्हायचा की, आज आपल्याला भाषण करायची संधी मिळणार आहे. परंतू आता वर्षातून एकदा विषय येतो. खरेदीचा विषय म्हणजे फार महत्वपूर्ण विषय आहे. अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. यावर विचार करत असताना माझी नम्र विनंती आहे की, आत्ता सर्व सदस्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. यात महापौरांनी जातीने लक्ष घालावे. एक नियोजन आराखडा असतो त्याप्रमाणे आपण महापालिकेचा विकास करतो. त्यापद्धतीने पीएमपीएमएलच्या संदर्भातील आपल्या भावना काय आहेत, त्या प्रत्येक पक्षीय सदस्याने त्याचा वर्षभरासाठी मास्टर प्लॅन तयार करावा. भौगोलिकदृष्ट्या पुणे शहराची व आपली तुलना कदापि होऊ शकत नाही. झपाट्याने वाढलेली लोकसंख्या व आपले विस्तारीकरण यात खूप तफावत आहे. त्यामुळे नियोजित आराखडा तयार करावा. किंबहुना पिंपरी चिंचवड शहरासाठी वर्षभराचा मास्टर प्लॅन तयार करावा. त्या दृष्टिकोणातून आपल्या असलेल्या उणीव असतील, नवीन रुटस् असतील त्यांचे नियोजन करा नाहीतर पुढील वर्षी अशाच पद्धतीच्या भावना

ऐकायला मिळतील. पुन्हा एकदा भाषण करायची संधी मिळून चांगल्या वाईट गोष्टी काय आहेत ते बोलाव्या लागतील. सर्व पक्षांतील लोकांना बोलवून आपला मास्टर प्लॅन तयार करावा. आमच्या शहराच्या, आमच्या नगरसेवकांच्या ज्या भावना आहेत, त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोणातून उपाययोजना करायचा प्रयत्न करावा. धन्यवाद.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**सन्मा.महापौर महोदया, सर्व सन्मा. सभागृह, बहल सरांनी जो प्रश्न केला, त्यात २००७ साली जी कंपनी स्थापन झाली, त्यावेळी पूर्वी पीएमटी व पीसीएमटीचे कर्मचारी मर्ज झाले. जशा मालमत्ता आल्या, तसे दोघांचे दायित्व सुद्धा आले. आस्थापना सुद्धा मर्ज झाली. त्यामुळे अमुक मालमत्ता पीसीएमटीची, अमुक मालमत्ता पीएमटीची असे म्हणता येणार नाही. तसेच कर्मचा-यांबाबतीत देखील म्हणायला वाव नाही. कालच जी काही सिनिऍरीटी लिस्ट पब्लिश झाली आहे. मालेगावकर समिती स्थापन करण्यात आली होती. त्यानुसार ही सिनिऍरीटी लिस्ट तयार झाली आहे. दोन्ही पीएमटी व पीसीएमटीकडील कर्मचारी ज्या तारखेला बदली कामगार म्हणून रुजू झाले होते. त्या दिवसाच्या दिनांकानुसार ही सिनिऍरीटी लिस्ट पब्लिश झाली आहे. कंपनी इंडस्ट्रीयल डिस्प्युट ऍक्ट ९ अ नुसार सूचना देऊन सिनिऍरीटी लिस्ट पब्लिश झाली आहे. त्यामध्ये पहिला पीसीएमसीचा कर्मचारी असू शकेल किंवा पीएमसीचा कर्मचारी असू शकेल. तसे म्हणायला वाव नाही. कदाचित पहिला त्यांचा असेलतर बाकी चार आपले असतील. पण तसे म्हणायला वाव नाही. कर्मचारी मर्ज झाल्यानंतर आज अमुक कर्मचारी हा पीएमसीचा आहे. ७५ टक्के पीएमसीला द्या आणि २५ टक्के पीसीएमसीला द्या किंवा ६० टक्के तिकडे द्या आणी ४० टक्के इकडच्यांना द्या असे करायला, असा भेदभाव करायला वाव नाही. आता रोस्टर तपासून मिळाले आहे. या रोस्टरनुसार जे काही आरक्षण असते. एससी असेल, एसटी असेल, व्हिजेएनटी असेल, त्याप्रमाणे सिनिऍरीटी लिस्टनुसार, चॅनलनुसारच प्रमोशन्स होतील किंवा केली जातील. यानुसार आमच्या ४० टक्के कर्मचा-यांचे प्रमोशन केले पाहिजेत असे नाही. दोन्हीकडील कर्मचारी मर्ज झाले असल्यामुळे हे पीएमपीएमएल संस्थेचे कर्मचारी आहेत. त्यामुळे ६० यांचे व ४० यांचे असे करायला वाव नाही.

**मा.योगेश बहल**-सन्मा.महापौर साहेब,मोरे साहेबांनी या प्रश्नाचा उलगडा केला आहे.परंतू मघाशी त्यांनी टक्केवारी सांगितली. त्या टक्केवारीनुसार एकूण सात हजार अधिकारी/कर्मचारी तिथे असताना पिंपरी चिंचवडचे फक्त १६/१७ टक्केच कर्मचारी तिथे राहतात. मग अशा परिस्थितीत कंपनी फॉर्म करत असताना ६० टक्के फायनान्शियल जबाबदारी ठरवून दिली आहे. मर्ज झाले, एकत्र केले हे तुम्ही क्लिअर केले. त्याप्रमाणे सिनिऍरीटी लिस्ट कॉमन झाली हे बरोबर झाले. परंतू बसेस किती असाव्यात, जशी मागणी असेल त्या पद्धतीने द्यावे. म्हणून दोन्ही बाजूंनी

समतोल राखण्याच्या अनुषंगाने अधिकारी असेल किंवा रिपोर्टींग असेल हे ठेवण्यासाठी पिंपरी चिंचवडमध्ये ऑफिस असणे गरजेचे आहे. आम्हाला हे रिपोर्टींग वेळोवेळी मिळाले पाहिजे. ४० टक्के फंडींग टाकताना आम्ही काहीही आकडे टाकायचे. आम्हाला सेवा उपलब्ध होताना २० टक्के होते का, २५ टक्के होते का १५ टक्के होते याचे मॉनिटरींग कसे होणार. त्यासाठी काय सूत्र असणार आहे. कर्मचारी भरती करताना सुद्धा पूर्वी आमचे १८०० कर्मचारी होते, आता १२४८ इतके राहीले आहेत. उरलेले ५५०० कर्मचारी तिकडचे असतील. भविष्यात याचे काय धोरण असणार आहे. त्यामुळेच ही विसंगती आहे. त्यामुळे जे ६०-४० चं फायनान्शियल पर्सेंटेज ठरवून दिले आहे, ते शासनाने ठरवून दिले आहे का कंपनी फॉर्म करताना हे नॉर्मस् ठरले आहेत ते सांगावे.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**सन्मा.महापौर महोदया, सर्व सन्मा. सभागृह, दिनांक १९/४/२००७ रोजीचा शासन आदेश आहे. शासनानेच ६०-४० असा रेशियो ठरवून दिला आहे. दि.१९ एप्रिल २००७ ला शासनाचे पत्र आले होते.

**मा.शमिम पठाण** – हे पत्र वाचून दाखवा.

(मा.मोरे,सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल यांनी पत्राचे वाचन केले.)

**मा.शमिम पठाण** – यात ६०-४० कुठे आहे.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**सन्मा.महापौर महोदया, सर्व सन्मा. सभागृह, यात ६०-४० असे निश्चित आहे. त्यानंतर संचालक मंडळाने सूचना दिलेली आहे. परिवहन मंडळ संचलनात जी तूट येत असते, ती तूट भरून काढण्यासाठी शासनाने आदेश केला आहे. त्यात स्पष्ट केले आहे की, स्वामित्वानुसार ही तूट भरून काढावी. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेस ६० टक्के व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस ४० टक्के असे दिले आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे** – मा.महापौर साहेब, तुम्ही हा विषय तहकूब ठेवा.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,खरेतर श्रावण महिना नक्की चालू आहे, असे मोरे साहेबांचे भाषण ऐकल्यावर वाटले. तुम्ही जेवढं बोलत होता त्याला मी इकडून स्वाहा स्वाहा असेच बोलत होते. स्टँडींग कमिटी चेअरमन महत्वाचे आहेत. त्यामुळे तुम्हालाच आरती करावी लागणार आहे. मा.महापौर आणि मोरे साहेब, तुम्हाला मा.योगेश बहल यांनी जो प्रश्न विचारला होता एक आणि तुम्ही पोथी पारायण आख्खं सांगितलं. त्यांनी काय सांगितले, कंपनी झाल्यानंतर तुम्हाला सिनिऍरीटीप्रमाणे प्रमोशन्स करायची आहेत. म्हणून आयुक्त साहेब, मी मघाशी सांगितले की, आपल्यातला एक अधिकारी

तिथे असला पाहिजे. आम्हाला विसर का पडतो. कारण हा विषय झाल्यानंतर परत पुण्यात कोणी जायचे. म्हणून आपल्याकडून या सगळ्या गोष्टींचे फॉलोअप सुटतात. म्हणून आपला एक अधिकारी असला पाहिजे. पहिले सुब्बराव पाटील होते. नंतर गवळी साहेब होते. मोरे साहेब बरोबर आहे ना. सुब्बराव पाटील होते त्यावेळी सुद्धा पीएमपीएमएल अस्तित्वात होती. त्यावेळी त्यांनी जी प्रमोशन्स दिली आहेत. त्यांनी जी प्रमोशन्स देऊन आज कोणकोणती लोक आहेत, मग त्यांची शैक्षणिक अर्हता. शैक्षणिक अर्हता कमी करण्यासाठीचा विषय त्या कमिटीत घेतला होता का. ते झाले होते का. या सगळ्या गोष्टी पाहण्यासाठी आमचा अधिकारी असला पाहिजे. मला वाटते की, मोरे साहेबांनी सभागृहात मांडलेले सगळे प्रश्न ऐकले आहेत. मोरे साहेबांनी हे प्रश्न लिहून घेतले आहेत. अष्टेकर साहेबांनी ते ऐकले आहेत. आणि अष्टेकर साहेब तर आमच्याच तावडीत आहेत. आहे आणखी एक चार्ज. आयुक्त साहेब तुम्हाला मान्य आहे का. तुम्ही पण सांगा, तुम्हाला मान्य आहे का, अष्टेंकर साहेबांना पीएमपीएमएल समजण्यासाठी अजून एक अतिरिक्त चार्ज द्यावा. ते मान्य असेल नसेल ते आत्ताच सांगा. म्हणजे आयुक्त साहेब आम्हाला विषयाचं काहीतरी करायला. चार्ज म्हणजे काय तर त्यांनी आम्हाला पीएमपीएमएलची माहिती द्यायची. कारण त्यांना पीएमपीएमएलची माहिती आहे. आपल्यातल्या कोणत्याही माणसाला आत्ता वाटले की अष्टेकरांना द्यावे तर त्यांनी पुढे करुन घ्यावे. मी सांगितल्याप्रमाणे पिंपरी चिंचवड कोऑर्डीनेटर म्हणा किंवा काहीही म्हणा. मा.आयुक्त साहेब, आम्हाला काही प्रॉब्लेम नाही. आम्हाला सगळ्यांना इथून त्यांना सांगता आले पाहिजे, त्यांच्याशी बोलता आले पाहिजे. आत्ता सदस्यांनी ज्या ज्या गोष्टी सांगितल्या, त्या सगळ्या गोष्टी त्यांना विचारता आल्या पाहिजेत. मोरे साहेब तुम्ही सांगताय, आज प्रोसिडींगमध्ये इथे आले आहे. पीएमटी व पीसीएमटी दोन्ही एकत्रित झाल्यानंतर त्यावेळी आमचे जे लोक होते, त्यांचे प्रमोशन्स सिनिऍरीटीप्रमाणे, क्वालिफिकेशनप्रमाणे झाले आहेत का नाही हे आम्हाला बघायचे आहे. मघाशी मा.शांताराम भालेकर यांनी देखील सांगितले की, आपण सगळे बोलतो पण शेवटी विषय मंजूर करतो. शेवटी विषय कशासाठी मान्य करतो कारण पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या आता वाढली आहे. आपल्या नागरीकांना ट्रान्सपोर्टची सुविधा चांगली मिळाली पाहिजे. यासाठी आपण परत परत भोपळे चौकात येतो. परंतू याचा फायदा पीएमपीएमएल यांनी घेऊ नये. अजून टेंडर निघालेले नाही. परंतू आत्ता जसे सगळ्यांचे म्हणणे आहे की, या विषयात आकडेवारी का आलेली नाही. अजून टेंडर निघालेले नाही. मा.आयुक्त साहेब, आमचा तुमच्यावर अजिबात अविश्वास नाही. तुम्ही ज्या टप्याचे पैसे द्यायचे आहेत, त्याप्रमाणे त्या टप्याचे पैसे द्याल याबद्दल दुमत नाही. पण मा.महापौर साहेब, आम्हाला असे वाटते की, आमच्या पिंपरी चिंचवडमधील लोकांना ट्रान्सपोर्ट सुविधा चांगली मिळावी, स्वच्छ मिळावी. एवढी दक्षता घ्यावी, मी एवढीच विनंती करते.

**मा.योगेश बहल**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, माझी विनंती अशी आहे की, आम्ही पीएमपीएमएलचा विषय सभागृहात आला की दरवेळी ओरडत असतो. परंतू त्यातून निष्पन्न काहीच होत नाही. एक जबाबदार अधिकारी म्हणून आयुक्त साहेब इथे बसतात. आयुक्त साहेबांनी कमीत कमी एवढी हमी द्यावी की, तुम्ही या शहरात एक कार्यालय, त्यांचे अधिकार डेप्युट कराल. तरच आम्ही आत्ता हा विषय करणार आहोत. नाहीतर आम्हाला हा विषय करायचा नाही. आपल्या कार्यालयाला ते जागा देऊ शकतात. मा.महापौर साहेब, आम्ही आमच्या अडचणी महापौर म्हणून तुमच्याकडे व आयुक्तांकडे हक्काने मांडू शकतो. अष्टेकर साहेबांची बदली तिकडून इकडे झाली आहे. मघाशी मा.मंगलाताई कदम यांनी काय सांगितले की, अष्टेकर साहेबांना ॲडीशनल चार्ज म्हणून नाहीतर कोऑर्डीनेटर म्हणून चार्ज द्यावा. आम्ही अडचण मांडली तर त्यांनी त्याचे कोऑर्डीनेशन करावे व आम्हाला सांगावे. याव्यतिरिक्त या शहरात पीएमपीएमएलचे ऑफीस व दोन/तीन वरिष्ठ लेवलचे अधिकारी उपलब्ध करुन द्यावेत. जेणेकरुन आम्हाला सभागृहाचा वेळ खर्च करावा लागणार नाही. पीएमपीएमएल आपल्याकडे काहीतरी मागायला आल्यानंतर इथे सदस्यांना दुःखी अंतकरणाने भाषण करावे लागते, अशी वेळ आमच्यावर पुन्हा येऊ नये. नागरीकांना सोईचे व्हावे. आमचे नगरसेवक आपले म्हणणे तिथे जाऊन मांडू शकतील. बस वेळेवर येत नाही. क्लिनिंग नाही, नवीन रूट पाहिजेत. अमुक पाहिजे. हे जे दुखणे आहे. मा.राजेंद्र काटे यांनी मघाशी सांगितले की, आपले कर्मचारी पहाटे पुण्यात जातात. त्यांनी बस मिळाली नाहीतर त्यांना परत यावे लागते. सदस्यांनी ज्या तक्रारी मांडल्या आहेत, त्याचे निराकरण करता यावे यासाठी आम्हाला इथे एक कार्यालय द्यावे. भले महिना दोन महिन्यांनी द्या. परंतू द्या. तरच आम्ही हा विषय मंजूर करणार आहोत.

**मा.आयुक्त**-मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह, पीएमपीएमएल ही एकतर स्वतंत्र कंपनी आहे. त्यांचे स्वतंत्र बोर्ड आहे. आणि त्यांचे जे मुख्य अधिकारी आहेत ते सुद्धा आयएएस अधिकारी आहेत. पीसीएमसीच्या बाजूने तीन डायरेक्टर आहेत. सन्मा.महापौर, सन्मा.स्थायी समिती अध्यक्ष व मी असे तीन जण आहेत. पिंपरी चिंचवडसाठी जॉईंट एम.डी. बाबतीत जे आहे, त्यात जॉईंट एम.डी. यांनी सर्व महापालिका सभा व स्थायी समिती सभा या सगळ्या सभांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. ज्यावेळी मा.प्रविण अष्टिकर जॉईंट एम.डी. होते, त्यावेळी ते प्रत्येक मा.महापालिका सभेला व मा.स्थायी समिती सभेला उपस्थित रहात होते. त्यामुळे जॉईंट एम.डी. यांना सभेला उपस्थित राहणे कंपल्सरी करायला पाहिजे. हा विषय आपल्याला पीएमपीएमएलच्या बोर्डवर ठेवावा लागेल. दुसरा ऑप्शन असा आहे की, जे जनरल मॅनेजर आहेत, ते पर्मनन्टली पीसीएमसी एरियात असावेत अशी मागणी आपल्याला करता येईल. त्यासाठी आपल्याकडे सेपरेट केबिनसुद्धा आहे. आपण पीएमपीएमएलच्या जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टरसाठी लोखंडे सभागृहात सेपरेट केबिन बनवलेली आहे. त्यांना जर पीसीएमसीच्या

कार्यालयात बसायचे असेलतर, त्यासाठी त्यांना जागा करुन देऊ. डेफिनेटली आम्ही तीन जण, आपण सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्या त्यांच्या बोर्ड मिटींगमध्ये प्रकर्षाने मांडू. आपण जे-जे प्रश्न मांडले आहेत, त्यांच्यावर जास्तीत जास्त सोल्यूशन काढण्यात येईल.

**मा.सुलभाताई ऊबाळे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मोरे साहेब २००७ च्या नवीन फॉर्मेशननुसार आपण तीन डायरेक्टर भरलेले नाहीत. त्याची माहिती आपण देऊ शकता का. समिती/उपसमिती जे काही असेल,त्यात अजून तीन लोक भरायचे राहिलेले आहेत.

**मा.मोरे(सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**मी संचालक मंडळाची रचना एक मिनिटांत वाचून दाखवतो.

**मा.सुलभाताई ऊबाळे** – मोरे साहेब, या जागा रिकाम्या आहेत का भरलेल्या आहेत तेवढेच सांगा.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**या जागा रिक्त आहेत. याविषयी शासनाला कळविले आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे-**मा.महापौर साहेब,पुणे महापालिकेतील एक नगरसदस्य पीएमपीएमएलच्या कमिटीवर डायरेक्टर आहेत. आपल्या महापालिकेतून कोणी सदस्य त्या कमिटीवर नाहीत. तुम्ही पदसिद्ध सदस्य म्हणून महापौर म्हणून जाता. मा.महापौर,मा.आयुक्त व मा.स्थायी समिती अध्यक्ष हे तिघे पदसिद्ध सदस्य म्हणून तिथे जातात. यांच्याकडे तेवढा वेळ नाही की, जनसामान्यांच्या तक्रारी तितक्या प्रमाणात तिथपर्यंत पोहोचू शकतील. जे तीन सदस्य भरायचे राहिलेले आहेत. त्या तुलनेत आपल्याकडील दोन सदस्य तिथे घ्यावेत. त्यांची संख्या ऑलरेडी जास्त आहे. तुम्ही थांबा, या विषयाची घाई कशाला करताय. आपल्याला काहीतरी काँक्रीट करु द्यात. आपण एवढं मोठं हातातून सोडतोय. यानंतर आपल्याला या विषयात कोणी विचारणार नाही. याचे तुम्ही आम्हाला कळवा. शासनाकडे आहे तर कुठे आहे. फॉलोअप कुठे करायचा आहे, काय करायचं आहे ते तुम्ही आम्हाला कळवा. हे प्रशासकीय काम करत आहेत. ते काय राजकीय नाहीत. ही प्रशासकीय काम करणारी मंडळी आहेत. कागदाला कागद चिकटवायचा आहे, ठराव मंजूर एवढाच त्यांचा विषय आहे. बाकी त्यांच सगळ आधीच झालेलं असणार आहे. आपल्याकडे फक्त अवलोकनासाठी विषय आला आहे. यात हे तीन सदस्य तुम्ही घ्या. मी मा.पक्षनेत्यांना विनंती करते की, तुम्ही हा विषय आता थांबवा. तीन डायरेक्टर व्यक्तींमध्ये आमच्या सभागृहातील दोन लोक पाहिजेत अशी उपसूचना देते.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.सुलभाताई ऊबाळे-**मा.महापौर साहेब, यांनी कोणाची शिफारस केली आहे. कोणाचे नाव पाठवले आहे ते कळायला पाहिजे.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-** तीन नव्हेतर दोनच पदे रिक्त आहेत. एक संचालक वित्त व दुसरे संचालक मानव संसाधन. दहा डायरेक्टर पैकी ही दोन पदे रिक्त आहेत. नगरविकास विभागाला कळविले आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे-**मा.महापौर साहेब, पीएमसीतले एक नगरसेवक त्यात आहेत.

**मा.मोरे (सहव्यवस्थापकीय संचालक,पीएमपीएमएल)-**हा शासन स्तरावरील मॅटर आहे. या दोन पोस्ट शासन स्तरावरील आहेत. पुणे महानगरपालिकेचे एक सदस्य त्यात आहेत.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – शासन निर्णय क्रं.एन.यु.आर.२०१३/र.क्र.३३८/नवि-३३ दिनांक १८/२/२०१४ अन्वये परिवहन उपक्रमातील संचलन तूट संबंधित महानगरालिकांनी भरुन काढणे बंधनकारक केले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्रं./पीएमपीएमएल/३०१३ चे पत्रानुसार ज्याप्रमाणे शासनाने सेवकांचा पगार ही बाब संचलन तुटीमध्ये येते, त्याचप्रमाणे महामंडळातील कामगारांना सुधारीत वेतनश्रेणीनुसार फरकापोटी देय रक्कम देखील संचलन तुटीचा भाग ठरते असे कळविलेले आहे. त्यानुसार दोन्ही महानगरपालिकांनी सुधारीत वेतनश्रेणीनुसार फरकापोटी देय रक्कम तीन हप्त्यामध्ये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे पीएमपीएमएलने कामगारांना सुधारीत वेतनश्रेणीचा फरकापोटी र.रु.३०० कोटींची मागणी दोन्ही महानगरपालिकेकडे त्यांच्या स्वामित्वाचे हिश्या प्रमाणे केलेली आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपलिकेने ६० टक्क्याप्रमाणे र.रु.१८० कोटी पैकी दुसरा हप्ता र.रु.५०/- कोटी पीएमपीएमएलला दिलेला आहे. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने स्वामित्वाचे ४० टक्के हिश्या प्रमाणे र.रु.१२०/- कोटी पैकी दुसरा हप्ता र.रु.४०/- कोटी दिलेला आहे.

२०१६-२०१७च्या अंदाजपत्रकामध्ये पीएमपीएमएल मधील कामगारांना सुधारीत वेतनश्रेणीचा फरक देणेकामी तरतूद केलेली आहे. त्यास अनुसरुन पीएमपीएमएल प्रशासनाने पिं चिं.मनपाकडे र.रु.४०/- कोटीची मागणी केलेली आहे. तरी कामगारांना सुधारित वेतनश्रेणी फरकाचा तिसरा हप्त्याचा धनादेश देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच दि.१ मे २०१६ पासून आरोग्य विभाग मनपा पुणे मार्फत पीएमपीएमएल मधील सेवकांना अंशदायी वैदयकिय योजने अंतर्गत सेवा देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील ५ दवाखान्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

आजमितीस पीएमपीएमएल मधील एकुण सेवकांपैकी ३००० ते ३५०० सेवक पिंपरी चिंचवड शहरामधील रहिवाशी आहेत. तरी सदर सेवकांच्या सोईसाठी पिंपरी चिंचवड मधील खालील दवाखान्यांचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | हॉस्पिटलचे नाव | गावाचे नाव |
|---|---|---|
| १ | आदित्य बिर्ला हॉस्पिटल | थेरगाव |
| २ | लोकमान्य हॉस्पिटल | निगडी |
| ३ | लोकमान्य हॉस्पिटल | चिंचवड |
| ४ | स्टर्लिंग हॉस्पिटल | निगडी |
| ५ | चैतन्य हॉस्पिटल | चिंचवड |
| ६ | रुबी एलकेअर | वायसीएम हॉस्पिटल |
| ७ | मोरया हॉस्पिटल | चिंचवड |
| ८ | एम्स हॉस्पिटल | औंध |
| ९ | मॅक्स न्युरो हॉस्पिटल | कासारवाडी |
| १० | स्टार हॉस्पिटल | आकुर्डी |
| ११ | निरामय हॉस्पिटल | चिंचवड |
| १२ | ओम हॉस्पिटल | भोसरी |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पीएमपीएमएल करीता ६०/४० या तत्वानुसार घेण्यात येणा-या १५५० बसेसपैकी ५५० वातानुकूलित बसेस एम.एस.आर.टी.यु.या केंद्रशासनाच्या अंगिकृत संस्थेकडून घेण्यास, १०० बसेस पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ६०/४० या तत्वानुसार खरेदी करण्यास व उर्वरित ९०० बसेस मार्केट फायनान्स मेकॅनिझम याप्रमाणे महामंडळाच्या ठरावाप्रमाणे गठीत ४ सदस्य समितीने ठरविलेल्या स्पेशिफीकेशन व सेवास्तर कराराप्रमाणे घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रभाकर वाघेरे**- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

(मा.दत्तात्रय साने, मा.तानाजी खाडे, मा.अनंत को-हाळे, मा.शितल शिंदे, मा.निलेश बारणे, मा.धनंजय आल्हाट यांनी विरोध दर्शविला.)

**मा.महापौर**-ज्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध नोंदवून घ्यावा.

**मा.महापौर**- विरोध नोंदवून हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -९१० विषय क्रमांक-१

दिनांक-२३.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/६/कावि/२७५/२०१६ दि.९/८/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२४ दि.९/८/२०१६

पी.एम.पी.एम.एल. अध्यक्षीय तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडील दिनांक १५/०७/२०१६ च्या पत्रानुसार पी.एम.पी.एम.एल. संचालकांचा ठराव क्र.१८ दि.२/०७/२०१६ अन्वये पी.एम.पी.एम.एल. साठी एकुण १५५० बसेसे तीन पद्धतीने खालीलप्रमाणे उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन या तिन्ही प्रकारच्या धोरणांस प्राप्त होणा-या बसेससाठी आवश्यक डेपो व अनुषंगीक सुविधा यासाठी लागणारा निधी व पी.एम.पी.एम.एल. संचयनातील अतिरिक्त येणा-या तुटीचे आर्थिक दायित्व व वित्तीय संस्थांच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करण्यासाठी म.न.पा.ने महामंडळाच्या वित्तीय संस्थांसाठी हमी देण्याबाबत मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे प्रस्ताव सादर करुन होणारा निर्णय पी.एम.पी.एम.एल.कडे कळविणेस विनंती केलेली आहे.

१) दोन्ही म.न.पा.च्या दायीत्वानुसार ५०० बसेसची खरेदी करणे.

२) पी.एम.पी.एम.एल. च्या माध्यमातून फायनान्स मेकॅनिझम पद्धतीने ५०० बसेसची खरेदी करणे.

३) ए.एस.आर.टी.यु. माध्यमातून भाडे तत्वावर वातानुकूलीत ५५० बसेसची खरेदी करणे.

वरील पत्राच्या अनुषंगाने पुणे म.न.पा.ने त्यांच्या मा.स्थायी समितीमध्ये खालीलप्रमाणे मान्यता देऊन पुणे म.न.पा. मा.मुख्य सभेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

१) पी.एम.पी.एम.एल. साठी ७०० बसेस ह्या बाजारातून अर्थसहाय्य उभे करून घेण्यात याव्यात.

२) १०० बसेस स्वतःच्या/म.न.पा.च्या निधीतून घ्याव्यात.

३) ७५० बसेस भाडे तत्वावर घेणेत याव्यात.

४) वरीलसाठी आवश्यक असलेली रक्कम बस खरेदीची विविध टप्पे पार पाडल्यानंतर पी.एम.पी.एम.एल. ला वेळोवेळी उपलब्ध करुन देण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस मान्यता देण्यात यावी.

५) मार्केट फायनान्स प्रमाणे करावयाची प्रक्रिया पी.एम.पी.एम.एल. मार्फत राबविण्यास व याप्रमाणे वित्तीय संस्थांना येणा-या वर्षामध्ये कर्जफेड परत करण्यास लागणारी वित्तीय

हमी देण्यास व त्या वित्तीय सहाय्यातून पी.एम.पी.एम.एल. ने ESCROW अकांऊट उघडून त्यामार्फत पेमेंट अदा करणे.

६) वरीलप्रमाणे बसेस उपलब्ध झाल्यानंतर आवश्यक लागणारी संचलन तुटीची रक्कम/नविन बस डेपो उभारणे, नविन टर्मिनल बांधणे, जुने टर्मिनल व डेपो नुतनीकरण करणे या अनुषंगीक सुविधा उपलब्ध करुन पी.एम.पी.एम.एल. मार्फत सादर होणा-या प्रस्तावाच्या आर्थिक दायीत्व स्विकारण्यास मान्यता देणे तसेच या तिनही प्रकारच्या बसेस उपलब्ध करुन देणेसाठी महामंडळाच्या ठरावाप्रमाणे गठीत चार सदस्य समिती बस स्पेसिफिकेशन, परतफेड अदा करावयाचे नियम व त्याप्रमाणे वेळापत्रक, बेस्ट मार्केट फायनान्स प्रपोजल, सर्व्हिस लेव्हल अग्रीमेंट इ. ठरविण्याचे सर्व अधिकार चार सदस्य समितीस देण्यास मान्यता देणे.

पी.एम.पी.एम.एल. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचेकडील पत्र तसेच गठीत चार सदस्य समितीची दिनांक ६/०८/२०१६ ची मा.आयुक्त, पुणे म.न.पा. यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील सुचनांचे अवलोकन करुन पी.एम.पी.एम.एल. साठी १५५० बसेस उपलब्ध करुन देणेकामी खालीलप्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेच्या मान्यतेकामी सादर करण्यात आलेला आहे.

१) पी.एम.पी.एम.एल.साठी ७०० बसेसकामी बाजारातून वित्तिय संस्थांकडून अर्थसहाय्य उपलब्ध करुन खरेदी करणे व ही सर्व प्रक्रिया पी.एम.पी.एम.एल. मार्फत राबविणे.

२) १०० बसेस खरेदीकामी महापालिकेच्या दायीत्वानुसार सन २०१६-१७ साठीच्या अंदाजपत्रकीय तरतुदींतून पी.एम.पी.एम.एल. साठी निधी या लेखाशिर्षातून निधी उपलब्ध करुन देण्यास,

३) ७५० बसेस भाडे तत्वावर घेण्यास,

४) वित्तिय संस्थांकडून अर्थसहाय्य उभे करुन वित्तिय संस्थांस पी.एम.पी.एम.एल. कडून येणा-या वर्षामध्ये कर्ज परतफेड करण्यास लागणारी वित्तीय हमी देण्यास व त्या वित्तीय सहाय्यातून पी.एम.पी.एम.एल. ने आवश्यक ESCROW अकांऊट उघडून त्यामार्फत पेमेंट अदा करणे.

५) वरीलप्रमाणे बसेस उपलब्ध झाल्यावर पी.एम.पी.एम.एल.ला आवश्यक संचलन तुटीची रक्कम/आवश्यकता असलेल्या ठिकाणी नविन बस डेपो उभारणे, नविन टर्मिनल बांधणे, जुने डेपो/टर्मिनल नुतनीकरण करणे व अन्य अनुषंगिक सुविधा पी.एम.पी.एम.एल. त्यांच्या प्रस्तावातून उपलब्ध करुन देण्याचे आर्थिक दायीत्व स्विकारणे.

६) उपरोक्त तीनही प्रकारे बसेसे उपलब्ध करुन देणेकामी पी.एम.पी.एम.एल. कडील चार सदस्य समितीस बस स्पेसिफिकेशन, परतफेड अदा करावयाचे नियम, त्याचे वेळापत्रक, बेस्ट मार्केट फायनान्स प्रपोजल, सर्व्हिस लेव्हल अग्रीमेंट ठरविण्याचे अधिकार देण्यास

७) उपरोक्त प्रमाणे बसेस उपलब्ध करुन देण्यासाठी खरेदीच्या विविध टप्प्यांवर पी.एम.पी.एम.एल. ला आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन देण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त, पिं.चिं.यांना देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच शासन निर्णय क्रं.एन.यु.आर.२०१३/र.क्र.३३८/नवि-३३ दिनांक १८/२/२०१४ अन्वये परिवहन उपक्रमातील संचलन तूट संबंधित महानगरालिकांनी भरुन काढणे बंधनकारक केले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्रं./पीएमपीएमएल/३०१३ चे पत्रानुसार ज्याप्रमाणे शासनाने सेवकांचा पगार ही बाब संचलन तुटीमध्ये येते, त्याचप्रमाणे महामंडळातील कामगारांना सुधारीत वेतनश्रेणीनुसार फरकापोटी देय रक्कम देखील संचलन तुटीचा भाग ठरते असे कळविलेले आहे. त्यानुसार दोन्ही महानगरपालिकांनी सुधारीत वेतनश्रेणीनुसार फरकापोटी देय रक्कम तीन हप्त्यामध्ये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याप्रमाणे पीएमपीएमएलने कामगारांना सुधारीत वेतनश्रेणीचा फरकापोटी र.रु. ३०० कोटीची मागणी दोन्ही महानगरपालिकेकडे त्यांच्या स्वामित्वाचे हिश्या प्रमाणे केलेली आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपलिकेने ६० टक्क्या प्रमाणे र.रु. १८० कोटी पैकी दुसरा हप्ता र.रु. ५०/- कोटी पीएमपीएमएलला दिलेला आहे. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने स्वामित्वाचे ४० टक्के हिश्या प्रमाणे र.रु. १२०/- कोटी पैकी दुसरा हप्ता र.रु. ४०/- कोटी दिलेला आहे.

२०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकामध्ये पीएमपीएमएल मधील कामगारांना सुधारीत वेतनश्रेणीचा फरक देणेकामी तरतूद केलेली आहे. त्यास अनुसरुन पीएमपीएमएल प्रशासनाने पिं चिं.मनपाकडे र.रु.४०/- कोटीची मागणी केलेली आहे. तरी कामगारांना सुधारित वेतनश्रेणी फरकाचा तिसरा हप्त्याचा धनादेश देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच दि.१ मे २०१६ पासून आरोग्य विभाग मनपा पुणे मार्फत पीएमपीएमएल मधील सेवकांना अंशदायी वैदयकिय योजने अंतर्गत सेवा देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील ५ दवाखान्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

आजमितीस पीएमपीएमएल मधील एकुण सेवकांपैकी ३००० ते ३५०० सेवक पिंपरी चिंचवड शहरामधील रहिवाशी आहेत. तरी सदर सेवकांच्या सोईसाठी पिंपरी चिंचवड मधील खालील दवाखान्यांचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | हॉस्पिटलचे नाव | गावाचे नाव |
|---|---|---|
| १ | आदित्य बिर्ला हॉस्पिटल | थेरगाव |
| २ | लोकमान्य हॉस्पिटल | निगडी |
| ३ | लोकामन्य हॉस्पिटल | चिंचवड |
| ४ | स्टर्लिंग हॉस्पिटल | निगडी |
| ५ | चैतन्य हॉस्पिटल | चिंचवड |
| ६ | रुबी एलकेअर | वायसीएम हॉस्पिटल |
| ७ | मोरया हॉस्पिटल | चिंचवड |
| ८ | एम्स हॉस्पिटल | औंध |
| ९ | मॅक्स न्युरो हॉस्पिटल | कासारवाडी |
| १० | स्टार हॉस्पिटल | आकुर्डी |
| ११ | निरामय हॉस्पिटल | चिंचवड |

| | | |
|---|---|---|
| १२ | ओम हॉस्पिटल | भोसरी |

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पीएमपीएमएल करीता ६०/४० या तत्वानुसार घेण्यात येणा-या १५५० बसेसपैकी ५५० वातानुकूलित बसेस एम.एस.आर.टी.यु.या केंद्रशासनाच्या अंगिकृत संस्थेकडून घेण्यास, १०० बसेस पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ६०/४० या तत्वानुसार खरेदी करण्यास व उर्वरित ९०० बसेस मार्केट फायनान्स मेकॅनिझम याप्रमाणे महामंडळाच्या ठरावाप्रमाणे गठीत ४ सदस्य समितीने ठरविलेल्या स्पेसिफीकेशन व सेवास्तर कराराप्रमाणे घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०६

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.महापौर** – प्रश्नोत्तरे

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

(विषयाचे वाचन केले.)

**मा.महापौर** – प्रश्नोत्तरे आत्ता चालू करते.

**मा.आशा शेंडगे** -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ वाचला आहे.

**मा.महापौर** – ताई तुम्ही बसा, विषय क्रमांक २ घ्या.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, ज्यांना जायचे आहे त्यांनी जावे. आमचे काही म्हणणे नाही. आम्ही ऐकले की नाही. मागासवर्गीयांना जर साथ द्यायची नसेलतर त्यांना सभागृहाबाहेर पाठवा. माझी विनंती आहे, त्यांनी सभागृह सोडावे. आपण प्रश्नोत्तरांचा तास पुकारल्यानंतर त्या उभी राहील्या आहेत. मग त्यांनी बोलायला सुरुवात केली आहे. आपण ज्या समाजाचे नेतृत्व करतो त्या समाजाचे प्रश्न मांडायचे का नाहीत.

**मा.महापौर** – प्रश्नोत्तरे घ्यायचीत का विषय घ्यायचे हे विचारते आहे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, परवा दिवशी प्रश्नोत्तरे नंतर घ्यायची असा विषय झाला होता. पहिला विषय झाला आहे. दुसरा विषय सुरु केला आहे. वास्तविक प्रश्नोत्तरे महत्वाची आहेत यात दुमत नाही.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, प्रश्नोत्तरे घ्यायची नसतीलतर नाही म्हणून सांगा. आमचे काही म्हणणे नाही. मी ज्या समाजाचे नेतृत्व करते, त्या समाजाबद्दल प्रश्न विचारणे जर गुन्हा ठरत असेलतर माझी विनंती आहे की, ज्यांना ऐकायचे नाही त्यांनी सभागृहाबाहेर जावे. मा.महापौर साहेब, तुम्हाला हात जोडून विनंती आहे. आपण पुकारल्यानंतर आम्ही उभे राहिलो आहोत.

**मा.आशा शेंडगे** – मा.महापौर साहेब, परवाच्या मिटींगला असेच ठरले होते की, पहिला विषय झाल्यानंतर प्रश्नोत्तरे घ्यायची. तुम्ही विनंती केलीत, तुम्ही सांगितले की कालचा अर्धवट प्रश्न पूर्ण करावा लागेल. म्हणून आम्ही हो म्हटले. तुम्हाला मिटींगला जायचे आहे, सगळ्यांनी जरुर जावे.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, प्रश्नोत्तरे चालू करा.

**मा.आशा शेंडगे** – सन्मा.महापौर, सन्मा.आयुक्त व सन्मा.सभागृह, खरेतर याठिकाणी अत्यंत वाईट वाटते. परवा सभागृहातील काही ज्येष्ठांनी सांगितले की, तुमची प्रश्नोत्तरे नंतर घेऊ यात का. आम्ही कसलाही किंतू परंतू न करता सांगितले, काहीही हरकत नाही.

**मा.शमिम पठाण** – अजिबात काही बोलायचे नाही.

**मा.आशा शेंडगे** – आम्हाला समजतेय सभागृहात कसे बोलायचे ते.

**मा.महापौर** – मा.पठाणबाई,तुम्ही खाली बसा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.आशा शेंडगे** – सन्मा.महापौर, आजची प्रश्नोत्तरे म्हणजे या शहरातील ५० टक्के नागरीक अनुसूचित जाती जमाती, भटक्या जाती यासाठी असलेले प्रश्न विचारतोय. तरीसुद्धा बोलण्यासाठी वेळ मागायला भांडावे लागते आहे. खरेच ही शोकांतिका, हे दूर्दैव आहे. खरेतर ही माहिती ऐकलीतर तुम्हाला निश्चितच आश्चर्य वाटेल. खरेतर हे लोकशाहीचे मंदीर. इथे सगळेजण एक निश्चय करतो, मनापासून ठरवतो की, सर्व समाजाचे, सर्व नागरीकांचे प्रश्न घेऊन आम्ही इथे सभागृहात येतो. असा निर्णय, असा निर्धार, असे वचन मनोमन स्वतःशी घेतो. आणि या लोकशाहीच्या मंदीरात पाऊल ठेवतो. परंतू इथे आल्यानंतर आम्हाला काहीतरी

वेगळेच चित्र बघायला मिळते. ज्यावेळी अनुसूचित जाती जमाती व भटक्या समाजासाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांसाठी अंदाजपत्रकात किती टक्के निधी राखून ठेवणे बंधनकारक आहे. सन्मा. महापौर, याठिकाणी ५ टक्के निधी राखून ठेवणे बंधनकारक आहे, असा शासन आदेश असतानासुद्धा जी आकडेवारी आम्हाला आपल्या प्रशासनाकडून उपलब्ध झाली आहे, त्यातून सरळ सरळ दिसते आहे की, जो शासन आदेश आहे, त्याठिकाणी ५टक्के निधी हा अनुसूचित जाती जमातींसाठी राखून ठेवला पाहिजे. चक्क हा शासन आदेश कच-याच्या टोपलीत टाकायचे काम पालिकेत प्रशासनाकडून केले जाते आहे.

सन्मा.महापौर, मी प्रश्न विचारला होता की, २००६ पासून २०१६ पर्यंत जो काही भांडवली खर्च वजा जाता महसूली उत्पन्न किती आहे. तर जी काही आकडेवारी आहे ती अत्यंत दुःखदायक आहे, वेदना देणारी आहे. ऐकताना वाईट वाटतेय. एकूण सगळ्यांची वृत्ती पाहतानाही तसेच वाटतेय की याकडे लक्ष देणे कोणाला गरजेचे वाटत नाही. खरेतर ७६८९.९२ कोटी आहे. इतका महसूल आपल्याला प्राप्त होतो. ५ टक्के निधी म्हणजे आपल्याला साधारणतः ३९३.५ कोटी इतका निधी म्हणजे सगळ्या ज्या काही अनुसूचित जाती जमाती व भटक्या समाजाच्या लोकांसाठी वापरला पाहिजे. शासनाचा असे निर्देश देण्यामागे उद्देश्य आहे की या दूर्लक्षित घटकांकडे समाजाचे दूर्लक्ष होऊ नये म्हणून, त्यांचे जीवनमान उंचावले गेले पाहिजे. त्यांना सुद्धा जगण्याचा हक्क मिळाला पाहिजे. या सगळ्या गोष्टींचा पाठपुरावा करण्यासाठी शासनाला आदेश काढावा लागला. ५ टक्के निधी उपलब्ध करुन द्यावा लागला. तरीसुद्धा आपल्या महापालिकेत हा निधी खर्च होताना दिसत नाही. खरेतर आज महापौर म्हणून, पुनर्वसन अधिकारी म्हणून जबाबदारी पाहता तरीसुद्धा तुमच्या काळात हे दिसत नाही. अत्यंत वाईट घटना आहे. याचा सभागृहात निषेध केला पाहिजे. केलेली तरतूद म्हणजे आपला अपेक्षित खर्च होता रु.३९३ कोटी. त्यातील फक्त रु.२६५ कोटी तरतूद केली आहे. यात जो खर्च अपेक्षित होता. रु.२६५ कोटी खर्च केला. म्हणजे याठिकाणी रु.१२८ कोटींचा अनुशेष निर्माण झाला आहे. ५ टक्के निधी खर्च करावा लागणार असताना सुद्धा अवघा ३.३७ टक्के खर्च प्रशासनाकडून या सगळ्या लोकांना सुविधा देण्यात खर्च केला जातो. आपण या शहरात अनेक मोठमोठ्या गोष्टी करतो. आपण सांगतो, शहर विकसित केलेतर कौतुकास्पद आहे. त्यावेळी हा मागासवर्गीय समाज, ज्या काही जाती प्रजाती असतील त्या सगळ्यांकडे जाणिवपूर्वक दूर्लक्ष करतो. सन्मा.महापौर साहेब, याचा विचार करायची गरज वाटते. ज्यावेळेला अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना किती निधी राखून ठेवायचा, अनुशेष निर्माण केलातर रु.६३ कोटी होत असतीलतर याठिकाणी कोणत्या प्रकारची कामे करतो. याकडे दूर्लक्ष का करतो. इतका १२८ कोटींचा अनुशेष का निर्माण झाला. आयुक्त साहेबांनी याचे उत्तर दिले पाहिजे. मा.महापौर साहेब, ज्यावेळी सगळा निधी आपण नागरीकांसाठी मागासवर्गीय कल्याणकारी योजना राबविण्याचा प्रयत्न महापालिकेकडून केला जातो. मी ज्यावेळी माहिती घेतली, त्यावेळी पुन्हा

एकदा अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली. तुम्हाला समजले की, आश्चर्य वाटेल. आपण म्हणतो, महापालिकेत मागासवर्गीय योजना मोठ्या प्रमाणावर राबवितो. त्यावेळी तुमच्या लक्षात येईल की, या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची लोकसंख्या जवळपास १९ ते २० लाख गृहित धरलीतरी अवघ्या ४२,४६५ लोकांना गेल्या दहा वर्षांत लाभ दिला आहे. आपण फक्त ४२,००० लोकांना लाभ दिला आहे. किती लोकांना कोर्स शिकवले. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था या संस्थेने किती लोकांना प्रशिक्षण दिले. तर त्याचा आकडा निश्चितपणे लाखोंमध्ये अत्यंत मोठा येईल. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत किती लोकांना लाभ दिला तर अवघ्या ४२,६६५ लोकांना लाभ दिला. तरतूद रु.२६ कोटी, खर्च अवघा रु.८ कोटी. का सन्मा. महापौर. प्रत्येक वेळी या समाजावर अन्याय करतो. ते त्या समाजात जन्माला येतात ही काही त्यांची चूक नाही. त्यांच्यावर अन्याय करायची आपण सगळ्यांनी सुपारी घेतली आहे अशाच पद्धतीने आपण याठिकाणी वागतो. सन्मा.महापौर, आपण इथे बघितलेतर अवघ्या चार प्रकारच्या योजना या मागासवर्गीय कल्याणकारी योजनेअंतर्गत राबवितो. शिष्यवृत्ती देतो, १२वी नंतर उच्च शिक्षणासाठी,एमएससीआयटी कोर्सेस आणि सायकल वाटप. या चारच योजना राबवितो. त्यांचे जीवनमान कधी उंचावूच नये असा प्रशासनाकडून, महापालिकेकडून प्रयत्न केला जातो. असा आरोप याठिकाणी करतेय. नाव ऐकलेतर तुम्हाला सुद्धा आश्चर्याचा धक्का बसणार आहे. २००७ ला लाभार्थ्यांची संख्या २९१८ होती. २००७-०८ ला २८७६ होती. महत्वाचा भाग म्हणजे २००८-०९ ला एकही लाभार्थी नाही. म्हणजे दोन वर्षांत आपल्याकडे २८०० आणि एकदा २९०० च्या आसपास संख्या येते. तिस-या वर्षाला शून्य लाभार्थी. म्हणजे काय झाले असेल. फॉर्म आले नाही असे शक्य आहे का. असे होऊच शकत नाही. म्हणजे पुन्हा एकदा आपला गलथान कारभार. फॉर्म वेळेवर उपलब्ध झाले नसतील. काहीतरी चुकीचे घडले असेल. म्हणून शून्य लाभार्थी असा तिथे आकडा दिसतोय. ही माझी माहित नाही. महापालिकेच्या प्रशासन विभागाकडून घेतलेली ही माहिती आहे. मा.महापौर साहेब,पुन्हा २०११-१२ ला तीच कंडीशन. ज्या वर्षी इलेक्शन्स असतात, त्यावेळी प्रत्येक वेळी वेळेवर फॉर्म देण्याची, फॉर्म स्विकारण्याची पद्धतच नाही. अनुदानसुद्धा वेळेवर दिले जात नाही. म्हणून पुन्हा एकदा २०११-१२ मध्ये शून्य लाभार्थी असे दिसते आहे. म्हणजे सदस्यांनी मनावर घेतले नाही, सदस्यांनी इंटरेस्ट घेतला नाहीतर प्रशासन हातावर हात घेऊन बसणार आहे. हेच सभागृहाला निदर्शनास आणून द्यायचा मी इथे प्रयत्न करते आहे. २००६-०७ ला २९०० ही संख्या, २००७-०८ ला २८०० ही संख्या, नंतर मात्र ही संख्या हळूहळू कमी होते. याचा आपण विचार केला पाहिजे. २०१३-१४ ला २३०० संख्या, २०१४-१५ ला ३२०० संख्या, २०१५-१६ ला फक्त १३०० ही संख्या. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब उतरती कळा का लागली. लाभार्थी संख्या कमी कमी का होत गेली याचा विचार निश्चितपणे याठिकाणी केला पाहिजे. या शहरात वेगवेगळ्या ठिकाणी फ्लेक्स लागतील, वेगवेगळ्या गोष्टींचा प्रसार केला जाईल. परंतू

मागासवर्गीय, भटक्या जाती जमातींच्या लोकांसाठी ज्या काही योजना आहेत, त्या लोकांपर्यंत पोहचवणे, त्यांची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करणे, लोकहिताची कामे करणे जणू काही आमच्या प्रशासनाला माहितच नाही, असे याठिकाणच्या आकडेवारीवरून दिसून येते आहे. सन्मा.महापौर साहेब, १२ वी नंतरचे उच्च शिक्षण यासाठी पुन्हा एकदा २२ विद्यार्थी, शून्य विद्यार्थी, एक विद्यार्थी. आकडे इतके खेदजनक आहेत म्हणजे निषेध करावा इतका थोडा. मागासवर्गीय समाजातील इतकी कमी मुले शिकतात का की, १२ वी नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी फक्त एकाच विद्यार्थ्याला लाभ दिला. २००९-१० ला एक विद्यार्थी, त्यानंतर पुन्हा एकदा उतरती कळा, २०११-१२ ला २३२ विद्यार्थी. कारण पुन्हा इलेक्शन इयर. आम्ही आमच्या ऑफीसमध्ये बोर्ड लावले असतील, फॉर्म भरले असतील. म्हणजे आम्ही यंत्रणा राबवली तर काम होणार. प्रशासन म्हणून कोणत्याही प्रकारची हालचाल न करायची मानसिकता यातून दिसून येते आहे. मा.महापौर साहेब, ३८, ३६, ३७ अशी संख्या आहे. हे सगळे आकडे पाहिल्यावर डोळे गरगरतात. मग प्रश्न पडतो की, आपण निश्चितपणे या ठिकाणी मागासवर्गीय समाजासाठी काम करत असताना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना राबवत असताना निश्चितपणे आपण कोणासाठी काम करतो. मा.आयुक्त साहेब, तुम्ही नागरवस्ती विभागात जाऊन पहा. तिथली अवस्था पहा. आमच्या सहकारी भगिनी तिथे जातात, त्यांना बसायला खुर्ची द्यायची मानसिकता सुद्धा आपल्या अधिका-यांमध्ये नाही. आमची नगरसेवक भगिनी तिथे उभी राहते. ताई, हे आत्ता झाले नाही. ताई, हे असे झाले नाही. अशी बिनधास्तपणे पूर्ण व्यवस्थित माहिती न देता आम्हाला पळवून लावले जाते. आमच्यासारख्यांची ही अवस्था असेलतर सर्वसामान्य नागरीक तुमच्या दोन/पाच हजारांसाठी घिरट्या घालण्यासाठी मोकळा नाही असे दूर्दैवाने म्हणावे लागतेय. त्यांना त्यांचे उद्दीष्ट गाठायचे असते, पुढचं शिक्षण करायच असतं. तुमच्याकडे दोनला, चारला, सहाला किती वेळा यायचं. प्रशासनातल्या लोकांना मला सांगायचे आहे की, आपण किती ऍक्टीव्हली या गोष्टी करतो. किती लोकांना आपण चेक देतो. कोणीही वेळेत चेक देत नाहीत. सध्या नवीन सिस्टीम राबवतोय. सीएफसीत फॉर्म जमा होतो. आणि तिथून फॉर्म एकदम व्यवस्थितरित्या गहाळ सुद्धा होतात. सन्मा.महापौर साहेब, आपल्याकडचे फॉर्म गहाळ सुद्धा होतात. मग आमचे अधिकारी इतके हुशार की ते नागरीकांना म्हणतात, फॉर्म भरल्याची पावती दाखव. म्हणजे त्यांची चूक लपवण्यासाठी माझ्या गरीब, कष्टकरी शहरवासियांना सांगितले जाते. तुमच्याकडील पावती आणा. हा गरीब कष्टकरी माणूस झोपड्यात राहतो. त्याचे सामान दहा ठिकाणी हलवत असतो. अशा वेळेला त्याने तुमच्या पावतीचा तुकडा जपून ठेवायचा. त्याला तुमच्याकडून दोन/अडीच हजार काय मिळतात ते घ्यायचे असतात. परंतू आमच्या प्रशासनाला याची कसलीच लाज वाटत नाही. आपण या लोकांना काहीतरी देणे लागतो. आपला याठिकाणी कर्तव्याचा भाग आहे असे त्यांना वाटतच नाही. आपण त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे यांना कुठेही वाटत

नाही. लेखा विभागात लांडे साहेब म्हणून एक नवीन अधिकारी आले आहेत. आमच्या भागातले चेक का झाले नाहीत असे मी विचारले. तर उत्तर मिळाले की, यांना कसलातरी जी.आर पाहिजे. म्हणजे हरकत नाही काम अत्यंत व्यवस्थित. नागरवस्ती विभागाची कोणतीही फाईल सहीला गेली की ते जी.आर. मागतात. त्यांनी अभ्यासपूर्वक विषय करावेत. मी लांडे साहेबांना इथे सांगू इच्छिते की, त्यांनी निश्चितपणे काळजीपूर्वक विषय करावेत. माहिती घ्या तेव्हाच फाईलवर सही करा. जेणेकरुन आमच्या नागरीकांना महापालिकेकडून जे काही अनुदान मिळते, त्यापासून ते वंचित राहू नयेत. यासाठी निश्चितपणे काळजी घ्या. त्याचबरोबर जे मोठे मोठे ठेके येतात, जी काही मोठमोठी बिले येतात, त्यांच्यावर सुद्धा तेवढीच कडी नजर तुम्ही ठेवली पाहिजे. कारण या चेकमध्ये कुणालाच काही मिळत नाही हे लक्षात ठेवून तुम्ही काम केले पाहिजे. आपण मागासवर्गीय कल्याणकारी योजनेच्या निधीपैकी अवघा ३१.१८ टक्केच निधी खर्च करतो. मा.महापौर साहेब, दहा वर्षांत अवघा ३१.१८ टक्के निधी खर्च होणे हे आपल्या शहरासाठी निश्चितपणे लाजीरवाणे आहे. नागरीकांचे जीवनमान का उंचवायचे नाही. का यांची प्रगती होण्यासाठी प्रशासन म्हणून, पालिका म्हणून प्रयत्न करायचे नाहीत. सन्मा.महापौर साहेब, त्याचबरोबर आमच्या प्रश्नांत आम्ही एक गलिच्छ वस्ती सुधारणा निधी जो आपल्याला शासनाकडून येतो. त्यात महापालिकेची कसलीही मेहेरबानी नाही. त्यात आपल्या करदात्यांचा कसलेही पैसे नाहीत. हे सगळे शासनाकडून येत असताना फक्त इकडे प्रक्रिया करायची आहे. आलेल्या पैशांतून योग्य प्रकारे नागरीकांच्या सुविधेसाठी उपलब्ध करुन द्यायचे आहे. यात सुद्धा प्रशासनाकडून प्रचंड मोठ्या प्रकारची निराशा त्यातून आपल्याला पहायला मिळते. अत्यंत वाईट पद्धतीने या निधीबाबत उदासिनता पहायला मिळतेय. हा निधी सुद्धा पूर्णपणे वापरला जात नाही. खरेतर प्रश्नउत्तरे विचारली आहेत, माहिती विचारली आहे तर प्रशासनाकडून आम्हाला तंतोतंत माहिती उपलब्ध होणे अपेक्षित आहे. किंबहूना ते बंधनकारक आहे. परंतू ते होताना दिसत नाही. मला जी माहिती दिली आहेत, त्यात २००७ पासून २०१६ पर्यंतची माहिती घेतलीतर त्यात सुद्धा २०१०-२०११ ला माहिती नाही असे डॅश डॅश केले आहे. असे कसे करु शकतात. निधी आला नाही का. यावेळी आपल्याकडे शासनाकडून एक रुपयासुद्धा निधी आला नाही म्हणून खर्च करायचा विषय येत नाही, असा उल्लेख करायची सुद्धा गरज प्रशासनाला वाटली नाही. तिथे डॅश केला आहे. मूळ तरतूद डॅश, झालेला खर्च मात्र रु.१,४७,००,०००/- दिसतोय. आणि पुन्हा एकदा शिल्लक डॅश. असे कसे. यावर कारवाई कोण करणार. आपल्या प्रशासनाची बेजबाबदार वर्तणूक असेलतर त्यांच्याकडे जाब विचारणे आपले कर्तव्य आहे. असे मला याठिकाणी वाटतेय. तुम्ही विचारले पाहिजे. आपल्याकडे गलिच्छ वस्ती सुधार निधी २००७ पासून २०१६ पर्यंत रु.१६.६५ कोटी इतका जमा झाला आहे. आलेला निधी आहे, त्यातला १०.२ टक्के निधी खर्च केला. म्हणजे याठिकाणी ६.६२ टक्के अनुशेष निर्माण झालेला दिसतोय. म्हणजे एकाही ठिकाणी आपल्या शहरातील कोणताही ब्रीड कोणताही रस्ता कोणतेही नवीन

काढलेले काम याचा मूळ खर्च रु.४० कोटी ४०० कोटी असेलतर तो ४,००० कोटींना व्यवस्थित जातो. कारण तिथे आमच्या सगळ्यांची टक्केवारी व्यवस्थित ठरलेली असते. त्यासाठी केलेला हा प्रयत्न असतो. परंतू या गरीबांसाठी, या समाजासाठी काम करत असताना कोणत्याही अधिका-याला टक्केवारी उपलब्ध होत नाही. म्हणून तो आलेला निधी साधा खर्च करण्याची प्रोव्हिजनसुद्धा आमचे अधिकारी करु शकत नाहीत हे अत्यंत वाईट आहे. यातून पिंपरी चिंचवड शहराचा कधीच पूर्णपणे विकास करु शकणार नाही. खरेतर काल बोलत असताना माझ्याकडून काही आकडे चुकले. एकदा २१०० झाले, मग २१००० झाले. कोणीतरी म्हणाले, डोक्यावर काही झाले का. सन्मा.महापौर साहेब, इतके महत्वाचे आकडे सांगताना निश्चितपणे तोंडातून एखादा शब्द इकडे तिकडे होतो, डोक्यावर काही होत नाही. काही होत नसतं. परंतू याला आपले हे सभागृह साक्षीदार आहे. एकदा आपल्या बजेटमध्ये १२० कोटी कशासाठी, का २० कोटी होते का २०० कोटी होते याचे उत्तर आयुक्त साहेब देऊ शकले नाहीत. ना एम.टी.कांबळे देऊ शकले. आम्ही त्यावेळी काही म्हटले नाही. आम्ही क्षणभर विलंब घेतला आणि म्हटले, सॉरी, ते २१००० चुकून म्हटले गेले. तिथे २१०० होते. असे हे आकडे आम्ही रोज बघतो. आणि वाईट वाटते की, या लोकशाहीच्या मंदीरात पाऊल ठेवत असताना कोणत्या विचाराने पाऊल ठेवले होते. आणि अशी ही धक्कादायक संख्या. शहरातील कोणतेही काम सांगा. अमुक अमुक खर्च गृहित धरला आणि तुम्ही अमुक अमुक खर्चास बसवला असे कधीच होत नाही. तिथे कोट्यावधींनी ही संख्या वाढते. मग आमच्या सामान्य मागासवर्गीय जाती जमातीतील लोकांसाठी, भटक्या समाजासाठी आपण ५टक्के निधी ठेवतो, त्यापेक्षा महापालिकेचा अजून एक्सट्रा निधी खर्च झाला असे महापालिकेच्या इतिहासात कधी होणारच नाही का. मा.महापौर साहेब, त्यांची प्रगती न करण्याचाच आपण विडा उचलला आहे का. याचा विचार आपण केला पाहिजे. मागील दहा वर्षांचा अनुशेष राहीलेला आहे. तो अनुशेष प्रोसेसमध्ये आणायला लागला. जो काही अनुशेष आहे तो आपण पुढील वर्षासाठी कॅरी ऑन करु शकतो का असा प्रश्न विचारला होता. याठिकाणी उत्तर चक्क नाही असे आले आहे. आमच्याकडे तसा जी.आर. उपलब्ध आहे, आदेश उपलब्ध आहे की, जो काही निधी मागील वर्षी खर्च केला नाही, तो पुढील वर्षासाठी कॅरी ऑन व्हायला पाहिजे. असेही आपल्या प्रशासनाने केले नाही. मागासवर्गीय समाजासाठी जो निधी आहे तो त्यावेळी वापरला नाहीतर तो कॅरीऑन न करता त्याचठिकाणी ड्यू झालेला दिसून येतो आहे. हा सगळा अनुशेष काढलातर साधारणतः २५० ते ३०० कोटींच्या घरात ही रक्कम प्रशासनाच्या हातात असेलतर हा मागासवर्गीय, दलित समाज, भटका समाज आहे, त्यांच्यावर आपल्याकडून अन्याय होतो आहे हे मी सभागृहात ठासून सांगते आहे. मोस्टली हा समाज झोपडपट्टीत राहणारा आहे. सन्मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, जाऊन बघा, आपल्या शहरात आजही अनेक ठिकाणी नाले, गटारींची अवस्था, कोब्यांची अवस्था किती बिकट, वाईट आहे. प्रत्येक वेळी एकच उत्तर असते. झोपडपट्टी पुनर्वसन विभागाला मी

विचारले की, असे का. त्यांचे एकच उत्तर असते की, कोणी टेंडर भरत नाहीत. टेंडर भरतीलच कसे कारण तिथे मोठे विषय नसतात. त्यामुळे टेंडर भरायला कोणी इच्छुक नसतात. त्यामुळे आपोआप त्याठिकाणी कामे केली जात नाहीत. या समाजासाठी कोणीच काम करायला मागत नाहीत. सन्मा.महापौर, का सांगत नाहीत की, चार कॉन्ट्रॅक्ट घेतले असतील तर झोपटपट्टीतले एक काम तुलाच घ्यायला पाहिजे. आणि तू काम करुन दिलेच पाहिजे असे कोणी का ठणकावून सांगत नाहीत. असे का आपण सांगू शकत नाहीत. कारण मा.महापौर साहेब, सगळीकडे सगळ्यांचे लागेबांधे आहेत. गटारी बघा, कोबे बघा. जर प्रशासनाने मनावर घेतले असते. जसे आपण पिंपरी चिंचवडमध्ये एखादा मॉडेल प्रभाग तयार करायचा विचार करतो, कार्यान्वित करतो, त्यासाठी अनेक कोटी रुपये खर्च करतो, त्याच प्रकारचा निधी आपल्याकडे अनुशेषातून असेल तर प्रशासनाने ठरवले तर अनेक उपाय योजून आपण एखादी झोपडपट्टी सुद्धा मॉडेल झोपडपट्टी म्हणून तयार करु शकलो असतो. आपली काम न करायची मानसिकता बदलली तरच पुढील काळात तिथे आपले सखे सोयरे, बहिण भावंडे असतील, आपल्यातलाच एक हिस्सा तिथे राहतो, त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे. निश्चितपणे प्रशासनाचा नाकर्तेपणा लपवून चालणार नाही. इथून पुढील काळात हे चित्र बदललेले आणि पालटलेले दिसावे, अशी अपेक्षा करते. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब धन्यवाद. प्रश्नोत्तरांचा तास घेतल्याबद्दल आपले आभार. जग बदल घालूनी घाव, जग बदल घालूनी घाव, सांगून गेले मज भीमराव. शाहू, फुले, आंबेडकरांच्या या देशात आज त्यांच्याच मुलांसाठी राखून ठेवलेला निधी पूर्णपणे खर्च होत नसेल, जर त्यांच्यावर अन्याय होत असेल, त्याबद्दल प्रश्न विचारले असतील, प्रश्न विचारण्यासाठी सभागृहात भांडावे लागत असेलतर मला वाटते, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे संविधान लिहिले आहे त्याचा हा अपमान आहे, त्या कायद्याचा अपमान आहे, त्या नियमांचा हा अपमान आहे, या सभागृहाचा अपमान आहे, तुमचा माझा सर्वांचाच अपमान आहे. एखाद्या विषयावर तुमची चार/चार तास चर्चा आम्ही ऐकून घेतो. आम्ही बोलत नाही. २० तारखेच्या जी.बी.त सन्मा.योगेश बहल यांनी विनंती केली की, ताई, आपण नंतरच्या जी.बी.त हा विषय घेतलातर चालेल का. आणि आम्ही मोठ्या दिलाने सांगितले की, हो साहेब, नंतर घ्या. माझी काही हरकत नाही. कारण त्यादिवशी खरेच रात्रीचे साडेआठ, पाऊणेनऊ झाले होते. सर्व भगिनींच्याबाबतीत विचार करता असे लक्षात आले की, जास्त उशीर झाला असल्यामुळे आपण हा विषय दुस-या वेळी घेतला तरी चालेल. म्हणून मा.महापौर साहेब, मी परवानगी दिली होती. उगाचच भरकटत जाऊन चर्चा करण्यातली मी निश्चितच नाही. त्यासाठी आम्ही आमच्याच अधिकारांचा वापर एक नगरसेवक म्हणून जे अधिकार ज्ञात आहेत ते वापरले. आपल्याकडे प्रश्नोत्तरे दिलीत. आपण ते स्विकारले. त्यानंतर आपल्याकडून चर्चेसाठी वेळ मागीतली. आपण

सांगितले दहा मिनिटांत बोला तर दहा मिनिटांत बोलू. आपण सांगाल त्या वेळात चर्चा करायची आमची तयारी आहे. परंतू आज जे काही झाले, त्यासाठी लक्षात आले होते की, मघाशी वारंवार सांगितले जात होते नंतर घ्या, नंतर घ्या, नंतर घ्या. तर नंतर घ्या किती नंतर घ्या. तुमचे नंतर नंतर करता करता आम्ही गावाबाहेरच आहोत हो. देशाला स्वातंत्र्य मिळून ६९ वर्ष झाली, तरी आम्ही गावाबाहेरच आहोत. घटनाकार जाऊन सुद्धा सव्वाशे वर्ष झाली तरी सुद्धा आम्ही गावाबाहेरच आहोत. किती नंतर जायचे. आमचा नंबर येणार आहे की नाही. त्यासाठी सभागृहात विनवणी करावी लागली. मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जाती जमाती, कोळी, माळी, कोष्टी, तेली यांच्यासंदर्भातला हा विषय होता. ऐकायचं नाही आणि का म्हणून ऐकायचं नाही. सत्ताधारी म्हणून आपल्याकडून चूका घडल्या असतील तर त्या दुरुस्त करायची संधी मिळत असेलतर ऐकले पाहिजे. का ऐकायचे नाही. मग त्यासाठी तुम्हाला विनवणी करावी लागत असेल, हात जोडावा लागत असेलतर मला अत्यंत दुःख झाले. मघाशी मा.शमिम पठाण बाई तावातावाने उठल्या, म्हणाल्या, का आम्हाला म्हणता सभागृहाबाहेर जा. अहो, हा आमचा अधिकार होता. सभागृह चालू झालेतरी आमची प्रश्नोत्तरे घ्यायला पाहिजे होती. सभेचा नियम तसा आहे. मा.महापौर साहेब, अत्यंत वाईट वाटले. मा.महापौर साहेब, या सभागृहात या सर्व थोर पुरुषांना वंदन करुन आज या ठिकाणी २००६ पासून २०१६ या दहा वर्षांचा लेखाजोखा मांडायचा प्रयत्न केला. यात एखादं दुसरा आकडा चुकीने कमी जास्त झालातर लगेच व्याकरणातील चुका काढून आपण किती महान आहोत, आम्ही किती निर्लज्ज आहोत हे दाखवायचा प्रयत्न करु नका. तुमचाच प्रशासनाचा निर्लज्जपणा मांडायचा, दाखवायचा प्रयत्न याठिकाणी करणार आहे. माझ्या बोलण्यातून काही अपशब्द निघालेतर सुरुवातीलाच माफी मागते. मा.महापौर साहेब निश्चितपणे सांगते, आम्हाला वारंवार परवा दिवशी ज्याप्रकारे हिणवण्यात आले त्याचे हे गिव्ह अँड टेक आहे. मी कास्टीझममध्ये अजिबात विश्वास ठेवणारी नाही. परंतू मला असे वाटते की, मी ज्या समाजातली आहे, नगरसेवक म्हणून ज्या अधिकाराने मी निवडून आली आहे, तो माझा अधिकार होता. माझा कोणी अपमान करणार असेलतर ऐकून घेण्यातली निश्चितच मी नाही. त्यांना मी निश्चितच प्रत्युत्तर करणार. २००६ ते २०१६ या कालावधीत महापालिकेच्या उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता सुमारे ७६८९.९२ कोटी रुपयांचे महसुली उत्पन्न महापालिकेला प्राप्त झाले आहे. त्यापैकी अनुसूचित जाती जमाती, भटक्या जाती, विमुक्त जमाती या सर्वांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन आदेशानुसार ५ टक्के निधी म्हणजे सुमारे ३९३.५० कोटी निधी राखीव ठेवणे महापालिकेला बंधनकारक आहे. मा.महापौर साहेब, दि.३ जुलै १९९२ चा हा शासन आदेश आहे. या शासन आदेशात महसुली उत्पन्नाच्या ५ टक्के भाग हा राखीव निधी म्हणून काढून तो दूर्बळ घटकांसाठी म्हणजेच अनुसूचित जाती जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती यांच्या कल्याणकारी योजनांसाठी खर्च करावा, असा शासन आदेश आहे. या शासन आदेशाची

अंमलबजावणी प्रशासनाकडून होत नाही याचे मला अत्यंत दुःख वाटते. हे दुःख माझ्या पुढील आकडेवारीवरुन आपल्याला निश्चित समजेल. बांधील खर्च वजा जाता रु.३९३ कोटी रुपये महापालिकेने दहा वर्षांत खरेतर या सगळ्या बांधवांवर खर्च करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ रु.२६५.४६ कोटी इतकीच तरतूद अंदाजपत्रकात केली होती. ६६८९ कोटी रुपयांच्या ५ टक्के म्हणजे रु.३९३.५० कोटी इतका निधी ठेवायला पाहिजे होता. परंतू तसा न ठेवता रु.२६५ कोटीच तरतूद केली असेलतर ५ टक्के निधी खर्चच केला नाही. हे या आकडेवारीवरून स्पष्ट होते. यात जवळपास रु.१२८.०३ कोटींचा अनुशेष निर्माण झाला आहे. हा अनुशेष कसा निर्माण झाला, का झाला, कोणामुळे झाला याच्या खोलात आपण गेलोतर निश्चितपणे प्रशासनाची यात चूक आहे. बजेटच मोठं पुस्तक देता. आम्ही पुस्तक वाचतो. आकडे शोधतो. एकमेकांवर कुरघोड्या करायचा प्रयत्न करतो. कुणाचा वॉर्ड मॉडेल वॉर्ड आहे. कुणाकुणाचा वॉर्ड मॉडेल वॉर्ड होणार आहे त्यावर आम्ही चर्चा करतो. मी पण त्यातलीच एक आहे. परंतू त्याचबरोबर माझे लक्ष याकडे पण असते की, मी ज्या समाजाचे नेतृत्व करते, मी ज्या झोपडपट्टीतून निवडून येते, त्यांच्यासाठी माझ्या बजेटमध्ये प्रशासनाने काही तरतूद केली आहे किंवा नाही. याची माहित घेत असताना खरेतर मार्च महिन्यानंतर माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा अत्यंत तोकडी माहिती आमच्यापर्यंत पोचली. त्यानंतर लक्षात आले की, आपण इतरांच्या वॉर्डबद्दल जसे बोलतो, त्याचप्रमाणे आपण याच्यावर सुद्धा बोलणे किती गरजेचे आहे. आणि म्हणूनच आज छोटासा प्रयत्न केला आहे. मा.महापौर साहेब, शासन आदेशाप्रमाणे ५ टक्के निधी राखीव ठेवायचा असताना सुद्धा प्रशासनाने तो ठेवला नाही. आपण पहिले त्या अधिका-यावर काय कारवाई करणार. जे-जे पदसिद्ध अधिकारी होते त्यांनी ते केले नाही. त्यांच्यावर तुम्ही काय कारवाई करणार हे सुद्धा मला सभागृहाकडून,आपल्याकडून अपेक्षित आहे. आज आपण काहीच केले नाहीतर परत सुद्धा म्हणजे मघाशी म्हणाल्याप्रमाणे नंतर घ्या, परत नंतर मला माहित नाही. मी जिवंत असताना सुद्धा, माझ्या हयातीतसुद्धा हेच उत्तर येणार आहे. आपण ख-या अर्थाने काळजीपूर्वक निर्णय घेणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासन असे का वागते. शासन आदेश आहे. आपण कुठलाही विषय घेतला. मघाशी पीएमपीएमएलचा विषय चालला होता. शासनाचे काय ठरले तर आम्हाला वाचून दाखवा. मोरे साहेबांनी दोन पाने/अडीच पाने वाचलीत याला माझा अजिबात आक्षेप नाही. मग एखादी उपसूचना आली की ज्याच्यावर आक्षेप आहे,तेवढीच काढून ती कशी वाचता येईल, याकडे ज्या-ज्या सदस्यांचा कल असतो. हे हेतूपुरस्सर मला मघाशी जाणवत होते की, यांच्या प्रश्नोत्तरांचा तास इतका लांबला पाहिजे की, यांनीच कंटाळून म्हटले पाहिजे की, महापौर, पुढल्या वेळी घ्या. मा.महापौर साहेब, हे जाणवत होते. मला हेच सांगायचे आहे की, ज्यावेळी एखादी उपसूचना वाचताना त्यामधला जो जिस्ट असतो, तोच सांगायचा नाही. थोडसं वाचलं की, हा चल पुढच वाच, हा चल पुढच वाच. हे जेव्हा करतो त्यावेळी मा.महापौर साहेब, आपण अधिका-यांना सुद्धा या सभागृहात शासन आदेश वाचायला

शिकवले पाहिजे या मताची मी आहे. अनुसूचित जाती जमाती मी त्याकडे येणार आहे. कारण आजचा प्रश्नोत्तरांचा तासच त्यासाठी आहे. मा.महापौर साहेब, यात मागासवर्गीय कल्याणकारी योजनांबद्दल आत्ता आशाताईंनी सांगितले आहे. मला कळतेय, मला याच्या फारसे खोलात जायचे नाही. कारण त्यासुद्धा भटक्या विमुक्त जमातीत येतात. म्हणून मला वाटतेय की त्यासुद्धा पोटतिडकीने बोलत होत्या. निश्चितपणे आकडेवारीत काही फेरफार झाली. शिक्षिका म्हणून असे होते. बोलण्याच्या ओघात एखाद दुसरे शब्द जातात. आम्ही हे शब्द पकडत नाही. परंतू आमचे शब्द पकडले गेले. आम्ही काही ना काही मांडण्याचा प्रयत्न करतो. ज्येष्ठ म्हणून तुम्ही आम्हाला वारंवार सांगता, आम्ही इतके वेळा निवडून आलो. आम्ही किती सिनिअर आहोत. थोडे मन मोठे ठेवा. ज्युनिअरच्या चुका झाकायचा प्रयत्न करा. आम्हाला सुद्धा आनंद होईल, तुम्हाला सुद्धा आनंद होईल. आम्हीसुद्धा अशा प्रकारे तुमच्यावर टिका करणार नाही. खरेतर मा.महापौर साहेब, या नागरवस्ती विभागाच्या वतीने ज्या विद्यार्थ्यांसाठी योजना आहेत,त्यांच्यासाठी वाड्यावस्तीवर जाऊन, झोपडपट्टयांमध्ये जाऊन आपण काम करणे गरजेचे आहे. आपण समुपदेशक नेमतो, आपण त्यांचे पगार काढतो. त्यांना फक्त बचतगटांपुरते ठेवले आहे का. मागासवर्गीय बचतगटांना अडीच लाख मिळाले पाहिजेत, त्यांना तीन लाख मिळाले पाहिजेत. त्यांना कर्ज मिळाले पाहिजे. त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहीले पाहिजे. हे शंभर टक्के बरोबर आहे. पण त्या विद्यार्थ्यांचे काय. त्यांच्यासाठी आपण हेतूपुरस्सर प्रयत्न करतो का. हा समाज शिकला नाही पाहिजे. या समाजातल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नाही पाहिजे, त्यांचे जीवनमान उंचावले नाही पाहिजे, जर याचे उत्तर नाही असेलतर रु.१२८ कोटींचा अनुशेष राहिला कसा. याचे उत्तर हो असेलतर फुले,शाहू,आंबेडकरांच्या या सभागृहात ज्या तसबीरी बघते त्या फक्त बघण्यापुरत्याच आहेत का याचा गांभिर्याने विचार करायला पाहिजे.

मा.महापौर साहेब, ज्या-ज्या वेळी शिष्यवृत्तीची वेळ येते, आज उच्चशिक्षणासाठी इतके हेलपाटे मारावे लागतात. एकतर तुमचा दहावी, बारावीचा रिझल्ट लागल्यानंतर तुमचे शिष्यवृत्तीचे फॉर्म वाटून मोकळे झाले पाहिजे. सीएफसीत आत्ता फॉर्म उपलब्ध केले आहेत. सगळ्या कॉलेजच्या याद्या लागल्या आहेत. इंजिनिअरींगच्या,मेडीकलच्या,डी.फार्मसी,बी.फार्मसी च्या सगळ्यांच्या याद्या लागल्या आहेत. साहेब, आपण त्यांना मदत कधी करायची. एकतर रिझल्ट लागल्या लागल्या फॉर्म भरुन तुमच्याकडे याद्या आल्या पाहिजेत. आत्ता पंधरा/वीस दिवसांपूर्वी फॉर्म छापलेतर याद्या लागल्या असताना चेक काढायला अजून काही महिने जाणार आहेत. पर्यायाने काय होते, ज्या विद्यार्थ्यांचा डिप्लोमा, डिग्रीसाठी नंबर लागला आहे, त्यांना त्याठिकाणी ॲडमिशन घ्यायला जमत नाही. आता तुम्ही म्हणाल, फी किती असते. साडे सहा हजार रुपये, आठ हजार रुपये, दहा हजार रुपये फी असते. परंतू ज्या घरात रॉकेलचा दिवा पेटवायला रॉकेल नसते, त्यांच्यासाठी ही रक्कम फार मोठी आहे. आपली उच्च शिक्षणाची बोंबच आहे. याठिकाणी उच्चशिक्षणासाठी आपण कोणालाही मदत केली नाही. तरीसुद्धा आपण

बोलायचे नाही असे म्हणत असालतर मा.महापौर साहेब, अशा प्रकारचा अन्याय निश्चितपणे झाला नाही पाहिजे, याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छिते. अंदाजपत्रकातील ५ टक्के राखीव ठेवण्यात आलेला निधी म्हणजे रु.२६५.४६ कोटींपैकी नागरवस्ती विभागाला आपण २६.०२ कोटी रुपये व झो.नि.पू., स्थापत्य विभागाला १५२.०० कोटी रुपये, रु.१७८.२० कोटी रुपये अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव ठेवण्यात आले. उर्वरीत रु.८७.२६ कोटी रुपये कोणत्या लेखाशिर्षाखाली राखीव ठेवण्यात आले याचा खुलासा प्रश्नोत्तरांमध्ये दिलेला नाही. आयुक्त म्हणून आपली सुद्धा जबाबदारी आहे. आयुक्त साहेब, तुम्ही व्यक्तिशः घेऊ नका. परंतू ही आपली सुद्धा जबाबदारी आहे. सभागृहात एखादा सदस्य ज्यावेळी प्रश्नोत्तरे करतो, त्यावेळी तरी आपण किमान खरी माहिती द्यावी. या मताशी मी आणि कदाचित सभागृह देखील माझ्या मताशी सहमत असेल. त्यात सुद्धा खोटेपणा करतो.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षे झाली आहेत आणि काँग्रेसला सत्ता मिळून ६० वर्षे झाली आहेत. राज्यात आणि महापालिकेत गेले १५ वर्षांपासून मी राष्ट्रवादीची पाहिलेली सत्ता आणि राहीलेला हा रु.१२८ कोटींचा अनुशेष. कोण आहे मागासवर्गीयांच्या विरोधात, कोण आहे भटक्या विमुक्त जाती-जमातींच्या विरोधात, कोण आम्हाला गावाबाहेर ठेवतोय. हेच ठेवतात ना. एक काहीतरी स्पष्ट करा. एकतर तुम्ही त्यांची दिशाभूल करताय किंवा त्यांना भानच नाही की, आपण या समाजावर अन्याय करतोय. नाहीतर तुमची व त्यांची सांगड आहे. म्हणून तुम्ही आम्हाला या सगळया सुखसुविधांपासून वंचित ठेवायचे काम करताय. मा.महापौर साहेब, आम्ही जी प्रश्नोत्तरे केलीत त्यात बीएसयूपी व जेएनएनयूआरएम योजनेच्या निधीचा तपशील दिला आहे. सदर माहिती देताना सन २००९-१० पासून ते २०१५-१६ पर्यंत सुमारे रु.४५७.७६ कोटींची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. त्यापैकी केवळ रु.२५२.९ कोटी रुपये खर्च करण्यात आले. त्यातही रु.२०५.६६ कोटी रुपये बीएसयूपी-जेएनएनयूआरएम अंतर्गत खर्चच होऊ शकले नाहीत, हे अपयश प्रशासनाचे आहे, सत्ताधा-यांचे आहे. यात मग मी का म्हणू नये तुम्ही आमच्या विरोधात आहात. मग मी का म्हणू नये की तुम्ही भटक्या जाती जमाती, मागासवर्गीयांच्या विरोधात आहात. जर तुम्हाला असे वाटत असेल की, हा समाज पुढे जायला पाहिजे, त्यांचे जीवनमान उंचावायला पाहिजे, तर हा निधी पूर्णपणे खर्च व्हायला पाहिजे होता. परंतू हा निधी खर्च झाला नाही म्हणजे याचा अर्थ असाच होतो आहे की, तुम्हाला आम्हाला तुमच्याबरोबर येऊ द्यायचे नाही. तुम्हाला आमच्यावर अन्याय करायचा आहे. तुम्हाला अजून आम्हाला गावाबाहेरच ठेवायचे आहे. म्हणून तुम्ही हे पैसे खर्च करत नाही आहात. यांची मागासवर्गीय आयोगाकडे तक्रार केली पाहिजे. जे-जे लोक यात सामील असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. यांना किती दिवस पाठिशी टाकायचे. मा.महापौर साहेब, अशा प्रकारे जर राज्य आणि याठिकाणी अशाप्रकारे जर महापालिका चालत असेलतर तुम्हाला आम्हाला वाली कोणी नाही. तुम्ही आम्ही सुशिक्षित आहोत. आईबापाच्या कृपेने सुशिक्षित

झालोत ते डिग्रॅ घेण्यासाठी झालोत का. जे झोपडपट्टीत राहतात, जे अशिक्षित आहेत, त्यांच्या बाजूने कोण बोलणार, त्यांच्यासाठी कोण आवाज उठवणार आहेत. कोणत्याही पक्षाचे पांघरुण घेऊ देत. माझ्या बंधूभगिनी असतील म्हणून काय ते सगळे विसरायचे. मा.महापौर साहेब, जीव तुटतो.

मा.महापौर साहेब, जेएनएनयूआरएममध्ये सेक्टर २२ मध्ये प्रकल्प बांधतोय. यापूर्वी सुद्धा मी हे सांगितले होते. या प्रकल्पाला ४/५ झोपडपट्या एकत्र करुन रेडझोन हद्दीत गावाबाहेर बांधले आहे. काही केलंतर बनकर साहेब. जसा पुलगावला बॉम्बस्फोट घडला, आख्खा डेपो बेचिराख झाला, कैक लोक गेले, काहींचा थांगपत्ता नाही. आत्ताच सहा महिन्यांपूर्वी झाला. इथे किती लोक जातील याचा थांगपत्ता लागणार नाही. चार चार झोपडपट्या एकत्र करुन न्यायच्या, सगळे मागासवर्गीय, भटक्या जाती जमाती एका ठिकाणी न्यायचे. का तर गावाबाहेर महारवाडा, तसा आमचा वाडा. वाईट वाटते ना. वाईट वाटते, ज्या देशाच्या संविधानावर हा देश चालतो, त्या संविधानाने निर्माण झालेले कायदे व त्या कायद्यांवर न्यायालये चालतात. त्यांचीच पोरे आज गावाबाहेर म्हणून विरोध केला. काही सुज्ञान लोकांना कळतच नाही की, कशासाठी विरोध होतो. ज्या-ज्या ठिकाणी झोपडपट्या असतील, ज्या-ज्या ठिकाणी माझे बंधू भगिनी राहत असतील त्यांचा विकास, आहे त्याच ठिकाणी केलातर त्यांच्या रोजीरोटीची आबाळ होणार नाही. त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षण अर्धवट राहणार नाहीत. त्यांना कोणी जोरदार फटका मारणार नाही. गावाबाहेर नेऊन ठेवल्यावर त्याठिकाणाहून यायचे म्हटल्यावर लोकं म्हणतात की, ते सेक्टर २२ झोपडपट्टी पुनर्वसन. सांगायला लागत नाही, तिथे कोण-कोण राहतात, मुसलमान,महार,मांग,भटक्या जाती जमाती, सगळ्या प्रकारचे लोक तिथेच राहतात. त्यातले काही माझे मराठे पण असतील. सगळ्या जातीचे, परंतू परिस्थितीने खालावलेले, मागासलेले आणि शिक्षण न मिळालेले लोक तिथे राहतात. हे सांगायला मला भूषणावह वाटणार आहे का. मग मी विचार करते की, मी या सभागृहात काय करणार आहे. जर मी इथे बोलू शकत नसेल, तर मी इथे येऊन काय करायचे. तुमच्या हा मध्ये हा मिसळायची का. कशासाठी. मा.महापौर साहेब आणि म्हणून आणि म्हणून सेक्टर २२ ला विरोध केला होता. आहे त्याच ठिकाणी झोपडपट्टीचे पुनर्वसन करा. अजिबात विरोध करणार नाही. नियमात राहून करा. सरकार बदलले की नवीन सी.एम., अधिकारी हेच. नवीन सीएम आला की कानात बोलायला हेच. एकला सांगणार बरोबर आहे. दुस-याच्या कानात सांगणार चूक आहे. करायचे काय. राज्यकर्ते म्हणून तुम्ही असू द्यात, मी असू द्यात, कोणत्याही पक्षाचे असू द्यात. हे तर एकसारखेच आहेत. तुमची आमची दिशाभूल करायला प्रशासन मात्र तेच आहे. म्हणून मा.महापौर साहेब, सेक्टर २२ला विरोध केला होता. मा.महापौर साहेब, खरेतर बीएसयुपी जेएनएनयूआरएम अंतर्गत केंद्र सरकार व राज्य सरकारकडून ५० टक्के व ३० टक्के अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले होते. लाभार्थी हिस्सा १० टक्के होता.

महापालिका हिस्सा १० टक्के होता. सेक्टर २२ असेल, विठ्ठलनगर असेल, वेताळनगर असेल, मिलिंद नगर असेल, अजंठा नगर असेल. येथील पुनर्वसन प्रकल्पासाठी ३६० कोटींचा प्रकल्प केंद्र शासनाने मंजूर केला होता. या प्रकल्पासाठी सुमारे ६१० कोटींची वाढीव दराची निविदा स्विकृत केली होती. किती हास्यास्पद आहे. मा.महापौर साहेब, केंद्र शासनाने रु.३६० कोटी मंजूर केले. ६१० कोटींच्या निविदा स्विकृत केल्या. एवढी वाढीव दराची निविदा स्विकृत केली असतीतर महापालिका म्हणून त्याचा भार निश्चितपणे आपल्यावरच येणार आहे. मा.महापौर साहेब, हा रु.२५० कोटींचा वाढीव खर्च केंद्र सरकार व राज्य सरकार देणार नसेल. कारण त्यांचा हिस्सा ठरलेला होता. ५० टक्के, ३० टक्के त्यांचा हिस्सा ठरला होता. जर रु.३६० कोटींची निविदा ६५० कोटींना स्विकारली. रु.२५० कोटींचा वाढीव खर्च केंद्र सरकार,राज्य सरकार देणार नाही हे माहित असताना महापालिकेने हा खर्च काही प्रमाणात अनुसूचित जाती जमाती, भटक्या विमुक्त जमातीच्या लाभार्थ्यांवर लादला, व काही खर्च महापालिकेवर लादला. लादला असे यासाठी म्हणतेय कारण १० टक्के लाभार्थी हिस्सा होता. लाभार्थी हिस्सा १० टक्के कशावर. जो डिपीआर पाठवला होता, त्याच्यावर १० टक्के होता. म्हणजे रु.१०,०००/- होता. परंतू आज त्या गाळ्यांची किंमत पाहिलीतर साडेतीन लाख रुपये, तीन लाख साठ हजार रुपये, काही ठिकाणी पस्तीस हजार, पन्नास हजार, बावन्न हजार असा त्याठिकाणी लाभार्थ्यांकडून हिस्सा वसूल करण्यात आला. हा त्या गरीब लोकांवर लादला असे याठिकाणी मी ठामपणे सांगू इच्छिते. जेएनएनयूआरएम योजनेच्या निकषांप्रमाणे १० टक्के स्वहिस्सा व लाभार्थीने १० टक्के निधी महापालिकेला देणे आवश्यक असताना ५० टक्के हिस्सा केंद्र शासन, ३० टक्के हिस्सा राज्य शासन, १० टक्के हिस्सा महापालिकेने भरणे बंधनकारक आहे. त्यामुळे रु.३६० कोटींच्या प्रकल्पाच्या १० टक्के हिस्सा म्हणजेच रु.३६ कोटी महापालिकेच्या हिश्यातून भरणे अपेक्षित आहे. नागरवस्ती विभाग व झो.नि.पू. स्थापत्य विभागातून वर्ग केलेल्या राखीव निधी व्यतिरिक्त सुमारे ८७.२६ कोटी रुपये जेएनएनयूआरएम प्रकल्पासाठी वर्ग केलेले असल्यास सुमारे रु.५१ कोटींचा अतिरिक्त निधी महापालिकेने बेकायदेशीरपणे वर्ग केला आहे. आपण काय करतो. ढोबळमानाने तुम्ही अंदाजपत्रक आमच्याकडे मांडता. खरेतर हे आमचे काम नाही. आकडेमोड करायची हे लेखा विभागाचे काम आहे. बरेचदा आमच्या नगरसेवकांना लोकं हसतात की, नगरसेवकाने वैद्यकीय विभागातला घोटाळा काढला. हा नगरसेवक डॉक्टर पण झाला. याला काय कळतेय. शिक्षण मंडळातला घोटाळा काढला, हा तर शिक्षक झाला. याला काय कळतेय. तुमच्या अधिका-यांचा घोटाळा बाहेर काढला तर याला काय कळतय. साहेब, आम्हाला कळत नसते, आणि आम्ही जर कळवून घ्यायचा प्रयत्न केला असेलतर आम्हाला हे आकडे बघून खरेच भिती वाटते, धक्का बसतो. आपण नेमके काय करतोय. आपण इथे कशासाठी निवडून आलो. आम्हाला त्यातले खरेच काही कळत नाही. आणि याचाच गैरफायदा तुम्ही घेताय. पुस्तकं मोठमोठी छापायची. तीन दिवस आधी, चार दिवस आधी, आठ दिवस आधी

आमच्याकडे पाठवता. मला सांगा, जे बजेट तयार करायला नोव्हेंबरपासून सुरुवात करता, ते आठ दिवसांत समजायला आम्ही अर्थतज्ञ आहोत का याचा विचार आपण केला पाहिजे. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला विनंती आहे की, बजेटचे पुस्तक एक महिना आधी द्यायला सांगा. ते वाचले तर पाहिजे. हे सगळे आकडे पाहिल्यानंतर वाटते, आपण कशासाठी नगरसेवक झालो आहोत. आज हे वाचून अभ्यास करुन काढतोय. हे आकडे बघितल्यावर वाटते, याची भरपाई होणार आहे का. मा.महापौर साहेब, सदर प्रकल्पापैकी जवळजवळ सर्व प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत. म्हणून जे प्रकल्प अपूर्ण राहिलेले आहेत, त्यांपैकी खर्च न झालेला तपशील आपण आमच्या उत्तरांत दिलेला नाही. मा.महापौर साहेब, दिलेल्या उत्तरांत प्रशासनाने बीएसयूपी या योजनेअंतर्गत लिंक रोड पत्राशेड या प्रकल्पाबाबत तपशील दिला आहे. सन २०११-१२ पासून लिंक रोड पत्राशेड पुनर्वसन प्रकल्पासाठी सुमारे रु.३७.९० कोटींची तरतूद करण्यात आली होती. त्यांपैकी रु.२२.४७ कोटी खर्च झाले आहेत. सुमारे रु.१५.४७ कोटी अद्यापही खर्च झालेले नाहीत. लिंक रोड पत्राशेडची कोणतीही निविदा कॉल केलेली नव्हती. रु.२५.३० कोटींचे काम विनानिविदा, थेट पद्धतीने मे.बी.जी.शिर्के यांना दिले होते. आपण जो काही ढोबळ अंदाज काढला होता, आपण २५ कोटी केले का, २५.१ कोटी केलेत का, २४ कोटी केले. आपण काय केले, २५.३० कोटींचे विनानिविदा, थेट काम दिले होते. त्यावर तरतूद रु.३७.९० कोटींची केली. थेट काम दिले. निविदा तर काढलीच नाही. त्यावेळी तत्कालिन आयुक्त मा.आशिष शर्मा होते. त्यावेळी मी ऑबजेक्शन घेतले होते की, तुम्हाला अशा पद्धतीने काम देता येणार नाही. तरीसुद्धा त्यांनी दिले. जर तुम्हाला पाहिजे होतं की, काम रु.३७ कोटींचे आहे. तर आपण रु.३७ कोटींची तरतूद का केलीत. मा.महापौर साहेब, याठिकाणी वाढीव तरतूद ठेवून आपण कॉन्ट्रॅक्टरचे भले करतो का. प्रशासन ज्या पद्धतीने कॉन्ट्रॅक्टरच्या पाठिशी आहे, ते बघितले तर वाटते की, आपण विरोध केला नसता, आपण काही आक्षेप घेतले नसते तर मला वाटते की, आपण रु.२५.३० कोटी नव्हेतर रु.३७.९० कोटी सुद्धा त्याला खर्च करायला लावले असते. नव्हेतर आपण तो निधी त्याला वर्ग करुन दिला असता. परंतू साहेब, आपल्याला माहित होते की, आपल्याला रु.२५ कोटीच लागणार आहेत. तरी ३७ कोटी केले. त्या मागचा उद्देश्य काय होता तो फक्त आपल्यालाच ठाऊक. आम्हाला माहित पडूच शकत नाही कारण आम्ही त्या गावचेच नाहीत. आमचा या संदर्भातला अभ्यास नव्हताच. मा.महापौर साहेब, आर्थिक वर्ष २००७-०८ ते २०१५-१६, मूळ तरतूद रु.३७.९० लाख झाली. झालेला खर्च रु.२२.४२ लाख, शिल्लक रु.१५.४७ लाख. हे सगळे आकडे पाहिलेतर, या आकड्यांचा सार काढलातर, तुम्ही आमच्या गरीब बांधवांचे रु.१२८.३ कोटी रुपये कुठे खर्च केले हेच आम्हाला सांगितले नाही. आम्हाला एकदा सांगा. मा.महापौर साहेब, प्रशासनाला पत्र दिले तरी प्रशासन उत्तर देत नाही. सभागृहात प्रश्नोत्तरे केलीतर तुम्ही ऐकून घेणार, विषय संपला. उत्तर दिलेतर रास्तच आहे. पण तुम्ही उत्तर देणार नसाल, बोलणार नसालतर या विषयावरील चर्चा अशीच

चालू राहणार आहे. आज मा.सिमा सावळे, उद्या अजून कोणीतरी असेल. प्रशासनाला चांगले ठाऊक आहे की त्यांना उत्तरच द्यायचे नाही. झोनिपू विभागासाठी तरतूद केलेल्या रकमेपैकी सुमारे रु.९२.४३ कोटी रुपये. असा एकूण रु.२२०.४३ कोटींचा अनुशेष आज निर्माण झाला आहे. म्हणजे बांधील खर्च वगळता झोपडपट्टी पुनर्वसन, नागरवस्ती विभाग,जेएनएनयूआरएम मध्ये येणारे सर्व प्रकल्प हे सगळे एकूण प्रकल्प लक्षात घेतलेतर जवळपास रु.२२०.४३ कोटींचा अनुशेष आज निर्माण झाला आहे. नागरवस्ती विभाग, झो.नि.पू, स्थापत्य विभागात अशी परिस्थिती आहे की, माझ्या बालाजीनगर वॉर्डमध्ये असेल, महात्मा फुले नगर असेल, लांडेवाडी झोपडपट्टीत असेल, आपण इथे मोठ्या प्रमाणावर टॉयलेट ब्लॉक बांधायची मोहिम हाती घेतली आहे. संपूर्ण वॉर्डच उखडलेला आहे. ड्रेनेज लाईन टाकायचे काम चालू आहे. त्याठिकाणी आम्हाला काम करायला निधीच नाही असे आम्हाला वारंवार झोनिपू विभागाकडून, स्थापत्य विभागाकडून सांगण्यात येते. आणि पर्यायाने कामे थांबतात. झोपडपट्टीत शौचालये बांधायची मागणी २०११-१२ च्या बजेटमध्ये केली होती. ती मागणी २०१३-१४ ला मंजूर झाली आणि आज काम चालू आहे. शाळा बांधायची म्हटली, समाज मंदीर बांधायचे म्हटलेतर निधीच नसतो. आपले स्थापत्य विभाग, झोनिपू विभाग सरळ सांगतात, निधी नाही. हे सगळे आकडे जर पाहिले, उरलेली रक्कम पाहिली, यांनी खर्च करायचे ठरवलेतर जसा मॉडेल वॉर्ड तयार करतो, तसा मॉडेल झोपडपट्टीचे वॉर्ड तयार करु शकतो. याबाबत माझ्या मनात तिळमात्र सुद्धा शंका नाही. आणि असे मॉडेल झोपडपट्टी वॉर्ड आपण का तयार करु नयेत. आजही माझा गरीब बांधव झोपडपट्टीत राहतो. तो नाल्याच्या कडेने भाकरी सोडवतो, तिथेच जेवतो. तिथे कचरा असेल, घाण असेल, तुम्ही तिथून जाताना नाकाला रुमाल लावून जाता. मा.महापौर साहेब, आम्ही तिथे काम करतो. सार्वजनिक शौचालयाचे चेंबर फुटले तर त्या गॅसच्या वासाने आपण अर्धा तास गुंगीत राहतो. एकिकडे स्मार्ट सिटी म्हणून आपण बिरुद मिरवतो. अजूनही महापालिकेच्या पाठीमागच्या रस्त्यावर शौचालयासाठी उघड्यावर बसतात. माझ्या भगिनी शौचालयासाठी जातात. मा.महापौर साहेब, मला अभिमान आहे की, माझ्या वॉर्डमध्ये जवळपास ३२५ शौचालये घरोघरी बांधून झाली आहेत. ड्रेनेज लाईनचे काम चालू आहे. पण त्या ड्रेनेज लाईनसाठी इतके झगडावे लागले. एकिकडे निधी पडून आहे. आणि मला भांडावे लागतेय. मला वाटते, हे अत्यंत दूर्दैवी आहे. माझ्या भगिनीला शौचालयाची वेळ पाळावी लागते. नैसर्गिक विधीसाठी तीने सकाळीच अंधारातच जायचे. कारण ती उघड्यावर, रस्त्यावर जाणार आहे. डिलिव्हरी झालेली बाई असेल, प्रेगनण्ट बाई असेल किंवा ऑपरेशन झालेली बाई असेल, तिने काय करायचे. तिचे आम्ही काही देणे लागत नाही. लहान मुलगी असेल, तरुण मुलगी असेल तिचे आम्ही काही देणे लागत नाही. काय चालले आहे. म्हणून मा.महापौर साहेब, मला असे वाटते, इथे प्रशासन व सत्ताधारी हे शंभर टक्के मागासवर्गीयांच्या विरोधातले आहेत हे या आकडेवारीवरुन स्पष्ट होते आहे.

माझ्या वॉर्डात जशी महापालिका शौचालये बांधतेय. तशीच शेल्टर म्हणून एक संस्था पण शौचालये बांधतेय. आपल्यापेक्षा त्या संस्थेचा जास्त स्पीड आहे. ती संस्था जास्त शौचालये बांधते आहे. मा.महापौर साहेब, महापालिका खरेतर त्याठिकाणी कमकुवतपणे काम करताना दिसते आहे. शौचालये बांधताना जी पोटतिडीक लागते. शेल्टर संस्था काम करतेय. मी त्यांचे इथे कौतुक करेल. त्यांना खरेच वाटतेय की, भारत स्वच्छता अभियान सुरु झाले आहे. ते घराघरापर्यंत पोचले पाहिजे. आज माझी भगिनी गाडीचा लाईट आलातर शौचालयाला बसलेली असताना ऊठून उभी राहते. लाज वाटते. एकिकडे विकासनगरीचे बोर्ड लावतात, उघड्यावर बसलेल्या महिला, पुरुष, छोटी मुले यांचे काय करायचे. मग आम्हाला म्हणायचे निर्लज्ज बाई. आणि हे बोलणे जर निर्लज्जपणाचे असेलतर हो आहे मी निर्लज्ज. कारण जोपर्यंत इथल्या सत्ताधा-यांना याची लाज वाटत नाही, तोपर्यंत मी इथे बोलणार. हा माझा अधिकार आहे. माझी बहिण उघड्यावर शौचालयाला बसतेय. झोपडपट्टीतल्या मुलांना शिक्षण मिळत नाही. त्यांना उच्चशिक्षणासाठी रोखले जाते. इथे आकडे फसवून सांगितले जातात. अधिकारी नीट अंकूश ठेवायचे काम करत नाहीत. निश्चितपणे विरोधी पक्ष म्हणून ही माझी पण जबाबदारी आहे. आणि मी माझी जबाबदारी पार पाडली आहे. मी माझी जबाबदारी पार पाडत असताना निर्लज्जपणा करत असेलतर मला या निर्लज्जपणाचा अभिमान आहे. अभिमान आहे. कारण त्याची लाज जर त्यांना वाटत नसेलतर मला लाज वाटून घ्यायला आवडेल. म्हणून मी आज प्रश्नोत्तरे केली. म्हणून ही प्रश्नोत्तरे करताना, सभागृहात ज्या प्रकारे विरोध झाला, हात जोडून सांगावे लागले, ज्यांना ऐकायचे नाही त्यांनी सभागृहाबाहेर जा. निवडणूका चार महिन्यांवर आल्या आहेत. मागासवर्गीयांची मते चालतात, त्यांच्याबद्दलची कळकळ नाही. ऐकून घ्यायचं नाही. सगळयात शेवटी घ्या, शेवटी शेवटी करता करता किती शेवटी. तुम्ही कुठे नेणार आहात. शेवटाला नाही जाणार. भांडणार आणि मी पुढेच उभी राहणार आणि बोलणार. हे बोलणं आणि चालणं जर निर्लज्जपणाचं असेलतर खरेच मी आहे निर्लज्ज. माझ्या बंधू-भगिनींसाठी मी भांडत आले. तुम्हाला जर खरेच लाज वाटत असेल, मी निर्लज्ज वाटत असेलतर खरेच मी आहे निर्लज्ज. प्रशासनावर बोलतो म्हणून आम्ही निर्लज्ज. मा.महापौर साहेब, काय चालले आहे. ज्या सभागृहामध्ये, ज्या राखीव कोट्यातून तुम्हाला महापौर पद मिळाले आहे. तुम्ही निवडून आलात, मी निवडून आले, मा.तानाजी खाडे निवडून आलेत. मा.आशाताई शेंडगे निवडून आल्या. मा.विमल जगताप निवडून आल्या. त्यांच्यासाठी बोलणे जर निर्लज्जपणाचे असेलतर आहे मी निर्लज्ज. कारण सत्ताधारी म्हणून तुम्ही तुमची जबाबदारी नीट पार पाडली असतीतर मला वाटते, आम्हाला इथे बोलायला जागाच राहिली नसती. खरेतर मी इथे बोलणार नव्हते. पण ज्याप्रकारे आम्हाला इथे बोलू दिले जात नव्हते, आमची गळचेपी करण्यात आली होती. त्या गळचेपीला मला उत्तर द्यायचे होते. या सगळ्या गोष्टींचा सार एकच आहे की, ज्या-ज्या अधिका-यांनी कामचुकारपणा केला, त्या-त्या

अधिका-यांवर आपण काय कारवाई करणार. मा.आयुक्त साहेब, आपल्याला विचारते. आपल्याकडून हा निधी खर्च झाला नाही. खरेतर हा निधी शासन आदेशानुसार दरवर्षी कॅरीफॉरवर्ड व्हायला पाहिजे होता. आपले लोकं तो आदेश वाचत नाहीत. मा.महापौर साहेब, याठिकाणी त्या आदेशाची एकच लाईन वाचून दाखवते. – “जर नगरपालिकेने निधी प्रति वर्षी संपूर्णपणे खर्च केला नाहीतर त्या वर्षांत खर्च न झालेला संपूर्ण निधी त्याची तरतूद पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात त्याप्रमाणात मिळून करत जावी.” असे आदेश शासन परिपत्रक क्र.--- यानुसार याठिकाणी देण्यात आला आहे. ज्यावेळी आम्ही विचारले, आपल्या अधिका-यांचे इतके अज्ञान होते की त्यांनी सांगितले की, हा निधी आपल्याकडे कॅरीफॉरवर्ड करायची आपल्याकडे तरतूद नाही. तसा शासनाचा आदेश असताना हा निधी आपल्याकडे कॅरीफॉरवर्ड व्हायला पाहिजे. हा निधी वापरला असतातर एक एक झोपडपट्टी ही नंदनवन झाली असती. त्यांच्यासाठी कामच करायचं नाही असे जर प्रशासनाने ठरवले असेल आणि त्याला दुजोरा जर सत्ताधारी पक्ष देणार असेलतर ते आमच्यासाठी अत्यंत दूर्दैवी आहे.

मा.महापौर साहेब, खरेतर आम्ही प्रश्न विचारला होता की, सन २००७-०८ पासून ते २०१५-१६ पर्यंत वार्षिक अंदाजपत्रकात अनुसूचित जाती जमाती, भटक्या जमाती यांच्यासाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांसाठी राखीव ठेवण्यात आलेला सर्व निधी सर्वसाधारणा सभा, स्थायी समितीच्या मान्यतेने इतरत्र वर्ग करण्यात आला का. तर या प्रश्नाचे उत्तर नाही असे दिले आहे. परंतू प्रशासनाने त्याचे उत्तर, इथे जे आदेश आहेत, त्याप्रमाणे त्यांनी केलेले नाही. त्यांच्यावर काय कार्यवाही करणार आहोत याचे सुद्धा उत्तर सभागृहाला सांगावे. बोलण्याच्या ओघात, खरेतर मन दुखावलं होतं. मघाशी बोलताना शब्दांचा थोडासा अतिरेक झाला असेलतर ज्या कोणा सदस्यांच मन दुखावले असेलतर मी सुद्धा याठिकाणी माफी मागते. मी पोटतिडकीने सांगते की, पाच/दहा झोपडपट्या घ्या. मॉडर्न झोपडपट्या. त्या झोपडपट्या बघायला आहे त्या स्थितीमध्ये. मी म्हणणार नाही की तुम्ही त्याठिकाणी मोठ्या बिल्डींग बांधा. ज्या असतील त्यांना ड्रेनेज सुविधा द्या, पाणी द्या, शौचालये द्या शाळा द्या,गार्डन द्या, समाजमंदीर द्या. तुमची माझी एकही बाई शौचालयाला उघड्यावर बसणार नाही याची काळजी घ्या. या फुले, शाहू, आंबेडकरांच्या ज्या सभागृहात तुम्ही आम्ही बसलो आहोत, जर तुम्ही माझा आवाज ऐकला नाहीत तर मला वाटतेय की, भविष्यात माझा आवाज ऐकायला इथे कोणी असणार नाही. मा.महापौर साहेब, माझी तुम्हाला हात जोडून विनंती आहे की, या गरीबातला कोणी उघड्यावर शौचालयाला बसला नाही आणि माझा गरीबातला कोणी मुलगा शिक्षण सोडून भंगार उचलायला गेला नाहीतर मी समजेल की, मी ज्या समाजात, ज्या जातीत, ज्या ठिकाणी निवडून येते, त्यांच्यासाठी मी एक टक्का तरी काम करु शकले. मा.महापौर साहेब, आपण ज्याअर्थी तीन हजार कोटींचे बजेट मोठ्या दिमाखाने या सभागृहात मांडतो, त्याचे कुठेतरी फलित झाले असे मला वाटेल. धन्यवाद.

**मा.तानाजी खाडे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मी सुरुवातीला मा.आशाताई शेंडगे व मा.सिमाताई सावळे यांचे धन्यवाद मानेन. त्यांनी सभागृहात चांगला प्रश्न उपस्थित केला आहे. प्रश्नोत्तरांच्या निमित्ताने त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत. मा.महापौर साहेब, मागील सभेत ठरले होते की, प्रश्नोत्तरे पुढील मिटींगमध्ये घ्यायची आहेत. नगरसचिव समोर आहेत. पुढील मिटींगमध्ये हा विषय घ्यायचा म्हणून मी देखील येताना कागदपत्रे आणली होती. मी मा.शहर सुधारणा समितीचा चेअरमन म्हणून काम केले आहे. १९९७ सालापासून मागासवर्गीय कल्याणकारी योजनेची ५ टक्के रक्कम ही राखीव राहीली पाहिजे व ती खर्ची झाली पाहिजे. यासाठी मी गेले २० वर्षांपासून प्रयत्न करतोय. परंतू आपले प्रशासन ढिम्म आहे का प्रशासनाला काम करायची इच्छाच नाही. आज सिमाताईंनी काही आरोप केले आहेत ते बरोबर आहेत. वास्तविक यावरुन प्रशासनावर ॲट्रॉसिटी का दाखल करु नये. ज्या ज्या वेळेस काही योजना या शहरात आणावी. मी स्वतः सांगतो, मी नगरसेवक होण्याआधी निधी काहीच खर्च होत नव्हता. मी १९७० साली महापालिकेत आल्यानंतर ब-याच मागासवर्गीय योजना सुरु झाल्या. शिष्यवृत्ती योजना सुरु झाली. पेन्शन योजनेचे फॉर्म सुद्धा वाटले गेले. काही नवीन लोकांना आल्यानंतर काही महिलांनी त्यांच्या अडचणी व्यक्त केल्यामुळे ही पेन्शन योजना कॅन्सल झाली. मला नगरसेवकांनी विचारले की पेन्शन योजना होती का. दर मी म्हणेन की, शंभर टक्के ही योजना होती. मा.महापौर साहेब, आपल्या बजेटच्या ५ टक्के निधी राखीव ठेवून मागासवर्गीय कल्याणकारी योजनेवर खर्च केलाच पाहिजे. परंतू तसे होत नाही. कारण आपण जे काही बजेट करतो, दर महिना तात्पुरते करून त्यावर आपण जो खर्च दाखवतो. हा खर्च म्हणजे प्रशासनाची उदासिनताच आहे. कारण प्रशासन म्हणते काय योजना आणायची. आपण बरेच काही करु शकतो. पण करायची मानसिकता नाही. सायकल, शिष्यवृत्ती, विधवा महिला, कृष्ठरोगी यांना अनुदान यावर किती तुटपुंजे पैसे खर्च होतात. पीएमपीएमएल सारख्या संस्थेला आपण भरभरुन पैसे देतोय. वास्तविक पाहता, केंद्र सरकार, राज्य सरकार यांची ही जबाबदारी असताना आपण हि जबाबदारी स्विकारतोय ही शोकांतिका आहे. आपण आज पाहिलेतर ब-याचशा योजना आपण आणू शकतो. मी मागील वर्षी म्हणाला होतो की, आज शहरात गोरगरीब विधवा महिला इतक्या आहेत. त्यांना त्यांची मुले सांभाळत नाहीत. पण हे कुठे कागदावर नाही. काही विधवा महिलांची मुले लहान आहेत. आपण त्यांना सहा हजार अनुदान देतो. मोकळे होतो. अहो,आपण विधवा महिलांवर फार उपकार केलेत. त्यांच्यासाठी कोणी पेन्शन योजना चालू करत नाही. त्याठिकाणी शासन खर्च करतेय. आपण ही योजना का चालवू शकत नाही. आपल्या इथल्या महिलांना, म्हाता-या बायांना खडकवासल्या पर्यंत चालत जावे लागते. त्यांचा अपघात होतो. हात पाय मोडतात. काहींना बसने जावे लागते. काहींना रेल्वेने जावे लागते. मी बरेच वेळा सभागृहात बोललो आहे. पण कोणाला किव आली आहे. आज कोणीही नाही. प्रत्येकजण बोलतो. पण याठिकाणी प्रशासन ढिम्मपणे

बसलेले आहे. कारवाई कोण करणार आहे. आज सभागृहात प्रश्नोत्तरे झाली. आम्ही बोल बोल बोलणार. मघाशी मा.मंगलाताई कदम यांनी जे भाषण केले. शेवटी विषय मंजूर करुन दिला. कारण का काहीतरी निघेल. यांचा विषय आज मंजूर झाला, काही होत नाही. मी आज तुम्हाला सांगतो, इथे ॲट्रॉसिटीचा मुद्दा उपस्थित केला आहे. ॲट्रॉसिटी का दाखल करु नये. झोपडपट्टीत काम करत असताना आम्हाला एका एका गोष्टीच्या अशा अडचणी येतात. आज पिंपरी चौकात राहूलनगर झोपडपट्टी होती. त्याठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी जागा द्यायची म्हणून पलिकडची सगळी झोपडपट्टी काढली. आणि गावाच्या बाहेर महारवाडा. मी कित्येक वेळा सभागृहात बोललो. आज सिमाताई बोलल्या. शहरातली झोपडपट्टी काढायची आणि गावाबाहेर टाकायची. तिथे झोपडपट्टी पुनर्वसन. श्री.बापू गावडे म्हणून नगरसेवक होते. त्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. माझ्याकडे त्यांचे पत्र होते. ठराव होता. आकुर्डीचे एक नगरसेवक होते. त्यांची सूचना. माझ्याकडे सगळी कागदपत्रे आहेत. त्यांनी त्यावेळी प्रश्न उपस्थित केला होता की, गावाबाहेर महारवाडा का. म्हणून त्यावेळी वेताळनगर झोपडपट्टीचे तिथेच पुनर्वसन करणार होते. ते त्यावेळी थांबवले गेले. उद्या देखील असेच प्रश्न उपस्थित होतील. हे पुनर्वसन शासनाच्या विरोधात आहे. त्यामुळे इथून पुढे झोपडपट्टी ज्याठिकाणी आहे तिथेच पुनर्वसन करावे असे शासनानेच ठरवले. म्हणून वेताळनगरचे पुनर्वसन त्याच जागेवर चालले आहे. त्या काळात ज्या झोपडपट्यांचे पुनर्वसन झाले. बाकी राहिलेल्या गाळांमध्ये घुसखोरी झाली. १९९७ साली मी नगरसेवक होण्याआधी मी ज्या १२३ स्क्वे. फूटाच्या घरात रहात होतो. आजदेखील मी त्याच घरात राहतोय. कारण ज्या बाबासाहेबांनी घटना लिहीली आहे, त्यात तरतूद केली होती की, मागासवर्गीयांना संधी मिळाली पाहिजे. त्यांना रिझर्वेशन मिळाले पाहिजे. त्याचा फायदा घेऊन मागासवर्गीयांतला एक व्यक्ती नगरसेवक झाला. मी स्वतःचे पुनर्वसन करुन घेतले. बंगला बांधला आणि बाहेर निघून गेलो तर थू त्या जिंदगीवर. बाबासाहेबांनी जी घटना लिहीली आहे, त्या घटनेच्या विरोधात केल्यासारखे होईल. पण मी तिथेच राहून त्या लोकांचे चांगले करायचे ही भूमिका मनात ठाम ठेऊन त्या लोकांचे भले करतोय. आज आपण ३५ बिल्डींगी अलॉट केल्या आहेत. शशीकिरण गवळी एका बाजूला, वैशालीताई ऊबाळे आणि मी एका बाजूला असे आम्ही ३ नगरसेवक तिथे होतो. तिथे पुनर्वसन सुरु करत असताना वास्तविक पाहता तिथे काम करत असताना आज राहील त्याचे घर, कसेल त्याची जमिन असे कायदा सांगतो. त्या घरांत राहणा-या लोकांना घरात घ्यायचे असे ठरवले गेले. महापालिकेत मी शहर सुधारणा समिती/झोपडपट्टी सुधार समितीचा चेअरमन असताना त्यावेळी मा.अजित गव्हाणे स्थायी समितीचे चेअरमन होते. याठिकाणी जेएनएनयूआरएम योजनेअंतर्गत झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन होणार होते. त्यावेळी १के खाली विषय येऊ दिला. मी विचार केला नाही की, झोपडपट्टी सुधार समिती मार्फत विषय आला पाहिजे. त्यावेळी १ के खाली विषय दाखल करायला लावला. या सगळ्या गोष्टी करत असताना माझ्या मनात एकच

विचार होता की, लोकांचे पुनर्वसन झाले पाहिजे. फक्त १० टक्के रक्कम नागरीकांकडून घ्यायची. १० टक्के रक्कम महापालिका भरणार. ३० टक्के रक्कम महाराष्ट्र शासन व ५० टक्के रक्कम केंद्र शासन भरणार असे ठरवले होते. असे करुन १०० टक्के रक्कम उपलब्ध करुन द्यायची असे ठरले गेले. आज देखील मी या विषयावर मा.सिमाताई सावळे यांचे अभिनंदन करेन. कारण सिमाताईंना तो १० टक्केंचा मुद्दा धरला. त्या कोर्टात गेल्या. त्या लोकांचे पुनर्वसन होत असताना त्यांनी रेडझोनचा मुद्दा उपस्थित केला. पण ते थांबले गेले. कारण त्यांचे विषय असतील. त्याचवेळी त्या झोपडपट्टी सुधार समितीच्या सदस्य होत्या. त्यावेळी मा.आर.एस.कुमार समितीचे चेअरमन होते. दिवाळीच्या आसपास मिटींग झाली असेल. संबंधित ठेकेदार देखील त्या मिटींगला आला होता. त्या मिटींगमध्ये काही विषय झाले. सिमाताईंनी काही प्रश्न उपस्थित केले. (मा.सिमा सावळे – मी त्या मिटींगला नव्हते. असे सांगितले) या मिटींगमध्ये एक एक विषय उपस्थित केले गेले. विषयाचे विषयांतर होत गेले. प्रत्येकाला घर मिळावे म्हणून मी लोकांचे पुनर्वसन होत असताना त्याठिकाणी मनापासून प्रयत्न करत होतो की, प्रत्येकाला घर मिळावे. त्याठिकाणी ३५ पैकी १६ बिल्डींगमध्ये राहणा-या लोकांमध्ये माझ्या वॉर्डमधील लोक आहेत. या ज्या १६ बिल्डींग आहेत, त्यात लोकांचे पुनर्वसन करत असताना मी माझ्या वॉर्डमधील एकही माणूस अपात्र होऊ दिला नाही. ज्यावेळी पात्र अपात्रतेचा प्रश्न उपस्थित झाला. लोकांनी कागदपत्रांची पूर्तता करा. कशासाठी पूर्तता करायची. हे लोक तिथे रहायला होते. तरीसुद्धा कागदपत्रे पाहिजेत. त्यांची कागदपत्रे माझ्याकडे आहेत. काही ठिकाणी माझे अंध बांधव होते. ते कागदपत्रांची पूर्तता करु शकले नाहीत. ती पूर्तता करण्यासाठी काही इकडचे तिकडचे कागदं लावून ते पात्र झाले. मी संबंधित विभागाला विनंती केली की, तुम्हाला जी कागदं पाहिजे ती कागदं घ्या. मा.महापौर साहेब, पण कालच्या मिटींगमध्ये सिमाताईंनी प्रश्न उपस्थित केला होता. काही खोल्यांच्या एन्क्वाय-या मागितल्या. त्या देत नाहीत. मी तर म्हणतो,द्या. मी तुम्हाला सांगतो, तानाजी खाडे मागच्या मिटींगमध्ये उलट सुलट बोलला होता. महापौर तुम्ही दोनदा, तीनदा मला आदेश दिला होता की तोंड सांभाळून बोला. प्रत्येकाला घर मिळाले पाहिजे. झोपडपट्टीतल्या लोकांचे पुनर्वसन झाले पाहिजे. त्यासाठी कागदपत्रे देत असताना लोकांनी काही चुकीची कागदपत्रे दिली असतील. पण मा.तानाजी खाडे यांनी तयार केलेले कागद नाहीत. नगरसेवक अधिका-यांना रिक्वेस्ट करतात. मी माझ्या राहणा-या गोरगरीब बांधवांना घर मिळावे म्हणून रिक्वेस्ट केली असेल. लोक पात्र झाले असतील. पण तानाजी खाडेने एक रुपयाचा पण भ्रष्टाचार केलेला नाही. मी काही गोष्टींत डायरेक्टली जाऊ शकलो असतो. पण मी तसे केले नाही. मला काही गोष्टी सांभाळायच्या आहेत. कारण मी सिनिअर नगरसेवक आहे. गेले २० वर्षांपासून मी सभागृहात का करतोय. मला काही गोष्टी बोलायच्या आहेत. तुम्ही आदेश दिल्यावर मी लगेच प्रतिक्रिया देणे हे माझे मलाच शोभत नाही. आज सिमाताईंनी काही प्रश्न उपस्थित केले. माझी सिमाताईंना विनंती

आहे की, आपण कळकळीने प्रश्न उपस्थित केलेत त्याबद्दल तुमचे धन्यवाद. लोकांचे पुनर्वसन होत असताना त्यात काही अडचणी असतील. प्रशासन चुकले असेल मान्य करतो. पण त्या चूका स्थानिक लेव्हलवर मिटल्या असत्या तर फार चांगले झाले असते. १९९७ साली मी माझ्या वॉर्डमध्ये घराघरांत संडास बांधून दिले. १९९७ साली मी १५६३ गाळ्यांमध्ये इंडीव्यूजल टॉयलेट रु.१,०६,००,०००/- खर्च करुन केले आहेत. सरकारने आज स्वच्छता अभियान काढले आहे. सरकारचे अभिनंदन. पण माझ्या भागातले सार्वजनिक संडास तोडून त्याठिकाणी घरगुती संडास बांधून दिले. माझा भाग हगणदारी मुक्त झाला होता. पण नंतरच्या काळात संग्राम झोपडपट्टी जी रोडवाईडींगमध्ये असलेली झोपडपट्टी. त्यांचा ड्रॉ झाला होता. त्यांना बिल्डींग तयार होती. त्यांना बिल्डींगमध्ये जायचे होते. पण आज कोर्टाच्या आदेशामुळे त्यांना बिल्डींग देत नाही. आजदेखील त्या झोपडपट्टीत राहणारे लोक रस्त्यावर बसतात. मला वाईट वाटते. माझ्या आयाबहिणी उघड्यावर संडासला बसतात. कायद्याच्या अडचणींमुळे ते त्या घरांत रहायला जाऊ शकती. आज माझी आई बहिण रस्त्यावर बसली नसती. मा.महापौर साहेब, माझ्या भागात आज जी छोटी घरे दिली होती, त्यांना मोठी घरे देता येतात. केंद्र सरकार मार्फत अटल योजना येणार आहे. चांगली गोष्ट आहे. या योजनेत झोपडपट्टीधारकाला एक ते दीड लाख त्याची झोपडी सुधारण्यासाठी देणार आहेत. ही चांगली गोष्ट होणार आहे. झोपडपट्टीतल्या लोकांना त्याचा फायदा होईल. पण आज माझा सेक्टर २२ हा रेडझोनमध्ये येत असल्यामुळे मला याचा फायदा घेता येणार नाही. माझ्या भागातले ३०,००० लोक आज या रेडझोनमुळे वंचित राहणार आहेत. या मागासवर्गीय कल्याणकारी योजनेतले पैसे खर्च झाले पाहिजेत. या लोकांना सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. या भागातल्या लोकांची कुटूंबे वाढत चालली आहेत. त्यांना घर कमी पडते आहे. त्यांचे पुनर्वसन झाले पाहिजे. त्यांचे पुनर्वसन करता येईल. आपण आपल्या मागासवर्गीय कल्याणकारी योजनेत महिलांना अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्याचे काम करतोय. मला सांगा, एका तरी महिलेला स्वतःच्या पायावर उभे केले आहे का. मागील वेळी सिमाताईंनी या अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची सगळी माहिती काढली होती. मला वाटते, या संस्थेला ब्लॅकलिस्ट करायला पाहिजे होते. त्यांच्यामार्फत लाखो, करोडो रुपये आपण खर्च करतोय. त्यांची बील देतोय. त्याचे आऊटपुट काय. या महिला आज धुणीभांडी करताहेत, दुस-याच्या हाताखाली मोलमजूरी करताहेत. त्यांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी काहीतरी व्यवस्था द्या. व्यवसाय शिकवा. शिलाई मशीनी काय देताय. आज एकेकाच्या घरी दोन दोन तीन तीन शिलाई मशीनी पडलेल्या आहेत.

**मा.महापौर** – विषय भरकटत चालला आहे.

**मा.तानाजी खाडे-** आज एवढे चांगले प्रश्न विचारले आहेत. मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचा विषय आहे. मला बोलायची इच्छा आहे. हे परत परत बोलता येणार नाही. आज बरेच पुरुष सुद्धा बेकार, बेरोजगार आहेत. त्यांना सुद्धा मागासवर्गीय योजनेमार्फत काही योजना आणता येतील. मी मागील मिटींगवेळी बोललो होतो. प्रशासन सहा.आयुक्त यांनी एखादे दिवशा आम्हाला घेऊन बसावे. आपण अशी एखादी योजना काढू शकता. प्रत्येक विषयाबद्दल गांभिर्याने लक्षात घेऊन मागासवर्गीय कल्याणकारी योजनेचे पैसे खर्च झाले पाहिजेत, एवढी विनंती करतो. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.सुलभाताई ऊबाळे-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, याठिकाणी बरेचसे नगरसेवक नाहीत. परत कोरमचा विषय येतो आहे. कार्यक्रम सुद्धा आहेत. पुढील पर्यावरणाचा विषय खूप मोठा आहे. म्हणून आजची ही सभा तहकूब करण्यात यावी ही सभा सोमवार दिनांक २९ ऑगस्ट २०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी अशी विनंती करते.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** – ही सभा सोमवार दिनांक २९ ऑगस्ट २०१६ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ६२**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०.०८,२०१६, २३.०८.२०१६ (दु.२.०० वा.),२३.०८.२०१६ (दु.२.२० वा.)**

**ची तहकूब सभा)**

दिनांक – २९.०८.२०१६ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे ऑगस्ट-२०१६) दि.२३.८.२०१६ (दु.२.२०) ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.२९.८.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१५. मा.पात्रे राम संभाजी

१६. मा.बाबर शारदा प्रकाश

१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

१९. मा.उल्हास शेट्टी

२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२१. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३०. मा.राजू मिसाळ

३१. मा.नंदा विकास ताकवणे

३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३३. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३५. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३६. मा.लोंढे गणेश नारायण

३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३८. मा.ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३९. मा.अपर्णा निलेश डोके

४०. मा.अनंत सुभाष को-हाळे

४१. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४२. मा.प्रसाद शेट्टी

४३. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४४. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४५. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४६. मा.वाबळे संजय मल्हारराव

४७. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

४८. मा.सुपे आशा रविंद्र

४९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५०. मा.मोहिनीताई विलास लांडे

५१. मा.अजित दामोदर गव्हाणे

५२. मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५३. मा.सावळे सिमा रविंद्र

५४. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशीनाथ

५५. मा.भोसले राहूल हनुमंतराव

५६. मा.पालांडे सुजाता सुनिल

५७. मा.बहल योगेश मंगलसेन

५८. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

५९. मा.कदम सदगुरु महादेव

६०. मा.गिता सुशील मंचरकर

६१. मा.कैलास महादेव कदम

६२. मा.टाक अरुण मदन

६३. मा.वाघेरे सुनिता राजेश

६४. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

६५. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६६. मा.काळे विमल रमेश

६७. मा.पाडाळे निता विलास

६८. मा.विनोद जयवंत नढे

६९. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७०. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७१. मा.बारणे निलेश हिरामण

७२. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७३. मा.बारणे माया संतोष

७४. मा.ओव्हाळ शेखर अशोक

७५. मा.यमुनाताई रमणनाना पवार

७६. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

७७. मा.चौंधे आरती सुरेश

७८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

७९. मा.जवळकर वैशाली राहुल

८०. मा.जगताप राजेंद्र गणपत

८१. मा.शितोळे शैलजा बाबुराव

८२. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

८३. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

८४. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी

८५. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

८६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८७. मा.शेंडगे आशा सुखदेव

८८. मा.मोटे किरण बाळासाहेब

८९. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९०. मा.संजय केशवराव काटे

९१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

९२. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.गावडे-सहआयुक्त,मा.तुपे,मा.दुधेकर-सहशहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे, मा.कडूसकर,मा.माछरे,मा.दुरगुडे,मा.आष्टीकर,मा.लोणकर,मा.बोदडे-सहा.आयुक्त,मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.निकम,मा.इंगळे,मा.गट्टूवार-कार्यकारी अभियंता,मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, मुर्ती खरेदी बाबतचा अहवाल आला असेलतर आयुक्त साहेबांनी तो अहवाल सभागृहासमोर ठेवावा. माझी विनंती आहे की, पाच दिवसांची मुदत संपून गेली आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, डोईफोडे साहेब कसा काय खुलासा देणार. त्यांचा खुलासा करायचा काय संबंध.

**मा.सुलभाताई ऊबाळे**–मा.महापौर साहेब, डोईफोडे साहेब नाहीतर मा.अति.आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**मा.तानाजी शिंदे (अति.आयुक्त) -**मूर्ती खरेदी प्रकरणी जी चौकशी प्रस्तावित केली होती, त्यासंबंधीचा अहवाल चौकशी समितीने मा.आयुक्तांकडे सादर केला आहे. परंतू अहवालावरुन जी काही कारवाई प्रस्तावित केली आहे, ती कारवाई करायचे अजून प्रलंबित आहे. म्हणून कारवाई केल्यानंतर, कारवाई पूर्ण झाल्यानंतर सभागृहाला माहिती द्यावी असा आयुक्त साहेबांचा निरोप आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, तुम्ही कारवाई करा. पण अहवाल काय आहे याची आम्हाला माहिती पाहिजे आहे.

**मा.तानाजी शिंदे (अति.आयुक्त)-**मा.आयुक्तांकडे अहवाल सादर केला आहे. त्याची कारवाई पूर्ण झालेली नाही, ती पूर्ण झाल्यानंतर सभागृहाला माहिती देण्यात येईल.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, पुढल्या वेळी अहवालाची माहिती देतील. पुढील विषय घेण्यात यावा.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

विषय क्रमांक-२

दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/७६/२०१६ दि.६/८/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२५ दि.९/८/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील आरक्षण क्र.१/१३३ यामध्ये शाळेचे आरक्षण एकुण क्षेत्र १८००० चौ.मी. आहे. या क्षेत्रापैकी ४७५४ चौ.मी. क्षेत्र हे महानगरपालिकेने FSI/TDR बदल्यात ताब्यात घेतले आहे. उर्वरीत क्षेत्राचा ताबा सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे यांचेकडे आहे. आरक्षणाचे संपुर्ण क्षेत्र माध्यमिक शाळा आरक्षण तरतुदीन्वये विकसित करणेसाठी महानगरपालिकेच्या ताब्यातील ४७५४ चौ.मी.जागा जागेसाठी नगररचना विभागाने ठरविलेल्या दरानुसार ३० वर्ष कालावधीसाठी ई-निविदा नोटीस क्र.१/२०१६-१७ अन्वये दर मागविणेत आले होते. (निविदा रक्कम रुपये २,५१,४८,६६०/-) सदर कामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे यांची एकमेव निविदा पात्र ठरली असून त्यांनी सदरकामी निविदा रक्कमेपेक्षा ०.५०% जास्त असा दर सादर केला आहे. सुभद्राज् एज्युकेशनल सोसायटी पुणे या निविदाधारकांची निविदा, निविदा दरापेक्षा ०.५०% जास्त (रक्कम रुपये २,५२,७४,४०३/- अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी बावन्न लाख चौ-याहत्तर हजार चारशे तीन फक्त/-) दराची व अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेने ३० वर्ष कालावधीसाठी लीज दराने देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.महापौर–**हा विषय याठिकाणी तहकूब करण्यात येत आहे. या विषयाला ज्यावेळी मान्यता देण्यात येईल, त्यावेळी या विषयावर चर्चा करण्यात येईल. माझे काही दुमत नाही. सर्व सदस्यांनी खाली बसावे.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ९११ विषय क्रमांक-२
दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/७६/२०१६ दि.६/८/२०१६
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६९२५ दि.९/८/२०१६

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

(सभागृहात गोंधळ)

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

ठराव क्रमांक - ९१२ विषय क्रमांक-३
दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/३६१/२०१६, दि.०५/०७/२०१६
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.८९ दि.१५.७.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर मुख्यलेखापाल या अभिनामाचे ०१ पद शासन मंजूर आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील आदेश क्र.बदली २०१६/प्र.क्र.१०६/कोषा प्रशा-२ दि.१५ जुन २०१६ अन्वये श्री.राजेश गोपाळराव लांडे, उपसंचालक, वित्त व लेखा सेवा यांची मुख्यलेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे. श्री.लांडे हे महानगरपालिकेमध्ये दि.२०/०६/२०१६ रोजी रुजू झाले आहेत. त्यांना इकडील आदेश क्र.प्रशा/२/कावि/३४४/ २०१६ दि.०१/०७/२०१६ अन्वये मुख्य लेखापाल या पदावर रूजू करुन घेण्यात आले आहे. श्री.राजेश गोपाळराव लांडे, उपसंचालक, वित्त व लेखा सेवा(वरिष्ठ) गट-अ यांची मुख्य लेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने करण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये “ मुख्यलेखापाल ” अभिनामाचे १ पद पे बॅन्ड र.रु.१५६०० – ३९१०० ग्रेड पे र.रु.६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहे. सदरचे पद हे असंविधीक असून महानगरपालिकेच्या लेखा संवर्गामधून सेवाजेष्ठ व मुख्यलेखापाल पदाची

अर्हता प्राप्त लेखाधिकारी यांचे मधून पदोन्नतीने भरावयाचे पद आहे. या पदावर महापालिकेतील श्री.एन.एन.लोंढे यांनी सन १९९१ ते २०११ व श्री.व्ही.टी.भोसले सन २०११ ते ३१/०५/२०१२ पर्यंत पदोन्नतीने कामकाज करीत होते. या पदावर श्री.सुरेश तुकाराम आव्हाळे सेवाजेष्ठतेनुसार पात्र आहेत. प्रशासन विभागाकडील आदेश क्र.प्रशा/२/कावि/३११/२०१६, दि.२३/०६/२०१६ अन्वये यापूर्वी काम करीत असलेले श्री.प्रमोद भिमराव भोसले यांची बदली सोलापूर महानगरपालिका येथे झाल्याने त्यांना कार्यमुक्त करुन मुख्यलेखापाल पदाचा पदभार सेवाजेष्ठ व मुख्यलेखापाल पदाची अर्हता प्राप्त लेखाधिकारी श्री.सुरेश तुकाराम आव्हाळे यांना देणेत आला होता. तदनंतर " मुख्यलेखापाल " पदाचे पदोन्नतीसाठी निवड समिती गठीत करणेत आली होती. परंतु शासनाकडून दि.१५/०६/२०१६ च्या आदेशान्वये श्री.राजेश गोपाळराव लांडे यांची प्रतिनियुक्ती नेमणूक केली. तथापि सदरची बाब योग्य नसून महापालिका कर्मचा-यांवर अन्याय करणारी आहे. तसेच कर्मचा-यांना घटनेने दिलेल्या पदोन्नतीच्या मुलभूत हक्कास बाधा निर्माण करणारी आहे. म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत श्री.राजेश गोपाळराव लांडे यांची प्रतिनियुक्तीने केलेली बदली रद्द करुन त्यांना शासन सेवेत परत पाठविणेत येऊन मा.आयुक्त यांनी महापालिकेतील लेखा संवर्गातील सेवाजेष्ठ मुख्यलेखापाल पदाची अर्हता प्राप्त श्री.सुरेश तुकाराम आव्हाळे यांना मुख्यलेखापाल पदावर नियमानुसार पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

(मा.राहूल जाधव, मा.दत्तात्रय साने, मा.सुरेश म्हेत्रे यांनी या विषयावर चर्चा करु द्यावी अशी मागणी केली.)

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, विषय क्रमांक २चे डॉकेट आयुक्त साहेबांनी ठेवलेले आहे. आणि उगाचच यात गैरसमज निर्माण होईल. काय माहिती पाहिजे असेलतर ती माहिती होऊ द्यात. नंतर विषय तहकूब करा. इतका आरडाओरडा कशाला करुन घ्यायचा. एखाद्या विषयावर चर्चा केली नाहीतर वेगळेच चित्र निर्माण होते.

**मा.महापौर-** विषय क्रमांक ३ वाचलेला आहे. तो मंजूर करण्यात येत आहे. मी माहिती द्यायला सांगते.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मला विषय क्रमांक ३ वर बोलायचे आहे.

**मा.महापौर** – सर्वांनी खाली बसावे. विषय क्रमांक २ची माहिती देत आहेत.

**मा.सुलभाताई ऊबाळे** – मा.महापौर साहेब, नुसती माहिती नाही बोलायला पण द्या. विषय क्रमांक ३साठी मी हात वर केला आहे.

**मा.अष्टिकर (सहा.आयुक्त,भूमि आणि जिंदगी विभाग)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सभागृह, विषय क्रमांक २ जो आहे, तो पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास योजनेतील आरक्षण क्र.१/१३३ यामध्ये विकास आरखड्यात माध्यमिक शाळेसाठी आरक्षण आहे. हे आरक्षण आरक्षणाच्या तरतुदीने विकसित करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे ४७५४ चौ.मी. जागा टीडीआरच्या बदल्यात महानगरपालिकेच्या ताब्यात आली आहे. ही जागा नगररचना विभागाकडून जे काही भाड्याचे दर ठरविण्यात आले आहेत, त्या दरावर ३० वर्षांकरीता भाड्याने देण्याकरिता जी निविदा काढण्यात आली होती. त्या निविदेची रक्कम रु.२,५१,४८,६६०/- होती. कालावधी ३० वर्षे असा होता. ही निविदा मुदतवाढ देऊन उघडल्यानंतर ३ निविदा प्राप्त झाल्या. सुभद्रा एज्युकेशनल सोसायची या निविदाकाराने ५० टक्के जास्त म्हणजे र.रु.२,५२,७४,४०३/- ही रक्कम कोट केली असल्यामुळे सदरची निविदा मान्य करण्यासाठी सभागृहापुढे सादर करण्यात आली आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – विषय क्रमांक ३ मंजूर करण्यात येत आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्यलेखापाल या पदासाठी विषय क्रमांक ३ चा विषय आहे. या विषयावर महानगरपालिकेत ब-याच समित्यांवर चर्चा झालेली आहे. ब-याच जनरल बॉडीत ठराव झाले आहेत. ब-याच समित्यांमध्ये ठराव झाले आहेत. आणि आज काहीच चर्चा न करता आपण हा विषय मंजूर करताय. महापालिकेच्या आस्थापनेतील हे पद महापालिकेच्याच अधिका-यांना मिळावे म्हणून चर्चा केली होती. १९९६ पासून २०१२ या कार्यकाळात आपल्या लोकांनी महापालिकेच्या अधिका-यांनी मुख्यलेखापाल म्हणून काम केले आहे. आकृतीबंधामध्ये सध्या तशा प्रकारची प्रस्तावना तयार केली आहे. एवढे करुन सुद्धा आपल्या अधिका-यांना त्याठिकाणी प्रमोशन देऊ शकतो. आपल्याला त्यांना देता आले नाही. शासनाचे अधिका-यांना रुजू करुन घेतले. पीएमसीमध्ये वर्ग २ चे लेखाधिकारी म्हणून पद होते. श्री.पाटील आणि श्री.काटे नावाचे जे लेखाधिकारी म्हणून आले होते, त्यावेळी सभागृहाने त्यांचा विषय फेटाळला. त्यांना रुजू करुन घेतले नाही. त्यांना परत शासनाकडे पाठवले. जर आपल्याकडे अशी व्यवस्था आहे तर आपण त्यांना रुजू करुन घेऊ नये. आपल्या अधिका-यावर अन्याय होतो आहे, हे वारंवार बोलण्यापेक्षा आपल्याकडे आलेले अधिकारी बी.ई.मेकॅनिकल, एमपीएससी असे शिक्षण घेतलेले आहेत. अकाऊंटच्या क्षेत्रात जास्तीत जास्त अकाऊंट विभागात काम केल्याचा अनुभव व त्यातही महानगरपालिकेत काम केलेले अधिकारी यांचा अनुभव फार महत्वाचा आहे. त्यामुळे आमची अशी विनंती आहे की, महापालिकेच्या आस्थापनेवरील आपल्या अधिका-यांना प्रमोशन देऊन त्यांना हे पद मिळावे व शासनाकडून आलेल्या अधिका-यांना शासनाकडे परत पाठवावे.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, आपल्या अधिका-यांना मुख्यलेखापाल पद मिळालेतर मला आनंदच आहे. श्री.लांडे यांना रुजू करुन घेतले. ते आता परत जाणार आहेत का याचा पण विचार करायला पाहिजे. प्रमोशन तुम्ही द्या. मी नाही म्हणत नाही. पण प्रमोशन कुणाला देणार. म्हणजे गेल्या महापालिका सभेत प्रमोशनचा तक्ता, कंडीशन वाचून दाखवला की, उपलेखापालपासून मुख्यलेखापालपर्यंत प्रमोशन मिळाले पाहिजे. आणि याचे कारण पण वाचून दाखवले. पण सन्मा.सहा.आयुक्त डोईफोड साहेब यांनी सांगितले की, तुम्ही खालचे वाचले नाही. तिथे किंवा म्हणून शब्द लिहीलेला आहे. मी सन्मा.अधिका-यांना सांगू इच्छितो की, नगरसेवक म्हणून हे माझे ३५वे वर्ष आहे. मला जेवढा कायदा माहित आहे त्याप्रमाणे प्रमोशनसाठी ज्याअर्थी उपलेखापाल उपलब्ध आहेत, मग त्याच्या खालच्या अकाऊंटंटला प्रमोशन द्यायचा प्रश्नच येत नाही. पहीला उपमुख्यलेखापाल, त्यानंतर लेखापाल. लेखापालाला मुख्यलेखापाल करा हे म्हणणे चुकीचे आहे. लेखापालचा ग्रेड पे आहे ५४००, उपमुख्यलेखापालचा ग्रेड पे आहे ६६००. तुम्ही प्रमोशन देताना ६६०० वाल्याला देणार का, ५४०० वाल्याला देणार. हे चुकीचे आहे. तुम्ही कोणाला जम्पिंग प्रमोशन देऊ शकत नाही. आख्या महाराष्ट्राच्या केडरमध्ये तुम्ही कुठेही बघा, तिथे जंम्पिंग प्रमोशन नाही. म्हणून माझी विनंती आहे की, मला याचे उत्तर पाहिजे आहे. मी परत सांगतो की, लेखापाल ज्याचा ग्रेड पे ५४०० आहे, त्याला मुख्यलेखापाल केलेतर उपमुख्यलेखापालावर अन्याय होणार. एक ज्युनिअर माणूस उपमुख्यलेखापाल म्हणून बसणार आहे. म्हणून मला या मुद्यावर खुलासा पाहिजे आहे. दुसरे म्हणजे उपमुख्यलेखापालांच्या ड्युटीज् बद्दल मी गेले अनेक मिटींगमध्ये बोललो आहे सगळी बीले उपमुख्यलेखापालाकडून मुख्यलेखापालाकडे जातात. तुम्ही लांडे साहेबांना विचारा. नाशिकमध्ये काय प्रोसिजर आहे, याचा खुलासा करायला सांगा. तिथे सुद्धा अशीच प्रोसिजर आहे असे मला कळाले. त्यामुळे दोन्ही गोष्टींत तुम्ही मला क्लॅरीफीकेशन द्या. पहिले म्हणजे प्रमोशन कोणाला द्यायचे. प्रमोशन द्या. आपल्या अधिका-याला प्रमोशन द्या. हे आपण आपल्या अधिका-याला खुष करण्यासाठी करतो. पण प्रमोशन देता उपमुख्यलेखापालाला सोडून लेखापालाला देऊ शकत नाही. कारण त्याचा ग्रेड पे कमी आहे. या दोन्हीचे क्लॅरीफीकेशन द्या.

**मा.सुलभाताई ऊबाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, ठराव केल्यानंतर लांडे साहेबांना ताबडतोब परत पाठवणार आहात का याचा खुलासा करावा.

**मा.निता पाडाळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,इथे मला एवढेच विचारायचे आहे की, प्रशासनाने सांगावे. आम्ही मा.विधी समितीत कोणत्या महिन्यात मुख्य लेखापालाचा ठराव केला होता. त्या ठरावाची प्रशासनाने आयुक्तांसमोर डिपीसी लावलीत का, लावली नसेलतर का लावली नाही. आम्ही प्रशासनाला विचारले होते, तर ते म्हणाले, आयुक्तांसमोर ठेवले होते, डिपीसी लावली होती. त्यांचे काहीच उत्तर मिळाले नाही म्हणून

शासनाचा माणूस आला. आमच्या कमिटीचे काही होतच नसेलतर आमची कमिटी कशाला ठेवायची. आमच्या नऊ सदस्यांना कमिटीत काही मान आहे का नाही. आम्ही मुख्यलेखापाल पदासाठी ठराव केला होता मग आयुक्त साहेबांनी, प्रशासनाने त्याप्रमाणे का केले नाही. क्लास वन अधिका-याला क्लास वन पद देता येते का याचा पण खुलासा करावा. कारण गवळी साहेबांना क्लास वन पद आहे. त्यांना परत पद देता येते का याचा खुलासा करा. आत्ता मा.सुलभाताई ऊबाळे यांनी सांगितल्याप्रमाणे पीएमसी मध्ये केले त्यापद्धतीने पालिकेचा माणूस रुजू करुन घेऊन हा विषय मंजूर करावा.

**मा.नंदा ताकवणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, भोसले यांची बदली होण्याआधी त्यांना तीन वर्षे पूर्ण होणार होती, जानेवारी महिन्यामध्ये मा.विधी समितीने पदोन्नतीनुसार आपल्याकडे मा.मुख्यलेखापाल असावा असा विषय केला होता. डॉ.डोईफोडे साहेबांनी तिथे काय केले. त्यांनी तिथे काहीच केले नाही. तेव्हाच काय ते झाले असते तर आत्ता ही वेळ आली नसती. कोणताही अधिकारी प्रतिनियुक्तीवर आला नसता. कमिटीने हा विषय घेतला होता. डीपीसी लावा म्हणून सांगितले होते. तिथेसुद्धा काही झाले नाही. या विषयासंदर्भात प्रशासनाने आम्हाला खुलासा करावा.

**मा.योगेश बहल-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मागील दोन मा.महापालिका सभांमध्ये या पदावरुन भरपूर गदारोळ झाला होता. आपल्या सर्वांचचं पहिल्यापासून हे मत आहे की, आपल्या अधिकारी, कर्मचा-यांना वेळोवेळी न्याय मिळावा अशी भूमिका मा.महापालिका सभेची नेहमीच राहीलेली आहे. मा.विधी समितीच्या सभेत सुद्धा सांगितले होते. मागील वर्षी सुद्धा या संदर्भात मा.विधी समितीने ठराव केला होता. परंतू प्रशासनाने त्यांच्याकडे कानाडोळा केला असे म्हटले तरी ते चुकीचे होणार नाही. कारण मा.विधी समिती ही कायद्याने गठीत समिती आहे. या समितीला कायद्याने दिलेले अधिकार आहेत. त्यांनी एखादा ठराव पारित केला असेलतर प्रशासनाने त्यांचे मत ताबडतोब प्रकट केले पाहिजे. हो किंवा नाही हे व्हायला पाहिजे. परंतू असे न करता ते घोंगडे तसेच भिजत ठेवले. त्यावेळचे मागचे आयुक्त जाधव साहेबांनी यावर निर्णय घेतला नाही म्हणून शासनाचा माणूस आला. इंजिनिअरिंग विभागात हिच परिस्थिती झाली. त्यावेळी एका अधिका-याचे नाव घेतले जाते, तर दुस-या अधिका-याचे नाव ठेवले जात नाही. ही जी दुफळी निर्माण केली जाते. त्यामुळे समज गैरसमज निर्माण होतात. अशावेळी मग आम्ही ठराव मांडलातर मात्र वकीली होते. मात्र इतर सदस्यांनी मांडलातर विषय बरोबर होतो. अशाप्रकारच्या गोष्टींना वाव मिळणे, याला कारणीभूत प्रशासन आहे. आम्ही वेळोवेळी सांगतो, की तुम्ही सिनिऍरीटी लिस्ट लावा. वेळेवर प्रमोशन द्या. महापालिकेच्या पदांवर शासनाचा माणूस आणून तुम्ही गदा आणू नका. पण मागे सुद्धा असेच झालेले आहे. सहाय्यक आयुक्तची जी पदे आहेत, ती आत्ताच्या नियमाप्रमाणे निम्मी-निम्मी आहेत. पण आपल्याकडे निम्यापेक्षा जास्त प्रशासनाची/रेव्हेन्यू डिपार्टमेंटची माणसे आली आहेत. त्यामुळे आम्हाला नाईलाजास्तव शिंदे साहेब असतील किंवा

जाधव साहेब असतील त्यांना सांगावे लागले. आपण एकाला परत पाठवले. मा.महापौर साहेब, आत्ता अशीच परिस्थिती या पदाबाबत सुद्धा झाली आहे. वास्तविक पाहता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका मुंबई प्रांतिक अधिनियम १९५३चे एक पद आहे. हे पद नेमण्याचा सर्वस्वी अधिकार हा महापालिकेच्या मा.महासभेचा आहे. मग आमच्या स्वायत्ततेवर का गदा आणताय हे कळत नाहीए. मा.महापौर साहेब, आपण रिक्रुटमेंट रुल्स्  ला मान्यता दिली त्यावेळी सर्वांनी मिळून विधी समितीने सुद्धा चांगल्या पद्धतीने अभ्यास करुन ते तयार केले. मा.महापौर तुम्ही सुद्धा त्याला भरपूर वेळ दिलात. विधी समितीने, महासभेने त्याला मान्यता दिली. हा आर.आर. मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला. त्या आर.आर. प्रमाणे महापालिकेतील हे पद शंभर टक्के पदोन्नतीने भरले जावे. आपल्या अधिका-यांना देणेत यावे अशा पद्धतीचा सुद्धा आर.आर. आपण मंजूर केलेला आहे. असे असताना, १९५३चे हे पद असताना आमच्यावर माणूस का लादताय. मघाशी मा.सुलभाताऊ ऊबाळे यांनी जे उदाहरण दिले. त्याचे दोन्ही ठराव माझ्याकडे आहेत. मी हे दोन्ही ठराव आयुक्त साहेबांना देऊ इच्छितो. पुणे महानगरपालिकेत अशा पद्धतीने वित्त विभागाने पाठविलेले, ही ऑर्डर रेव्हेन्यू विभागाकडून निघालेली नाही. मी श्री.लांडे यांची ऑर्डर पाहिली आहे. ही ऑर्डर सुद्धा वित्त विभागाकडून आलेली ऑर्डर आहे. तिथल्या सचिवांनी लिहिलेले पत्र आहे. अशा पद्धतीने एक ऑगस्ट महिन्यात आलेले व एक जुलै महिन्यात आलेले पत्र आहे. अशा प्रकारे आलेली दोन्ही पत्रे मी आयुक्त साहेबांना देऊ इच्छितो. असे असताना सुद्धा पुणे महानगरपालिकेच्या महासभेने ठराव केला, त्यांनी नकार दिला व त्यांना परत त्यांच्या विभागात बसवले गेले. मग पुणे महापालिका जर अशा प्रकारे त्यांचा अधिकार वापरू शकते तर मग आपले अधिकारी तो अधिकार का वापरु शकत नाहीत. मी तुम्हाला त्याच्या दोन्ही प्रती देऊ इच्छितो. पुणे महापालिका असे करु शकते मग आपण का करु शकत नाही. वास्तविक पाहता, लांडे साहेबांचे क्वॉलिफिकेशन काय आहे, ते आपले मित्र आहेत का शत्रु आहेत अशातला काही भाग नाही. आम्हाला त्याच्याशी काही देणे घेणे नाही. श्री.लांडे यांना शासनाच्या सेवेत त्वरित पाठवावे हे आजच्या अजेंडाच्या अनुषंगाने सांगतो. मा.विधी समितीने तसा ठराव केलेला आहे. मा.स्थायी समितीने तसाच ठराव केला आहे. आणि या मा.महासभेचे सुद्धा म्हणणे तसेच आहे. आणि जो कोणी आमचा अधिकारी असेल, त्या आमच्या अधिका-याला, जो कोणी सिनिअर मोस्ट असेल, जो कोणी क्वॉलीफाईड असेल त्या माणसाला त्या पदावर पदोन्नती देण्यात यावी. मा.महासभेची हिच विनंती सुद्धा आहे. मा.महापौर तुम्ही आदेश करा की, आज ही जी.बी. संपल्यानंतर येत्या तीन दिवसांत डिपीसी घेतली पाहिजे. आणि डिपीसी घेतल्यानंतर आमच्या अधिका-यांतील जो कोणी सिनिअर मोस्ट आहे, जो कोणी क्वॉलीफाईड आहे, त्याची तिथे नेमणूक करा आणि लांडे साहेबांना शासनाच्या दरबारी पाठवून द्या. आम्हाला आमच्यावर लादलेला माणूस नको आहे. आणि मी सांगितल्याप्रमाणे ५३च्या अनुषंगाने हे पद भरायचा अधिकार या महासभेला आहे. आमच्या स्वायत्ततेवर गदा आणू नका आणि आम्ही तो घाला सहन करणार नाही. त्याठिकाणी जो कोणी सिनिअर मोस्ट ऑफिसर असेल, त्याला तुम्ही ताबडतोब नेमणूक द्या. अशी याठिकाणी उपसूचना देऊ इच्छितो की, - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये १ मुख्यलेखापाल पद मंजुर आहे. सदरचे पद असांविधीक असून, महापालिकेतील लेखा संवर्ग पदोन्नती साखळी मधील

आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ खालील महापालिका सभेस सदरचे पद भरावयाचे संपूर्ण अधिकार आहेत.

पिंपरी चिंचवड नगरपालिकेची स्थापना १९७१ साली झाली, सन २३/०२/१९७९ मध्ये नगरपालिकेसाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पदास मंजूरी दिली आहे. तदनंतर दि.११/१०/१९८२ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थापना झाली. महानगरपालिका सभा क्र.४७ दि.०६/१२/१९८३ मध्ये महापालिकेसाठी लेखा संवर्गासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग व शैक्षणिक पात्रता निश्चित केली आहे. त्यानुसार मुख्य लेखापाल पदाची अर्हता सी.ए. किंवा बी.कॉम व १० वर्षाचा लेखाधिकारी पदाचा अनुभव अशी निश्चित केली होती. त्यानुसार महापालिका सभा क्र. ३ विषय क्र. ५८ ठराव क्र. ३२७६ अन्वये महानगरपालिकेतील श्री.एन.एन.लोंढे यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर दि.१६/८/१९९६ रोजी पदोन्नती देण्यात आली होती. मा.महापालिका सभा क्र. ९ विषय क्र.१७ ठराव क्र. ३३७६ दि.१९/१२/१९९६ अन्वये मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाचे पदनाम मुख्य लेखापाल असे करणेस मान्यता देणेत आली आहे. मा.आयुक्त यांनी दि २७/१२/२००४ च्या पत्रान्वये मा.अवर सचिव नगरविकास मंत्रालय, मुंबई यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मुख्य लेखापाल) हे पद संचालक लेखा कोषागारे यांचे नियंत्रणाखाली आणण्याची आवश्यकता वाटत नाही असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे.

श्री.लोंढे हे दि ३१/०५/२०१० रोजी सेवानिवृत्त झालेनंतर महापालिका सभा ठराव क्र. ८७४ दि.२०/०५/१० अन्वये दि.०६/१२/१० रोजी श्री.विलास तुकाराम भोसले या महापालिकेतील अधिकारी यांस मुख्य लेखापाल पदावर पदोन्नती देणेत आली.

मा.विधी समिती कडील ठराव क्र.३२ दि.१५/०१/२०१६ अन्वये महापालिकेतील मुख्य लेखापाल हे पद असंविधीक असल्याने लेखाधिकारी पदावर काम करणा-या कर्मचा-यांमधुन सेवाजेष्ठतेनुसार व पात्रतेनुसार नियमानुसार मुख्यलेखापाल या पदावर पदोन्नती देणेत यावी व शासनाकडून प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांची नेमणूक करण्यात येऊ नये व प्रशासन विभागाने या संदर्भात तपासणी करुन प्रस्ताव फेरसादर करावा व या पदावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठवू नये असे शासनास कळविणेस मान्यता दिली होती.

वित्त विभाग मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.३१ मे २०१६ चे आदेशान्वये श्री.प्रमोद भोसले, यांची सोलापूर महानगरपालिका येथे मुख्य लेखा परिक्षक या पदावर बदली व नेमणूक झाली असल्याने प्रशासन कडील दि.२३/०६/२०१६ च्या आदेशान्वये श्री.प्रमोद भोसले यांना कार्यमुक्त करुन त्यांचा मुख्य लेखापाल पदाचा पदभार श्री.सुरेश तुकाराम आव्हाळे या सेवाजेष्ठ व मुख्य लेखापाल पदाची अर्हता प्राप्त अधिका-याकडे देणेत आला. याबाबत प्रशासन विभागाने वेळेत निवड समिती घेऊन मुख्य लेखापाल पदावर पदोन्नती देणे आवश्यक होते.

परंतु वित्त विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.१५ जुन २०१६ च्या आदेशान्वये श्री.राजेश गो. लांडे यांची मुख्य लेखापाल या पदावर प्रतिनियुक्तीव्दारे नेमणूक केली त्यामुळे दि.०१/०७/२०१६ रोजी श्री.आव्हाळे यांचेकडील मुख्य लेखापाल पदाचा पदभार काढून श्री.लांडे यांचेकडे सोपविणेत आला.

मा.विधी समिती कडील ठराव क्र. ८९ दि१५/०७/२०१६ मा.आयुक्त यांचेकडील विषयपत्रानुसार त्यांची नियुक्ती महापालिकेत ठेवणेसाठी मान्यता घेणेचा विषय सभेपुढे ठेवला

असता सदर सभेमध्ये सदरचा विषय फेटाळणेत येऊन श्री.लांडे यांची महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने केलेली बदली रद्द करुन त्यांना शासन सेवेत परत पाठविणेत येऊन मा.आयुक्त यांनी महापालिकेतील लेखा संवर्गातील सेवाजेष्ठ व मुख्य लेखापाल पदाची अर्हता प्राप्त श्री.सुरेश तु.आव्हाळे यांना मुख्य लेखापाल पदावर नियमानुसार पदोन्नती देणेबाबत शिफारस करणेत येऊन सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव महापालिका सभेकडे पाठविणेबाबत मान्यता दिली आहे.

श्री.राजेश गो. लांडे यांची शैक्षणिक पात्रता ही इंजिनिअरींग क्षेत्रातील असल्याने सदरची पात्रता मनपाने ठरवलेल्या शैक्षणीक अर्हतेनुसार नाही. यातही तफावत आहे. मग असे असताना आपण जे रुल केले आहेत, त्याला मा.महासभेने मंजूरी दिलेली आहे. असे असताना सुद्धा आपण मनमानी कारभार करताय असा माझा प्रशासनावर आरोप आहे. त्यामुळे या उपसूचनेच्या अनुषंगाने व विषयाच्या अनुषंगाने आपल्या महापालिकेतील महापालिकेत असणारे जे कोणी ज्येष्ठ अधिकारी असतील, ज्यांची शैक्षणिक पात्रता आहे, या सगळ्या गोष्टी तपासून पाहून ताबडतोब डीपीसी लावून तुम्ही आमच्या अधिका-यांना पदोन्नती देण्यात यावी. श्री.राजेश लांडे यांना शासन सेवेत त्वरित पाठवावे असे महासभेचे म्हणणे आहे.

**मा.आर.एस.कुमार**-मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** – विषय क्रमांक ३ मंजूर केला आहे. ही उपसूचना विषय क्रमांक ४ ला द्यावी. मी त्यांना विषय क्रमांक ३वर बोलायला दिले होते.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, ही उपसूचना विषय क्रमांक ४साठी देण्यात यावी.

**मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे (सहा.आयुक्त, प्रशासन)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आजचा विषय होता तो महापालिकेत मुख्यलेखापाल म्हणून श्री.राजेश लांडे रुजू झाले आहेत, त्यांच्या मान्यतेचा हा विषय आहे. मा.विधी समितीने त्यांना रुजू न करुन घेता पुढील ठराव केला आहे. श्री.आव्हाळे यांना मुख्यलेखापाल म्हणून पदोन्नती देणे हा ठराव मा.विधी समितीने केला आहे. आमच्यामार्फत निवड समितीने या प्रस्तावाची छाननी केलेली नाही. मुख्यलेखापाल पदावर पदोन्नती देताना उपमुख्यलेखापाल, लेखाधिकारी यांची सेवाज्येष्ठता व अर्हता पाहूनच त्यांच्या पदोन्नतीचा निर्णय घेतला जाईल. आमच्याकडून असा प्रस्ताव तयार केलेला नाही. मा.विधी समितीने ठराव केला होता. शासनाकडून एक/दोन वेळा त्याचा अहवाल सुद्धा मागविला होता. त्याअनुषंगाने एप्रिल २०१६ व मे २०१६ असा दोन वेळा मा.आयुक्तांकडे हा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. परंतू त्याच्यावर निर्णय होण्यापूर्वीच श्री.लांडे यांची ऑर्डर झाल्यामुळे पदोन्नती समितीची स्थापना न करता हा विषय मा.महापालिका सभेपुढे आला होता. त्याप्रमाणे आयुक्त साहेबांची वेळ घेऊन त्याप्रमाणे फाईल पुटअप करण्यात आली आहे. त्यानुसार डिपीसी लावण्यात येत आहे.

**मा.महापौर-**जर महापौरांनी आदेश दिला होता. सभागृहाने मंजूरी दिली होती, त्याचे पुढे काय झाले. मग डोईफोडे साहेब, त्यांना रुजू करुन का घेतले. आम्हालाही कळू द्यात.

**मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे (सहा.आयुक्त, प्रशासन) -** मा.महापौर साहेब, श्री.राजेश लांडे यांची जेव्हा ऑर्डर झाली त्यानंतर मा.महासभेत चर्चा झाली होती.

**मा.महापौर** - एकदा मिटींग झाली. मान्यता दिली गेली नाही. त्यानंतर त्यांना ऑर्डर मिळाली होती. त्यानंतर त्यांना रुजू करुन घेतले होते.

**मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे (सहा.आयुक्त,प्रशासन)-**मा.महापौर साहेब,सभागृहात चर्चा झाल्यानंतर शासनाला कळवले की, महासभेचा विरोध आहे. तरी त्यांना रुजू करुन घेता येणार नाही. परंतू शासनाने पण, वित्त विभाग व नगरविकास विभागाने पण कळवले होते की, यांना रुजू करुन घ्यावे लागेल. म्हणून रुजू करुन घेतले आहे. परंतू महासभेच्या मान्यतेच्या अधीन रुजू करुन घेतले आहे. आज रोजी जो ठराव झाला आहे. आपला ठराव प्राप्त झाल्यानंतर लगेच त्यावर विचार करण्यात येईल.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

विषय क्रमांक-४

दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.भारती फरांदे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव **–**
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.९२ दि.८.८.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ११ सहाय्यक आयुक्त पदे शासन मंजूर आहेत. त्यापैकी ६ पदे शासनाच्या प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांमधून तर उर्वरित ५ पदे ही महापालिका सेवेतील प्रशासन अधिकारी संवर्गामधून भरण्यात येतात. महापालिका सेवेतील अधिका-यांमधून भरावयाच्या पदांपैकी एक पद अनुसूचित जाती (प्रवर्ग) साठी राखीव असून ते अनेक वर्षापासून रिक्त आहे. सदर रिक्त पदावर अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रशासन अधिकारी श्री.अण्णा यशवंतराव बोदडे यांना अनुभवाची अट शिथील करुन त्यांचा महापालिका सेवेतील

१८ वर्षाचा अनुभव लक्षात घेवून त्यांना सहाय्यक आयुक्त म्हणून पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्वाती साने –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नव्याने सेवा प्रवेश नियम तयार करणेत आले असून त्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेवून शासन मान्यतेकामी पाठविण्यात आलेले आहेत. सदर सेवा प्रवेश नियमामध्ये सहाय्यक आयुक्त पदावर पदोन्नतीकरीता प्रशासन अधिकारी पदावरील ३ वर्ष अनुभवाची अट विहीत करण्यात आलेली आहे.

सहाय्यक आयुक्त संवर्गातील मंजूर ११ पदापैकी ६ पदे शासन सेवेतील तर ५ पदे मनपा अधिका-यामधून पदोन्नतीने भरण्याची तरतूद आहे. मनपामार्फत भरावयाच्या पदापैकी २ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदावर प्रशासन अधिकारी पदाच्या सेवाजेष्ठता यादीतील प्रथम क्रमांकावरील श्री.मनोज नंदकुमार लोणकर यांना खुल्या प्रवर्गांतून शासन मान्यतेच्या अधिन व आवश्यकता भासल्यास अनुभवाची अट शिथील करुन सहाय्यक आयुक्त पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच स्थापत्य विभागातील सह शहर अभियंता पदावर बढती होवून रिक्त होणा-या व नव्याने निर्माण होणा-या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदासाठी अर्हतेनुसार व अनुभवानुसार पात्र असलेले १) श्री.मनोज सेठिया २) श्री.राजेंद्र राणे ३) श्री.विजयकुमार काळे ४) श्री. शिरीष पोरेडी ५) श्री.अजय सुर्यवंशी ६) श्री.सुनिल भागवानी या सर्व उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासन निर्णय क्र.पी.सी.सी.३०८९/६४४/सी.आर.-९७/नवि २२ दि.१ डिसेंबर १९८९ अन्वये सहाय्यक आयुक्त (सामुहीक विकास) अशा अभिनामाचे १ पद मंजूर आहे. सदरचे पद महापालिका स्थरावर विवीध सामाजिक विकासाच्या योजना राबविण्याकरिता निर्माण करणेत आलेले आहे. त्यामुळे सहाय्यक आयुक्त (सामुहीक विकास) या पदावर पदोन्नतीने नेमणुक करणेकरिता आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता मा.महापालिका सभा ठराव क्र. ७२१ दि.२१.०८.२००९ अन्वये निश्चित करणेत आलेली आहे. तसेच याच ठरावान्वये या पदाचा पदोन्नती सोपान निश्चित करणेत आलेला असून तो समाज विकास अधिकारी वर्ग २ असा आहे. या पदावरील अधिका-याची सेवाजेष्ठता विचारात घेवून तसेच शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणा-या उमेदवारास सहाय्यक आयुक्त (सामुहीक विकास) या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यास मा.महापालिका सभा ठराव क्र. ७२१ दि. २१.०८.२००९ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. नागरवस्ती विकास योजना विभागात समाज विकास अधिकारी वर्ग-२ या पदावर कार्यरत असणारे श्री. संभाजी भगवान ऐवले हे सहाय्यक आयुक्त (सामुहीक विकास) या पदाची सर्व अर्हता पुर्ण करीत असल्याने त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाजेष्ठता, गोपनिय अहवाल व आरक्षण इत्यादी सेवा विषयक तपशील विचारात घेवुन शासन निर्णय दि.५.१०.२०१५ मधील तरतूदी नुसार अनुभव कालावधी शिथील करुन पदोन्नतीपुर्व पदावरील ९० % नियमित सेवा ग्राहय धरुन वेतनश्रेणी रक्कम रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० सहाय्यक आयुक्त या पदावर श्री.संभाजी

भगवान ऐवले समाज विकास अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ (४) मधील तरतूदी नुसार शासन मान्यतेच्या अधीन राहुन पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये १ मुख्यलेखापाल पद मंजुर आहे. सदरचे पद असांविधीक असून, महापालिकेतील लेखा संवर्ग पदोन्नती साखळी मधील आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ खालील महापालिका सभेस सदरचे पद भरावयाचे अधिकार आहेत.

पिंपरी चिंचवड नगरपालिकेची स्थापना १९७१ साली झाली, सन २३/०२/१९७९ मध्ये नगरपालिकेसाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पदास मंजूरी दिली आहे. तदनंतर दि.११/१०/१९८२ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थापना झाली. महानगरपालिका सभा क्र.४७ दि.०६/१२/१९८३ मध्ये महापालिकेसाठी लेखा संवर्गासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग व शैक्षणिक पात्रता निश्चित केली आहे. त्यानुसार मुख्य लेखापाल पदाची अर्हता सी.ए. किंवा बी.कॉम व १० वर्षाचा लेखाधिकारी पदाचा अनुभव अशी निश्चित केली होती. त्यानुसार महापालिका सभा क्र.३ विषय क्र. ५८ ठराव क्र. ३२७६ अन्वये महानगरपालिकेतील श्री.एन.एन.लोंढे यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर दि.१६/८/१९९६ रोजी पदोन्नती देण्यात आली होती. मा.महापालिका सभा क्र.९ विषय क्र.१७ ठराव क्र. ३३७६ दि.१९/१२/१९९६ अन्वये मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाचे पदनाम मुख्य लेखापाल असे करणेस मान्यता देणेत आली आहे. मा.आयुक्त यांनी दि २७/१२/२००४ च्या पत्रान्वये मा.अवर सचिव नगरविकास मंत्रालय, मुंबई यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मुख्य लेखापाल) हे पद संचालक लेखा कोषागारे यांचे नियंत्रणाखाली आणण्याची आवश्यकता वाटत नाही असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे.

श्री.लोंढे हे दि ३१/०५/२०१० रोजी सेवानिवृत्त झालेनंतर महापालिका सभा ठराव क्र. ८७४ दि.२०/०५/१० अन्वये दि.०६/१२/१० रोजी श्री.विलास तुकाराम भोसले या महापालिकेतील अधिकारी यांस मुख्य लेखापाल पदावर पदोन्नती देणेत आली.

मा.विधी समिती कडील ठराव क्र.३२ दि.१५/०१/२०१६ अन्वये महापालिकेतील मुख्य लेखापाल हे पद असंविधीक असल्याने लेखाधिकारी पदावर काम करणा-या कर्मचा-यांमधुन सेवाजेष्ठतेनुसार व पात्रतेनुसार नियमानुसार मुख्यलेखापाल या पदावर पदोन्नती देणेत यावी व शासनाकडून प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांची नेमणूक करण्यात येऊ नये व प्रशासन विभागाने या संदर्भात तपासणी करुन प्रस्ताव फेरसादर करावा व या पदावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठवू नये असे शासनास कळविणेस मान्यता दिली होती.

वित्त विभाग मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.३१ मे २०१६ चे आदेशान्वये श्री.प्रमोद भोसले, यांची सोलापूर महानगरपालिका येथे मुख्य लेखा परिक्षक या पदावर बदली व नेमणूक झाली असल्याने प्रशासन कडील दि.२३/०६/२०१६ च्या आदेशान्वये श्री.प्रमोद भोसले यांना कार्यमुक्त करुन त्यांचा मुख्य लेखापाल पदाचा पदभार श्री.सुरेश तुकाराम आव्हाळे या सेवाजेष्ठ व मुख्य लेखापाल पदाची अर्हता प्राप्त अधिका-याकडे देणेत आला. याबाबत प्रशासन विभागाने वेळेत निवड समिती घेऊन मुख्य लेखापाल पदावर पदोन्नती देणे आवश्यक होते.

परंतु वित्त विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.१५ जुन २०१६ च्या आदेशान्वये श्री.राजेश गो. लांडे यांची मुख्य लेखापाल या पदावर प्रतिनियुक्तीव्दारे नेमणूक केली त्यामुळे

दि.०१/०७/२०१६ रोजी श्री.आव्हाळे यांचेकडील मुख्य लेखापाल पदाचा पदभार काढून श्री.लांडे यांचेकडे सोपविणेत आला.

मा.विधी समिती कडील ठराव क्र. ८९ दि१५/०७/२०१६ मा.आयुक्त यांचेकडील विषयपत्रानुसार त्यांची नियुक्ती महापालिकेत ठेवणेसाठी मान्यता घेणेचा विषय सभेपुढे ठेवला असता सदर सभेमध्ये सदरचा विषय फेटाळणेत येऊन श्री.लांडे यांची महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने केलेली बदली रद्द करुन त्यांना शासन सेवेत परत पाठविणेत येऊन मा.आयुक्त यांनी महापालिकेतील लेखा संवर्गातील सेवाजेष्ठ व मुख्य लेखापाल पदाची अर्हता प्राप्त श्री.सुरेश तु.आव्हाळे यांना मुख्य लेखापाल पदावर नियमानुसार पदोन्नती देणेबाबत शिफारस करणेत येऊन सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव महापालिका सभेकडे पाठविणेबाबत मान्यता दिली आहे.

श्री.राजेश गो.लांडे यांची शैक्षणिक पात्रता ही इंजिनिअरींग क्षेत्रातील असल्याने सदरची पात्रता मनपाने ठरवलेल्या शैक्षणीक अर्हतेनुसार नाही.

श्री.आव्हाळे यांची महापालिकेतील एकूण सेवा ३३ वर्ष व लेखाधिकारी पदासाठी सेवा १० वर्ष होऊन अधिक झाली आहे ते कलम ५३ नुसार मुख्यलेखापाल पदाची अर्हता धारण करीत असलेने मुख्यलेखापाल पदावर नेमणुक करणेचे अधिकार महापालिका सभेस असलेने श्री.राजेश गो. लांडे यांना शासन सेवेत त्वरित परत पाठविणेत येऊन श्री.सुरेश तु. आव्हाळे यांना मुख्यलेखापाल पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.भारती फरांदे –** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब, या उपसूचनेमध्ये सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता त्वरित या विषयाची अंमलबजावणी व्हावी. सेक्शन ५३ असल्याने यावर महापालिकेचाच अधिकारी रुजू करुन घ्यावा असा आमचा सभागृहाचा एकमताने ठराव आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर**-हा विषय उपसूचनेसहित मंजूर करण्यात येत आहे. पण मा.योगेश बहल यांनी जी अट टाकली आहे की, सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता. परंतू तसे नाही. सभावृत्तांत कायम झाल्यानंतर ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – ९१३ विषय क्रमांक-४
दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.भारती फरांदे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव –
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.९२ दि.८.८.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ११ सहाय्यक आयुक्त पदे शासन मंजूर आहेत. त्यापैकी ६ पदे शासनाच्या प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांमधून तर उर्वरित ५ पदे ही महापालिका सेवेतील प्रशासन अधिकारी संवर्गामधून भरण्यात येतात. महापालिका सेवेतील अधिका-यांमधून भरावयाच्या पदांपैकी एक पद अनुसूचित जाती (प्रवर्ग) साठी राखीव असून ते अनेक वर्षांपासून रिक्त आहे. सदर रिक्त पदावर अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रशासन अधिकारी श्री.अण्णा यशवंतराव बोदडे यांना अनुभवाची अट शिथील करुन त्यांचा महापालिका सेवेतील १८ वर्षाचा अनुभव लक्षात घेवून त्यांना सहाय्यक आयुक्त म्हणून पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच  पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नव्याने सेवा प्रवेश नियम तयार करणेत आले असून त्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेवून शासन मान्यतेकामी पाठविण्यात आलेले आहेत. सदर सेवा प्रवेश नियमामध्ये सहाय्यक आयुक्त पदावर पदोन्नतीकरीता प्रशासन अधिकारी पदावरील ३ वर्ष अनुभवाची अट विहीत करण्यात आलेली आहे.

सहाय्यक आयुक्त संवर्गातील मंजूर ११ पदापैकी ६ पदे शासन सेवेतील तर ५ पदे मनपा अधिका-यामधून पदोन्नतीने भरण्याची तरतूद आहे. मनपामार्फत भरावयाच्या पदापैकी २ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदावर प्रशासन अधिकारी पदाच्या सेवाजेष्ठता यादीतील प्रथम क्रमांकावरील श्री.मनोज नंदकुमार लोणकर यांना खुल्या प्रवर्गांतून शासन मान्यतेच्या अधिन व आवश्यकता भासल्यास अनुभवाची अट शिथील करुन सहाय्यक आयुक्त पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच स्थापत्य विभागातील सह शहर अभियंता पदावर बढती होवून रिक्त होणा-या व नव्याने निर्माण होणा-या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदासाठी अर्हतेनुसार व अनुभवानुसार पात्र असलेले १) श्री.मनोज सेठिया २) श्री.राजेंद्र राणे ३) श्री.विजयकुमार काळे ४) श्री. शिरीष पोरेडी ५) श्री.अजय सुर्यवंशी ६) श्री.सुनिल भागवानी या सर्व उपअभियंता यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शासन निर्णय क्र.पी.सी.सी.३०८९/६४४/सी.आर.-९७/नवि २२ दि.१ डिसेंबर १९८९ अन्वये सहाय्यक आयुक्त (सामुहीक विकास) अशा अभिनामाचे १ पद मंजूर आहे. सदरचे पद महापालिका स्थरावर विवीध सामाजिक विकासाच्या योजना राबविण्याकरिता निर्माण करणेत आलेले आहे. त्यामुळे सहाय्यक आयुक्त (सामुहीक विकास) या पदावर पदोन्नतीने नेमणुक करणेकरिता आवश्यक असणारी  शैक्षणिक पात्रता मा.महापालिका सभा ठराव क्र. ७२१ दि.२१.०८.२००९ अन्वये निश्चित करणेत आलेली आहे. तसेच याच ठरावान्वये या पदाचा पदोन्नती सोपान निश्चित करणेत आलेला असून तो समाज विकास अधिकारी वर्ग २ असा आहे. या पदावरील अधिका-याची सेवाजेष्ठता विचारात घेवून तसेच शैक्षणिक पात्रता व अनुभव धारण करणा-या उमेदवारास सहाय्यक आयुक्त (सामुहीक विकास) या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यास मा.महापालिका सभा ठराव क्र. ७२१ दि. २१.०८.२००९ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. नागरवस्ती विकास योजना विभागात समाज विकास अधिकारी वर्ग-२ या पदावर कार्यरत असणारे श्री. संभाजी भगवान ऐवले हे सहाय्यक आयुक्त (सामुहीक विकास) या पदाची सर्व अर्हता पुर्ण करीत असल्याने त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाजेष्ठता, गोपनिय अहवाल व आरक्षण इत्यादी सेवा विषयक तपशील विचारात घेवुन शासन निर्णय

दि.५.१०.२०१५ मधील तरतूदी नुसार अनुभव कालावधी शिथील करुन पदोन्नतीपुर्व पदावरील ९० % नियमित सेवा ग्राह्य धरुन वेतनश्रेणी रक्कम रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० सहाय्यक आयुक्त या पदावर श्री.संभाजी भगवान ऐवले समाज विकास अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ (४) मधील तरतूदी नुसार शासन मान्यतेच्या अधीन राहुन पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये १ मुख्यलेखापाल पद मंजुर आहे. सदरचे पद असांविधीक असून, महापालिकेतील लेखा संवर्ग पदोन्नती साखळी मधील आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ खालील महापालिका सभेस सदरचे पद भरावयाचे अधिकार आहेत.

पिंपरी चिंचवड नगरपालिकेची स्थापना १९७१ साली झाली, सन २३/०२/१९७९ मध्ये नगरपालिकेसाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पदास मंजूरी दिली आहे. तदनंतर दि.११/१०/१९८२ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थापना झाली. महानगरपालिका सभा क्र.४७ दि.०६/१२/१९८३ मध्ये महापालिकेसाठी लेखा संवर्गासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग व शैक्षणिक पात्रता निश्चित केली आहे. त्यानुसार मुख्य लेखापाल पदाची अर्हता सी.ए. किंवा बी.कॉम व १० वर्षाचा लेखाधिकारी पदाचा अनुभव अशी निश्चित केली होती. त्यानुसार महापालिका सभा क्र. ३ विषय क्र. ५८ ठराव क्र. ३२७६ अन्वये महानगरपालिकेतील श्री.एन.एन.लोंढे यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदावर दि.१६/८/१९९६ रोजी पदोन्नती देण्यात आली होती. मा.महापालिका सभा क्र. ९ विषय क्र.१७ ठराव क्र. ३३७६ दि.१९/१२/१९९६ अन्वये मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदाचे पदनाम मुख्य लेखापाल असे करणेस मान्यता देणेत आली आहे. मा.आयुक्त यांनी दि २७/१२/२००४ च्या पत्रान्वये मा.अवर सचिव नगरविकास मंत्रालय, मुंबई यांना मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मुख्य लेखापाल) हे पद संचालक लेखा कोषागारे यांचे नियंत्रणाखाली आणण्याची आवश्यकता वाटत नाही असा स्पष्ट अभिप्राय दिला आहे.

श्री.लोंढे हे दि ३१/०५/२०१० रोजी सेवानिवृत्त झालेनंतर महापालिका सभा ठराव क्र. ८७४ दि.२०/०५/१० अन्वये दि.०६/१२/१० रोजी श्री.विलास तुकाराम भोसले या महापालिकेतील अधिकारी यांस मुख्य लेखापाल पदावर पदोन्नती देणेत आली.

मा.विधी समिती कडील ठराव क्र.३२ दि.१५/०१/२०१६ अन्वये महापालिकेतील मुख्य लेखापाल हे पद असंविधीक असल्याने लेखाधिकारी पदावर काम करणा-या कर्मचा-यांमधुन सेवाजेष्ठतेनुसार व पात्रतेनुसार नियमानुसार मुख्यलेखापाल या पदावर पदोन्नती देणेत यावी व शासनाकडून प्रतिनियुक्तीवरील अधिका-यांची नेमणूक करण्यात येऊ नये व प्रशासन विभागाने या संदर्भात तपासणी करुन प्रस्ताव फेरसादर करावा व या पदावर प्रतिनियुक्तीवर अधिकारी पाठवू नये असे शासनास कळविणेस मान्यता दिली होती.

वित्त विभाग मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.३१ मे २०१६ चे आदेशान्वये श्री.प्रमोद भोसले, यांची सोलापूर महानगरपालिका येथे मुख्य लेखा परिक्षक या पदावर बदली व नेमणूक झाली असल्याने प्रशासन कडील दि.२३/०६/२०१६ च्या आदेशान्वये श्री.प्रमोद भोसले यांना कार्यमुक्त करुन त्यांचा मुख्य लेखापाल पदाचा पदभार श्री.सुरेश तुकाराम आव्हाळे या सेवाजेष्ठ व मुख्य लेखापाल पदाची अर्हता प्राप्त अधिका-याकडे देणेत आला. याबाबत प्रशासन विभागाने वेळेत निवड समिती घेऊन मुख्य लेखापाल पदावर पदोन्नती देणे आवश्यक होते.

परंतु वित्त विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.१५ जुन २०१६ च्या आदेशान्वये श्री.राजेश गो. लांडे यांची मुख्य लेखापाल या पदावर प्रतिनियुक्तीव्दारे नेमणूक केली त्यामुळे दि.०१/०७/२०१६ रोजी श्री.आव्हाळे यांचेकडील मुख्य लेखापाल पदाचा पदभार काढून श्री.लांडे यांचेकडे सोपविणेत आला.

मा.विधी समिती कडील ठराव क्र. ८९ दि१५/०७/२०१६ मा.आयुक्त यांचेकडील विषयपत्रानुसार त्यांची नियुक्ती महापालिकेत ठेवणेसाठी मान्यता घेणेचा विषय सभेपुढे ठेवला असता सदर सभेमध्ये सदरचा विषय फेटाळणेत येऊन श्री.लांडे यांची महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने केलेली बदली रद्द करुन त्यांना शासन सेवेत परत पाठविणेत येऊन मा.आयुक्त यांनी महापालिकेतील लेखा संवर्गातील सेवाजेष्ठ व मुख्य लेखापाल पदाची अर्हता प्राप्त श्री.सुरेश तु.आव्हाळे यांना मुख्य लेखापाल पदावर नियमानुसार पदोन्नती देणेबाबत शिफारस करणेत येऊन सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव महापालिका सभेकडे पाठविणेबाबत मान्यता दिली आहे.

श्री.राजेश गो.लांडे यांची शैक्षणिक पात्रता ही इंजिनिअरींग क्षेत्रातील असल्याने सदरची पात्रता मनपाने ठरवलेल्या शैक्षणीक अर्हतेनुसार नाही.

श्री.आव्हाळे यांची महापालिकेतील एकूण सेवा ३३ वर्ष व लेखाधिकारी पदासाठी सेवा १० वर्ष होऊन अधिक झाली आहे ते कलम ५३ नुसार मुख्यलेखापाल पदाची अर्हता धारण करीत असलेने मुख्यलेखापाल पदावर नेमणुक करणेचे अधिकार महापालिका सभेस असलेने श्री.राजेश गो. लांडे यांना शासन सेवेत त्वरित परत पाठविणेत येऊन श्री.सुरेश तु. आव्हाळे यांना मुख्यलेखापाल पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

विषय क्रमांक-५

दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.नंदा ताकवणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव-
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.९७ दि.८.८.२०१६

महाराष्ट्र शासनाने मा.आमदारांचे मानधन वाढीचे बाबतीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन्मा.नगरसदस्यांचे सध्याचे मासिक मानधनामध्ये वाढ करुन मासिक मानधन र.रु.५०,०००/- करण्यात यावे. तसेच नगरसेवकांच्या नगरसेवक पदाच्या कार्यकालाप्रमाणे त्यात वाढ करण्यात यावी. तसेच कायद्यातील तरतूदीनुसार असलेल्या मा.पदाधिकारी यांना देखील शासनाकडील लागू करणेत आलेल्या प्रणालीनुसार मा.पदाधिकारी यांचे पदानुसार मानधन निश्चित करण्यात यावे. तसेच माजी नगरसदस्य यांना देखील

शासनाकडील लागू करणेत आलेल्या प्रणालीनुसार मासिक पेन्शन योजना चालू करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.स्वाती साने –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.संजय काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, विषय क्रमांक ५ या विषयाबद्दल काय करायचे ते करा. या विषयाला अनुसरुन मी एक पत्र मा.महापौर आपणाला देत आहे. जी मानधन वाढ होणार आहे. मी स्वतःच्या बाबतीत बोलतोय की, आता २०१७ मध्ये निवडणूका आल्या आहेत. मी प्र.क्र.६४ मधून निवडून आलो आहे. मला मानधनात वाढ नको आहे. किंबहूना माझे यापुढील मिळत असलेले माझे मानधन बंद करण्यात यावे असे पत्र मी आपल्याला देतो आहे.

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, हा ठराव मा.विधी समितीने मंजूर केला होता. मा.महापौर, हा ठराव मंजूर करत असताना एकतर बाकीच्या कुठल्याही सदस्यांशी किंवा कुठल्याही गटनेत्यांशी चर्चा केली होती असे मला वाटत नाही. आत्ताच मा.संजय काटे यांनी सांगितले, माझे मानधन बंद करा किंवा पुढील मानधन देऊ नका. या विषयात नगरसचिव, मा.उल्हास जगताप यांनी सुद्धा खुलासा करावा की, असा विषय किती वेळा मंजूर झालेला आहे. बरेच वेळा झालेला आहे. तो काय मंजूर होत नाही. आता निवडणूकीच्या तोंडावर जेव्हा या विषयाची चर्चा होणार, जेव्हा बातम्या येणार, तेव्हा बाकीच्यांची हिरोगिरी चालू होणार. या विषयावरुन फुकटचा प्रचार होणार. ज्यांना घ्यायचे आहे त्यांनी घ्यावे, ज्यांना घ्यायचे नाही त्यांनी घेऊ नये हा विषय निश्चितपणे आहे. परंतू मा.महापौर साहेब, अशा प्रकारे हा विषय यापूर्वी किती वेळा झाला होता आणि त्याचा पाठपुरावा कोणी केला आहे. आमदार, खासदार यांचे मानधन जेव्हा वाढले. यावर चर्चा करायची आपली पात्रता नाही किंवा काहीही चर्चा केलीतरी तिथपर्यंत ती पोहोचू शकत नाही. परंतू हा विषय जो महापालिकेचा विषय आहे, यात तुम्ही प्रत्येकाला ॲन्सरेबल आहात. तुम्हाला लोकांना उत्तर द्यायचे आहे. मा.विधी समितीत हा विषय मंजूर झाला, लोकांना वाटले यांच्याकडे पन्नास हजार चालू झाले. लोकांना कळत नाही की, या विषयाला शासनाने मंजूरी दिली पाहीजे. परंतू याचे प्रतिसाद, पडसाद जे जे उमटणार आहेत. एक एक जण उभा राहणार. दहीहांडीप्रमाणे हा विषय चढत जाणार आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे. नगरसचिव श्री.उल्हास जगताप साहेब आपण सुद्धा खुलासा करावा. या पाठिमागे अशा प्रकारचा प्रस्ताव किती वेळा झाला आहे. याचा फॉलोअप कोणी केला होता. याचा उपयोग काय. फक्त आमचे समाधान होण्यासाठी विषय करत असालतर त्या विषयाला काही अर्थ नाही. मागील विषयाचे काय झाले का, त्याचा फॉलोअप कोणी केला का काय केले. यातून निव्वळ आणि निव्वळ नगरसेवकांवर ॲलिगेशन्स येणार आहेत. या विषयाचे काही गांभिर्य राहणार नाही. म्हणून नगरसचिव तुम्ही सांगा. महापौर तुम्ही सांगा.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, नगरसेवकाच्या मानधनात वाढ करायचा असा विषय मा.मोहिनीताई लांडे या महापौर असताना सुद्धा सभागृहात

आला होता. त्यानंतर परत एकदा मा.विधी समितीने हा विषय आपल्यासमोर आणला आहे. प्रथमतः आपण नगरसेवक आहोत, याचे माझ्याबरोबर इथल्या प्रत्येक निवडून आलेल्याला भान आहे. आपण सेवा करण्यासाठी इथे आलो आहोत. त्यामुळे जे मानधन देताय ते देखील इथून पुढे नाही दिलेत आणि आत्ता मा.संजय काटे यांनी जे सांगितले, इथून पुढील मानधन नको. मी तर म्हणेन की, या मागील १० वर्षांत जे मानधन घेतले तरी आपण आदेश केलाततर एकरकमी मानधन द्यायची माझी तयारी आहे. कोणी मानधन घ्यायचे, कोणी घ्यायचे नाही, कोणी हिरोगिरी करायची हा ज्याचा त्याचा विषय आहे. पहिले मुख्य म्हणजे आपण नगरसेवक आहोत, पगारी नाही. आमच्याकडे हा पगार आला नाहीतरी चालणार आहे. हे मानधन आले नाहीतरी चालणार आहे. आम्ही अधिकारी नाही आहोत याचा विसर कुठेही पडू देणार नाही. त्याचबरोबर माझी नगरसचिवांना विनंती आहे की, नगरसचिव साहेब, आपल्या महापालिकेचा दर्जा बघून नगरसेवकाचे मानधन ठरविले जाते ना. जोपर्यंत महापालिकेचा दर्जा बदलणार नाही, तोपर्यंत अशा प्रकारे मानधनात वाढ करायचा विषयच येऊ शकत नाही. त्यामुळे शासन ऑटोमॅटीकली वाढ लागू करते. कमिटीने निर्णय घेतला, एखादा ठराव केला असेल त्यांना मला नाव ठेवायचे नाही. इथे प्रत्येक जण निवडून आला आहे. त्याने काय मांडायचे काय मांडायचे नाही, याची त्याला स्वायत्तता आहे. त्याविषयी मला बोलायचे नाही. मला जो विषय पटत नाही, त्या विषयाला माझा विरोध आहे. नकार आहे. मा.महापौर साहेब, आपण आदेश केलात तर मागील साडे नऊ वर्षांचे माझे मानधन एकरकमी परत करायचा माझा मानस आहे, माझा शब्द आहे. त्याचबरोबर पुढील वाढीव मानधनात मला गृहित धरण्यात येऊ नये. धन्यवाद.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खरेतर पार्टी मिटींगमध्ये या विषयावर चर्चा झाली होती. मी याठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो की, निश्चितपणे उद्याच्या वर्तमानपत्रामध्ये पहिल्या चौकटीत हाच विषय असणार आहे. कार्यालयात बसलोतरी हाच पहिला विषय होणार आहे. कारण इथे काय चालते आणि आपले पत्रकार बांधव चौकटीत काय देतात. आणि नागरीकांमध्ये वेगळाच मेसेज जातो. पहिला प्रश्न काय तर आत्ता मा.सुलभाताई ऊबाळे यांनी सांगितल्याप्रमाणे, शासनाकडे हा विषय जाणार. त्याला मंजूरी मिळणार नाही मिळणार हा नंतरचा प्रश्न असणार आहे. परंतू आमच्यासारखे कार्यकर्ते याला सामोरे जाणार. मी इथे सांगू इच्छितो की, गणपती संपले, नवरात्र येणार आहेत. वर्गणी देताना लाखो रुपयांची वर्गणी द्यावी लागते याचे किती विशेष महत्व आहे मला माहित नाही. एवढ्या मोठ्या प्रभागात काम करत असताना नाना प्रकारचे खर्च, वर्गण्यांसाठी खर्च होत असतो. आणि हा फुकटचा विषय येऊन डोक्याला ताप करणार आहे. कोणाकोणाचे तोंड बंद करणार, कोणाकोणाशी चर्चा करणार आणि काय मिळणार, कधी मिळणार, कोण देणार. मा.सुलभाताई ऊबाळे यांनी सांगितल्याप्रमाणे या आधी किती वेळा हा विषय झाला आहे. एवढे सोप्पे आहे का, आज विषय केला की तो लगेच मंजूर झाला. डेफीनेटली पब्लिकमध्ये, नागरीकांमध्ये हा विषय येणार आहे. मला याठिकाणी कोणाचे व्यक्तिगत मत असेल, मा.संजय काटे यांनी सांगितले की, मानधन नको आहे. आता दोनच महिने राहीले आहेत. आता मानधन बंद करुन उपयोग होणार नाही. गंमतीचा भाग आहे पण मी सांगतोय की, हा विषय खरोखरच चुकीचा आहे. महापालिकेत निवडून येताना कोणी जबरदस्ती पगार म्हणून याकडे बघत नाही.

पगारासाठी निवडणूक लावत नाही. इथे पगार मिळणार आहे किंवा मानधन मिळणार आहे म्हणून कोणी निवडून येत नाही. ही एक जनसेवा आहे, लोकसेवा आहे. नगरसेवक म्हणून काम करत असताना नाना प्रकारच्या प्रश्नांना आम्ही सामोरे जात असतो. खर्च होत असतो. आता येणा-या निवडणूकीत आचारसंहिता, नाना प्रकारचे खर्च होणार आहेत. पण हा नको त्या वेळेला आलेला विषय आहे. माझे या विषयाला बिल्कूल समर्थन आहे. माझाही विरोध असणार आहे. मी याठिकाणी सभागृहाला विनंती करतो की, हा विषय इथे फेटाळून लावण्यात यावा. परत परत हा विषय आणून आम्हाला मनस्ताप करायचे काम करु नका. कार्यक्रमात जाताना सामान्य नागरीक आम्हाला विचारतात की तुम्ही हे काय करताय. मागील टर्म मध्ये दोन/तीन विषय असे झाले. त्या विषयांना सामोरे जाताना आमच्या नाकी नऊ आले. असे वाटते की, महापालिकेत काय चालले आहे. ३/४ जी.बी. मिटींगमध्ये एकच विषय आहे, मानधनाचा विषय आहे, भ्रष्टाचाराचा विषय आहे. मा.महापौर साहेब, माझी सभागृहाला कळकळीची विनंती आहे की, नसेलतर माझा या विषयात डेफीनेटली विरोध नोंदवून हा विषय फेटाळून लावा. धन्यवाद.

**मा.अनंत को-हाळे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, निश्चितपणे जेव्हा आपण कार्यकर्त्यामधून नगरसेवक होतो. परंतू जेव्हा आपण कार्यकर्ता असतो आणि नगरसेवक होण्यासाठी लोकांच्या घरोघरी जातो. मला या भागाचा विकास करायचा आहे. मला या भागात काम करायचे आहे. मला काहीतरी करुन दाखवायचे आहे. आपण या भावनेतून जेव्हा जातो, त्यावेळी ते आपल्याला निवडून देतात. त्यावेळी आपल्याला कल्पना असते की, आपल्याला निश्चितपणे आपल्या खर्चातून या सगळ्या गरजा भागवाव्या लागणार आहेत. त्यावेळी तो नगरसेवक या मानधनावर अवलंबून नसतो. ही जाणिव त्याला आधीसुद्धा असते, जेव्हा तो कार्यकर्ता असतो. निश्चितपणे हा प्रस्ताव मागे सुद्धा आला होता, मंजूर झाला होता. आत्ता नगरसेवकांनी पन्नास हजारांची मागणी केली आहे. लोकांमध्ये चुकीचा मेसेज जातो आहे. त्यांना वाटतेय की हा विषय मंजूर पण झाला आहे. खरेतर ही आमची गरज सुद्धा नाही. सगळ्यांकडे मोठ्या गाड्या आहेत. प्रत्येकाच्या घरात भरपूर सोनं आहे. विषय काय होतो, मानधन असताना सुद्धा हा ठराव का आला. जर आपली महापालिका अ, ब, क ज्या श्रेणीत बसत असेलतर त्यानुसार शासन नगरसेवकांचे मानधन वाढवेल. आपण मागणी का करायची. निश्चितपणे आपली ही मागणी चुकीची आहे. सर्वसामान्य कुटूंबातून मी नगरसेवक झालो आहे. वडीलांचा पगार तोच आहे आणि घरातला खर्च मात्र वाढतोय. मग निश्चितपणे माझा घरातला खर्च कसा कमी करता येईल. एखादा क्लास कमी लावला तर चालेल का. ज्यामुळे वडीलांचा खर्च कमी होईल. महापालिकेचे उत्पन्न वाढत नाहीय. हिच परिस्थिती इथे आहे. अशी मागणी करणे, असा विषय मंजूर करणे म्हणजे नागरीकांना ज्या विश्वासाने आम्हाला इथे पाठवले आहे, त्यांचा विश्वासघात केल्यासारखे वाटतेय. मनसेच्या सगळ्या नगरसेवकांचा या प्रस्तावाला विरोध आहे. माझे मत सुद्धा नोंदवून घ्यावे.

**मा.नंदा ताकवणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.विधी समितीत हा विषय आला होता. लोकसभेतसुद्धा खासदार, आमदारांचे पगार वाढले आहेत. आम्ही हा

विषय चांगल्या मताने आणला होता. मी विनंती करते की, हा विषय दप्तरी दाखल करण्यात यावा.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर** – सभागृहाचा वेळ घेऊ नका. हा विषय दप्तरी दाखल होत असेलतर सभागृहाचा वेळ घेऊ नका. चांगल्या कामासाठी सभागृहाचा वेळ घ्या. हा विषय दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – ९१४ | विषय क्रमांक-५
दिनांक-२९.८.२०१६ | विभाग-मा.आयुक्त

संदर्भः- १) मा.नंदा ताकवणे, मा.सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव-
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.९७ दि.८.८.२०१६

विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८१ | प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

विषय क्रमांक-६
दिनांक-२९.८.२०१६ | विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अरुणा भालेकर, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.६९ दि.२१.७.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील वाढीव क्षेत्राच्या हद्दीवरील मौजे चिखली व तळवडे हद्दीवरील २४ मीटर रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्यावरील शिवरकर चौक ते बालाजी स्कूलपर्यंत मोठया प्रमाणात दोन्ही बाजूने बांधकामे झालेली आहेत व सदर मिळकतधारक हे अल्पउत्पन्नधारक कामगार वर्ग आहे. त्यामुळे प्रस्तावित ९.०० मीटर रुंदीचा रस्ता महापालिकेस विकसित करताना अडचणी निर्माण होतील तसेच बाधीत मिळकतधारक बेघर होतील. त्यामुळे चिखली व तळवडे हद्दीमधील जो २४ मी. रस्ता प्रस्तावित केलेल्या रस्त्यापैकी शिवरकर चौक ते बालाजी स्कूलपर्यंत अस्तित्वातील रस्त्यासह ९ मीटर रुंदीचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुरेश म्हेत्रे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - प्रस्तुत विषयामध्ये प्रस्तावित ९ मीटर रुंदीचा रस्ता महापालिकेत विकसित करताना अडचणी निर्माण होतील तसेच बाधित मिळकतधारक बेघर होती, असा उल्लेख केलेला आहे. तरी सदर ठिकाणी प्रस्तावित ९ मीटर रुंदीच्या रस्त्याचे ऐवजी प्रस्तावित २४ मीटर रुंदीचा रस्ता अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.वसंत लोंढे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - मौजे रहाटणी येथील स.नं.८३ पैकी ४५ मी. रुंद रस्त्यालगतची नदी कडेची जागा मंजूर विकास योजनेनुसार हरीत पट्टयात (Green belt) समाविष्ट आहे. सदर जागेचे संबंधित जागा मालक हे सुमारे २.०० एकर क्षेत्र टि.डी.आर. अथवा खाजगी वाटाघाटीने रोख मोबदल्याचे स्वरुपात मुस्लीम समाजाच्या दफनभुमीसाठी देणेस तयार आहे. तरी मुस्लीम समाजाच्या दफनभुमीची निकड व मागणी लक्षात घेता सदरची जागा मुस्लीम समाजाच्या दफनभुमीसाठी आरक्षित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस तसेच सदरकामी हरकती व सुचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी मान्यता देणेत येत आहे तसेच सदरचा विषय पुढील कार्यवाही करणेसाठी व शासनास प्रस्ताव सादर करणेकरिता मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.विनोद नढे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - मौजे-चिखली येथे ग.नं. ६८० मध्ये १२ मी. रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्यामध्ये बांधकामे आहेत सदर रस्ता विकसित करणेस अडचण होत आहे. तसेच प्रस्तावित १२.०० मी. रस्त्याचे दक्षिण बाजूस अस्तित्वातील रस्ता आहे. त्यामुळे ग.नं. ६८० मधील १२ मी. रस्ता रद्द करुन तो भाग निवासी विभागात समाविष्ट करणे व अस्तित्वातील रस्त्यास १२ मी. रस्तारुंदीकरण गट नंबर ६८० मध्ये प्रस्तावित या रस्त्याचे आखणीस म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदलास मान्यता देणेत यावी.

**मा.अरुणा भालेकर** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे सांगवी येथील सर्वे क्र. ७ मधील मंजूर विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक ३२३ हे माध्यमिक शाळे करीता असुन सदर आरक्षणाचे जागेवर मनपाच्या विकास आराखडयाचे अगोदरची घरे आहेत व अनेकवेळा आरक्षण रद्दची मागणी झाली आहे. त्यामुळे सदर आरक्षण रद्द होणेकरीता मुंबई प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७

अन्वये फेरबदल होणेची कार्यवाही करावी तसेच सांगवी सर्वे क्र. ३ मधील लहान मुलांचे क्रिडांगणाचे आरक्षण क्रमांक ३२६ हे जागामालकांचे मागणीनुसार मुळानदीचे बाजूस पुर्व-पश्चिम असणा-या १८ मी. रुंदीचे रस्त्याजवळ नदीचे बाजूला स्थलांतरीत करावे व मुळ असणारे आरक्षण रहिवासी विभागात समाविष्ट करावे व म.रा.न.रा.अ. १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाचे कार्यवाहीस व सदर प्रस्ताव सूचना-हरकतींसह घेवून रीतसर राज्यशासनाकडे मान्यतेस पाठविणेस मान्यता देणेत यावी. तसेच मा.महापालिका ठराव क्रं. ७७४ दि.२०/११/२०१५ नुसार ज्या मिळकतधारकांचे मिळकतीचे क्षेत्र ० ते ३०० चौ.मी.पर्यंत आहे त्याऐवजी ज्या मिळकतधारकांचे मिळकती पैकी रस्त्याने/आरक्षणाने बांधीत क्षेत्र ० ते ३०० चौ.मी. पर्यंत आहे यानुसार दुरुस्ती करुन मिळकतधारकांना मोबदला अदा करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ३३ गवळीनगर मध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे विकास आराखडयातील आरक्षण क्र. ४०६ माध्यमिक शाळा क्षेत्रफळ १.३० हेक्टर भोसरी सर्व्हे नं. २११ पैकी व आरक्षण क्रं.४०८ चे मैदान क्षेत्रफळ ०.४० हेक्टर भोसरी सर्व्हे नं. २१२ पैकी असे आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील भोसरी परीसर अतिदाट लोकवस्ती असलेला परीसर असून त्या भागामध्ये असलेली आरक्षणे अदयाप विकसित झालेली नाहीत. त्यामुळे नागरीकांना पायाभुत सुविधांसाठी इतरत्र जावे लागते. प्रभाग क्र. ३३ गवळीनगर मध्ये असलेली आरक्षण क्र. ४०६ माध्यमिक शाळा व आरक्षण क्र. ४०८ खेळाचे मैदान हि अदयाप विकसित नसुन त्यामध्ये ब-याच ठिकाणी बांधकामे झालेली आहेत.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे विकास आराखडयातील उपरोक्त आरक्षणाच्या संपुर्ण क्षेत्रफळा पैकी बांधकाम झालेली क्षेत्रफळ वगळता उर्वरीत क्षेत्रफळ एम.आर.टी.पी. कलम ३७ अंतर्गत फेरबदल करुन ताब्यात घेणेत यावे. जेणेकरुन बांधकाम झालेले क्षेत्रफळ निवासी होऊन इतर क्षेत्र मनपा मार्फत जागा ताब्यात घेवून विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेव सद्स्थितीतील म.औ.वि.मं. यांचेकडून मनपाकडे हस्तांतरीत झालेल्या मोकळया भुखंडावर वेगवेगळया प्रयोजनाची बांधकामे प्रस्तावित आहेत व काही ठिकाणी झालेली आहे. हे भुखंड लवकरात लवकर विकसीत करणेसाठी नागरीक, सन्मा.सदस्य मागणी करीत आहेत सबब त्यासाठी या सर्व जागांवरील बांधकामांचे नकाशे मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. म.औ.वि.मं. बांधकाम नियमावलीनुसार करावयाच्या बांधकामाचा विचार करता काही ठिकाणी जागेच्या वापरामध्ये फेरबदल व विभाजन करणे आवश्यक आहे. तसेच MIDC DC RULES 2009 CLAUSE NO 21.6 नुसार काही जागांचे समायोजन करणे आवश्यक आहे.

म.औ.वि.मं. कडून मनपाकडे हस्तांतरीत झालेल्या जागांपैकी खुली जागा क्र. १ च्या उत्तर पुर्वीचे सुमारे १३२७.१३ क्षेत्राचे विभाजन करुन या १३२७.१३ चौ.मी. क्षेत्राचा वापर Amenity Space म्हणून करणे व ज GP-198 जागेतील तेवढेच क्षेत्र खुली जागा म्हणून वापरात बदल करणेचा प्रस्ताव म.औ.वि.मं.स सादर करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, ३७च्या आणि आरक्षणातील फेरबदल असेल, जागेत फेरबदल असेल एवढ्या उपसूचना आल्या आहेत की आम्हाला काही कळाले नाही. आम्ही ऑब्जेक्शन घेणारच आहोत. पण विषय कळू द्यायचा

नसेल, इतका फास्ट करणार असालतर मा.महापौर साहेब, हे योग्य नाही. या शहरात पायंडा पाडला आहे. पण विषय तर कळाला पाहिजे. आम्हाला या विषयाला विरोध करायचा नाही. चिखली-तळवडे २४ मी. रस्ता प्रस्तावित केला आहे. २४ मी. रस्ता असताना तो ९ मी.वर आणतोय. तुम्ही किती मीटरने रस्ता कमी करणार आहात. तिथे नागरीकांची घरे आहेत. तुमचे जे काही असेल ते. परंतू किमान विषयाची माहिती नाही. अशा प्रकारे एवढ्या उपसूचना आल्या तर आम्हाला त्यात काय समजणार आहे. आरक्षण फेरबदलाचे विषय आहेत. तुम्ही रस्ता शिफ्ट करताय. पार्क स्ट्रीटचा रस्ता काढताय. तर मग हे रस्ते सुद्धा काढले पाहिजेत. याचेसुद्धा शिफ्टींग काढले पाहिजे. परवा दिवशी नगरसेवक निलेश बारणे यांनी आरोप केला. मग यात व्यवहार झाला नाही असे कसे म्हणता येणार नाही. हे सगळे विषय तुम्ही सभागृहापुढे ठेवा. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की, तुम्ही हा विषय मंजूर करु नका. पुढील वेळी आम्हाला या सगळ्या उपसूचनांचा अभ्यास करु द्यात. आणि अभ्यास केल्यानंतर मंजूर करायचा का नाही हा तुमच्या हातातला विषय आहे. परंतू आत्ताच घाईघाईने अशाप्रकारे विषय करणे हे योग्य नाही. म्हणजे एकाला एक न्याय, दुस-याला दुसरा न्याय, असे न करता सगळ्यांना एकच न्याय दिला पाहिजे. इतके विषय आले आहेत, याच्यावर मला काही बोलायचे नाही. कारण हे विषय उपसूचनेद्वारे आले आहेत. आम्हाला काहीच कळालेले नाही. विषय तरी वाचू द्यात. सगळ्यात महत्वाचे आहे. ही तहकूब जी.बी. आहे. तहकूब जी.बी.त उपसूचना घ्यायची तरतूद आहे का हे मा.नगरसचिव यांनी सांगावे. आणि जर या उपसूचनांवर कार्यवाही होणार नसलेतर, त्या उपसूचना मंजूर होणार नसतीलतर आपण त्या नगरसेवकांच्या तोंडाला पाने पुसतोय. कलम ३७ च्या ज्या उपसूचना घेतोय, अधिका-यांबाबतीत ज्या उपसूचना घेतोय. तहकूब जी.बी.त तसे करु शकत नाही. तुम्हाला तसे हायकोर्टाचे निर्देश आहेत, तसा निर्णय आहे. तुमचं एवढं फास्ट फास्ट चालू आहे. ताई म्हणाल्या विषयाला विरोध करणार का. आम्ही आमचे म्हणणे शंभर टक्के मांडणार. आजपर्यंत मांडतोय. मा.महापौर साहेब, इतके बेजबाबदारपणे सभागृह चालवले नाही पाहिजे. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की, एकतर या सगळ्या उपसूचना नगरसेवकांना अभ्यासासाठी द्या. त्यांना त्या वाचू द्यात. त्यांनी कशाला हो म्हटले नाही म्हटले. असे करणार असालतर मा.आयुक्त साहेब, मा.नगरसचिव साहेब पुढील वेळी कोर्टाच्या आदेशाचा अवमान केला म्हणून पुढील वेळी मी तुम्हाला कोर्टाची नोटीस बजावणार आहे.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ९१५ विषय क्रमांक-६

दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अरुणा भालेकर, मा.वसंत लोंढे यांचा प्रस्ताव –
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.६९ दि.२१.७.२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील वाढीव क्षेत्राच्या हद्दीवरील मौजे चिखली व तळवडे हद्दीवरील २४ मीटर रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्यावरील शिवरकर चौक ते बालाजी स्कूलपर्यंत मोठया प्रमाणात दोन्ही बाजूने बांधकामे झालेली आहेत व सदर मिळकतधारक हे अल्पउत्पन्नधारक कामगार वर्ग आहे. त्यामुळे प्रस्तावित ९.०० मीटर रुंदीचा रस्ता महापालिकेस विकसित करताना अडचणी निर्माण होतील तसेच बाधीत मिळकतधारक बेघर होतील. त्यामुळे चिखली व तळवडे हद्दीमधील जो २४ मी. रस्ता प्रस्तावित केलेल्या रस्त्यापैकी शिवरकर चौक ते बालाजी स्कूलपर्यंत अस्तित्वातील रस्त्यासह ९ मीटर रुंदीचा रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रस्तुत विषयामध्ये प्रस्तावित ९ मीटर रुंदीचा रस्ता महापालिकेत विकसित करताना अडचणी निर्माण होतील तसेच बाधित मिळकतधारक बेघर होती, असा उल्लेख केलेला आहे. तरी सदर ठिकाणी प्रस्तावित ९ मीटर रुंदीच्या रस्त्याचे ऐवजी प्रस्तावित २४ मीटर रुंदीचा रस्ता अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच मौजे रहाटणी येथील स.नं.८३ पैकी ४५ मी. रुंद रस्त्यालगतची नदी कडेची जागा मंजूर विकास योजनेनुसार हरीत पट्टयात (Green belt) समाविष्ट आहे. सदर जागेचे संबंधित जागा मालक हे सुमारे २.०० एकर क्षेत्र टि.डी.आर. अथवा खाजगी वाटाघाटीने रोख मोबदल्याचे स्वरुपात मुस्लीम समाजाच्या दफनभुमीसाठी देणेस तयार आहे. तरी मुस्लीम समाजाच्या दफनभुमीची निकड व मागणी लक्षात घेता सदरची जागा मुस्लीम समाजाच्या दफनभुमीसाठी आरक्षित करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेस तसेच सदरकामी हरकती व सुचना मागवून अंतिम निर्णय घेणेकामी मान्यता देणेत येत आहे तसेच सदरचा विषय पुढील कार्यवाही करणेसाठी व शासनास प्रस्ताव सादर करणेकरिता मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मौजे-चिखली येथे ग.नं. ६८० मध्ये १२ मी. रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर रस्त्यामध्ये बांधकामे आहेत सदर रस्ता विकसित करणेस अडचण होत आहे. तसेच प्रस्तावित १२.०० मी. रस्त्याचे दक्षिण बाजूस अस्तित्वातील रस्ता आहे. त्यामुळे ग.नं. ६८० मधील १२ मी. रस्ता रद्द करुन तो भाग निवासी विभागात समाविष्ट करणे व अस्तित्वातील रस्त्यास १२ मी. रस्तारुंदीकरण गट नंबर ६८० मध्ये प्रस्तावित या रस्त्याचे आखणीस म.प्रा.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदलास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे सांगवी येथील सर्वे क्र. ७ मधील मंजूर विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक ३२३ हे माध्यमिक शाळे करीता असुन सदर आरक्षणाचे जागेवर मनपाच्या विकास आराखडयाचे आगोदरची घरे आहेत व अनेकवेळा आरक्षण रद्दची मागणी झाली आहे. त्यामुळे सदर आरक्षण रद्द होणेकरीता मुंबई प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल होणेची कार्यवाही करावी तसेच सांगवी सर्वे क्र. ३ मधील लहान मुलांचे क्रिडांगणाचे आरक्षण क्रमांक ३२६ हे जागामालकांचे मागणीनुसार मुळानदीचे बाजूस पुर्व-

पश्चिम असणा-या १८ मी. रुंदीचे रस्त्याजवळ नदीचे बाजूला स्थलांतरीत करावे व मुळ असणारे आरक्षण रहिवासी विभागात समाविष्ट करावे व म.रा.न.रा.अ. १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाचे कार्यवाहीस व सदर प्रस्ताव सूचना-हरकतींसह घेवून रीतसर राज्यशासनाकडे मान्यतेस पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका ठराव क्रं. ७७४ दि.२०/११/२०१५ नुसार "ज्या मिळकतधारकांचे मिळकतीचे क्षेत्र ० ते ३०० चौ.मी.पर्यंत आहे" त्याऐवजी "ज्या मिळकतधारकांचे मिळकती पैकी रस्त्याने / आरक्षणाने बांधीत क्षेत्र ० ते ३०० चौ.मी. पर्यंत आहे यानुसार दुरुस्ती करुन मिळकतधारकांना मोबदला अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ३३ गवळीनगर मध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे विकास आराखडयातील आरक्षण क्र. ४०६ माध्यमिक शाळा क्षेत्रफळ १.३० हेक्टर भोसरी सर्व्हे नं. २११ पैकी व आरक्षण क्रं.४०८ चे मैदान क्षेत्रफळ ०.४० हेक्टर भोसरी सर्व्हे नं. २१२ पैकी असे आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील भोसरी परीसर अतिदाट लोकवस्ती असलेला परीसर असून त्या भागामध्ये असलेली आरक्षणे अदयाप विकसित झालेली नाहीत. त्यामुळे नागरीकांना पायाभुत सुविधांसाठी इतरत्र जावे लागते. प्रभाग क्र. ३३ गवळीनगर मध्ये असलेली आरक्षण क्र. ४०६ माध्यमिक शाळा व आरक्षण क्र. ४०८ खेळाचे मैदान हि अदयाप विकसित नसुन त्यामध्ये ब-याच ठिकाणी बांधकामे झालेली आहेत.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचे विकास आराखडयातील उपरोक्त आरक्षणाच्या संपुर्ण क्षेत्रफळा पैकी बांधकाम झालेली क्षेत्रफळ वगळता उर्वरीत क्षेत्रफळ एम.आर.टी.पी. कलम ३७ अंतर्गत फेरबदल करुन ताब्यात घेणेत यावे. जेणेकरुन बांधकाम झालेले क्षेत्रफळ निवासी होऊन इतर क्षेत्र मनपा मार्फत जागा ताब्यात घेवून विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेव सद्स्थितीतील म.औ.वि.मं. यांचेकडून मनपाकडे हस्तांतरीत झालेल्या मोकळया भुखंडावर वेगवेगळया प्रयोजनाची बांधकामे प्रस्तावित आहेत व काही ठिकाणी झालेली आहे. हे भुखंड लवकरात लवकर विकसीत करणेसाठी नागरीक, सन्मा.सदस्य मागणी करीत आहेत सबब त्यासाठी या सर्व जागांवरील बांधकामांचे नकाशे मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. म.औ.वि.मं. बांधकाम नियमावलीनुसार करावयाच्या बांधकामाचा विचार करता काही ठिकाणी जागेच्या वापरामध्ये फेरबदल व विभाजन करणे आवश्यक आहे. तसेच MIDC DC RULES 2009 CLAUSE NO 21.6 नुसार काही जागांचे समायोजन करणे आवश्यक आहे.

म.औ.वि.मं. कडून मनपाकडे हस्तांतरीत झालेल्या जागांपैकी खुली जागा क्र. १ च्या उत्तर पुर्वीचे सुमारे १३२७.१३ क्षेत्राचे विभाजन करुन या १३२७.१३ चौ.मी. क्षेत्राचा वापर Amenity Space म्हणून करणे व ज GP-198 जागेतील तेवढेच क्षेत्र खुली जागा म्हणून वापरात बदल करणेचा प्रस्ताव म.औ.वि.मं.स सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

विषय क्रमांक-७

दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.
क्र.वैद्य/०३/कावि/७२७/२०१६ दिनांक ०४/०८/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये नियमितपणे व पूर्णवेळ तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध व्हावेत या उद्देशाने वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टीट्यूट सुरु करणेकामी प्रस्तावित करण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने आवश्यक असलेले सर्व कागदपत्रांची पूर्तता त्यावेळी करण्यात आलेली होती. त्यामध्ये बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयासमवेत (ससून रुग्णालय) Under Graduate Basis Science Affiliation, MUHS कडील परवानगी व संलग्नीकरण, राज्य शासनाकडून अध्यापक वर्गाची पदमंजूरी व Essentiality Certificate, DMER कडील परवानगी इ. बाबींचा समावेश होता. तथापि, केंद्र शासनाचे आरोग्य मंत्रालयाकडून आवश्यक असलेले Medical Council of India Post Graduate Medical Education Regulations, 2000 अंतर्गत कलम 8(1A) चे Exemption Certificate त्यावेळी प्राप्त न झाल्यामुळे सदरचे इन्स्टीट्यूट कार्यान्वित होऊ शकलेले नाही.

तदनंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी मा.आयुक्त, आरोग्य वैद्यकीय अधिकारी व कुलगुरु, MUHS यांचेशी दुरध्वनीवरुन समक्ष चर्चा करुन सदर पोस्ट ग्रॅज्युएट इन्टीट्यूट सुरु करणेकरिता महानगरपालिकेमार्फत पुनश्च: पाठपुरावा करणेबाबत कळविलेले आहे. परंतु याकामी ३ वर्षांचा कालावधी उलटून गेला असल्याने वरील सर्व मंजूरी / परवानगी पुनश्च: घेण्याची आवश्यकता आहे. याबाबत चर्चा करणेकामी दि. १४/०७/२०१६ रोजी डॉ.म्हैसकर, मा.कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व डॉ.चंद्रकांत मुंगळ, व्याख्याता, नांदेड वैद्यकीय महाविद्यालय यांचेशी चर्चा करणेकामी मा.आयुक्त सो यांचेमार्फत बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते.

सदर बैठकीमध्ये डॉ.म्हैसकर, मा.कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी यापूर्वी वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये कार्यान्वित करावयाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम हा MUHS-PCMC Post Graduate Institute असे संयुक्त विद्यमाने कामकाज करण्यात आलेले होते. त्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा आर्थिक स्वरुपात व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचे शैक्षणिक स्वरुपाचा सहभाग होता. तथापि, Medical Council of India यांचेमार्फत Exemption Certificate प्राप्त करणेकरिता संस्थेमार्फत स्वतंत्रपणे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणे आवश्यक असल्याने सदरचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम हा पूर्णपणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत स्वतंत्रपणे राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे.

तथापि, यापूर्वी महानगरपालिकेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका व MUHS, नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये अभ्यासक्रम राबविणेकरिता मा.महापालिका सभा ठराव क्र.११७ दि.२०/०९/२०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे जर

महानगरपालिकेमार्फत स्वतंत्ररित्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविण्याचा असल्यास त्याकरिता मा.महापालिका सभेचे ठरावामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेमार्फत वाय.सी.एम. रुग्णालयाकरिता स्वतंत्रपणे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम (Post Graduate Institute) सुरु करणेकामी व त्याकरिता आवश्यक असलेले संलग्नीकरण शुल्क महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे भरणेकामी मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खरेतर मला याच विषयावर बोलायचे होते. आपल्या सहकारी मा.सिमा सावळे यांनी हायकोर्टाचा काय निर्णय आणलेला आहे, काय आदेश आणला आहे तो आम्हाला सर्व नगरसेवकांना मिळाला तर बरे होईल. सभा तहकूब असेलतर का विषय तहकूब असेलतर कशाला उपसूचना देता येत नाही याचे आम्हाला सुद्धा स्पष्टिकरण झालेतर बरे होईल. विषय तहकूब नव्हता म्हणून या उपसूचना आल्या असतील.

**मा.महापौर** – मा.पठाणताई विषयावर बोलत जा.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, त्यांनी जोर द्यायचा, त्यांनी निर्णय द्यायचा, आम्ही ऐकायचे, मा.महापौर काय चालले आहे.

**मा.महापौर**–मा.सिमाताई तुम्ही शांत रहा. आदेश काहीही असू देत. पठाणताई, तुम्ही विषयावर बोला. विषयावर बोलायचे नसेलतर खाली बसा. हा आदेश न्यायालयाचा असेतर सर्वांसाठी आहे का. मग यात एवढे राग यायचे काय कारण आहे. आपला विषय वेगळा आहे.

**मा.शमिम पठाण**– मा.महापौर साहेब, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात मेडीकल कौन्सिल ऑफ इंडीया कडून पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करतोय. मेडीकल इन्स्टिट्युटकडून एमबीबीएस कोर्स सुरु करतोय. त्याबाबतीत मला इथे माजी आयुक्त मा.श्रीकर परदेशी यांचे अभिनंदन करायचे आहे. त्यांनी याबाबतीत विशेष सहकार्य केलेले आहे. त्यांनी याबाबतीत विशेष पुढाकार घेतला आहे. ते सध्या दिल्लीमध्ये कार्यरत आहेत. तिथे असून सुद्धा त्यांनी याठिकाणची निकड, याठिकाणची आवश्यकता लक्षात घेऊन त्यांनी हे काम स्वतः जातीने प्रयत्न करुन केले आहे. म्हणून मी सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करते. एवढेच सांगायला मी उभी होते.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.श्रीकर परदेशी साहेब वायसीएम हा जो विषय होता, त्याच अनुषंगाने मान्यतेसाठी हा विषय आला आहे. आपल्याकडे मेडीकल कॉलेज सुरु झाल्यानंतर ज्या पद्धतीने आपल्याला डॉक्टर्स मिळणार आहेत. मी त्यावेळी त्यांना विनंती केली होती की, आपल्याकडे नर्सिंग कॉलेज सुरु केलेतर

आपल्याला जास्तीत जास्त नर्सेस सुद्धा उपलब्ध होतील. डॉ.श्रीकर परदेशी साहेब असताना सुद्धा त्यांनी नर्सिंग कॉलेजचे काम सुरु केले होते. पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या बघता, शहरातील रुग्णालयांची संख्या बघता, आता भोसरी इथे रुग्णालय होते आहे, थेरगाव इथे होणार आहे. च-होली इथे होणार आहे. चिखली इथे रुग्णालय होणार आहे. ही सगळी रुग्णालयांची संख्या बघता मी उपसूचना देते आहे. परंतू एकदा डॉ. रॉय सरांनी याची सगळी माहिती सभागृहाला द्यावी. माझ्या माहितीप्रमाणे बहुतेकांना सगळी माहिती आहे. परंतू तरीसुद्धा या विषयाची माहिती द्यावी. मा.महापौर साहेब, मी या विषयाला उपसूचना देते की - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये नियमितपणे नर्सेस (परीचारीका) उपलब्ध व्हावेत या उद्देशाने वाय.सी.एम.रुग्णालयामध्ये मेडीकल पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमबरोबरच नर्सिंग इन्स्टिटयूट/कॉलेज चालू करणेस व त्या अनुषंगाने आवश्यक असणा-या परवानग्या घेण्यास व संलग्नीकरण शुल्क भरण्यास मान्यता देणेत यावी.

या विषयाबरोबरच तो विषय जावा. या विषयाला मान्यता मिळणार आहे. परंतू नर्सिंग कॉलेजसाठी त्याबरोबरीनेच प्रयत्न करावेत. कारण मेडीकल कॉलेजचा विषय होणारच आहे. परंतू नर्सिंग कॉलेजसाठी चांगल्या पद्धतीने प्रयत्न केले गेले पाहिजेत. नाहीतर एकच विषय पुढे जाईल. दुसरा विषय मागे राहील. माझ्या माहितीप्रमाणे नर्सिंग कॉलेजसाठी आपल्याला परवानगी मिळू शकते. केंद्र सरकारकडे विषय जाणार आहे. म्हणून नर्सिंग कॉलेजला मान्यता मिळण्यासाठी तातडीने त्याची प्रोसिजर सुरु करावी अशी मी विनंती करते.

**मा.स्वाती साने** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.डॉ.अनिल रॉय (आरोग्य वैद्यकीय अधिकारी)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, आज आपल्यासमोर विषय आहे, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टीट्युट/कॉलेज सुरु करण्याबाबत आहे. सदर विषय आपण २०१२ मध्ये मंजूर करुन घेतलेला आहे. तथापी तेव्हा महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल नाशिक व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हे इन्स्टिट्युट तयार केले होते. तेव्हा आवश्यक त्या परवानग्या घेतल्या होत्या. शासनाचे इसेन्शियल सर्टीफीकेट, लोकल इन्सपेक्शन कमिटीची मान्यता, एनसीआयची मान्यता घेतली होती. केंद्र सरकारकडून एक्झम्पशन सर्टिफिकेट मिळते ते प्राप्त झाले नाही म्हणून यात खंड पडला. त्यानंतर हा विषय २/३ वेळा त्यांच्यापुढे ठेवला तरी त्यांनी आपल्याला परवानगी दिली नाही. गेल्या तीन/चार महिन्यांपूर्वी तत्कालीन आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी पी.एम. ऑफीसवरुन केंद्रीय आरोग्य मंत्र्यांशी चर्चा करुन सदर विषय परत पाठवण्यासाठी आम्हाला निर्देश दिले. त्या अनुषंगाने ते आयुक्त साहेबांशी बोलले. श्री.भेसेकर, व्हाईस चान्सलर एमओयू, नाशिक यांच्याशी बोलले. त्यानंतर त्यांनी स्वतः येऊन आयुक्तांबरोबर चर्चा केली. त्यावेळी निर्णय असा झाला की, we just work with PCMC. तेव्हा ठरले की, आपण डी.ओ. ऑथोरीटी, पूर्ण फायनान्शियल पॉवर एमयूएचएस यांना द्यावी. तुम्ही तुमच्या लेव्हलवर एकटेच हे करा. आम्ही तुम्हाला बाकीच्या परवानग्या देतो. म्हणून हा विषय संलग्नीकरण शुल्क भरण्यास मान्यता देण्यासाठी आला आहे. आज आपण १५ कोर्सेससाठी

मान्यता घेतोय. याअगोदर ११८ पदांसाठी प्रोफेसर, लेक्चरर इ. पदांसाठी शासनाकडून मान्यता आली आहे. पदांसाठी मान्यता आहे. फक्त बाकी कागदपत्रे, इतर इसेन्शियल मान्यता व एमसीआयची मान्यता, एक्झम्पशन अंडर सेक्शन ८ए नुसार मान्यता घ्यायची आहे. याकरिता पूर्म एक वर्षाचा कालावधी लागेल. कागदपत्रांसाठी स्पेसिफीक टाईम पिरियड असतो. कुठला कागद कुठल्या महिन्यात द्यायचा. त्यामुळे आपण हे अगोदर करु शकत नाही. साधारणपणे पुढील २१ मे पर्यंत हे पूर्ण होईल. मागे जेव्हा आपण सुरु केले होते तेव्हा आपल्याकडे साईडरुम होती. ती आपल्याकडे आहे. याकरिता क्लासरुम लागत नाही. नर्सिंग कॉलेजबाबतीत आम्ही महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांच्या संपर्क साधून नर्सिंग कॉलेज सुरु करण्याबाबत प्रयत्न करु.

**मा.मंगलाताई कदम** – त्याचे लिमिट बघून घ्या आणि त्याप्रमाणे करा.

**मा.डॉ.अनिल रॉय (आरोग्य वैद्यकीय अधिकारी)** – त्याचे काय नियम असतात त्याप्रमाणे बघून करुन घेऊ. धन्यवाद.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब,उपसूचना स्विकारली आहे.

**मा.आशा शेंडगे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर आज महापौरांचे बदललेले रुप पाहून खूप आनंद झाला. मा.महापौर तुमचे मनोमन अभिनंदन. मी खूप वेळा हात वर केला. तुम्ही मला या विषयावर बोलायला संधी दिलीत त्याबद्दल तुमचे मनापासून आभार मानते. खरेतर डॉ. श्रीकर परदेशी साहेब इथे नसताना सुद्धा त्यांचे या महापालिकेवर असलेले प्रेम, त्यांचे आपल्याकडे असलेले लक्ष. मी त्यांना भेटले, बोलले की, साहेब, हे होणार आहे का. ते म्हणाले, बहुतेक करुन हे रद्द होणार आहे. तरीसुद्धा पुन्हा एकदा इथे त्यांची उपस्थिती नसतानाही, डॉ.श्रीकर परदेशी साहेबांनी नवीन संजीवनी द्यावी. आणी आपल्या महापालिकेबद्दल असलेले त्यांचे प्रेम, त्यांचा जिव्हाळा पुन्हा एकदा प्रकट केला. म्हणून पुन्हा एकदा मी त्यांचे महापालिकेच्या सगळ्या सदस्यांच्यावतीने मनापासून अभिनंदन करते. खरेतर इतक्या चांगल्या अधिका-याला आपण मुकलो, हे या महापालिकेचे दूर्देव आहे. एवढेच सांगून थांबते. जयहिंद, जयमहाराष्ट्र.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसहित मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ९१६ विषय क्रमांक-७
दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.
क्र.वैद्य/०३/कावि/७२७/२०१६ दिनांक ०४/०८/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये नियमितपणे व पूर्णवेळ तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध व्हावेत या उद्देशाने वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टीट्यूट सुरु करणेकामी प्रस्तावित करण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने आवश्यक असलेले सर्व कागदपत्रांची पूर्तता त्यावेळी करण्यात आलेली होती. त्यामध्ये बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयासमवेत (ससून रुग्णालय) Under Graduate Basis Science Affiliation, MUHS कडील परवानगी व संलग्नीकरण, राज्य शासनाकडून अध्यापक वर्गाची पदमंजूरी व Essentiality Certificate, DMER कडील परवानगी इ. बाबींचा समावेश होता. तथापि, केंद्र शासनाचे आरोग्य मंत्रालयाकडून आवश्यक असलेले Medical Council of India Post Graduate Medical Education Regulations, 2000 अंतर्गत कलम 8(1A) चे Exemption Certificate त्यावेळी प्राप्त न झाल्यामुळे सदरचे इन्स्टीट्यूट कार्यान्वित होऊ शकलेले नाही.

तदनंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी मा.आयुक्त, आरोग्य वैद्यकीय अधिकारी व कुलगुरु, MUHS यांचेशी दुरध्वनीवरुन समक्ष चर्चा करुन सदर पोस्ट ग्रॅज्युएट इन्टीट्यूट सुरु करणेकरिता महानगरपालिकेमार्फत पुनश्च: पाठपुरावा करणेबाबत कळविलेले आहे. परंतु याकामी ३ वर्षांचा कालावधी उलटून गेला असल्याने वरील सर्व मंजूरी / परवानगी पुनश्च: घेण्याची आवश्यकता आहे. याबाबत चर्चा करणेकामी दि. १४/०७/२०१६ रोजी डॉ.म्हैसकर, मा.कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व डॉ.चंद्रकांत मुंगळ, व्याख्याता, नांदेड वैद्यकीय महाविद्यालय यांचेशी चर्चा करणेकामी मा.आयुक्त सो यांचेमार्फत बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते.

सदर बैठकीमध्ये डॉ.म्हैसकर, मा.कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी यापूर्वी वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये कार्यान्वित करावयाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम हा MUHS-PCMC Post Graduate Institute असे संयुक्त विद्यमाने कामकाज करण्यात आलेले होते. त्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा आर्थिक स्वरुपात व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचे शैक्षणिक स्वरुपाचा सहभाग होता. तथापि, Medical Council of India यांचेमार्फत Exemption Certificate प्राप्त करणेकरिता संस्थेमार्फत स्वतंत्रपणे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणे आवश्यक असल्याने सदरचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम हा पूर्णपणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत स्वतंत्रपणे राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे.

तथापि, यापूर्वी महानगरपालिकेमार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिका व MUHS, नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने वाय.सी.एम. रुग्णालयामध्ये अभ्यासक्रम राबविणेकरिता मा.महापालिका सभा ठराव क्र. ११७ दि.२०/०९/२०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे जर महानगरपालिकेमार्फत स्वतंत्ररित्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविण्याचा असल्यास त्याकरिता मा.महापालिका सभेचे ठरावामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेमार्फत वाय.सी.एम.रुग्णालयाकरिता स्वतंत्रपणे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम (Post Graduate Institute) सुरु करणेकामी व त्याकरिता आवश्यक असलेले संलग्नीकरण शुल्क महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे भरणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये नियमितपणे नर्सेस (परीचारीका) उपलब्ध व्हावेत या उद्देशाने वाय.सी.एम.रुग्णालयामध्ये मेडीकल पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमबरोबरच नर्सिंग इन्स्टिटयूट/ कॉलेज चालू करणेस व त्या अनुषंगाने

आवश्यक असणा-या परवानग्या घेण्यास व संलग्नीकरण शुल्क भरण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

विषय क्रमांक-८

दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील
जा.क्र.पअक/३/कावि/२८६/२०१६ दि.५/०८/२०१६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ६७ (अ) अन्वये प्रत्येक महानगरपालिकेने लगतपूर्ववर्ती शासकीय वर्षासंबंधीचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येईल, अशा पध्दतीने दरवर्षी मा.महापालिका सभेकडे सादर करणे बंधनकारक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१५-१६ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या डी.पी.एस.आय.आर. या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवाल मा.महापालिका सभेस सादर करावयाचा आहे.

सबब पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१५-१६ चा पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल मा.महापालिका सभेसमोर ठेवणेत आला.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.अमिना पानसरे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – ९१७ विषय क्रमांक-८

दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील
जा.क्र.पअक/३/कावि/२८६/२०१६ दि.५/०८/२०१६

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

ठराव क्रमांक – ९१८ विषय क्रमांक-९

दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे कडील
जा.क्र.आमुका/२/कावि/४६७/२०१६ दि.५/८/२०१६

देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१५ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defection Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई - ३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५ व शासन निर्णय क्र.स्वमअ २०१६/प्र.क्र.१३/२०१६-१७ दि. १३/०६/२०१६ अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | १,२४,९६,०००/- | २,४९,८८,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग (माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ५०,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,६७,०३,०००/-** | **२,६३,९१,००० /-** |
| | | **केंद्रशासनव राज्य शासन एकूणअनुदान** | **४,३०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येत लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ८०००/- , राज्य शासनाचे र.रु. ४०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३१/१/२०१६ अखेरसोबत सादर केलेले प्रपत्र "अ "प्रमाणे कामकाज झालेले आहे. शासन निर्णय क्र.स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/ नवि-३४,दिनांक१९/११/२०१५अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा" असे कळविलेले आहे.तसेच स्वच्छ भारत अभियानासाठी मा. पंतप्रधान यांनी महाराष्ट्र राज्याकरिता नामनिर्देशित केलेल्या खेलरत्न व अर्जुन पुरस्कार विजेत्या नेमबाज अंजली भागवत यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी ब्रॅन्ड अम्बॅसिडर म्हणून नियुक्ती केलेली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/०७/२०१६अखेर केलेल्या कार्यवाहीची माहितीखालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|
| जिल्हा | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | ५२८८ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | ५००७ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | ३६१६ | |

| | | | |
|---|---|---|---|
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुतीशौचालय | २८२३ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | २३१७ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ३५६१ लाभार्थी | GOI+GOM= २१३.६६ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ७१.२२ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **२८४.८८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १३४६ लाभार्थी | GOI+GOM= ८०.७६ लाख | GOI =२०००/- व GOM= ४०००/- हिस्सा |
| | | ULB = २६.९२ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **१०७.६८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १०वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

ठराव क्रमांक – ९१९ विषय क्रमांक-१०
दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**मा.विधी समिती**

अ) दि. १/७/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.१५/७/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

ठराव क्रमांक – ९२० विषय क्रमांक-११
दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि. ८/६/२०१६ व दि.२२/६/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.१३/७/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

ठराव क्रमांक – ९२१ विषय क्रमांक-१२
दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.२/६/२०१६, दि.१६/६/२०१६ व दि.७/७/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२१/७/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

ठराव क्रमांक – ९२२ विषय क्रमांक-१३
दिनांक-२९.८.२०१६ विभाग-मा.नगरसचिव

**मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

अ) दि.१५/६/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे

ब) दि.७/७/२०१६ व दि.११/७/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.राजू मिसाळ** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४वर पुढीलप्रमाणे ठराव मांडते आहे.

ठराव क्रमांक – ९२३
दिनांक-२९.८.२०१६

विषय क्रमांक-१४
विभाग-मा.नगरसचिव

संदर्भ :- १) मा.अतुल शितोळे, मा.सदगुरु कदम यांचा प्रस्ताव.
२) मा.क प्रभाग समिती सभा ठराव क्र.१८२ दि.७/७/२०१६
३) मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील जा.क्र.कक्षे/कावि/८४/२०१६ दि.५/८/२०१६

सांगवी प्रभाग क्र. ५९ मधील सर्व्हे नं. १२ उदयान आरक्षण क्र. ३१९ "उदयान" मनपाचे ताब्यात घेणेत येत आहे. तरी सांगवी परिसरातील

१. संत गोरा कुंभार, सातपुडा सोसायटी
२. शिवसृष्टी उदयान, जयमाला नगर
३. छत्रपती शिवाजी उदयान, मधुबन सोसायटी
४. संत सावतामाळी उदयान, PWD कॉलनी परिसर
५. वेताळ महाराज उदयान, सांगवी गावठाण हे

सांगवी विकसीत झाले असून ही तुर्त नवीन उदयानाची गरज नसून आरक्षण क्र. ३१९ जागेचा वापर क्रीडांगणा करता करावे अशी MRTP कलम ३७ अन्वये कार्यवाही करावी व तेथे त्याकरिता आवश्यक सुविधा मनपा मार्फत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर** – सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/१०/कावि/११६/२०१६
दिनांक – ०५/१२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.